
९०/६५

मध्यप्रांत संशोधन मंडळ, नाग
(पुरस्कृतग्रंथमाला : क्रमांक पां

श्रीसर्वज्ञ चक्रधरनिरूपित

दृष्टान्तपाठ

[यादवकालीन मराठींतील गद्य प्रबंध]



सन १९३७]

[नेने-सवाळकर

५४|६५

श्री सर्वज्ञ

चक्रधरनिरूपित

दृष्टांत-पाठ

नीळकंठ बळवंत भवाळकर, बी. ए., बी. एल्.
मराठीचे अध्यापक, सेंट्रल कॉलेज फॉर वुईमेन, नागपूर.
हरी नारायण नेने, एम्. ए., एल्. टी.
अध्यापक, पटवर्धन हायस्कूल, नागपूर.

(सर्व हक स्वाधीन)

किंमत दीड रुपया.

प्रकाशक—**हरी नारायण नेने**, एम्. ए., एल्. टी.
शिक्षक, पटवर्धन हायस्कूल, नागपूर.

मुद्रक—**पांडुरंग नारायण बनहट्टी**, बी. एस्सी.,
व्यवस्थापक, **नारायण मुद्रणालय**,
सिताबर्डी, नागपूर.

संपादक—**नेने-भवाळकर.**

पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें—

१. **श्री. पां. ना. बनहट्टी**, धनतोली, नागपूर.
२. **श्री. कृ. जोग**, व्यवस्थापक, सरस्वती प्रेस, उमरावती.
३. **भिसे-ब्रदर्स**, सिताबर्डी, नागपूर.



नामदार दादासाहेब खापर्डे

विश्वविद्यालयांत व न्यायमंदिरांत,
राजसभेंत व विद्वत्परिषदेंत
गेल्या शतकार्धांत
ज्यांनीं आपलें अग्रस्थान
अबाधितपणें कायम ठेविलें आहे;

आणि

ज्यांना वऱ्हाडच्या जुन्या पिढीचा प्रतिनिधि
व नव्या पिढीचा आदर्श मानतात;
अशा नामदार श्रीमंत

गणेश श्रीकृष्ण खापर्डे,

बी. ए., एल्एल्. बी.

मेंबर, कौन्सिल ऑफ स्टेट,

यांना, हा जुन्या मराठींतील

पहिला गद्य-प्रबंध

अत्यंत आदरभावानें अर्पण केला आहे.

—संपादक.

मध्यप्रान्त संशोधन मंडळाचा पुरस्कार

मंडळाच्या पुरस्कृत ग्रंथमालेंतील पहिलें पुष्प म्हणून, श्रीसर्वज्ञ चक्रधरनिरूपित **दृष्टान्तपाठ** या यादवकालीन मराठी **गद्यप्रबंधाचा** गौरवपूर्वक पुरस्कार करितांना कार्यकारी मंडळाला आनंद होत आहे. 'नागपूरकर भोंसल्यांची बखर' या ग्रंथाच्या द्वारें 'स्वीय' व प्रस्तुत ग्रंथ-द्वारा 'पुरस्कृत' अशा दोन्ही ग्रंथमालांचीं पहिलीं पुष्पें वाचकांच्या हातीं एकाच वेळीं देण्याचा हा सुयोग जुळलेला पाहून, इतिहास व वाङ्मय ह्या दोन्ही अंगांनीं संस्थेच्या प्रकाशनकार्याच्या प्रारंभाला शुभशकुनच झाला असें म्हणावेंसें वाटतें. मंडळाचे सभासद 'नेने–भवाळकर' या दोघांनीं प्रस्तुत ग्रंथ–**दृष्टान्तपाठ**–मोठ्या परिश्रमानें व चिकित्सापूर्वक संपादिला हें त्यांस भूषणावह असून, ते सर्वांचे धन्यवादास पात्र आहेत यांत संशय नाहीं. प्राचीन वाङ्मयाचे–विशेषतः महानुभावीय मराठी वाङ्मयाचे अभ्यासक व संशोधक या नात्यानें, प्रो० भवाळकर व श्रीयुत नेने यांनीं पूर्वी मिळविलेल्या कीर्तींत प्रस्तुत गद्यग्रंथाच्या प्रकाशनानें अधिकच भर पडली आहे. मार्मिक प्रस्तावना, मूळ सांकेतिक ग्रंथाचा मराठी उतारा, व्यासंगपूर्वक दिलेल्या टीपा, 'दृष्टान्तपाठावर' अधिष्ठित झालेल्या इतर महानुभावीय ग्रंथांतील पोषक अवतरणें, तौलनिक दृष्टीनें व्याकरणविषयक चर्चा, इत्यादि अनेक दृष्टींनीं सुसंस्कृत केलेला हा **गद्यप्रबंध** प्राचीन मराठीच्या जिज्ञासू वाचकांस विशेष उपयुक्त असल्यानें त्याचा महाराष्ट्र-रसिक वाचकांकडून योग्य आदर होईल अशी आशा आहे.

नागपूर
ता. १४–१–३७
(मकरसंक्रांत)

श्री. ल. पांढरीपांडे,
चिटणीस, म० सं० मंडळ, नागपूर.

मध्यप्रांत संशोधन मंडळानें आपल्या पुरस्कृत ग्रंथमालेंत **दृष्टान्तपाठ** या ग्रंथाचा स्वीकार केल्याबद्दल आम्ही मंडळाचे आभारी आहोंत.

—संपादक.

शुद्धिपत्र

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
२	४	यदार्थ	पदार्थ
३	२३	रत्नें सति	रत्नें असति
८	४	पावोनि	पावौनि
१३	७	नीररौनि	नीसरौनि
१८	१४	वीसवीति	नीसवीति
२१	२३	सांड	सोंड
२५	१०	षुरुषु	पुरुषु
२५	१५	"वरिपडा होसि" यानंतर	"एकी वासना" शब्द पाहिजे.
३३	१५	परमेश्वसंनिधानीं	परमेश्वरुसंनिधानीं
३४	३	शब्द	शाब्द
३५	२०	आवधीं	आवघीं
३६	२२	राजीं	राज्यीं
३८	७	भग	मग
३९	७	अपरोक्षीं दशे	अपरोक्षदशे
३९	१४	का जी	कांजी
३९	२४	मागातौ	मागौता
४१	६	कतुले	केतुले
४३	१३	होय	होए
४५	२१	कराडा	करांडा
४६	२१	स्वर्ग	खर्ग
४८	१८	दीसवाडी	दीसवडी
५१	३	बाबुळीवरि	बाबुळीं वरि
५१	११	डोळेनीचि	डोळेनीचि डोळेयातें
५३	२	प्रगठे	प्रगटे
५४	१	अज्ञात	अज्ञान

कांहीं संदर्भ ग्रंथ

हस्तलिखितें

१. उद्धरणप्रमेय (पृ. ११७)
२. विदेहीबल्हो (,, ,,)
३. दृष्टांतिकान्वय व्याख्यान (पृ. ११६)
४. दृष्टांतस्थळ (विश्वनाथ बास)
५. भाष्यस्थळ (पृ. १०९)
६. लीळाचरित्र: पूर्वार्ध (पृ
७. ,, उत्तरार्ध (पृ.९९–६८)
८. रत्नमालास्तोत्र.
९. स्मृतिस्थळ.
१०. लक्षणरत्नाकर (संस्कृत)
११. ,, मराठी व्याख्या.
१२. दुर्भंगाप्रमेय.
१३. शय्यापालनाप्रमेय.
१४. दृष्टांतमालिकाभाष्य (मुरारी बास)
१५. दृष्टांतटिप्पणी.

प्रकाशित ग्रंथ

१. ज्ञानेश्वरी
२. ज्ञानप्रबोध
३ उद्धवगीता
४ चक्रधरसिद्धांतसूत्रें–लक्षणपाठ (नेनें–भवाळकर प्रत)
५. श्रीचक्रधरोक्त सूत्रपाठ (नेनेप्रत)
६. लीलाचरित्र भा. १ एकांक.
७. नित्यदिनीलीळा : पूजावसर. (पृ. ६१–२)
८. ज्ञानेश्वर: अभंगगाथा (जोग–प्रत)
९. पाटण येथील शिलालेख. (पृ. ८१)
१०. ऋद्धपूरवर्णन. (पृ. ६७)
११. महावाक्यप्रमेय (वि. ज्ञा. विस्तार: नेने–भवाळकर प्रत)
१२. निरुक्त : राजवाडे (पृ. ६९)
१३. भा. इ. सं. मंडळ त्रैमासिक, वर्ष १३.
१४. ज्ञानेश्वरी व्याकरण (राजवाडे)
१५. दिगंबरजैनग्रंथमाला (प्रो. हीरालाल जैन).
१६. ज्ञानेश्वर दर्शन.

अनुक्रमणिका

महानुभावीय 'श्रुति'वाङ्मय

१. **चक्रधरसिद्धान्तसूत्रें**–भाग १ ला
(लक्षणान्वयपाठ) सटीप किंमत १॥ रुपया.
२. चक्रधरोक्त–**सूत्रपाठ** ,, ४ आणे.
३. **लीळाचरित्र**–भाग १ ला एकांक ,, ४ ,,
४. ,, ,, २रा पूर्वार्ध खंड १. ,, ६ ,,
५. **नित्यदिनलीळा**–(प्रसादसेवा, मूर्तिज्ञान,
पूजावसर व नामाचे दहा ठाय) ,, २ ,,
६. **दृष्टांतपाठ**–(सटीप आवृत्ति) ,, १॥ रुपया.

उपोद्घात

१. महानुभाव पंथाचे आद्य प्रवर्तक सर्वज्ञ श्रीचक्रधर हे उतरकालीन यादवांच्या राजवटींत सिंघणाच्या कारकीर्दींत विद्यमान होते. सिंघणाची कारकीर्द इ० स० १२१० ते १२४७, कन्हरदेवाचा अम्मल, इ० स० १२४७ ते १२६० व महादेवरायाचा इ० स० १२६०–१२७१ या तीन पूर्ण कारकीर्दी व पुढें रामदेवाच्या कारकीर्दीचीं पहिलीं दोन वर्षें, म्हणजे इ० स० १२७३ पर्यंत, श्रीचक्रधर बदरिकाश्रमीं जाईपर्यंत महाराष्ट्रांत होते. सिंघणानें गुजराथेंत ज्या चढाया, स्वाऱ्या केल्या त्यांपैकीं एकीमध्यें, कदाचित आकस्मिक स्वरूपाचा असा तो छापाही असणें संभवनीय आहे, भरंवस (भडोच) प्रांताच्या राजसेनेचें आधिपत्य चक्रधराकडे होतें, अशी पंथीयांची समजूत आहे. हा गुजराथेवरील चढाईचा काल १२१६–१९ असल्यामुळें तेव्हांपासून प्रयाणापर्यंत चक्रधरांच्या आयुष्याचा बहुतेक भाग विदर्भ,झाडीमंडळ-औरंगल-पैठण-श्रीनगर (सिन्नर) या प्रांतांत गेला. पूर्ववयांत आपला मूळचा देश "लाट" दक्षिण–गुजराथ-कायमचा पाठीशीं घालून व रामटेकच्या यात्रेचें निमित्त पुढें करून श्रीचक्रधर रिद्धपुरास आले; तेथें असणाऱ्या गोविंदप्रभु नामक विदेही वृत्तीच्या विरक्त पुरुषाचें दर्शन घेऊन व प्रसादस्वीकार करून त्यांनीं नंतरचा १२ वर्षांचा काल रानाडोंगरांत तपाचरणांत घालविला. या कालांतील त्यांच्या विदेह स्थितीचें वर्णन लीलाचरित्रांत (एकांक) थोडक्याच शब्दांत अत्यंत हृदयद्रावक तऱ्हेनें केलें आहे. 'गोसावी अवस्था स्वीकरिति : मार्गीं चालावेयाची प्रवृत्ति नाहीं : कांटेया केसकलाप गुंपति : ते वारेनि उगविती : कां : कव्हणि मनुष्य उगवी तेव्हळि । मूर्ति वोरखडे कांटे रूपति : असुधाचे बींदु निगति : ते साहाज पऱ्हरेयावरि मानकूलि तैसीं मीरवति (लीलाचरित्र-एकांक-लीला ८ : नेने प्रत.) गोसा-

त्यांना समाधी प्राप्त झाल्यावर त्यांना आपल्या देहाच्या हालचाळींची शुद्धी राहिली नाहीं; त्यांचे केस कांटेरी झुडुपांत अडकत, तेव्हां वाऱ्यामुळें तरी ते मोकळे होत अथवा करुणा उत्पन्न होऊन कोणी तो गुंता सोडविला तर ते मोकळे सुटत असत; मूर्तीच्या देहावर जे ओरखडे व कांटे खुपून रक्ताचे बिंदू साहजिक निघत ते त्यांच्या गौरवर्ण देहावर माणिकांच्या लहान खडयांप्रमाणें चमकत असत ! अशा प्रकारें सातपुडा झाडीमंडळांत बारा वर्षें घालविल्यावर चक्रधरांनीं 'एकाकी'–शिष्यपरिवार न जमवितां बरींच वर्षें प्रांतभर भ्रमण केलें. कधीं औरंगल तर कधीं भानारा (भंडारा), कधीं गोंडवण झाडीमंडळ तर कधीं अळंचपूर (एलिचपूर) असें अनियत अटन संचरण करीत त्यांनीं सुमारें ३०–३२ वर्षें घालविलीं. हा चरित्र-भाग लीला चरित्राच्या 'एकांक' भागांत विस्तारशः आला आहे व तो सांप्रत रा. नेने यांच्या आवृत्तीच्या द्वारें जिज्ञासूंना उपलब्ध झाला आहे. या काळांत भंडारा येथें त्यांना आपला पहिला अनुयायी 'दामोदरभट' हा लाभला; 'रामदरणा' म्हणून एलिचपूरचा देवगिरीकरांचा एक मांडलिक होता त्याचा स्नेहभाव संपादन केला; आंध्र देशांत वास्तव्य करून व कमलनायकाची मुलगी हंसांबा हिच्याशीं परिणय करून किंचित्काल ते संसारी बनले; पुन्हां वैराग्यवृत्ती बाणून झाडीमंडळांत भ्रमण केलें; 'लोणार क्षेत्रीं' महादेवरावाची भेट झाली;–इत्यादि सर्व 'एकांक' प्रकरणांत दिलें आहे. अशा प्रकारें संचार करीत ते पैठण येथें येऊन 'नागांबिका'–'बाइसे' नामक एका पयोव्रतधारी वृद्ध स्त्रीला अनुग्रह देऊन अवतारकार्यार्थ प्रगट झाले. कन्हरदेवाची भेट (एकांक: लीला ४१.) १२५६ च्या अंदाजांत झाली असावी; कन्हराची कारकीर्द १२६० मध्यें संपली व पैठणास प्रगट होण्याचा काल महादेवरायाच्या कारकीर्दींत जातो. (महादेवराय १२६०–१२७१.)

पैठणच्या दिशेनें प्रवास करीत असतां पुढें ज्याचा परिचय वाढत गेला व नागदेव व त्याचे आप्तसंबंधीय माणसांची चक्रधराकडे घरोब्याची जा ये सुरू झाली त्या 'रामदेवा'ची (दादोस) भेट झाली. पुढें श्रीनगर येथ चक्रधर असतां नागदेव हा आपली आई आबाइसे, बहीण उमाइसे, चुलत बहीण रूपाइसे उर्फ महदाइसे यांना समागमें व सोबतीस रामदेवास

घेऊन चक्रधरांच्या दर्शनास आला. हा घरोबा वाढत जात हें कुटुंब बव्हंशीं चक्रधरांच्या सेवेंत नंतर अखेरपर्यंत व्यग्र असे. चक्रधरांच्या दर्शनानंतर नागदेवाच्या वृत्तींत फरक पडूं लागला व वारंवार भेटी घेतल्यावर ६ व्या भेटीस वैराग्यबोध दृढ होऊन ७ व्या भेटीस नागदेवानें अनुग्रह घेतला. या नंतर ४ वर्षांनीं चक्रधर बदरीकेदारीं गेले. ('शके ११९४ श्रीमुख संवत्सरीं माहोमासीं शु० ४ सोमवारीं गोसावियां प्रवृत्यंतर जालें' स्मृतिस्थळ, १ ली लीला.)

२. पैठण येथें प्रगट झाल्यापासून बद्रिकेदारास जाईपर्यंत चक्रधरांचा जो ७–८ वर्षांचा काल, तो नित्य पर्यटनांत जात असे. एकाच जागीं चक्रधर फार दिवस राहात नसत; आणि जरी त्यांच्या दर्शनास कोणाची बंदी नसे, तरी त्यांनीं आपल्या सभोंवतालीं भक्त मंडळींची गर्दी जमविली नव्हती अथवा ते आपले सिद्धांत प्रतिपादन करीत व सभेंत विजय संपादन करीत हिंडतही नसत. जी जिज्ञासू, आर्त अगर ज्ञानी मंडळी त्यांच्या दर्शनास येई व सहजपणें ज्या चर्चा चालत, अगर एखादा विषय निघून प्रसंगप्राप्त असें जें निरूपण होई, त्याखेरीज वादविवादांचे असे आखाडे त्यांच्या बैठकींत पडत नसत. अशा वेळीं निरूपण करीत असतां आपला आशय श्रोत्यांच्या मर्यादित बुद्धीस अवगत व्हावा म्हणून चक्रधर अनेक दाखले, उदाहरणें व दृष्टांत सजवून तो आशय सहजगम्य करीत असत. निरूपणाच्या भरांत प्रतिपादनार्थ ज्या मंडनपद्धती लेखकांस उपयोजाव्या लागतात त्यांत, आणि जेव्हां आपलें म्हणणें श्रोत्यांच्या अंतःकरणावर वक्ता बिंबवीत असतो तेव्हां त्याची वृत्ती 'चांद्रमयी' करण्याकरितां तो वक्ता संभाषण पद्धतींतील युक्त्या, पकडी, प्रश्नप्रतिप्रश्न इत्यादिकांचा स्वीकार करितो; त्या दोहींत जमीन अस्मानाचा फरक असतो. पद्य जसें वेधक व मंजुळ, तसें गद्य हें भेदक व निर्णायक असावें लागतें. वादविवाद अगर संवादात्मक रचनेंत जें वैशिष्टच असतें तें वेगळ्याच प्रकारचें असतें; शंका-प्रश्नांच्या मारा सुरू असतां आपली बाजू सांवरून घेऊन व एखादा समर्पक दृष्टांत रंगवून प्रतिपक्षावर मात करणें हें जसें एखादा प्रसंगावधानी वक्ता करूं जाणतो, त्याप्रमाणें कोणत्या वर्गाच्या व ग्रहण शक्तीच्या श्रोत्यांना कोणत्या उदाहरणांचा दाखला समर्पक पटेल हें ओळखून त्यांचीच योजना

करून समाधान करणें ही योजकता थोड्यांच्या अंगीं असते. हीच वाद-कुशल बुद्धि सर्वज्ञांच्या ठायीं वसत होती.

३. गोसाव्यांच्या प्रयाणानंतर सर्व शिष्य गोविंदप्रभूंजवळ ऋद्धपूर येथें एकत्र झाले व नागदेवाचार्यांच्या अनुज्ञेनें माहींभटानें 'लीला चरित्राची' मांडणी केली. असें सांगतात कीं नागदेवास सदैव चिन्तना-निमग्न पाहून एकदां माहींभटानें पुसलें, 'भटो ! तुम्ही नित्य कोणत्या तरी स्मरणमननांत निमग्न असतां; कधींच मोकळे नसतां; तर आपल्या मनांत सदैव असें काय घोळत असतें ?' यावर नागदेवांनीं उत्तर दिलें कीं हें सर्व स्मरणमनन मी गोसाव्यांच्या आज्ञेप्रमाणें करीत आहे; 'येथौनि निरोपीलें वीचार : शास्त्र : अर्थ : ज्ञान : यांचें श्रवणमनन : निदिध्यास करावा : एथींचीं चरित्रें आठवीजेति : आइकीजती।' गोसाव्यांचा हा उपदेश मनांत पक्का बिंबल्यामुळें नागदेवांनीं हें कार्य आपण अधिक व्यापक कसें केलें तें माहींभटास पुढें सांगितलें. प्रारंभीं समोर घडलेल्या गोष्टी नागदेव ध्यानांत धरीत. पुढें गैरहजेरींत घडलेल्या गोष्टी त्यांनीं त्या वेळीं तेथें असणारांकडून पुसून घ्याव्या; नंतर स्वतःच्या अनुसरणापूर्वीं ज्या लीला 'बाइसादेखतां वर्तलीया' त्या सर्वज्ञांस पुसाव्या; प्रसंगप्राप्त निरूपिलेल्या इतिहासपुराणांतील गोष्टी, वेळोवेळीं केलेलें 'परावरनिरूपण' एलिचपुराहून पैठणास येईपर्यंत घडलेल्या गोष्टी सर्वज्ञ प्रसंगतः सांगत असत. हा सर्व सूक्ष्म निरीक्षणात्मक वृत्तांत ऐकून माहींभट थक्क झाले व त्यांनीं नागदेवास एक अपूर्व योजना सुचविली. 'सर्वज्ञें निरोपिलें ज्ञान : शास्त्र : आन सर्वज्ञें जीया केलीया लीला : सांगितलीया लीला : तुम्हांसि आठवि-ताति। तरि आतां : श्रीचरणसंनिधानीं : आम्हासि आन पुढां जो सर्वज्ञाचा मार्ग होइल : त्यासि तवं इतुके शास्त्र : न धरे। तरि सर्वज्ञाचिया लीळा : तुम्ही सांगा : आन : लीहीन :' ही गोष्ट नागदेवास पटली; हें सर्व जर 'काळाक्षरीं प्रतिपन्न' होईल तर तें 'मार्गासि उपयोगा जाइल : **सर्वज्ञातें मार्गाची प्रवृत्ति असे :** कां पा : सर्वज्ञें भणितलें : शास्त्र घेइजे : घोकीजे : मग काळे करूनि उपयोगा जाए'. चक्रधरांचें पैठण प्रांतांत वास्तव्य असतांनाच महानुभाव 'मार्गा'ची उभारणी झाली होती व चक्रधरांचे सूत्रबद्ध सिद्धांत त्यांचे शिष्य घोकीत असत, ही गोष्ट आतां

संशयातीत समजावी लागते. लीलाचरित्रांतच अनेक प्रकरणें शिष्यांकरवीं घोकवीत असत याबद्दल अनेक वेळां उल्लेख आले आहेत.

वरील बेत पक्का करून दररोज एक प्रहर या प्रमाणें माहींभटांनीं सहा महिन्यांत भटांच्या सांगण्याप्रमाणें कच्चा खर्डा तयार केला; नंतर ज्यांच्या समक्ष ज्या ज्या लीला घडल्या त्यांच्या जवळून अधिकोत्तर माहिती गोळा करून ती भटांच्या माहिती प्रमाणें पडताळून, भटांच्या अनुसरणापूर्वीच्या लीलांचा पूर्वार्ध, व त्या नंतरचा उत्तरार्ध, असे मुख्य भाग कल्पून व 'मग तीया लीळा भटाचेनि पुढें : श्रीप्रभुसंनिधानीं : लक्ष्मींधरभटीं : कोथळोबासीं : महादेवबासीं : त्रीपुरारीबासीं : घोकलीया ।' (भा. इ. सं. मंडळ, त्रैमासिक, वर्ष १३, अंक २). याच लीलाचरित्रांतून नंतर सांप्रदायिक पाठांच्या संहिता केशिराजांनीं नागदेवाचार्यांच्या अनुज्ञेवरून तयार केल्या. नागदेवाच्या शिष्यांत जे अनेक अधिकारी पुरुष होते त्या सर्वांत भटांनीं भास्कर पंडित व केशिराजबास या दोघांचीच फक्त फार प्रशंसा केली आहे. 'पंडिता (पंडित भास्करबास) : केशवदेया : तुम्हीं माझे डोळे कीं गा : म्हणितलें : तुमचेनिं माझी विद्या उजळली म्हणितलें ।" (स्मृतिस्थळ, लीला ६८)

४. 'केशिराज बास' यांच्या मूळ वास्तव्यस्थानाची 'स्मृतिस्थळ'-कारास माहिती नाहीं; परंतु ते पापदंडो रामपुरीचे विद्वांस व्याख्याते होते अशी जी लौकिकांत त्यांच्या वेळीं समज होती ती नमूद केली आहे.* ते ज्ञानभीक्षेसाठीं भटापासीं येऊन राहिले व नागदेवाची त्यांच्यावर मर्जी जडली; 'ते भट्टाचे थोर पढिये' होते. (स्मृतिस्थळ, लीळा १२) अल्पवयांत अंगीं बाणलेली वैराग्यवृत्ती केशिराजांच्या आप्तसोयऱ्यांना व विशेषतः सासऱ्यास धातुक वाटली; आणि त्यांचें मन वळवून त्यांनां संसाराची आस्था लागावी म्हणून अनेक युक्त्या आनेराज (वडील भाऊ)

---

*स्मृतिस्थळाच्या १८७ व्या लीलेंत ' अनंत ' कोचा ' ते अन्नोबासाचे आजे आणि सारंगपाणी ते पिते : या आवघेयां गोसाव्यांचे दर्शन जालें होते ।' असा उल्लेख आढळतो; अनंत कूचि हे कन्हराचे (१२४७-१२६०) कोशाधिकारी व दुर्गनियंत्रक होते असें म्हणतात, व ते बरखेड-वाडी (नजीक पैठण) येथील मूळचे रहिवासी होते.

व सासरची मंडळी यांनीं केल्या. मोठमोठ्या विवादपटु पंडितांना बोलावून केशिराजास निरुत्तर करण्याची खटपट केली; फार तर काय प्रत्यक्ष अर्धांगीच्या सांनिध्यांत तरी त्यांची वृती निवळेल या अपेक्षेने दोघांस एकाच खोलींत ठेऊन पाहिलें; परंतु जसें विद्वानांनीं केशिराजापुढें हात टेंकले त्याचप्रमाणें इकडे मुलीनेंही वडिलांस कळविलें कीं 'आतां हे योगिये जाले.' नागदेवास ही गोष्ट पुढें कळली तेव्हां त्यांनीं केशिराजाची फार प्रशंसा केली व हर्षभरानें 'माझा केशव शुकयोगींद्र कीं गा' असें म्हणाले. (स्मृतिस्थळ : लीळा१३).

'रत्नमालास्तोत्र' हा केशिराजांचा पहिला ग्रंथ असावा; श्वशुर-गृहीं असतांना या स्तोत्रकलापाची रचना झाली. ते नित्य सकाळीं स्नानास नदीवर जात व तेथें संध्यावंदनादि उरकल्यावर मागें नागदेवाच्या संनिध असतां ज्या चक्रधरलीला माहींभट भटोबासास दामोदरपंडितादिकांच्या बैठकींत वाचून दाखवीत असत, त्यांवर मनन करून केशिराज हें संस्कृतांत घाटावर बसून पद्यरचना करीत. लीलाचरित्रांतोल अनेक लीलांचा संस्कृ-तांत केशिराजांनीं जो असा पद्यात्मक अनुवाद केला आहे तोच रत्नमाला-स्तोत्रकलाप. (स्मृतिस्थळ, लीळा १४). याची रचना १२८४ मध्यें झाली व त्या जेव्हां नागदेवास वाचून दाखविल्या तेव्हां भटांनीं त्यांची वाहवा केली; 'भले केले केशवदेया : गोसावियाच्या अमोघ लीळा बांधलिया : तुवां वाक्पुष्पीं ईश्वरार्पण केलें।.' या प्रोत्साहनानें केशिराजांना अधिक हुरुप चढला व त्यांनीं हळूच समय पाहून नागदेवास विनंती केली कीं 'रत्नमाले' प्रमाणेंच उद्धरणप्रकरण देखील गीर्वाणस्वरूपांत तयार करूं काय? त्यावर नागदेवांनीं जें उत्तर दिलें तें प्रसिद्ध आहे व चक्रधरांची शिकवण संस्कृता-च्या बंदिखान्यांत कोंडून ठेवल्यास 'माझिया म्हातारिया नागवतील'– बाया बापड्या स्त्रीशूद्रादिकांचा उद्धार होणें दुष्कर होईल (स्मृ.ली.१५); आतां हें उत्तर सर्वांच्या परिचयाचें झालें आहे. चक्रधराचा ब्रह्मसिद्धांत संस्कृतांत नसावा हें मत नागदेवांनीं अनेक वेळां प्रगट केलें होते; एकदां वादविवादाच्या भरांत केशिराज संस्कृत परिभाषिक संज्ञा उच्चारुत गेले तेव्हां 'पंडित केशवदेया : तुमचा 'अस्मात् कस्मात्' नेणो : मज **चक्रधरें निरूपीली मऱ्हाटी** तियाचि पुसा।.' असें झणझणित उत्तर नागदेवानें

दिलें होतें; याचा परिणाम असा झाला कीं 'मग केसोवास संस्कृतबंध न करीतीचि।.' (स्मृतिस्थळ: लीला १५).

याव्यतिरिक्त असें केशिराजाचें चरित्र विशेष उपलब्ध नाहीं. ते स्वरूपानें अत्यंत सुंदर व देखणे होते व अंत:करणाचे खंबीर–शुकाप्रमाणें होते व स्त्रियांच्या मोहास वश झाले नाहींत. याविषयीं त्यांची इतकी प्रसिद्धी होती कीं अनिष्ट प्राप्त झालें असतां स्वसंरक्षणाचीच तेवढी प्रत्येक जण काळजी घेत असतो; परंतु केशोबासांना अनिष्टकालीं स्वत:पेक्षां पंथाची अब्रू अधिक वाटत असे अशी त्यांची 'स्मृतिस्थळां'त अभिनंदनीय स्तुति केली आहे. 'एके अनिष्ट आलेया आपणेयातें राखिले : एकेकातें राखोले : केशवदेनी मार्गातें राखिलें गा।' (स्मृतिस्थळ: लीला१०६) केशीराजाच्या आणखी दोन चार आख्यायिका स्मृतिस्थळांत दिल्या आहेत. चक्रधराचे अनुग्रहीत नाथोबा, ज्यांना गोसावी 'मंडलिका' असें संबोधीत, त्यांचे कटकदेमाइसे व वंको असे दोन शिष्य होते; एकदां वंकी हे कटक-देमाइसेकडे आले असतां भोजनार्थ केशीराजास आमंत्रण दिलें; 'वंको'च्या पंक्तीचा लाभ आहे हें मात्र त्यांना कळविलें नव्हतें; कारण 'वंकी ते अनेका व्यसनीचें : राभस्य राहाटीचे : गुरुकुळ तया न भेटे।.' भोजनप्रसंगीं केशीराजाचें पात्र माजघरांत व वंकोचें गाईचे गोठ्यांत मांडलें व जेव्हां वंको हे प्रतिग्रासीं 'चक्रधर' नामाचा उच्चार करूं लागले तो ऐकून केशिराजांनी चौकशी केली. वंकोवर गुरुकुळाची कृपा व्हावी ही पोटांत इच्छा असल्यामुळेंच देमाइसेने अशी युक्ती योजली होती; या प्रश्नावर कटकदेमाइसेनें उत्तर दिलें, 'पृथ्वीमध्यें परमेश्वरू दुर्लभ कीं ईश्वरातें चिंतिता तो दुर्लभ : भणौनिया मियां तुम्हां **करितां** वंकीतें बोलाविले।.' त्यावरि–'अपराध उपसाहिजे।' असें म्हणतां केशीराजांनी देमाइसेचें 'भलें केले' असें म्हणून समाधान केलें व वंकोबरोबर आनंदानें भोजन केलें; 'आतां येथौनि पुढिलाची रेघ आन मागिलाचा अनुताप : परद्वारिया सप्तव्यसनियांचा संसर्ग न करावा : त्यांपसीं उभे न ठाकावें वंकी।' असा उपदेश केला. (स्मृ. स्थळ: लीळा१३१) केशवबास, राघोभट व पंडित दामोदरबास यांना कवीश्वरबास 'एकमूर्ती त्रये भागा' म्हणत असत. (स्मृतिस्थळ : लीळा२५२) यांचे परस्परांत नित्य वादसंवाद चालत असत

व एकदां नागदेवांनीं यांना रिकामे दाखवावे अशी पैज मारली; 'केशव पंडित: रामातें: शास्त्रसंवादेविण जो उठितां बैसतां रीकामेया दाखवील: तयासि मी होड सारिन गा: ऐसें प्रशंसिलें।' (स्मृतिस्थळ: लीळा २५२) 'माझें शास्त्र माहींभटा लक्ष्मीधराचेनि नुजळेंचि: तें पंडित केशववदेयासि चर्चा करितां उजळलें।' (स्मृतिस्थळ: लीळा ६८) केशिराजांच्या पंथ-सेवेची योग्यता नागदेवांनीं चांगली जाणली होती; 'केशवदेया: माझेनि मुखें जें निरूपण: संशयो नाही: परि मज मागां शास्त्रजाए ना ऐसें तुवां केलें: एणें शास्त्रें पुढां मार्गाचिं झगडे तूटतील।' (स्मृ. स्थ. ली. २२४) नागदेवांचा काळ शके १२२४ शुभकृत संवत्सरीं भाद्र० व. १२ ला झाला इ. स. १३०२)

भटांच्या मागून तीन वर्षांनीं 'बाइदेव' आटोपले व पुढें दीड वर्षानें दामोदर पंडित वारले. दामोदरपंडितानीं मृत्यूकाळीं लीलाचरित्राची प्रसादपोथी कवीश्वरास दिली व सर्व गुरुकुळास तेथूनच 'लीले'चे पाठ देण्यांत येत असत. सिद्धांते हरिबासाच्या (उपाध्ये अम्नाय) 'वृद्धाचार अन्वय स्थळांत' केशिराजांचा निर्वाण शक १२३८ (इ. स. १३१६) दिला आहे. 'रत्नमालास्तोत्र' रचीत असतांना ते भरतारुण्यांत होते व तो काळ म्हणजे शके १२०६ हा केशिराजांच्या यौवनावस्थेचा मानल्यास आणि अंदाजें त्यांचा जन्म शके ११८० मानला असतां मृत्युसमयीं ते साठीच्या आसपास होते असें अनुमान निघतें.

ज्या प्रमाणें 'रत्नमालास्तोत्र' हा केशिराजांचा पहिला गीर्वाण ग्रंथ त्याप्रमाणें 'मूर्तिप्रकाश' हा त्यांचा पहिला मराठी ओवीबद्ध असावा अशी रूढ कल्पना आहे; परंतु कदाचित वडीलपणाचा हा मान 'दृष्टांत-पाठा'कडेही जाऊं शकेल या पाठाची गणना 'श्रुति' मागांत करितात व हा पहिला मराठी प्रबंध चक्रधरांच्या उद्धरणसिद्धांतावर एक उपनिषदच आहे असें म्हणण्याचा मोह आवरत नाही. श्रीमुखांतून हे दृष्टांत जेव्हां प्रथम अवतीर्ण झाले त्या वेळीं जशी त्यांच्यावर औचित्याची दीप्ती खेळत होती व ज्याप्रमाणें ती तेव्हां कारुण्यबुद्धीच्या अमृतरसानें थबथबलेली होती, तशीच ती केशिराजांच्या पाठांत संभाळली आहे. अवतारधारी परमेश्वराच्या जीवोद्धरण व्यसनाची कोंवळीक आणि आर्त मुमुक्षूच्या उद्धरण क्रियेच्या साक्षात्काराची हुरहुर, या दोहोंचा मधुर परिपाक या

पाठांत पूर्णपणें उतरला आहे. केशिराजांनी गुंफलेली ही माळ कठीं धारण करणारांना शीतळता, मार्दव, सुगंध इत्यादि तिचे गुण तर आवडतीलच पण मनोवृत्ती प्रफुल्ल करून, अंतःकरण निवळून आणि बुद्धी व भावना निर्वाळून तेथें सात्विक भावांचा उदय होईल हा भरंवसा आहे. दृष्टांत-स्तोत्राव्यतिरिक्त दुसरें 'ज्ञानकलानिधिस्तोत्र' केशिराजांनीं रचिलें आहे; आणि 'दृष्टांतपाठा'व्यतिरिक्त त्यांनीं लक्षण, आचार व विचार हे तीन सूत्रपाठ तयार केले आहेत ही गोष्ट सर्वपरिचितच आहे; म्हणून त्याबद्दल लक्षणपाठाच्या उपोद्घातांत जें आम्ही सांगितलें आहे त्याची येथें पुनरुक्ति केली नाहीं.

५. केशिराजांच्या दृष्टांतपाठावरील ' लापणिका'ची (परिशिष्ट २ रें पहा) जर 'लक्षण'पाठांतील 'उद्धरण' प्रकरणांतील सूत्रांशीं तुलना केली तर त्यांतील ६६ सूत्रांपैकीं जवळपास ४५ सूत्रांचा आशय लापणिकांत आढळेल; आणि असें होणें अपरिहार्य होतें; कारण चक्रधर-सिद्धांताचें मुख्यतः हेंच वैशिष्ट्य आहे. मनुष्यांचा उद्धार फक्त परमेश्वरच करूं शकतो; 'एकें परमेश्वरेंवीण' मनुष्य हा 'सृष्टीमध्यें कव्हणें करणें मूचिजेना'. हें उद्धरणकार्य करण्यास समर्थ असे 'अवतारी' कोणते, ते हें 'उद्धरणदान' कोणत्या साधनांनीं देतात, मुमुक्षूदशेस प्राप्त होणारे जीव मोक्षोद्यमी कसे होतात, इत्यादि प्रास्ताविक विचारांत पहिले १० दृष्टांत जाऊन नंतरच्या ६ दृष्टांतांत अनधिकारी जीवांचा सामान्यत्वें विचार करून आणि दृष्टांत २० अखेर त्यांची व्यर्थ चाललेली धडपड वर्णन करून २४ दृष्टांत अखेर अशा एकदेशीय खटपटींत तादृश फायदा नाहीं हें स्पष्ट केलें आहे. नंतर दृष्टांत २५ ते ३३ व ३५–३६ मध्यें अनधिकारी जीवांच्या अक्षमतेचें पृथक्करण करून दृ० ३७ ते ३९ मध्यें त्यांच्या ठायीं मुख्यत्वें 'आर्ति' पाहिजे हें सांगून दृष्टांत ४० मध्यें सत्राधिकारी जीवाच्या मोक्षमार्गसंस्काराचा आरंभ केला आहे. तथापि प्रत्यक्ष सुरुवात करण्या-पूर्वी दृष्टांत ४१–४७ मध्यें अधिकारपरीक्षा कशी करावी व मुख्यत्वें जे दोष विशेष वर्जनीय त्यांचा उल्लेख दृ० ४८–४९ मध्यें करून ५० व्या दृष्टांतांत परमेश्वर कोणासही जबरदस्तीनें परमार्थांत ओढीत नसतात हें स्पष्ट केलें आहे. तथापि जे अनन्यपणें या मार्गाचा स्वीकार करितात

त्यांचें स्वभावप्रकृतिपरत्वें असणारे प्रकार दृ० ५१–५५ मध्यें निर्दिष्ट करून आणि उत्कटतेची धांव व प्रखर वैराग्यवृत्ति कित्येकांत अखेर पर्यंत कशी टिकत नाहीं याचा विचार दृ० ६३ अखेर करून सर्वाधिकार-संपन्न जीवाच्या मोक्षसंस्कारारंभास खरा प्रारंभ दृ० ६४ पासून होतो. प्रथमत: त्याला कर्मरहाटींतून काढून दैवरहाटींत आणतात; बोधाग्नि-संस्कार देतात; उत्तरोत्तर ज्ञानदान करीत करीत त्याच्या मळांचा क्षय करितात आणि मळनिवृत्तीनंतर त्याला प्राप्तीयोग्य करितात, हें दृ० ७० अखेर स्पष्ट केलें आहे. त्यानंतर या मुमुक्षूची नित्यचर्या कशी असावी, त्याच्यावर परमेश्वराच्या कृपादृष्टीची राखण कशी असते, हा असंनिधान धर्म किती कडक व अवघड आहे, त्यांत शिरलेल्या पुरुषानें कोणते प्रमाद टाळावेत, परमेश्वराची अनुकूलता कशी संभाळावी, कदाचित् प्रतिकूलत्व भासमान झाल्यास प्रसन्नता येईपर्यंत कसें वागावें, इत्यादि सुळावरील पोळीप्रमाणें जाज्वल्य व क्लेशपूर्ण असणाऱ्या असंनिधान धर्माचें निरूपण दृष्टांत ९५ अखेर करून भिंगुरटीच्या दृष्टांतानें प्रयत्नीया पुरुष ईश्वर-भावास कसा जातो तें स्पष्ट केलें आहे. नंतरच्या दृष्टांतांत सत्ताज्ञान-निक्षेपापासून सामान्यज्ञान, विशेषज्ञान इत्यादि सोपानक्रमानें मुमुक्षूचें व्यवधान दूर होऊन, अज्ञानाचें समग्र निरसन होऊन व प्रपंचांतील अहंभाव ओसरून त्याचें 'जीवत्व' विरून तेथें केवळ 'वस्तुत्व' कसें शिल्लक राहतें हें सांगून तेथें मग ईश्वराचे सकळ गुण प्रकट होतात आणि कैवल्यभावांत पदार्पण करणाऱ्याचीं अनिष्टें निवारून परमेश्वर त्याला इष्टप्राप्ती देतो हें अखेरच्या तीन दृष्टांतांत सांगून 'पाठाची' परिपूर्ति केली आहे. सारांश, ज्या मार्गाला गीतेंत 'क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम्' असें यथार्थत: म्हटलें आहे, त्याला सुंदर पायऱ्याचा घाट बांधून व सर्वत्र मोक्ष-गंगेचे प्रवाह अत्यंत प्रसन्नतेनें खेळवून हा प्रबंध संपविला आहे. श्वशुरगृहीं असतांना प्रात:काळीं केशिराज नित्य गंगास्नानास जात असत व चक्रधरां-च्या ज्या लीळा माहींभट नागदेवांना वाचून दाखवीत असतां त्यांनीं ऐकल्या होत्या त्यांतील निवडक प्रसंग घेऊन केशिराज घाटावर बसून नियमानें एखादें तरी संस्कृत पद्यबंधांत गुंफलेलें 'लीलास्तोत्र' करीत असत. त्या-वेळीं केशीराजांची मन:स्थिति आर्त मुमुक्षूची होती; आणि त्या काळांत

ज्या लीला केशिराजांनीं काव्यामृतांत चुबकळवून 'परिपाकयुक्त' केल्या, त्यांचा परिणाम जसा त्यांच्या भावी आयुष्यावर झाला तसाच त्या मनन-निदिध्यासनाचा प्रसाद या 'दृष्टांतपाठ' स्वरूपांत केशिराजांनीं जणू काय सर्वांस वाटण्यास तयार केला आहे असें वाटतें. त्या वेळीं चक्रधरांचें सर्व चरित्र केशिराजांच्या अंतःचक्षूसमोरून जात होतें; आणि सर्वज्ञांचें अलौकिकत्व कशांत व्यक्तिमंत होत असे, त्यांच्या भजनीं लोक कोणत्या मोहनीमुळें लागत, त्यांच्या वाणींत, उपदेशांत, निरूपणांत, प्रतिपादन-शैलींत व सिद्धांतमंडनांत अशी कोणती आकर्षक शक्ति होती कीं त्यामुळें सर्व–आबालवृद्ध, स्त्रीशूद्रादि, विद्वान भोळीभाबडी–मंडळी त्यांच्या वेध-वंती व बोधवंती वैखरीनें वश होत–याचा शोध घेण्यांत केशिराज गुंग असत. ही तंद्री इतकी उत्कट अवस्थेस गेली होती कीं आपल्या पतीवर 'दृष्टीचें राखण' घालणाऱ्या त्यांच्या धर्मपत्नीला देखील ते 'योगिये' झाले अशी कबूली द्यावी लागली. सर्वज्ञांची ही वशीकरणाची शक्ती केशीराजांना अवगत झाली व त्याच शक्तीचा अंगिकार करून जी हातोटी चक्रधरांना साध्य झाली होती त्याच सयुक्तिक दृष्टांतांची निवड करून तिच्या द्वारानें श्रोत्यांस इष्ट असें अध्यामिक तात्पर्य हृदयांत उतरवून देणें ही कला आत्मसात् करून चौदोत्तरशत निवडक दृष्टांतांची ही अम्लानमाला तयार केली असवी.

स्वावलंबनी व दृढनिश्चयी पुरुषाची प्रयत्नानुकूलता प्रथमतः व मुख्यतः मोक्षास आवश्यक आहे हें केशिराजांनीं पूर्णपणें ओळखिलें होतें; 'न ऋते श्रांतस्य सख्याय देवाः' थकेपर्यंत प्रयत्न करणाऱ्या मनुष्याखेरीज देव इतरांना मदत करीत नाहींत (ऋग्वेद ४–३३–११); ज्ञानेन कुरुते यत्नं यत्नेन प्राप्यते महत् (महाभारत, शांतिपर्व ३२०–३०)–हाच सिद्धांत 'लापणिकां'त त्यांनीं प्रतिपादिला आहे. 'पुरुषाचेनि उद्यमें देणें आति : परि ब्रह्मविद्या ते अधिकार्यासीचि संचरे।' हा इशारा देऊन पहिल्या ४९ दृष्टांतांत मुख्यत्वें वेगवेगळ्या अवस्थेंतील अनधिकारी लोकांची पृथक्करणपद्धतीनें वर्णनात्मक व्यावृत्ती करून ५०–५२मध्यें दुसरा एक तितकाच महत्त्वाचा सिद्धांत सांगितला आहे. 'भणौनि परमेश्वरु बळें धर्मीं न घालिती : ज्ञान देऔनि उत्तराइ होति। प्रवर्तले तरि सकळही

गोमटें आपणचि करीति: भणौनि ईश्वराकारणें जीवें सकळही आंगवावे ।.' याचें समर्थन व स्पष्टीकरण दृष्टांत ६२ अखेर करून पुरी आंगवण–आत्मार्पण करणाऱ्यावर परमेश्वराचें 'गोमटेंपण' – सर्वप्रकारें कुशल करण्याची प्रभावी शक्तीचा व्यापार दृष्टांत ७० अखेर सांगून ही परमेश्वरी कृपा कोणकोणत्या द्वारें व प्रकारांनीं अभिव्यक्त होते तें 'लक्षणपाठां-तील सूत्रानुसंधानानें समुचित दृष्टांत देऊन इष्टप्राप्तीच्या टोंकापर्यंत ११४ दृष्टांत अखेर पुरें केलें आहे. ही उद्धरणक्रमाची चक्रधरोक्त सांखळी संभाळून व लीलाचरित्रांतील दृष्टांतवर्णनांत प्रत्येक 'श्रीमुखोक्त' शब्दाला बिलकुल ढका न लावतां सर्व आशय संभाळून घेऊन व त्याला पूर्तता आणण्यासाठीं आपलें अध्यात्मिक तात्पर्यव्याप्तीचें सूचक असें 'दार्ष्टांतिक' जोडून, जो अपूर्व कारागिरीचा अलंकार निर्माण केला आहे, त्याची पुरी प्रशंसा करणें अशक्य आहे.

'दृष्टांतपाठा'वरील विश्वनाथ बासांच्या 'दृष्टांतस्थळा'चा आम्हीं टीपांचें स्पष्टीकरण करितांना वारंवार उपयोग केला असून त्यांतून अनेक अवतरणें घेतलीं आहेत; हिरवळी येथें त्यांनीं रचिलेल्या 'ध्यानामृतस्तोत्रां'त दिलेल्या कालनिर्देशावरून ते शके १५६३ मध्यें विद्यमान होते. हे उपाध्ये आम्नायांतील 'रेवेराजां'चे शिष्य असून यांना 'वर्धनस्थ बीडकर' असेंही म्हणत असत (य. खु. देशपांडे : म. म. वा. पृ. ६९ पहा). जरी या ग्रंथाला 'स्थळ'–भाष्य असें अभिधान असलें तरी याचा विस्तार सहज 'बंध'–महाभाष्यासारखा मोठा असून त्याची मान्यता पंथांत अतिशय समजतात. सदर ग्रंथाचा प्रारंभ विश्नाथबास येणेंप्रमाणें करितात:–' कृपाळवें परमेश्वरें श्रीचक्रधरें जीवोद्धरणाचेनि वेसनें सर्वज्ञत्वें जीवाचें आर्जकत्व देखौनि चिन्मय मायेकरवि सृष्ठि रचउनि तियेमध्यें सर्वगुणान्वित मनुष्यावतार स्वीकरीले : मग उभयदृश्यत्व : स्वरूपादि सकळ पदार्थाचेया अशेषविशेषाचें सर्वोत्तमा अधीकार्यासि करीतां पाठचि निरोपीति : कां : मोकळा आर्थचि निरूपीति : अथवा पाठार्थ : दोन्हीं निरूपीति। तेचि निरूपण त्रिकाळ होये। कादाचित आहोरात्रें करीति। मग प्रकरणवशें दर्शनीयाप्रति : वेधवंता : अनुसरलेया भक्ताप्रति : निरूपण होये। ....। खंडज्ञानी शाब्दियासि यथातथ्यें निरूपण कैसें धरैल : परि उद्धरणहेत तो तयाचाचि

असे। ". नंतर चक्रधरांनीं आपल्या सिद्धांतांचा उपदेश वेळोवेळीं करून भटोबासांना कसें तयार केलें तें सांगून व प्रसन्न होऊन चक्रधरांनीं नागदेवास जें वरदान दिलें होतें त्याचा उल्लेख करून टीकाकार पुढें म्हणतात, 'अन्यथा न बोलेति ऐसें वरदहीं दीधले : म्हणौनि हे श्रीमुखीचें होयेः हें नव्हें : ऐसें (नागदेव) म्हणेति । मग आपुलीया स्मृततेसि (स्मृतीला) जीयें पाठवचनें तथा अर्थवचनें मीळति : तीयें वचनें निर्वचें मानीति । मग दर्शनीया हो अथवा वेधवंत : बोधवंत : अनुसरला भक्त हो : ...... परि आपुलीया अवबोधासारिखी : युक्त श्रीमुखउच्चाराचीं इयें वचनें होति : भणौनि **पंडित केशोबासा**करवि लीळारूपांतुनि निवडुनि ईश्वरीचीए व्युत्पत्तिव्युत्पन्नतेकरूनि आकरा प्रकरणांसि (लक्षण+आचार +विचार) यथातथ्य अन्वयो लावीला । तया प्रकरणां वेगळें मोकळें निरूपण श्रीमुखींचें तेंही तैसेंचि आपुलेया शिष्यांसि केलें । तयाचिया टांचणीया **राजुर लक्ष्मीधरबासीं** केलिया । तेचि लक्षणाचे पक्ष : प्रत्यक्ष वचनांसारीखें प्रमाणत्वें वर्तत असत । एवं अशेष ब्रह्मविद्येचा झाडा तो अकरा प्रकरणाचिमध्यें असे । **तोचि परम सिद्धांत भटोबासाचा :** तथा पंडित केशवादिकां आचार्यांचा अवबोध जाणावा । तया वेगळें तेतुकें क्षेपक : युक्तिविलासांचें जाणावें : कां जें : तया प्रकरणांचा सिद्धांतार्थ अन्य गुरुमुखें न कळतां वीनप्रमाणें मुखाधाराचें प्रवर्तन तें स्वयुक्तीचें लक्षावें : आणि सिद्धांत तो प्रकरणीचां प्रकरणीं : वचनीचां वचनीं : परिसावा। आणिके प्रकरणींचा अर्थ तथा वचनाचा आणिके प्रकरणीं : तथा निःशेष जरि बोलिला तरि तें पूर्वपक्षें व्युत्पत्ती होए : परि तीये प्रकरणीचा तथा वचनीचा सिद्धांत नव्हे । कां : जें : **अर्थु तो प्रकरणवशें : प्रकरणें आर्थ विनियोजक : आर्थी दृष्टांत दीजे :** म्हणीतलें : यातवं : परि तेही दृष्टांत गोसावी प्रकरणवशेंचि निरूपिलें : तयासि भटोबासीं आपणासन्मुख उद्धरणाचेनि क्रमें अन्वयो लाविला । तें बारावें प्रकरण : जैसी उद्धरणीं अवतारपद्धति आणि अंतीं साध्य-दंडक मांडविला : तैसाचि क्रम दृष्टांतींही असे : आधीं सकळ अवताराचें स्वीकार सांगौनि सेवटीं साध्य-दंडकाचे दृष्टांत मांडविले असत । तरि दृष्टांत म्हणीजे काइ पा : ना : दृष्टाचां अंतीं अदृष्ट बुझवीलें म्हणौनि दृष्टांत बोलीजे । तेंचि दृष्ट ऐसें :

पंचभौतिक त्रिगुणात्मक कार्यरूप प्रपंच : तत्संयोगें जीवकृत आणि देवता-संपादक जेतुलेंहीं वर्तन तेतुलेंहीं दृष्टचि जाणावें । तया दृष्टासारिखेंचि अदृष्ट जरि कल्पिलें तरि अन्यथात्वसंचारें रुंभणें होइल : यातत्रं दृष्टाचां पोटीं अदृष्ट भावो वोळखावा । जैसें आदर्शीं प्रतिबिंब देखिलेया मुखाकृती जाणीजे : परि आदर्शासारिखेंचि मुख असें ऐसें न भणिजे । तथा मुखाचें प्रतिबिंब अभावरूप : तैसेंचि अदृष्टही अभावरूप न कल्पीजे : आणि जियें दृष्टांतीं अभावरूप बुझविला असे : तिये अभावीं भावरूप पदार्थत्व न भाविजे : कां : जें : अन्यथात्व संचारें बोध जाइल : म्हणौनि दृष्टांत देवों जाणावा : परिसों जाणावा । कां : जे : एक दृष्टांत अन्वयें : एक अप्रत्यन्वयें : असति । मग तयांतहि अंश : संपूर्ण : ऐसे भेद असति । तेथिचें तात्पर्य विमर्षितां एकेके दृष्टांतीं सकळ शास्त्र वाखाणत असे : परि आपुलेनि आइतेपणें जाणावया हें दृष्टांतस्थळ प्रवर्तलें । ' इतका प्रास्ताविक स्वरूपाचा विचार करून विश्वनाथबासांनीं प्रत्येक दृष्टांत स्पष्ट केला आहे; ती पद्धति सामान्यतः लक्षणरत्नकाराच्या उताऱ्यांवरून कळून येईल. (परिशिष्ट ३ पहा.)

६. प्रस्तुत 'दृष्टांतपाठ' आम्ही एकाच प्रतीवरून अविभाज्यतः असा तयार केला नाहीं; उपलब्ध झालेल्या पोथ्यांपैकीं (कोणत्याही पोथीवर कालनिर्देश नाहीं) जी पोथी बाह्य स्वरूपतः व भाषादृष्ट्या प्राचीनतम वाटली तिला मुख्य मानून नंतर दुसऱ्या ज्या त्याहून अर्वाचीन अशा तीन हस्तलिखित प्रती मिळल्या आणि 'दृष्टांतस्थळा' वरील टीप-ग्रंथ वाचीत असतां जे जे समीचीन पाठ तेथें आढळले त्यांत विमर्शपूर्वक जे प्राचीनतम व मान्य ते स्वीकारून ही संकलनात्मक प्रत तयार केली आहे. मिळालेल्या सर्व पोथ्या सांकेतिक 'सकळा' लिपींतील आहेत. लक्षणान्वय पाठाप्रमाणें दृष्टांतपाठ हाही सांकेतिक लिपींतच नेहमीं लिहिलेला आढळतो. सांकेतिक लिपींतून आबालवृद्धांना कळेल अशा प्रचलित लिपिस्वरूपांत हा पाठ प्रथमतःच प्रसिद्ध होत आहे. 'सोलापूर'च्या पाठसमुदायांतील पाठाचा मुळींच उपयोग केला नाहीं. पाठभेदांपैकी ज्या 'वासना' आमच्या पोथींत होत्या त्या सर्व दिल्या आहेत. या 'वासना' परशरामबास, रामेश्वरबास वगैरे प्राचीन व सर्वमान्य अशा आचार्यांच्या अतएव सर्वस्वीं अधिकृत

आहेत व ते विद्यमान असतांनाच 'दृष्टांतपाठ' हा संप्रदायांत रूढ होऊन त्याचें शुद्धीकरणही झालें होतें. सांप्रदायिकांच्या पद्धतीनें पाठाची विभागणी केल्यास दृष्टांत १–१० हे दैवाद्य, ११–६१ पुरुषाद्य, ६२–७० दैवांत ७१–७६ संन्यास, ७७–८४ जिज्ञासू, ८५–८९ असंनिधानधर्म, ९०–९५ साधनविघ्न, ९६–९८ विघ्नहानी आणि ९९–११४ हे दृष्टांत साध्यव्यवस्था अशा क्रमानें होते. उद्धरणव्यापाराची सिद्धि वेधक्रमानुसारें व बोधक्रमानुसारें कशी साधली आहे हें पाहूं जातां सर्वस्वीं वेधव्यापारक्रमावरच अधिष्ठित असे दृष्टांत फारसे आढळत नाहींत; उभयविध स्वरूपाचे असेच पुष्कळ आहेत. श्रोतेवार दृष्टांतांची जुळणी केल्यास २१ पुरुष व १० स्त्रिया आणि यांपैकीं ज्यांना एखादादुसरा दृष्टांत सांगितला आहे ते वगळतां फक्त ६ पुरुष व ४ स्त्रिया महत्त्वाच्या ठरतात. स्थळवार विचार केल्यास ११४ पैकीं ८४ दृष्टांत पैठण, बेलोपूर, डोमेग्राम खडकुळीं, एलोपूर, हिंवरळी व सिंगणापूर या सात गांवांत निरूपिले आहेत. ज्यांना हे दृष्टांत सांगितले त्या विषयीं सविस्तर माहिती परिशिष्ट ४ वरून ध्यानांत येईल. यावरून असें दिसतें कीं भटोबास, महदाइसे, रामदेव आणि बाइसा हेच शिष्य प्रमुख होत. सुमारें निम्याच्या वर दृष्टांत या चौघांना मिळून सांगितले आहेत.

नागदेव हे गोसाव्यांचे पट्टशिष्य; तेव्हां २७ दृष्टांत गोसाव्यांनीं त्यांना सांगितले यांत नवल नाहीं; ते ३॥ वर्षें चक्रधरांच्या सांनिध्यांत असल्यामुळें असे प्रसंगही वारंवार येत असावे. दुसरा जो रामदेव (दादोस) याचा परिचय अळजपुराहून बडनेरा येथे आल्याबरोबरच झाला व पुढें पैठण येथें तो चक्रधरांची वारंवार भेट घेऊं लागला. त्याला आणि बाकी सर्व मंडळीस जे जे दृष्टांत निरूपिले ते सर्व लीलाचरित्र पूर्वार्ध-उत्तरार्ध या काळांतील होत हें निर्विवाद आहे; त्यामुळें हा निरूपणकाळ स्थूलतः इ. स. १२६८–१२७३ समजणें युक्त होईल. स्थलदृष्टचा पैठणाप्रमाणें 'बेलोग्राम' हें महत्वाचें आहे; कारण तेथूनच चक्रधरांनीं उत्तरापंथें प्रयाण केलें. बेलोग्रामीं सांगितलेले बहुतेक दृष्टांत नागदेव व महदाइसे (रूपाई) यांना उद्देशून आहेत. प्रयाणापूर्वी सात दिवस बेलोग्रामीं जमलेल्या सर्व शिष्यांस

चक्रधरांनीं असंनिधान धर्माचें निरूपण केलें; त्यामुळें या सर्व दृष्टांतांत त्याच चर्चेची छाया आढळते. महदाइसेला दृष्टांत सांगितले त्यांची विषय-व्यवस्था व मांडणी पाहिल्यास गोसाव्यांच्या दृष्टीपुढें रूपाईची पुढची कालक्रमणा होती व त्या दीर्घ काळांत तिला आपलें आयुष्य नागदेवाच्या आश्रयानें घालविणें प्राप्त असल्यामुळें जें आश्वासन तिला चक्रधरांनीं देणें उचित तें त्यांत अंतर्भूत आहे. नागदेवाची देखील तशीच अवस्था होती व चक्रधरावर त्याची किती दृढ भक्ती होती हें नंतर त्याचें देहभान हरपून गेलें या गोष्टीवरून स्पष्ट होतें. तरी जात्या पुरुष व धीराचा त्यामुळें नागदेवाला सांगितलेल्या दृष्टांतांत दृढपणा व निश्चयात्मक वर्तनाची आवश्यकता या भावांची छटा अधिक गोचर होते. नागदेवास आपलें भावी आयुष्य पंथप्रतिस्थापनेकडे एकनिष्ट चिकाटीनें घालवावयाचें होतें हें जाणूनच चक्रधरांनीं ही असंनिधान सेवा दृढश्रद्धायुक्त अंतःकरणानें कशी पार पाडावी हें त्या दृष्टांतांत ध्वनित केल्याचा भास होतो.

रामदेवाला सांगितलेल्या दृष्टांतांत अनधिकारी-अधिकारी-मुमुक्षूंचीं परीक्षा केली आहे; रामदेव हा अखेरपर्यंत अनधिकारीच राहिला. त्यानें चक्रधरापासून परमार्थ प्राप्त करून घेतला नाहीं. सारंगपंडित उर्फ 'पांडेय' व चांगदेव हे दोघे स्वामींच्या सेवेंत असत. पांडेयास देवगिरीस पाठवून धाकटचा राणीकडून स्वामीनीं वृत्ती मिळवून दिली व त्याला संन्यास घेण्याचा आग्रह केला; परंतु त्यांची ऐहिक आसक्ती सुटली नाहीं. पद्मनाभी देवाची तीच गती झाली; तो कांहीसा भोळसर होता व त्याला वाटे कीं स्वामींनी आपल्या सर्व गणगोतांवर अनुग्रह करावा! परंतु त्याच आप्त-वर्गास पद्मनाभीनें स्वामीकडे जावें हें देखील आवडलें नाहीं. त्याची स्वामींनीं जबरदस्तीनें घरीं रवानगी करून दिली, व पुढें तो जेव्हां पाल-खीपद वैभवांत रंगला तेव्हां नागदेवास एकदां देवगिरीस भेटला असतां त्यानें औपचारिकपणानें व कांहींसें फटकून वागून चक्रधराच्या शिष्या-बद्दलचा जुना आदरभाव विसरल्याचें सिद्ध केलें. नाथोबाला स्वामींनीं एलापुरीं दीक्षा दिली होती; याला स्वामी 'मांडलिक' म्हणत असत. हा पैठण येथें नदींत नाव बुडाली तेव्हां नागांबिकेच्या समागमें नावेंत होता.

७. 'दृष्टांतपाठा'वर विवरणात्मक अगर टीप दिलेले असे सुमारें ४०–४५ ग्रंथ भाव्यांच्या सूचींत निर्दिष्ट केलेले आढळतात; त्यांचीं वर्गवारी लाविल्यास ३ स्थळें, ५ भाष्यें, १ महाभाष्य, ३ विधायिकें, २ लापिका, ४ व्याख्या, १ टांचणी, २ परीक्षा, १ पक्षभेद, १ अनुवर्णन इत्यादि ३९ पोथ्यांत १५ प्रकार आढळतात. 'दृष्टांता'वर प्रमेयात्मक स्वरूपाची देखील रचना झाली आहे; ८ प्रमेयांपैकीं २ प्रमेयें व एक विधायिक आम्हांस मिळालें. इतर हस्तलिखितांपैकीं विश्वनाथ बासांचें 'दृष्टांतस्थळ' व मुरारी बासाचें 'दृष्टांतमालिकाभाष्य' यांचा मुख्यत्वेंकरून टीपा देतांना उपयोग केला आहे. या आवृत्तीमुळें एकवार पाठाचा परिचय वाचकांस झाल्यानंतर पुढें जसजशी अधिक टीपांची उपयुक्तता गोचर होईल त्याप्रमाणें इष्ट तो विस्तार करणें फारसें प्रयासाचें होणार नाहीं; तोंपर्यंत हा प्रयत्न अशाच आजच्या स्थितींत गोड करून घ्यावा.

'द्वात्रिंशत्लक्षणां'त आनेराजांनीं दृष्टांताचें लक्षण केलें आहे; त्यावर पुढें 'लक्षणरत्नाकर' म्हणून एक मराठी व्याख्यावृत्ति तयार झाली; तिची दुर्मिळ अशी एक हस्तलिखित सांकेतिक पोथी महंत दत्तराजांच्या कृपेनें मिळाल्यामुळें त्यांतील उपयुक्त उतारे परिशिष्टांत देतां आले आहेत. हा न्यायशास्त्रावर पहिलाच प्राचीन मराठी ग्रंथ दिसतो व त्याचें संपूर्ण प्रकाशन होणें अगत्याचें आहे. हें कार्य वैयक्तिक नसल्यामुळें त्याबद्दल येथें आणखी लिहिणें अप्रस्तुत होईल; तथापि हें परिशिष्ट वाचणाऱ्यांना वेगळ्या शिफारसीची आवश्यकता भासणार नाहीं हें मात्र सुचवितों.

प्रत्येक दृष्टांताचे तीन भाग पडतात; म्हणजे प्रत्येक दृष्टांत त्रिकांडात्मक आहे; शिरोधार्य सूत्र, व नंतरचें उदाहरण किंवा प्रत्यक्ष दृष्टांत, हीं दोन्हीं कांडें 'श्रीमुखोक्त' म्हणजे चक्रधरोक्त असून शेवटलें जें 'दार्ष्टांतिक' तेंच फक्त केशिराजांनीं तयार केलेलें आहे. पहिले दोन्ही भाग चक्रधरांचे म्हणून ते इ. स. १२६४–७२ या काळांतील व तिसरें 'दार्ष्टांतिक,' जें केशिराजांनीं 'गोविंदप्रभूंच्या संनिधानां'त लिहिलें–तें गोविंद प्रभूंच्या निर्याणापूर्वींचें (इ. स. १२८६) होय. चक्रधरनिरूपित भाग आणि केशिराजांचा अंत्य भाग यांतील भाषास्वरूपांत एक संस्कारविशेष

सहज ध्यानांत येण्यासारखा नाहीं; तथापि तें वैशिष्टय महत्त्वाचें आहे. चक्रधरांच्या वाणींतील जिवंत वाहतावाढता ताजातवाना स्रोत केशिराजांच्या दार्ष्टांतिकांच्या भाषाशैलींत दिसून येत नाहीं. केशिराजांची भाषा शास्त्रसंस्कारानें शाणोल्लेखसंस्कार झालेल्या पैलूदार रत्नाप्रमाणें भासते. पाणिनीनें घडविलेल्या चरणशृंखला जिच्या प्रतिपदाला सांवरून धरीत आहेत; न्यायशास्त्राच्या उपनयाच्या पंचावयव वाक्यांच्या उपक्रमोपसंहार पद्धतींचा अंगीकार करून त्यांच्या आश्रयानें जी सिद्धांताचा मार्ग चोखाळीत आहे;–अशा पंडितमन्य भाषा-शैलीचा प्रारंभाविष्कार तेथें आढळून येईल. चक्रधरांच्या भागांत संज्ञा, पारिभाषिक शब्द सहसा आढळणार नाहींत; महाराष्ट्रांतील प्रतिग्रामांत घरोघरीं जें जीवनाचें प्रसन्न वातावरण तेंच प्रतिबिंबित झालेलें आढळेल. दृ०५९ अगर दृ०९८ वाचल्यास धाकांत असलेली सासुरवाशीण अगर मुलांचे हट्ट पुरविणारी आई यांचीं जीं दोन शब्दचित्रें तेथें रेखाटलीं आहेत, तींच आज सातशें वर्षांनीं घरोघरीं आढळतील; दृ० १३, ४०, ५३, ५४, ६६, ९१, ९४ या दृष्टांतांतील दृश्यें खेडोंखेडीं अजूनही त्याच स्वरूपांत आढळतील, आणि शेतकरी वर्गाच्या परिचयांत येणारे दृष्टांत २८, २९, ४१, ४९, आजही तसेच ओळखूं येतात. ग्रामें सोडून शहरांत राहणाऱ्यांना व व्यवहार, राजकार्य इत्यादिकांचा परिचय असणाऱ्यांना रोचक असे दृ० ८, १०, १६, ३६, ५७, ५८, ७२, ७३, ७४, ७७, ७८, ८१, ६२. ६३, ८३, ८४ ८५, ९७ आहेत, व वरिष्ठ दर्जाच्या घराण्यांत आढळणाऱ्या प्रसंगांवर दृ० ५२, आहेत. एकंदरींत या दृष्टांतांच्या द्वारानें उत्तर यादवांच्या राजवटींतील प्राचीन महाराष्ट्र समाजाचें स्वभावसुभग असें चित्र पहावयास मिळतें. पण तेंच केशिराजांच्या दार्ष्टांतिकाकडे वळलें तर पहिली दृष्टी पालटून जाते. त्याच काळांतील एखाद्या मराठी जन्मभाषा असणाऱ्या उभयभाषाकोविद महापंडितानें राजसभेंत अगर विद्वत्परिषदेंत ज्याप्रकारें एखाद्या शास्त्रवचनाचें 'उदाहरणं प्रत्युदाहरणं वाक्याध्याहार इत्थमेतत्समुदितं **व्याख्यानं** भवति '–या पतंजलीच्या स्पष्टीकरणास स्मरून 'मराठींत' व्याख्यान करावें, तशी स्थिति होते. केशिराजांच्या शैलीवर संस्कृताची पकड उघड दिसते व ती तितकीच उघड चक्रधरांच्या सरणींत

अकृत्रिमपणांत आढळते. दोघेही जरी समकालीन नव्हेत तरी पाठोपाठचे; परंतु आपल्या दीर्घायुष्यांत महाराष्ट्रांत यथासुख भ्रमण केल्यामुळें चक्रधरांना जें जनतेचें भाषावैष्टिच प्राप्त झालें होतें त्यापासून केशिराज पुष्कळच अंतरावर होते. जिज्ञासू व ज्ञानी वर्गांतील ते एक प्रतिनिधी हळूहळू चक्रधरसिद्धांताचें मराठींत संहितीकरण करण्याच्या खटपटींत होते; त्यामुळें जे अपरिचित सिद्धांत नव्या वाढत्या भाषेंत प्रथमतःच आणावयाचे असतात व त्याकरितां जे जे नवे शब्द, संज्ञा, वाक्यप्रचार हुडकून काढावे लागतात अगर जे प्रसंगीं नव्यानें निर्माण करावे लागतात ते विचार केशिराज करूं लागले होते. तावत्काल केवळ गीर्वाणवाणींत निर्वचनीय असा ज्ञानविष्कार विद्वानांस पटेल अशा पद्धतीनें मराठींत रूढ करावयाचा प्रचंड सायास त्यांनीं शिरावर घेतला होता. सूक्ष्म अशा शास्त्रविचारांना व्यक्त करण्यास प्रतिक्षम व समर्थ अशी शब्दसंपदा केशिराजांनीं मराठींत आणली. प्राचीन मराठी गद्यरचनेचे ते प्रथमाचार्य होते. मराठींत 'दृष्टांतपाठा'स सदृश असा ग्रंथ झाला नाहीं. कालदृष्टया अग्रपूजेचें भाग्य चक्रधरसूत्रांस असल्यामुळें केशिराजांच्या 'दार्ष्टांतिकां'स नंतरचें स्थान द्यावें लागतें.

'चक्रधरसिद्धांत सूत्रें–लक्षणपाठ' प्रसिद्ध केला त्या वेळीं तेथें सूत्रांच्या वाक्यरचनेबद्दल व रूपसिद्धीबद्दल त्रोटक विवेचन केलें होतें; परंतु सूत्रांचें स्वरूपच असें असतें कीं तें प्रयोगसिद्धीच्या द्वारें वाक्यविस्ताराच्या उत्क्रांतीस अनुकूल नसतें; तेथें प्रत्येक निरुपयोगी अक्षर गाळण्यांत सारी दक्षता ठेवावी लागते; अल्पाक्षरी, निर्दोष व सारवंत शब्द निवडून त्यांची जोडणी करावयाची असते. पण ही मर्यादा केशिराजांना दृष्टांतपाठांत स्वीकारण्याचें कारण नव्हतें; कारण प्रत्यक्ष चक्रधरांनीं जीं उदाहरणें लोकव्यवहाराच्या भाषेंत सजविलीं आहेत त्यांत व्याप्ती व साम्य दाखविण्यास्तव अर्थसंकोच करावयाचा नसून अर्थविस्तारच आवश्यक होता. सादृश्यदर्शक उदाहरणांच्या साह्यानें 'दृष्टें अदृष्ट बुझावा'–"दृष्टाच्या अंतीं अदृष्ट बुझाविलें भणौनि दृष्टांत बोलिजे'–'दृष्टादृष्ट नीरूपूनि तत्सादृश्यें दृष्टादृष्ट बुझाविजे तें दृष्टांतलक्षण'–अशीं सर्व शास्त्रवचनें उघड सांगत आहेत. प्रकरणोपयोग्य व्यवहारार्थाचा ताण सहन करील

असाच वाक्यपट येथें विणला गेला आहे; संकल्पित सादृश्यभाव त्यांत उतरावेत म्हणून ' वचन : वचनार्थ : लापिका : उदाहरण : या चौचें अर्थान्वयें समर्थन ' करणें हें स्पष्ट उद्दिष्ट आहे. केशिराजांनी 'दृष्टांत' हें पूर्वदळ व' दार्ष्टांतिक' हें उत्तर दळ मानून त्यांत प्रत्येक पाठांत सादृश्य-व्याप्ती सामावली आहे.

सर्वज्ञांचा देखील असाच हेतु होता; 'अर्थु तो प्रकरणवशें : प्रकरण अर्थविनियोजक : अर्थी दृष्टांतु दीजे ।'– ' हें वचन : हा वचनार्थु : वचन जाओं नेदिजे ।'–'काकु : कक्षा : भावार्थु : प्रकरण जाणावे ।'– 'संशय स्फुरे तो अर्थु न कीजे ।'–अशीं अर्थविनिश्चयास साहायभूत व मार्गदर्शक होणारीं अनेक सूत्रें सर्वत्रतः पाठसमुदायांत आढळतात. वक्ता व श्रोता या उभयांस परस्पराकांक्षित असेंच विषयानुसंधान संभाळून शब्दयोजना करावी; संशयास जागाच ठेऊं नये; पूर्वोत्तरपक्षांचें समाधान करून व सुसंगत समन्वय घालून सिद्धांतमंडन करावें,–अशा धोरणाचीं तीं सूत्रें आहेत. त्याच काळांत रचिलेले हेमाद्रि वगैरे प्रबंधकारांचे आदर्श परिचित होते व संकलनात्मक प्रबंधपद्धती मागें पडून सिद्धांतसमन्वयाकडेस त्या काळांतील प्रबंधरचनेचा ओघ वळला होता. मेधातिथीच्या 'सारासार विचार प्रपंचाची' चातुरी, ' स्तोकं वस्तु निगूढमल्पवचनात् ' अशी दुसऱ्याची स्तुती ज्या काळांतील विद्वत्समाजांत महाराष्ट्रांत होत असे, तेथें उत्कृष्ट प्रतीच्या प्रबंधस्वरूपाची कल्पना नव्हती हें म्हणणें चुकीचें होईल; तथापि 'लापणिक–स्वोक्ति–लोकोक्ति–काकु–कक्षा'–इत्यादि सभास्थानीय वाद-विवादसमितीच्या पद्धतीच्या फार अधिक पुढें नव्या मराठी भाषेची धारणाग्रहणशक्ती गेली असेल, असें वाटत नाहीं; केशिराजांनीं मराठीची गद्यरचना न्यायपद्धतीच्या शास्त्रमर्यादेंत आणून शब्दांचें बळ वाढविलें, वाच्यार्थाची व्याप्ती पुष्कळ दूरवर नेली, व व्यावहारिक संकेत व विशिष्ट संकेत यांत खेळणारे अभिधा व लक्षणा यांचे व्यापार परस्परांस पोषक करून तात्पर्यार्थक स्वरूपाचा 'दृष्टांतपाठ' हा नवा परिपाक तयार केला. 'पाठां'तील वाक्यरचनेचें स्वरूप स्पष्ट करणारें प्रतिपादन परिशिष्ट ५ मध्यें वेगळें केलें आहे, तें पहावें.

८. 'दृष्टांतपाठांत' अनेक उत्कृष्ट स्थळें आहेत व त्यांचा निर्देश टीपांत ठिकठिकाणीं केला आहे; परंतु एक वैशिष्टच जरा अधिक उद्बोधक वाटल्यावरून त्याचा मात्र येथें विस्तार करितों. 'बोधानुसरण' मार्गांत आत्मार्पणबुद्धी जशी बळावूं लागते तसें अव्यक्त गिरिशिखरावरील विरल वातावरण मुमुक्षूची दमछाट करूं लागते; इंद्रियधर्मांचें नियमन, मनोधर्मांचें निर्मूलन, जीवधर्म व देहधर्म याचें अग्निसंशोधन आणि निरर्थक ठरलेल्या अशा अंतरबाह्य धर्मांचें प्रयत्नपूर्वक उच्चाटन, हें सर्व संपादून शिवाय शिलकी धर्मास परमेश्वराच्या गुणधर्मीं नियोजणें,–ही असंनिधानधर्माची, खडतर दैनंदिनी त्याला आचरावी लागते.' हे देहे ईश्वरासि अर्पिले : आन अहंता तरि सांडिली नाहीं : तरि कैसें अनुसरण '(भाष्यस्थळ). ही अनुसरणाची उग्र तपश्चर्या दृ० ७१–९६ पर्यंत स्पष्ट केली आहे व त्या निरूपणांत 'विरहिणी'च्या तळमळी पासून जीं जीं उदाहरणें दिलीं आहेत तीं स्त्रीवर्गास अत्यंत पटणारीं आणि त्यांच्याच आयुष्यांत वारंवार अनुभवास येणारीं दिलीं आहेत. अशा स्वरूपाचे 'दृष्टांतपाठां'त स्त्रियांच्या 'रमण' प्रेमास व असह्य विरहावस्थेस अनुलक्षून १३ व मातेस अनुलक्षून ८ दृष्टांत दिले आहेत. भक्तीची 'परा' कोटी वर्णन करीत असतां 'वियोगीं नुरे' अशी चक्रधरांनीं त्या अवस्थेची व्याख्या केली आहे. भक्ती ही प्रेमसंचारोद्भूत असते; तिचा प्रवेश ज्ञानी पुरुषाच्या 'सत्तासंचारा' प्रमाणें 'बोध'द्वारें होत नसून मुख्यत्वें तो 'आर्ती'च्या पोटीं 'वेधद्वारें होत असतो. ती आर्ती उत्कट दशेस गेली म्हणजे 'भक्ती' होते व बोधाची उत्कट अवस्था तिलाच 'ज्ञान' म्हणतात. दृष्टांत ३७ ते ३९ हे आर्तीदर व दृ० ५३ ते ५६ हे अनन्यतेवर अधिष्ठित केले आहेत; व ही अनन्यता दृ० ६३ आणि ६८ मध्यें आग्रही, हट्टी बनलेली दाखविली आहे.

प्रेमाच्या संचारांत मनोद्वंद्वें प्रारंभींच नष्ट होतात; त्याच्या प्रगतीस स्वेतर दुसऱ्या कोणत्याच विकारास अवसर नसतो; प्रेमाच्या ज्योतींत ते सर्व केव्हांच जळून खाक झाले असतात. विकल्प व देहद्वंद्वें निस्तेज व निष्प्रयोजक होऊन प्राप्यप्रापकबोध उदय पावतो व मग भक्तास 'असंनिधान' असह्य होतें (दृ० ६८). या उत्कट अवस्थेस अनुरूप असे दृष्टांत स्त्रियांचें रमणप्रेम अगर वात्सल्यभाव या शिवाय इतरत्र आढळणार

नाहींत. दृष्टांतपाठांत जीं उदाहरणें दिलीं आहेत त्यापैकीं चार (दृ० ५२, ३१, ३२, ८९) विवाहसंस्कारबाह्य अशा स्वेच्छेनें प्रेमाविष्ट झालेल्या स्त्रियांस अनुलक्षून आहेत व पांच दृष्टांत रचतांना (दृ० ५९, ६३, ८२, ८३, ८४) वैवाहिक अवस्थेंत घडलेल्या प्रसंगांचा उपयोग केला आहे. शिल्लक उरलेल्या चार (द० ८७, ८८, ८९ व ९७) दृष्टांतांची देखील विवाहबंधन अस्तित्वांत असतांना जी विरहावस्था उत्पन्न होते त्यावर रचना केली आहे.

लौकिकदृष्टया अत्यंत श्रेष्ठ अशा ब्राह्मणकुलांत व अत्यंत वरिष्ठ अशा श्रोत्रियांच्या घराण्यांत जी जन्मास आली अशी दीक्षितकन्या (दृ० ५२) आपल्या संसाराच्या अभ्युदयाची सर्व सामुग्री झुगारून देऊन लोकलज्जेची क्षिती न बाळगतां, भर तारुण्यांत मातापित्यांची अवज्ञा व दुर्लौकिक याकडेस पूर्णपणें पाठ फिरवून फक्त विषयपूर्ती संपादण्यासाठीं बुद्धिपूर्वक घरांतून उठून जाते व धीटपणें त्याच गांवांत राहणाऱ्या एका कोळयाच्या संसाराची जोगवण करिते ! ज्यांना सर्व लोक अबला समजतात अशी स्त्री हा चमत्कार घडवून आणते व केवळ शरीर-सुखार्थ तो धीटपणा तिच्या अंगीं येतो; तर मग ईश्वराच्या प्राप्तीसाठीं सर्वशक्तिसंपन्न अशा पुरुषानें काळ-कुळ-लोक यांचीं बंधनें तोडण्यास अनमान करावें काय ?–असा विस्मयोपरोधपूर्ण प्रश्न दुसऱ्या कोणत्याही उदाहरणानें इतक्या भेदक प्रकारें रंगवितां येणें अशक्य आहे. दासीच्या दृष्टांतांत (दृ० ६२) निर्हेतुक ईश्वरदास्याची पराकाष्टा कशी दाखविली आहे तें टीपांत दिलेला उतारा पाहून (पृ० ९७) स्पष्ट होईल. दृ० ८४ हा दुर्भगेचा आहे व मध्ययुगीन महाराष्ट्रांतील कित्येक सुखवस्तु घराण्यांत अंतर्गृहांतील ज्या भेसुर छाया वावरत असत त्यांपैकी एका करुण प्रसंगाचें चित्र उभें केलेंआहे. गैरसमजुतीचे लेप चढून गेल्यामुळें जिचें मुखावलोकन करणें, नवऱ्यानें टाकून दिलें, तथापि आपण निरपराधी आहोंत या निश्चयात्मक करारीपणाच्या बळावर जी स्त्री संपन्न अशा माहेरीं न जातां पतीच्या घरींच अनुकूल कालाची वाट पहात व धैर्यानें सर्व हाल सोशीत दिवस कंठीत राहते आणि आपल्या विशुद्धाचरणानें नवऱ्याची प्रसन्नता

पुनः संपादन करिते–हें दृश्य सुंदरपणें रंगविलें आहे. दुर्भगाप्रमेय हें याच दृष्टांतावर रचिलें असून 'शारदाश्रम' वार्षिकांत (१९३३) रा. नेने यांचा या प्रमेयाचें स्वरूप देणारा परिचयात्मक लेख पाहावा.

दृष्टांत ५९ मध्यें निर्दिष्ट केलेली 'स्वाधीनभर्तृका' असून त्यांत दाखविलेला तिचा मुग्धपणा व सभय कातरता रोचक वाटते. दृष्टांत ६३ मधील स्त्री ही प्रौढा असून आपल्या पतीच्या ठायीं असलेलें तिचें वेंचलेंपण समीचीनत्वें शोभतें. 'द्विभार्ये' च्या दृष्टांतांतील (दृ० ८३) 'ज्येष्ठा' ही मध्यमावस्थेंतील आहे व तिचा पति दाक्षिण्ययुक्त असल्यामुळें आपली गैरमर्जी तो नाजूकपणें कशी व्यक्त करीत आहे हें मार्मिकपणानें दाखविलें आहे. आर्य स्त्रियांचें जन्मजीवित ज्या परतंत्र आंखासभोंवतीं अद्यापि फिरत आहे व जेथें अजूनही आर्य स्त्रीला आपलें सौभ्याग्यमंदिर फक्त आत्मार्पणबुद्धीच्या पायावरच उभें करितां येत आहे, अशा स्त्रीजीवनक्रमांतून जें सार प्राप्त झालें त्यांतून वरील १३ दृष्टांतात्मक उदाहरणें घेऊन केशिराजांनीं 'अनुतापें तापला : निर्वेदें दाटला : अनुशोचें शोचला : आर्तीचि आतुला । '–या क्रमानें स्त्रीधर्मींतील पतिसाहचर्याच्या भिन्न अवस्था निवडून संनिधानस्थितीपासून असंनिधानावस्थेपर्यंत जुळणारीं अशीं उदाहरणें रंगवून मुमुक्षूनें त्या स्त्रीप्रमाणेंच आर्त स्थितींत देहशोषण करून उर्वरित आयुष्य परमेश्वरी कृपेची वाट पहात लोटावें, असें प्रतिपादिलें आहे. जशी स्त्रीच्या भर्तृपरायणबुद्धीवर ही रचना केली आहे, तशीच स्त्रीच्या वात्सल्यबुद्धीवरही केशिराजांनीं ८ दृष्टांत उभारले आहेत (दृ० २५, ३८, ३९, ४४, ५५, ६८, ९८ व ९९); त्यांत दृ० ९८–९९ हे अखेरचे असून 'दृष्टांतस्थळ'कारांनीं 'लेंकुरवाळीए माते'च्या दृष्टांतांत या सर्व मातृविषयक उदाहरणांचा सुन्दर समारोप केला आहे (टीपा पृ. १०९). उत्कटपणें परमेश्वराचें स्मरण करणारास, त्यानें जर 'स्मरणीं अंतर्भेदें आर्ती' वाढविली तर याच देहीं व जन्मीं परमेश्वर 'सकळै वोखटें फेडुनि गोमटे करीति' असा दृष्टांताशय आईचा दाखला घेऊन समर्पकतः स्पष्ट केला आहे. मुलाचें लेंढार पाठीशीं असलेल्या प्रत्येक माउलीला आपल्या साऱ्या लेंकरांच्या मनोवृत्ती

समग्रत: कळतात ही समजूतच जशी गैर, तशीच प्रत्येकाची प्रत्येक हौस पुरविण्याची संपन्नता भाग्यवशें ज्यांना लाभली आहे अशा किती माता असतील ? (टीपा पृ० १०९–११० पहा). 'माते'चे सारे दृष्टांत अत्यंत उचित, मार्मिक व समर्पक आहेत, व ते 'गद्य' असले तरी त्यांतील 'काव्य' कमी चेतोहारी नाहीं. 'आदीपयंति हृदयं' हा आवश्यक काव्यगुण त्यांत अवतीर्ण झाला आहे व या हृदयप्रकाशन शक्तीनें वाचकांचीं हृदय-मंदीरें केवळ उजळलीं नसून त्यांत नितांत भक्तिभावाचा उबाराही निर्माण केला आहे. प्रसन्नतेच्या जोडीस परिमळबहळताही आणली आहे; म्हणून दृष्टांतपाठांत काव्यही आहे, असें एकवार सांगावेंसें वाटतें.

या ग्रंथाला ज्या टीपा जोडल्या आहेत व जीं परिशिष्टें अध्ययनास उपयुक्त होतील या आशेनें दिलीं आहेत त्याबद्दल अल्पसें सांगून हा उपोद्वात पुरा करितों. मूळ ग्रंथ जसा सांकेतिक स्वरूपांतून बालबोध स्थितींत प्रथमत:च बाहेर येत आहे त्याचप्रमाणें टीपांमध्यें दिलेलीं अवतरणें, विस्तृत उतारे देखील प्राचीन मराठी गद्यरचनेचे नमुने व प्रतिपादनपद्धतीचे मासले म्हणूनही आदरणीय आहेत; ते देखील सांकेतिक स्वरूपांतून प्रथमच बाहेर पडत आहेत. विशेषत: **दृ०** १६, २०, २८, ४१, ५३, ९८, १०९, यावरील टीपा नव्या माहितीच्या दृष्टीनें महत्वाच्या आहेत. या निर्दिष्ट केलेल्या भागांत प्राचीन महानुभावीय टीपात्मक वाङ्मयाचें वैशिष्ट्य व सूक्ष्म चिकित्सक वृत्ती दाखविणारे दाखले आढळतील. शुद्ध पाठाबद्दल ते किती दक्षपणें व जपणुकीनें वागत असत, पाठांच्या सत्यतेची परीक्षा कशी करीत, इत्यादि पृ० ७४ मधील उताऱ्यांत पहावें; अन्यथाज्ञानाचें आंधळेपण कसें असतें त्याचें मार्मिक वर्णन पृ० ८४ मध्यें आढळेल; 'त्यागाधिकारा'स 'देमाइसे' कितपत लायख आहे याबद्दल जी विमर्शपर चर्चा केली आहे त्या पद्धतीचा नमूना पृ० ९२ मध्यें आहे; आणि 'उखारलेल्या' वस्त्राचा दृष्टांत (दृ० १०९) स्पष्ट करीत असतां कापड धुण्याचीच प्रक्रिया, पण ती यादवांच्या काळांत किती नाजूक व कौशल्याची झाली होती याची कल्पना पृ० ११२–११३ मध्यें दिलेल्या उताऱ्यावरून होईल.

परिशिष्टांपैकीं 'लापणिक' ही दृष्टांतपाठाची प्रकरणानुक्रमें पृथक्करणात्मक अशी अनुक्रमणिका होय व तिच्या आवश्यकतेबद्दल वाद नाहीं; ज्या शास्त्रस्वरूपाच्या कल्पनेवर दृष्टांतांची इमारत उभारली आहे त्याची सांप्रदायिक कल्पना येण्यासाठीं 'लक्षणरत्नाकर' व 'बत्तीस लक्षणाची मराठी टीप' यांतील दृष्टांतलक्षण स्पष्ट करणारा भाग जिज्ञासूंना परिचित असणें अगत्याचें वाटतें; व केशिराजांचें दृष्टांतस्तोत्र यांतच समाविष्ट झाल्यानें पंथीयांची सोय होऊन पाठाचा आशय प्राचीन मराठीचे अनभिज्ञ पण गीर्वाण भाषाकोविद आहेत अशांनाही तो या द्वारानें कळण्याचें साधन सुलभ केलें आहे. दृष्टांत ज्यांना सांगितले त्यांचा तपशील देणारें परिशिष्ट देऊन शेवटच्या परिशिष्टांत दृष्टांतपाठांतील वाक्यरचनेचें वैशिष्ट्य दाखविणारी मीमांसा केली आहे.

हा 'दृष्टांतपाठ' केवळ मूळतः वाचला व टीपांची व परिशिष्टांची कटकट बाजूला सारून केवळ श्रीमुखोक्त अशी चक्रधरांनी सांगितलेली दृष्टांतात्मक उदाहरणें 'गोष्टी' म्हणून वाचल्या, तरी प्राचीन मराठी भाषेच्या उदयकाळांतील महाराष्ट्र समाज कसा होता व त्याचें उज्वल दृश्य उभें करण्यास ती भाषा कशी समर्थ होऊं लागली होती याची पूर्ण जाणीव येईल; म्हणून तरी एकवार पाठावर दृष्टी वळवावी अशी नम्र विनंती आहे.

या महानुभावीय वाङमयाचा परिचय झाल्यास सात आठ वर्षें झालीं. त्यांतील अध्यात्म स्वरूपाचे ग्रंथ पाहतां एक विशिष्ट विवरणपद्धति व सिद्धांताची मांडणी करण्याची धाटणी त्यांत सर्वत्र आढळली; त्यावरून ते ग्रंथ पूर्णपणें ध्यानांत येण्यासाठीं चक्रधराचीं सूत्रें, लीळाचरित्रांतील लीळा आणि दृष्टांतपाठांतील चौदोत्तरशत दृष्टांत, यांचा अभ्यास आवश्यक वाटूं लागला. १९३१ मध्यें "लक्षणान्वय पाठ" प्रसिद्ध केला तेव्हां जे भाष्यस्थळ, बंधादि ग्रंथ पहावे लागले त्यामुळें आणि प्रमेयांचा व 'लक्षणरत्नाकराचा' परिचय झाल्यावर असें पक्कें वाटूं लागलें कीं केवळ सूत्रें जर 'प्रकरणवशाच्या अनुसंधानाशिवाय दुर्बोध तर प्रमेयें हीं लीळा

आणि दृष्टांत यांच्या परिचयाशिवाय अर्थविहीन. तेव्हां लीळाचरित्र व दृष्टांतपाठ व चक्रधरसूत्रसमुच्चय यांचें प्रकाशन महत्वाचें वाटून दृष्टांतपाठाची सटीप आवृत्ती प्रथमतः तयार करण्याचा बेत कायम केला व तो तयार होत असतांना जी थोडी फार सवड मिळाली त्यांत रा. नेने यानीं **चक्रधरोक्त सूत्रपाठ** व **लीळाचरित्र-एकांक** व **पूर्वार्ध भाग १**–हे तीन साधन ग्रंथ प्रसिद्ध केले. या कालांत जसा अध्ययनाचा हव्यास वाढू लागला तसा तो पुरविणारे पुरुषही पुढें येऊं लागले व जे कित्येक परिचय स्नेहभावांत दृढ झालें त्यांत महंत यक्षदेव ऋद्धपूरकर, महंत दत्तराज माहूरकर, म. गोपीराज मुशाफीर महानुभाव, म. हरींद्र जितेंद्र व्यास, म. कृष्णराजबुवा लासूरकर पारिमांडल्य, म. बाळकृष्णशास्त्री देवदेवेश्वर संस्थान, माहूर इत्यादिक महाशयांच्या ऋणाचें स्मरण वारंवार होतें.

महानुभाव पंथ जसा विदर्भांतील त्याप्रमाणें महानुभावीय वाङ्मयावर पहिला वडीलकीचा हक्क वऱ्हाडच्या सरस्वतीभक्तांचा होय हें उघड आहे. आम्हीं दोघेही वऱ्हाडच्या बाहेरचे, तेव्हां हें वाङ्मयधन ज्याचें त्यास देऊन "प्रत्यर्पितन्यास इवान्तरात्मा" व्हावें म्हणून ज्यानां आज सरस्वतीच्या साम्राज्यांत अग्रपूजेचा मान आहे, "कौन्सिल ऑफ स्टेट" मध्यें जे वऱ्हाडचे आद्यावधि अद्वितीय प्रतिनिधी म्हणून उभयतः नृपतिजनपदांना मान्य आहेत त्यांना हें प्राचीन गद्यरत्न अर्पण करीत आहोत. **ती. स्व. दादासाहेब खापर्डे** यांनी आमची विनंती मान्य केली व या ग्रंथाचा स्वीकार केला हें कळविण्यांत आम्हांस आनंद होत आहे. रा. रा. पांडुरंग नारायण वनहट्टी यानीं जर मुद्रणकार्य अल्पावधींत इतकें सुंदर केलें नसतें तर आजचा प्रसंग प्राप्त झाला नसता म्हणून त्यांचें, आणि दादासाहेबांचा 'ब्लॉक' दिल्याबद्दल रा. रा. गोपाळराव ओगले यांचे, आभार मानणें रास्त होय.

॥ श्री परेशायनमः ॥

श्रीचक्रधरनिरूपित

दृष्टान्तपाठ।

१. आंतुलाचा दृष्टांत।

सूत्र—परमेश्वरू परदर्श्यें होति : अवरदर्श्यें होति : परावरदर्श्यें होति ॥१॥

दृष्टांत—घरांतु असे तो आंतुल सकळही पदार्थ देखे : परि बाहीरिल काहींचि न देखे ॥

दार्ष्टान्तिक—तैसा परदर्श्याअवतारु पर सकळै देखे : अवर काहींचि न देखे। जेंचि देखणें आति तेंचि देणें आति ॥

२. बाहीरिलाचा दृष्टांत।

सूत्र—जो जेतुला तो तेतुलियातें करूं शके ॥१॥

दृष्टांत—बाहीरि असे तो बाहीरिल सकळै देखै : परि आंतुल काहींचि न देखे ॥

दार्ष्टान्तिक—तैसा अवरदर्श्याअवतारु अवर सकळै देखे : पर कांहींचि न देखे। जेंचि देखणें आति तेंचि देणें आति ॥

३. उंभरेयावरिलाचा दृष्टांत ।

सूत्र—जो जें होउनि असे तो तेंचि बोले ॥१॥

दृष्टांत—उंबरेयावरि जो असे तो आंतुल सकळै पदार्थ देखे : आणि बाहीरिल सकळै यदार्थ देखे ॥

दार्ष्टान्तिक—तैसा उभयेदर्श्या अवतारू पर सकळै देखे : अवर सकळै देखे : परही देणें आति अवरही देणें आति ॥

४. कुकडीयेचा दृष्टांत ।

सूत्र—जीवासि वेध आणि वेधशक्ति ते एथौनीचि कीं गा ॥१॥

दृष्टांत—कुकडी असे : ते आंडीं घालीं : पीलीं होति तेयांसि पाखवा दे । अमृतकळा असे ते संचरे । तयातवं तीयें वाढति ॥

दार्ष्टान्तिक—तैसे परमेश्वराचेया स्पर्शातवं एकां वेधु संचरेति : जैसे गोपाळांसि : गरुडाग्रोडेयासि : कांकोसासि : विष्णुभटासि ॥

५. मासळीयेचा दृष्टांत ।

सूत्र—दृक् स्पर्श आलाप अंतःकरण ॥१॥

दृष्टांत—मासळी असे ते पाणियांतु वीतुवीतु[१] जाए : मागौतें परतौनि तयांतें दृष्टी पाहे। अमृतकळा असे ते संचरे : तयातवं तीयें वाढति ॥

दार्ष्टान्तिक—तैसें परमेश्वराचीये दृष्टीपासौनि एका वेध संचरेति : जैसें भक्तासि : बाइसासि : निधिवासाचीये सभेसि : भारद्वाजासि ॥

६. कासवीयेचा दृष्टांत ।

सूत्र—चतुःप्रकारें वेध संचरति ॥१॥

१ वीतिवीति.

दृष्टांत—कासवी असे : ते थडियेसि वीये : आपण ऐलाडि असे : तींयें पैलाडि असति : तेथौनि तयांतें अंतःकरणीं आठवी । अमृतकळा असे ते संचरे तयातवं तींयें वाढति ॥

दार्ष्टान्तिक—तैसें परमेश्वराचीये आठवणेतवं एका वेध संचरेति : जैसें नित्यदीनीं लीळेचे पुरुषू : मातांगासि : शतांसहस्रां : एकाइसासि ॥

७ शब्दवेधिया रसाचा दृष्टांत ।

सूत्र—जीवासि बोध आणि बोधशक्ति ते एथौनीचि कीं गा ॥१॥

दृष्टांत—कव्हणा एका महात्मेयांचिये आधारीयेसि शब्द-वेधीया रसु असे : तो वाटा जातु असे : रात्रीं नगरांतु तोवें तांबें घडत असे : रसातें स्पर्शौनि शब्दु ये : मागुता तेथचि विलया जाये : तोवें तांबें असे तें सोनें होए ॥

दार्ष्टान्तिक—तैसे परमेश्वराचेया शब्दापासौनि[१] एका वेधु संचरति : जैसें संतोखासि : वींझुगाचेया ब्राम्हणासि : हंसराजासि : अवडळ भटासि ॥

८. समुद्राचा दृष्टांत ।

सूत्र—परमेश्वरापासौनि चतुर्विध दान आति ॥१॥

दृष्टांत—कव्हणी एक समूद्रासि उद्यमा जाति : एक कवडे देखति : ते कवडे भरीति : ते कवडांचि धाले जाति । एक भणति : ये समुद्रीं माणीकें मोतीयें असति : ते परते जाति : ते माणिकें मोतियें भरीति : ते तेणेंचि धाले जाति । एक भणति हा समुद्र : इये समुद्रीं काइएक नसे : इये समुद्रीं अनर्घ रत्नें सति : भणौनि ते राहाति : अनर्घा

---

१ तत्र

रत्नांचा उदिमू करीति : अनर्घें रत्नें घेति : गावांसि येति : रायासि भेटति । रावो रत्नपारखी बोलावी : यांसि रूप काइ। ते म्हणति : यांसि रूप नाहीं : यांसि रूप करी तयाचीये जीव्हे कुष्ट लागे : तथा तयाची जीभ झडे : ना : इयें अमोलीकें रत्नें : मग तयांसि वोवाळणीं पडे : ते तयांसि खावेया होए : तयांचीं रत्नें तीयें तैसींचि असति : एरांसि केतुलें एकदीं खावेया जालें : मग नाहीं ॥

दार्ष्टान्तिक—तैसें परमेश्वरुसंनिधानीं असता एक सील्पविद्या घाले जाति : एक अपरोक्षविद्या घाले जाति : एक म्हणति हा परमेश्वरु : ये परमेश्वरीं काइएक नसे : परमेश्वरी ब्रम्हविद्या असे । ते ब्रम्हविद्येचा उदीमू करीति : तयांसि ब्रम्हवीद्या होए : मग तयांचे यातायात पारुखति :

९. सोमकांताचा दृष्टांत ।

सूत्र--हें शास्त्र दृष्टप्रति कारण होए कां अदृष्टप्रति कारण होए ॥१॥

दृष्टांत--चंद्राचां रश्मीकरूनि सीळापाषाण (लतागुल्में रामेश्वरवास) नीवति : परि द्रवति ना : तैसा सोमकांतु नव्हे : तो द्रवे ॥

दार्ष्टान्तिक—तैसें परमेश्वरुसंनिधानीं एक आधिकार्ये असति : एक अनधिकार्यें असति : अनधिकार्यें असति तयांसि सुखविशेष होए : परि बोधदातृत्व नव्हे : तैसे अधिकार्यें नव्हेति : तयांसि बोधदातृत्व होए ॥

१०. हीरेखाणियेचा दृष्टांत ।

सूत्र—वोखटें करीतसांतां कव्हणी गोमटेयातें न पवे : गोमटें करीतसांतां कव्हणी वोखटेंयातें न पवे ॥१॥

दृष्टांत—कव्हणी एक हीरयांची खाणि खणति : खणतखणतां खांब राखति : वोदरे तेथ मध्यें टेंका सुति : तयासि षटकोणि हीरा सांपडे : एकासि हीरेकणी सांपडे : एकु नसुधा रींगे : नींगे। एकावरि दराडि पडे ॥

दार्ष्टान्तिक—तैसे परमेश्वरुसंनिधानीं असतां एकां मोक्षु होए : एका देहविद्या होए : तथा संतें फळें होति : एका सृष्टिशुन्य होए : एका नित्य नरक होति ॥

११. वेंवाचा दृष्टांत ।

सूत्र—ईश्वरीं जीव नंह्लिळ होति ॥१॥ जीव स्वार्थपर ॥२॥

दृष्टांत—कव्हणी एकु साळी हाटासि वेंव घेयावेया जाए : हाटवेळु नव्हे भणौनि वृक्षा एका तळीं[1] नींजे : वरूतें पाहे तवं सरळ डाळ खांदीं देखे : मग म्हणे : याचें कैसें चरवें वेंव होइल : तवं वेंव पडे : वेंव घे : खांदावरि घाली[2] : नींगे : मग तो म्हणे : आगा मी कल्पवृक्ष : प्रसन्न जालां : माग। तर मोडीये तोडीये आणिक वेंवाचि दे ॥

दार्ष्टान्तिक—तैसे परमेश्वरु प्रसन्न जालेया जीवें काइ वीखोवेव्हारु मागावा : परमेश्वरू प्रसन्न जालेया जीवें परमेश्वराचें प्रेम मागावें कीं।

१२. राहाटघडीएचा दृष्टांत।

सूत्र—मायाचक्रभ्रमणन्यायें पर्यायवशें जीवु सकळहीं पावे एकवांचौनि ॥१॥

दृष्टान्त—राहाटीं घडी बांधली असे : ते ये : जाये : भरे : रीचवे ॥

---

१ खालीं. २ घालौनि नींगे

दार्ष्टान्तिक—तैसा हा जीवु चैतन्यें बांधला असे : तो स्वर्गा जाए : नरका जाए : मोक्षा जाए : कर्मभूमी ये : क्रिया करी ॥

१३. माळेकाराचा दृष्टांत।

सूत्र—हा कां गा खांडु देईल ॥१॥ एथौनि जीवांचीं कृतकर्मे जाणिजेति म्हणौनि एथ जीवाची घृणा नुपजे ॥२॥ एथौनि तुमचे दोष बाहेरि घालीजेति तरि पोरेंहो पोटीं सुरीं सोसों मराल ॥३॥

दृष्टांत—कव्हणीं एकु माळेकार माळेयावरि उभा असे : तयाचेया सेताचीए लवणीं चोरू एकु असे : तो वाटा घे : वोहरे मारी : ब्राह्मणु मारी : संन्यासी मारी : तो तें देखे परि उगाचि असे : मग एकु दीसु तो रायासि सांपडे। मग तो रावो तयातें खैरी जुंपावेया धाडी : मग अवघीये गावींचा लोकु पाहावेया ये : तो म्हणे : कैसा बापुडा : गोरा गोमटा : धारे धाकुटा : राणीयेचा पूत ऐसा दीसतु असे । मा रावो यातें खैरीं कां जुंपिताए : यातें पाखाळु कां नेघे । मग तो माळेकारु कांबळेयाची[१] बुंथि घालौनि पाहावेया ये : तवं तो आइके। मग म्हणे : एणें जीयें पापें केलीं आहाति तीयें मी जाणतु आहें कीं। याचें लांब खांड तें मूहुरी एव्हडें करावें : तथा लाहान खांड ते मूहुरी एव्हडे करावे। याचां खांडीं गांवो पूजावा ॥

दार्ष्टान्तिक—तैसें परमेश्वरु मनुष्यवेशाची बुंथि घालौनि संसारामध्यें अवतरले असति : ते जीवाचीं कृतकर्मे जाणत असति : भणौनि अनुकंपा उपजों नेंदावी : काइ आपुलेयाचीही उपजों नेंदावी : ना : तयाचि होआवी ॥

१ घोंगतें

१४. डोळेयाचा दृष्टांत।

सूत्र—**जीव जैसा संगीं ठेविजे तैसा होए ॥१॥ जेतुलजेतुला प्रपंचीं जडे तेतुलतेतुला परमेश्वरीं उजडे : जेतुलजेतुला प्रपंचीं उजडे तेतुलतेतुला परमेश्वरीं जडे ॥२॥**

दृष्टांत—**डोळेयाचां ठाइं स्वतसीधा दोनि सामग्रीया : तेजसामग्री आणि मेदसामग्री। तेजसामग्री वाढवी तरि रत्नाचीये गर्भीचे खूतले रंग देखे : मेदसामग्री वाढवी तरि कांहींचि न देखे ॥**

दार्ष्टान्तिक—तैसा या जीवाचां ठाइं दोनि सामग्रीया : संतसामग्री असंतसामग्री : संतसामग्री वाढवी तरि चैतन्यपर्यंत उजळे : असंतसामग्री वाढवी तर मृतीकापर्यंत मैळे। एवं वीधि इष्टातव वाढवीत वाढवीता प्रेमासि पात्र होए : अवीधि अनीष्टातव वाढवीत वाढवीता नीत्य नरकासि भाजन होए ॥ **वासपक्ष** रत्नस्थानीं स्वरूप : तेथचा गर्भ तीन्ही अंश। एकीकडे माया : एकीकडे ब्रम्ह : मध्यें ईश्वरू। भणौनि गर्भू खुतले रंगस्थानीं ज्ञानिया भक्ताची प्राप्ति : दोहींचा विभागु देखे : अनुभूतीचा विशेषु शक्तीयुक्त देखे ॥

१५. खडेया खुबटेयाचा दृष्टांत।

सूत्र—**सृष्टीमध्यें जेतुलें जीव करी तेतुलेनि काइसेनिही मुचीजेना एक वांचौनि ॥१॥ हें नेणोकाइ एक तें तुम्हासीचि कीं गा : यासि काइ : हें आगाधाचें आगाध ॥२॥**

दृष्टांत—**कव्हणी एकु डोहाचीए थडीए बैसला असे : तेथ कव्हणी एकु वेडसु वेडसु ये : उदकाचें स्वछ निर्मळपण देखौनि आंतुल खडे खूबटे आसळग देखे : आंगीयेची बाहे वरौती सारुनि हातु घाली : हातें न पवे : मग पावो घाली : पायें न**

पवे : मग पडदनी घेउनि बुडी दे : तेणेंहीं न पवे । मग थडीए बैसला असे तो म्हणे : आगा हें अक्षोभ्य उदक : तुं भलतेंही करि पां जरि पावसि ॥

दार्ष्टान्तिक—तैसें अवर विद्यांचां साधनीं परमेश्वरू पावोनि म्हणति परि तो काइसेनिहीं न पविजे। बासपक्ष हातस्थानीं सील्पविद्या : पाएस्थानीं अपरोक्षविद्या : बुडीस्थानीं चैतन्यविद्या : थडीए बैसला तीये स्थानीं अपरोक्षज्ञानीया : तो म्हणे : तुं भलतेंही करिपां जरि पावसि ईश्वरू काइसेनिहीं न पवीजे ॥

१६. बांदकरीयाचा दृष्टांत ।

सूत्र—जीव जीवां साजात्य : हें सकळांहीं वैजात्य ॥१॥ जीव जीवाचें म्हणितलें करिति ॥२॥

दृष्टांत—कव्हणी एकु मैळा चोरू बांद धरी। रावो तेयातें मागावेया जाए : आरे मैळेया हें बांद आम्हांसि दे : मग तुं म्हणसी तें आम्ही तुज देउनि । तो रायासि नेंदी : मग पंचनगरें मागावेया येति : (नवही मागावेया येति) : आरे मैळेया हे बांद आम्हांसि दे : मग तूं मागसी तें आम्हीं तुज देउनि : म्हणसी तें करुनि : त्यांहीं नेंदी । मग गाणें : भाटें : थोंटीं : सीमूरें : रांधवणें : सामान्य स्त्रीया : कालाळें : तीयें रायातें वीडा मागावेया एति तीयें म्हणति आम्हीं बांद मागौनि। रावो म्हणे : आम्हासि नेंदीचि : पंचनगरांसि नेंदीचि : मा तुम्हांसि काइ देइल । ना : आम्हीं मागौनि । मग रावो तयांसि वीडा दे : मग तीयें जाति : तीयें म्हणति : आरे मैळेया हे बांद आम्हांसि दे : तो म्हणे : मातें रावो मागावेया आला होता : तेयासि नेंदीचि : पंचनगरें

मागावेया आलीं होतीं : तयांसि नेंदीचि : मग तुम्हासि काइ देइन तीयें म्हणति हे काइरे मैळेया : मर : तुवां जोडावें आम्हीं खावें : मागां जोडीलें तें आम्हांसीं खादलें : पुढां जोडिसी तें आम्हांसींचि खासी : भणौनि उमेठां[१] शब्दीं वानीति : मग तो तयांसि दे ॥

दार्ष्टान्तिक—तैसें हा जीवु ईश्वरा मागतां जन्म नेंदी : देवतां मागतां नेंदी: तरि कवणासि दे : ना: विषएवेव्हाराचेया चाडा जीवासि दे ॥

१७. काकसुकराचा दृष्टांत ।

सूत्र--एक अमेध्यकृमी : एक विषयकृमी ॥१॥ अमेध्यतुल्य विखो तो कव्हणासि दुर्लभ : जे कृमीतुल्य पुरुष तयांसि कीं ॥२॥

दृष्टान्त—काउळा असे : तो चांचु करूनि अमेध्य ऐसा सारी : ऐसा सारी : तयांतु सार नीवडी : तयांतु कैचें सार : तेथिचें सार तेहीं अमेध्यचि का । सूकर असे : तो बोडीआंतु चूडि खोवी : तयांतु सार नीवडी : तयांतु कैचें सार : तेथिचें सार तेंहीं बोडीचि कीं ॥

दार्ष्टान्तिक—तैसा महात्मा विषएवेव्हारामाजि असौनि परमार्थ नीवडी : तयाचेनि तेयासि गोमटें नाहीं : मा तयाचेया जवळिका तुम्हांसि कैचें ॥

१८. लाडाचीये बासीचा दृष्टांत ।

सूत्र—प्राणियांतें इष्टापासौनि काढुनि अनिष्टीं घाली तो प्रतारक आचार्या बोलिजे ॥१॥ प्रतारक आचार्या नरक ॥२॥

दृष्टान्त—वांसरू तान्हेलें होतें : तें पाणियाची बोल

---

१ उमेठीं

देखौनि अडाभवंतें भवे : वाटा लाडु जात होता : बापुडी यासी तान्हैली भणौनि चहुं पाइं धरूनि[१] अडांतु घाली : तें जीवें जाए : तेयासि नरक होति ॥

दार्ष्टान्तिक—तैसा कव्हणी एकु संसारत्रसीत, महात्मावेष देखौनि जवळि जाये : तेयातें तो प्रतारी : हें अवघें तें तुचि : तयाही नरक होति : तेयाही नरक होति ॥

१९. बांधलीये गाईचा दृष्टांत ।

सूत्र—तेणें लाविलें तें तो फेडी । तेणें नाहीं लाविलें तें तेयाचेनि न फिटे ॥१॥ जीवाचां बंधमोक्षीं परमेश्वरू क्रीडति ॥२॥

दृष्टांत—बांधली गाए असे : ते सुटावेया लागौनि खुंटाभवंतीं भवे । तेणें तियेचा गळा अधिकाचि आवळे : जेणें वीरडें लावीलें तो सोडी तैं सुटे : कां तीये जातीचें लेंकरू सोडी तैं सुटे ॥

दार्ष्टान्तिक—तैसा परमेश्वरप्रवृत्ती जीवासि आदिमळु लागला असे : तो फीटावेया लागौनि जीवु अन्येग उपाये करी : परि ते काइसेनिहीं न फीटे : तेणें अधिका नरकचि होति : स्वरूप फेडी तै फीटे : कां अवतारु फेडी तै फीटे ॥

२०. वज्रकीटकीयेचा दृष्टांत ।

सूत्र—हें जीवाअविद्ये विभाग करूं जाणे ॥१॥ जैसें बापपुत्रां वाटलिया अर्थार्थीं संबंधु नाहीं ॥२॥ जीव आणि बांधावे आणि सोडावे : ऐसिया जीवां श्रीप्रभु मोकलिति तैंचि मोकलिति ॥३॥

---

१ उचलौनि

दृष्टांत—कव्हणा एका अंताचीए सवडी वज्रकीटकी लागली असे : ते आगीं जाळितां जळेना : पाणियें बुडेना : शस्त्रें छेदेना : घणवरि पीटितां परि मरेना : सांडसवरि तोडीतां परि तुटेना : कव्हणीचि रोगु नेणे : अधिका दुःखचि होए : एकाधा एकु रोगु जाणे परि उपावो नेणे एकाधा उपावो जाणे तरि रोगु नेणे : एकाधा एकु जाणतायें : तो रोगुही जाणे आणि उपावोही जाणे : तो तयातें अपयें पाजी : तेणें तें चरफडौनि मरे ॥

दार्ष्टान्तिक—तैसें जीवासि अनादि अवीद्या लागली असे : तें फीटावेया जीवु अनेग उपाए करी : तेणें अधिका नरकचि होति : मग परमेश्वरू कृपाशक्ति करूनि फेडीति तै फीटे ॥

२१. खाजेयाचा दृष्टांत ।

सूत्र—स्वर्गी इंद्रादिकांचां ठाइं विषय मानसीक विखो ॥१॥ कैलासवैकुंठपर्यंत तापस्पर्श एकु आति ॥२॥

दृष्टान्त—खाजें खादलेयां क्षुधा नीवृत्ति तरि होए परि भूक न वचे : तथा तृप्ति नव्हे ॥

दार्ष्टान्तिक—तैसीं इंद्रादिकाचीं फळें च्युतिमंतें आन दुःखरूपें ।

२२. अन्नाचा दृष्टांत ।

सूत्र—चैतन्यादिकरूनि सकळ फळसाधनें च्युतिमंत बोलीजेति ॥१॥

दृष्टान्त—अन्न जेविलेयां भूक तरि जाये : अमरां नव्हीजे ॥

दार्ष्टान्तिक—तैसें चैतन्यफळ मोक्षतुल्य तरि होए परि च्युतिमंत हा दोषु ॥

२३. अमृताचा दृष्टांत ।

सूत्र—चैतन्यापर परमेश्वरपद पावीजे : ते अच्युतपद बोलिजे ॥१॥

दृष्टान्त--अमृत पीजे[१] तरि अमरां होइजे ॥

दार्ष्टान्तिक—तैसा मोक्षु नव्हे : मोक्षु जालेया यातायात पारुखति ॥

२४. वटबीजाचा दृष्टांत ।

सूत्र--चैतन्यानुभूतीं जीवीं बीजभूत अविद्या असे : जैसा वटबीजीं वट असे । ॥१॥ चैतन्यादीकरुनि सकळ फळ साधनें च्युतिमंतें बोलीजेति ॥२॥

दृष्टांत--वटबीजामध्यें साकोपसाकीं पानीं फळींसीं आवघा वट सामावला असे : मोटका भूमि उदकाचा योगु होए आन प्ररोहातें पावे ॥

दार्ष्टान्तिक—तैसें चैतन्यफळीं सुक्ष्मु प्रपंचू उपसंहारला असे : च्युति होए आन स्थुळेंसीं उठी ॥

२५. तुपाभाताचिया घासाचा दृष्टांत ।

सूत्र—जवं पुरुषु विद्ये आधिन नव्हे तवं ब्रह्मविद्या आधिकार आति ॥१॥ बीढारावरि काइ बीढार असे ॥२॥

दृष्टांत—कव्हणी एकि माता असे : ते हातीं तुपभाताची वाटी घेउनि लेंकुरुवासि घांसु सुए : तें तोंड ऐसें पळवी ऐसें पळवी : मग ते म्हणे : आलें असैल आलेया पालया पोट भरूनि : म्हणौनि खालि वाटी ठेवी ।

१ अमृतपान कीजे   २ समान

दार्ष्टान्तिक—तैसें विद्यामार्गनांवेंचि आले पाले असति : तेथ ब्रह्मविद्या कें रीगो लाहील । तैसें परमेश्वर प्रवृत्तिवशें निरूपीत असत : परि जीवु साधनाचेनि धालेपणें नेघे : तें धालेपण येवों नेंदावें ॥

२६. सेवाळलिया खडकाचा दृष्टांत ।

सूत्र—**राजसा तामसा धर्मी अधिकार नाहीं ॥१॥**

दृष्टान्त—**सेंवाळलें खडक असे : तयावरि पावो देउंचि तथा ठेउंचि न ए। ऐसांहीं ठेवीजे तरि नीरसौनि पाडी : गुडघे कोपर झांजरीति ॥**

दार्ष्टान्तिक—तैसें तामसाप्रति धर्म बोलोंचि न ए : ऐसांहीं बोलीजे तरि दुःखातेंचि दे ॥

२७. पाणियां आंतुल गुंडियाचा दृष्टांत ।

सूत्र—**आधीं येथें बुद्धी व्हावी मग येथचिया परिवारावरि व्हावी ॥१॥**

दृष्टान्त—**पाणियांतुल गुंडा : वरि पाणियें भीजला वोला दीसे। फोडौनि पाहीजे तवं आंतु कोरडा असे ॥**

दार्ष्टान्तिक—तैसें परमेश्वरसंनिधानीं पुरुषु साद्रउ ऐसा दीसे : पुसौनि पाहीजे तवं आंतु कठीन असे ॥

२८. तनधैलिया वावराचा दृष्टांत ।

सूत्र—**राजसा तामसा धर्मी अधिकार नाहीं ॥१॥ आप्ताचें वाक्य लागे ॥२॥**

दृष्टांत—**तनधैलें वावर असे : तें आंतु बाहीरि तनें दाटलें असे : तथा धालें असे : मग नांगरांजे : दुनीजे : कांसीया**

फेडीजति : मग पेरींजे : कुंभचासी तथा भार आतौनि पीके : ना तैसेंचि पेरींजे तरि न पीके ॥

दार्ष्टान्तिक—तैसा राजस पुरुषु आंतु बाहीरि अवघी रजाची क्रीया करी : ते फेडौनि दीजे तरि प्रभवे : ना तयाचिवरि दीजे तरि न प्रभवे ॥

२९. कानवाथराचा दृष्टांत ।

सूत्र-- ऐसें प्राणियांचीया इष्टाआड न येईंजे कीं ॥१॥ जीव जीवा काइ होति : परमेश्वरू एक सोडवीता ॥२॥

दृष्टांत--कानवाथरु असे : तो सीरसाळेयातें व्यापौनि राहीला असे : तेयासि टांकी लागेना : ऐसाहीं लावीजे तरि उसळौनि पैऱ्हां पडे : एकाधा एकु तयावरि कोळें जाळी : वरि कुळथवणियें सींपे : मग टांकी लावी तरि लागे : एव्हडा-लया चकतळीया नीगति : रामेश्वरबास : तीया पुरींजति : परशुराम बास : तीया ऐसीयाचि सांडीजति तरि पावो तोडीति : तयासि वना नाही पाटा नाही। तळीं सीरसाळा नींगे तयाचीं लींगे होति प्रतिमा होति : जें कीजे तें होए ॥

दार्ष्टान्तिक—तैसें जीव जीवासि कानवाथर होउनि लागले असति : देवता जीवा कानवाथरा होउनि लागलीया असति : मग परमेश्वर कान-वाथर फेडौनि आपुलेयातें राखति। तैसें आपण कव्हणाहीं कानवाथरा होआवें ना : आपणयांसि कव्हणी कानवाथरु लागों देयावा ना ॥

३० वेळुवाचा दृष्टांत।

सूत्र--हृदयशून्या धर्मीं अधिकार नाहीं ॥१॥

दृष्टांत--चंदनाचिया जवळीका आरी : बोरी : टाकळी : वेहंकळी : पाडळी वेधति : परि वेळु न वेधे। कां : तो अंतर सारु नव्हे : तथा भींतरी पोकळु असे ।

दार्ष्टान्तिक—तैसे परमेश्वरसंनिधानीं बहीर्यागीए अंतर्यागीए असति : राजस तामस असति : कखाए वीखए असति : कव्हणी एकी अवस्वरीं ते ईश्वरीचेया बोधदातृत्वासि उपयोगा जाति : परि हृदएशून्ये तो न वचे ॥ **बासपक्ष** ॥ आरीस्थानीं अंतर्यागीए : बोरीस्थानीं बहिर्यागीए : टाकळीस्थानीं राजस : वेहंकळीस्थानीं तामस : पाडळीस्थानीं वीखये कखाए ॥

३१. जारसैलेया वाळुकाचा दृष्टांत ।

सूत्र—**जरठा धर्मीं अधिकार नाहीं** ॥१॥

दृष्टांत--**जारसैलें वाळुक असे : तें खावोंचि न ए : ऐसाही मीठ मीरपुडी लाउनि खाइजे तरि तोंडीं खतचि पाडी** ॥

दार्ष्टान्तिक—तैसें जरठाप्रति बोलोंचि न ए : ऐसांहीं बोलीजे तरि दोखंसींचि उठी ॥

३२. भवंरैलेयां वाळुकाचा दृष्टांत ।

सूत्र--**भक्तीजडा धर्मीं अधिकार नाहीं** ॥१॥

दृष्टांत--**भवंरैलें वाळुक असे : तें वरि बरवें दीसे : फोडौनि पाहीजे तवं आंत गाठी भरलें असे** ॥

दार्ष्टान्तिक—तैसा भक्तिजड साद्रव सप्रेमळ ऐसा दीसे : पुसौनि पाहीजे तवं अन्यथाज्ञानें भरला असे : सर्व वीष्णुमयं जगत "जोन्इळे परमेश्वरू" ॥

३३. देहलुतैलेया वाळुकाचा दृष्टांत ।

सूत्र--**कर्मजडा धर्मीं अधिकारु नाहीं** ॥१॥

दृष्टान्त--**देहलुतैलें वाळुक असे तें हातीं घेउंचि[१] न ए : ऐसाही घेइजे[२] तरि दोन्ही हातु कीवीयां भरीति** ॥

---

१. धरूंचि २. धरीजे

दार्ष्टान्तिक—तैसें कर्मजडासि आपणपें दाउंचि न ए : ऐसाही दाखवीजे तरि दोखुचि घे : कर्मजड्ड असेल तया घरा न वचावें तथा देशा[१] न वचावे ॥

३४. कोवळेया वाळुकाचा दृष्टांत ।

सूत्र--**जीव सर्वाधिकार्या ॥१॥**

दृष्टान्त--**कोवळें वाळुक असे : तें नीर्दोष : सर्व उपयोगा जाए । तयाचें तळींव होए : सांबारींव होए : कुसंबीर होए : लोणचिं होए : हीरवें खावों ये ॥**

दार्ष्टान्तिक—तैसें वयेसा कोमळ पुरुषु सर्वाधिकार्या : तयाचें केलें भलेतें होए : परधर्मी उपयोगा जाये : तो शास्त्र काढी तरि शास्त्र नीगे : वैराग्य करी : तरि वैराग्य होववे : ईश्वराचें म्हणीतलें तयासीचि होववे : ना प्रेमाधिकारू घडवीति तरि तयासि तेंहि होववे : तो सर्वाधिकार्या : तयासि परमेश्वरू आपलें ज्ञान देति : सकळही गोमटें करीति ।

३५ इंद्रवणाचा दृष्टांत ।

सूत्र—**जरठावस्थे विकारु जाए परि विकल्पु न वचे ॥१॥**

दृष्टान्त—**कोवळें इंद्रवण असे : तें तोडीजे तै तुटे : तेंचि देठीं नीबर जालेयां तोडीजे तरि न तुटे । ऐसांहीं तोडीजे तरि मूळांसि वेलि हातासि ये ॥**

दार्ष्टान्तिक--तैसे उभए–जरठ निरूपणाचेनि आक्रोशें करुनि भिक्षा करविजे तरि अवीव्रसीं उठी : मज म्हातारपणीं कांहीं लागैल : हीरडा बेहाडा मीठ वस्त्र घेयावया होइल ॥

३६ सन्निपातलेयाचा दृष्टांत

सूत्र—**जीवेश्वरां स्वामीभृत्य संबंधु अनादीचा ॥१॥**

---

[१] गांवाही

दृष्टान्त—कव्हणा एकाचा पाइकु सनिपातैला असे : तो आपुलेया गोसावीयासि म्हेळीएची सीवी दे । तो तेयाचे वोखटें नेघे हीताचि प्रवर्ते । मग म्हणे : यातें कव्हणी राखो कां गा : यातें जो राखैल तेयासि मी एव्हडी सोनयांची रासि करीन । तेंचि सावध जालेयावरि जरि म्हणे तरि आव्हेरीति : सुरीया हाणौनि मारूनि फेडी ।

दार्ष्टान्तिक—तैसें परमेश्वरातें जीवु म्हणे : देवतातें जीवु म्हणे : परि परमेश्वरू तेयाचें वोखटें नेघौनि ज्ञान देति । तेंचि जरि ज्ञान जालेयावरि म्हणे तरि अव्हेरीति ॥

३७. विषयाचा दृष्टांत

सूत्र—**आर्तातें परमेश्वरु वाडोवाडीं गिवसती ॥१॥**

दृष्टान्त—**कव्हणी एकु वीखया असे : तो पात्रालागि देशोदेशीं गावोगावीं हींडे । पात्र देखे तेथ रमे ॥**

दार्ष्टान्तिक—तैसें परमेश्वरू आर्ताकारणें देशोदेशीं गावोंगावीं हींडति : आर्त भेटे तयासि दान देति ॥

३८. दूरस्थ मातेचा दृष्टांत ।

सूत्र—**परमेश्वरू आर्तदानी ॥१॥**

दृष्टांत—**कव्हणी एकी माता असे : ते लेंकुरूवातें नीजउनि कांडुं-जाए : कां दळुं जाए : मोटका पान्हा ए आणि ते जाणे : तें भुकैलें असैल । मग एउनि तयासि स्तन पान दे ।**

दार्ष्टान्तिक—तैसें परमेश्वरू आणीके देशीं राज्य करीत असति : आणि आर्तु आणीके देशीं असे : तेयाची आर्ति जाणौनि आपण पुरवीति कां कव्हणा एका करवि पुरवीति ॥

३९. हीरडेया बेहाडेयाचा दृष्टांत ।

सूत्र--परमेश्वरू अनिमित्यबंधू ॥१॥ अनाथनाथ ॥२॥ कृपाळू ॥३॥ परमेश्वर पुरुषार्थ : लाभापासुनि लाभ ॥४॥

दृष्टांत--कव्हणी एकि माता असे : तिएचीया लेंकुरवासि भूक नाहीं : मांद्य पडिलें असे : भणौनि ते हीरडेया बेहाडेयाचा गुळळा दे । मग तेयासि भूक लागे : मांद्य फीटे : मग स्तनपान दे ॥

दार्ष्टांन्तिक--तैसे परमेश्वरू जीवासि आर्ति उपजौनि ज्ञान देति ॥

४०. सुरीयेचा दृष्टांत ।

सूत्र—अयोग्यासि योग्य करीति : योग्यासि परमेश्वरू ज्ञान देति ॥१॥

दृष्टान्त—गांवा खाती ये : आवघी मीळौनि कामीठा घालवीति : (एकीवासना : तो कामीठा घाली ।) आवघे गांवींचे खांडीं सुरीया वीसवीति : एकाधेया एकाचीए सांदीसवडी सुरी पडिली असे : तो घेउनि ये : म्हणे हे सुरी लाउनि देया : तो हातीं घे : ऐसी पाहे ऐसी पाहे : म्हणे हे सुरी रायासि योग्य। मग तो म्हणे हे आवघी खतेनि खादली असे : आगी आंतु घालीजैल तरि जळौनि जाइल : इचे दाम च्यारि घेया : मां मी इचे इळे खीळे करीन : तो दाम च्यारि घे : मा घेउनि जाए । तो ताट वेगळें करी : परजु वेगळा करी : ताट ताटांतु घाली : परजु परजांतु घाली : ऐसी वीतंडौनि सांडी : तो वीळवरि म्हणीये करी : परि दृष्टि तयाचि वरि असे : मग आगी आंतु घाली : तेणंकरूनि एक खते झाडी : तावी : पीटी : उजरी :

तेणेंकरुनि एक खते झाडी : खरसाहाणे लावी : तेणे करूनि एक खते झाडी । तेल साहाणे लावी : तेणेंकरूनि एक खते झाडी : तुपसाहाणे लावी : तेणेंकरूनि एक खते झाडी । मग आपुलीया परी एकु परजु वाए । एकी वासना : मग तोचि परजु वाए । ते सुरी रायासि भेट करी । मग रावो तेयासी दायेपसाये दे । मग तो रावो वैसला असे तेव्हळि पुढां ठेवी : चाले तेव्हळि हातीं धरी : जेवी तेव्हाळि मांडिएवरि ठेवी : नीजे तेव्हाळि आडयांगीं[१] घाली : ऐसा तीएसि केव्हळांहीं वीसरे ना[२] ॥

दार्ष्टान्तिक—तैसे परमेश्वरु जीवासि बोधदातृत्व देउनि च्यान्ही ज्ञानें निर्वाळुनि प्राप्ति करूनि ईश्वरस्वरूपीं मेळवीति ॥ खातीस्थानीं परमेश्वरु : गांवस्थानीं कर्मभुमि : जेणें आणिली तीए स्थानीं देहाभिमानीनि देवता : सुरीस्थानीं अधिकार्या जीवु : दामस्थानीं देवतेसि आनंदु देति : वितंडणें विसंबणें स्थानीं कर्मराहाटीआंतुनि काढुनि दैवराहाटीआंतु घालीति जैसे भट : आगीआंतु घाली तीए स्थानीं बोधदातृत्व : तावी : पीटी : उजरी तीएस्थानीं धाववीति : पव्हवीति : बुझवीति : यापरी एक कर्में नासीति : खरसाहाणेस्थानीं अपरोक्ष : तेथ कर्में नासीति तेलसाहाणेस्थानीं सामान्य : तेथ मळ नासीति : तुपसाहाणेस्थानीं वीशेष : तेथ अयोग्यता नासौनि योग्य करीति : परजस्थानीं चरम देह : राएस्थानीं स्वरुपाची प्राप्ति करीति : हे **बासपक्ष** । खातींस्थानीं उभएदृश्या अवतारू : राएस्थानीं परदृश्या अवतारू : केवि : ना : श्रीप्रभूचां ठाइं सकळ अवतारु योग्य करुनि लावीति : अथवा बीजें करावेयाची प्रवृत्ति तरि अवतार अवतारा नीरोवीति । दावोपसावो

---

१ अ.डासनीं २ वीसंबेना

तो साधिकरणीं लाभे : मोक्ष देति कां प्रेम देति : ना : अधिकरणीं तरि अगाधे स्वरूपीं अवताराचा तोखु आति ।.न विसंवणें स्थानीं सुखावेगळा केव्हळांहीं न करीति । तैसें नीमीत्तवीधीचां कष्टीं तावीला : आक्षेपाचां घाइं घडिला : चतुर्वीधा दुःखाचीए साहाणे लाउनि प्रेमासि पात्र केला ॥ प्रमेय ॥

४१. रुंभणेयाचा दृष्टांत ।

सूत्र--पोर जीवु आपणा करूं आवडे तेंचि करी : पाठीं पुढिलावरि ठेवी ॥१॥

दृष्टांत—कव्हणी एकु दुधाचे गुण वीसेख अन्मोदीत होते : तेथ जात्यंधु आला होता । तेणें पुसीलें : हां गा दूध तें कैसें : दूध तें पांढरें : पांढरें तें कैसें : पांढरें तें बळहेसारीखें : बळहे ते कैसी : बळहे ते रूंभणेया सारीखी : रूंभणे तें कैसें : रूंभणें तें ऐसें : भणौनि हातु वांकुडा करूनि पाहीलें । एकु दीसु तेणें रूंभणें कोठां देखीलें : तथा आंगणीं देखीलें : हातु वांकुडा करूनि पाहीला : दूध तें हें भणौनि पेवों लागला : हीरडीया फुटति : रगत नीगे । आरे हें काइ करीतासि : ना : दुध पीताये । आरे सांडि : सांडी हें रूंभणें : हीरडया फुटति : ना : माझेनि बापें सांघितलें : दूख होए परि न संडी ॥

दार्ष्टान्तिक--तैसें कव्हणी एकु ईश्वराचे गुण विशेखु अन्मोदीत होते : तेथ कठीया बैसला होता । तेणें पुसिलें : हां गा परमेश्वरू तो कैसा । ना : जैसा कैलास वैकुंठीचा ब्रह्मावीष्णु महादेवो । ब्रह्मा तो कैसा : जैसा आयूध्येचा रामु । रामु तो कैसा : मग द्वीभुज : चतुर्भुज : भणौनि प्रतिमा दाखवी । मग तेथ तो राहे : झाडी : सडा संमार्जन करी : पाला तोडी : तेणें अधिका नरकचि होति । भणौनि हेतुगर्भीत हींसा ॥

४२. चांदोत्रेयाचा दृष्टांत ।

सूत्र--ब्रह्मविद्येची सारखी वाटणी इतर विद्येचां ठाइं आति ॥१॥ चैतन्य विद्या आदीकरुनि सकळही विद्या अपरा अमोचका बोलीजेति ॥२॥

दृष्टांत--कव्हणी एकु क्षुधार्थी देउळासि ये : तवं चांदोवां आंबेयांसारिखे आंबे देखे : केळांसारिखीं केळें देखे : नारीएळांसारीखीं नारीएळें देखे : (रामेश्वर वास :) जांबुळांसारीखीं जांबळें देखे । तीयें तोडुनि खावों बैसे : तवं सेणें मातियां तोंड भरे ॥

दार्ष्टान्तिक—तैसा अवरविद्यांचां साधनीं करूनि ब्रह्मविद्येचा सारिखा आभासु देखे : तीयें फळीं च्युति होय : दुखः होये । तैसीं गा ब्रह्मादिकांचीं फळें : हे **बासपक्ष** ॥ आंबेस्थानीं चैतन्य विश्वेचें फळ : केळस्थानीं अष्ठभैरवांचीं फळें : नारीएळस्थानीं शेषशय्याचें फळ : हें ना तरि शेषसयाचें फळ ब्रम्हादिकांतु आलें । जांबूळस्थानीं ब्रम्हादीकाचीं फळें ॥

४३. हत्तीचा दृष्टांत ।

सूत्र--जो जें होऔनि असे तो तेंचि बोले ॥१॥ अनंत शक्ति परमेश्वर सकळासिही विषयव्यवस्था करीति ॥२॥

दृष्टांत--गांवा हस्ति आला : तेथ जात्यंध हस्ती पाहों गेले : एकें पावो देखीला : एकें सोंड देखीली : एकें कानु देखीला : एकें पाठि देखीली : एकें पोट देखीलें : एकें पूंस देखीलें । मग एकमेका संवादति : आरे तुवां हस्ती देखीला : पावो देखीला तो ह्मणे हस्ती खांबासरीखा : सोंड देखीली तो ह्मणे हस्ती

मूसळासारीखा : कानु देखीला तो ह्मणे हस्ती सुपासारीखा : पाठि देखीली तो ह्मणे हस्ति भींतीसारीखा : पोट देखीलें तो ह्मणे हस्ती कोथळेयासारीखा । पुंस देखीलें तो ह्मणे हस्ती खरांटेयासारीखा । ऐसें एकमेकां उरोधीति । तयांमध्ये डोळसु असे तो ह्मणे हा हस्तीचा एकु एकु अवएवु होए : परि हस्ति नव्हे : ऐसा अवएवीं युक्त तो हस्ति ॥

दार्ष्टान्तिक—तैसें जयासि जे शक्ति प्रकाशली असे तो तीए शक्तीतें परमेश्वरू म्हणे : ज्ञानिया असे तो म्हणे हे ईश्वराची एकिएकि शक्ति होए । परि परमेश्वरू नव्हे । ऐसा शक्तीयुक्त तो परमेश्वरू ॥

४४. डुळकैलेया बाळकाचा दृष्टांत ।

सूत्र—हे हो जाणें परि जाओं नेणे ॥१॥ उपयोगा न वचे ऐसें कांही असे ॥२॥

दृष्टान्त—कव्हणी एकि माता असे : ते आपुलेया लेंकरुवासि पेहें दे । तथा पाजी : ते डुळकी । मागौतें दे : मागुतें डुळकी : मागुतें दे : मागुतें डुळकी । मग सेजीया साइलीया असति तीया म्हणेति हा वो हे डुळकीताए : तरि कां पाजीतीएसि । ते म्हणे : घेइ आइ : आंतु तऱ्हीं लींतैल ॥

दार्ष्टान्तिक—तैसें कव्हणा एकाप्रति परमेश्वरू शास्त्र नीरोपीति : तो विसरे : मागौतें नीरोपीति : मागौतें वीसरे । मागौतें नीरूपीति : मागौतें वीसरे । मग सामान्यज्ञानिये विशेषज्ञानिये म्हणेति : जी जी हा हें वीसरताये । तरि हें याप्रति कां नीरुपीजताये । घेयागा वासना तऱ्ही उरैल ॥

४५. कपालपरीक्षेचा दृष्टांत ।

सूत्र—तैशा स्थानीं तैशा गोष्टी न कीजति कीं ॥१॥ जाणौनि नेणें तो सदैवु ॥२॥

दृष्टान्त—कव्हणी एकु धातुर्वादी असे : तो रण सोधुं जाये : रण पडीलें असे। तो एकाचीये कानीं काडी घाली : ते एरी कानीं नीगे : तें सांडी। आणिकाचीए कानीं काडी घाली : ते तोंडुनि नीगे : तेंही सांडी। आणीकाचीए कानीं काडी घाली : तें भीतरि जाए : तें घे॥

दार्ष्टान्तिक—तैसें परमेश्वरू नीरोपीति : तें विसरे : तयातें अव्हेरीति : कां आणिकाप्रति बोले तयातेंही अव्हेरीति। आपुलेया उपयोगा नें तयाते ने अव्हेरीति॥

४६. मोदळेयाचा दृष्टांत।

सूत्र—हें तुमचें रहस्य कीं गा : आपुलें रहस्य तें आणिकां प्रती प्रकटिजे ना कीं॥१॥ अन्यकथनें जाए॥२॥

दृष्टांत—मोद्ळा असे : तयाचें घेतें द्वार सानें : सांडीतें द्वार थोर॥

दार्ष्टान्तिक—तैसें वरिषां दीसां कां दो वरीषां काढीलें असें शास्त्र तें एकाप्रति बोलौनि जाए : तेयातें परमेश्वरू विशेषें अव्हेरीति॥

४७. रोवंतलेया पशूचा दृष्टांत।

सूत्र—हें शास्त्र आपण होउनि कवणाचें घर न रिगे॥१॥ आपण याचें घर रिगीजे॥२॥ यासी आपणपें दीजे तर हें आपणपें दे॥३॥

दृष्टांत—पशु असे : ते आर्डीदरडी चरे : पोट भरे : मग एकी ठाइं बैसौनि रोवंती। तेणें तयाचीया सप्तधातु नीवति : तुष्टि होए पुष्टि होए बळ होए॥

दार्ष्टान्तिक—तैसें परमेश्वरू निरूपीति : तें आइके : मनन करी : तयातंव दक्षता होए : योग्यता होए : सुखविशेष होए ॥

४८. कर्मचांडाळाचा दृष्टांत ।

सूत्र—वाई जाणतेयापासि वर नेणता चांग ॥१॥ कर्मचांडाळापासि जातचांडाळ चांग ॥२॥

दृष्टांत—कव्हणी एकु कर्मचांडाळ ब्राम्हणु असे : तो माहारीसीं वीटाळे : तयाचे म्हणीयें करी। सींकें : नाडे : तुते करी : रामेश्वर वास : तयातें कार्यें प्रयोजन होए तथा काज भोज : होए : तैं तयासि तयाची पांति नाहीं। (एकी वासना) तयाचीये जातीची पांति नाहीं। तेयासि खापरीं अन्न वाहीरि घालीति ॥

दार्ष्टान्तिक—तैसें अज्ञानाचेया सारीखी ज्ञानिया क्रिया करी तेयासि ही तेयांची पांति नाहीं ॥

४९. पडाळीये गाईचा दृष्टांत।

सूत्र—पुरुषु सवेतवं जाए ॥१॥ सवे ते काइसेयाचीही न होवावी ॥२॥

दृष्टांत—पाडाळीं गाए वांधली असे : तीएवरि गळे। चरूं जाए तरि तोंडा चीखूल ये : बुडीं पाए कीवीं कोरीति : पावो झाडी तरि मागीली डीळीसीं लागे : झडें वारेनि पीटे। ऐसें देखौनि घरीचा गोसावी म्हणे : वापुडी गाए पीडीली : म्हणौनि माळवधींचां खांवी वांधे। खडु घाली : खडु चरे : कांटाळा सांडी : मग रींगतेया नीगतेयातें देखौनि वुजे : तो

म्हणे सोडु : एऱ्हवीं माळवधाचा खांबु पाडील । भणौनि सोडी : ते मार्गौतीं जाउनि तयांतुचि रीगे ॥

दार्ष्टान्तिक--तैसें परमेश्वरू अधिदैवीकु अधिभौतिकु अध्यात्मीकु तीन्ही ताप फेडौनि सन्निधान देति : नीरोपण करीति : परि जीवु सवेचि कडे वोवांडी ॥ **बासपक्ष** : झडवारेस्थानीं अधिदैवीक तापु : कीवीं करीति तीए स्थानीं अधिभौतीकु तापु : डीळी पावो लागे तीए स्थानीं अध्यात्मीकु तापु : वरि गळे तीएस्थानीं शारीरकष्ट भोगी : तोंडा चीखूल ये तीएस्थानीं विषएवेव्हारु नरकाचि जाति ॥

५०. माळेकाराचा दृष्टांत ।

सूत्र—आद्यंतीं दैव : मध्यें पुरुषु ॥१॥ केतुले एक दीस दैव वाट पाहे : मग उदासीन होए ॥२॥

दृष्टांत—कव्हणी एकु माळेयावरि उभा असे । कव्हणी एकु वाटा जातु असे । तो म्हणे : आगा या वाटा जासी तरि चोरीं नागवीजासि : कां वाघें खाइजासि । ना या वाटा जासी तरि नगरां पुरां पाटणां वरिपडा होसि : तेया वाटा जाये तरि चोरीं नागवीजे कां वाघें खाइजे । ना तेया वाटा जाइजे तरि नगरां पुरां पाटणां वरिपडा होये ॥

दार्ष्टान्तिक—तैसें परमेश्वरू वीधी अवीधीचें ज्ञान करीति : जरि जीवु वीधि आचरे तरि वीधी इष्टा वरिपडा होए । ना अवीधि आचरे तरि अवीधि वरिपडा होए ॥

५१. अयाचग्रासीयाचा दृष्टांत ।

सूत्र—पुरुषें आपुलीये करणीये करौनि असावें : मग दैवें करावें तें दैवचि करील ॥१॥

दृष्टान्त—कव्हणी एकु अयाचग्रासीया असे : तेयासि कव्हणी एकु घांसु सूए। तेणें चावावा गीळावा इतुलेंचि : परि धातुतें नेतें तें आणिक असे ॥

दार्ष्टान्तिक—तैसें पुरुषें उभयां ठाकौनि प्रएत्न करावा इतुलेंचि : नव्हतें पुरवीति : परमेश्वरू साह्य करीति ॥

५२. दीक्षीतकन्येचा दृष्टांत ।

सूत्र—परमेश्वराकारणें काळकुळलोक यें तीन्हीं आंगवावीं ॥१॥

दृष्टान्त—कव्हणी एकि दीक्षीताची कन्या असे : ते वीषयाचीया चाडा गावींचा गावीं कोळीया एकाची घरवात करी : काळ कुळ लोक तीन्हीं आंगवी ॥

दार्ष्टान्तिक—तैसें वीषयाचीया चाडा जीवें तीन्हीं आंगवीलीं तरि परमेश्वराचेया चाडा जीवें काइ एक नांगवावें ॥

५३. कुष्टीयाचा दृष्टांत ।

सूत्र—देव माझा : मी देवाचा : ऐसियापरी असीजो का देमती ॥१॥ देमती असीजे ऐसें कुष्टियाचां धर्मी ॥२॥

दृष्टांत—कव्हणी एकु वेव्हारा असे : तयासि कुष्ट जालें : सोएरींधाएरीं तयाची खंति करीति : बापुभाउ खंति करीति : तो थुंकी : तरि तेयाचे पुत्र : ब्राम्हणि : खंति करीति : बाहीरि वैसों नेदीति । (भियावा) माया बहीणी म्हणति तूं मरकाढी। मरो कां : हें आझुइं कां जीताए : ऐसा उबगला । मग गावां मागें दुबळेश्वरु देवो : तेथ आला : देवा तूं माझा मी तुझा : ऐसें भणौनि उंबरां उसीसें करुनि नीजैला। पाठीं तीयें आलीं :

तेयांतें म्हणे तुम्हीं माझीं नव्हां : मी तुमचा नव्हें। ऐसे म्हणौनि राहे : मग कव्हणी एकु खापरीं भरूनि अन्न ठेवी : कव्हणी एकु कऱ्हा भरूनि उदक ठेवी : हातापायांचे थापे जाले होते । तो ऐसें पाणी पीए। (म्हणौनि गोसावी श्रीकराचेनि अनुकारें दाखवीले : (रामेश्वरबास) कव्हणी एकु एसणें सांपटें पांगुरावेया दे। मा काइसी देवता (एकी वासना : प्रकृता देवता) दृष्टीं तरि अन्नोदक पुरवीलें : अदृष्टीं तरि आपुलें फळ दीधलें ।

दार्ष्टान्तिक--तैसें देवो माझा मी देवाचा ऐसेया होउनि असिजो का देमती ॥

५४. आधारीचेया परीसाचा दृष्टांत ।

सूत्र—**जवं जवं प्रयोजक तवं तवं अप्रयोजक : जवं जवं अप्रयोजक तवं तवं प्रयोजक ॥१॥**

दृष्टान्त—**कव्हणा एका महात्मेयाचीए आधारीए परीसु होता। तो कव्हणी येका ब्राह्मणाचेया घरा वसतीसि जाए : दारीं तीटत तीटत ऐसें पाणी पडत होतें : तेणें तेयाचें वस्त्र आंबट वोलें ऐसें जालें होतें : घरीचिया ब्राह्मणी वोसरीए पीढें घातलें : पाए धुतले : तांबीया भरूनि दीधला। तेणें संध्या केली तवं तो ब्राह्मणु आला। डोइए वानेराची पेंडी : ते ठेवीली : तीयें सदुर्बळें ऐसीं ब्राह्मणें : तेयांतें गाए एकि दुभे। तेणें गाए दुहीली : राळेयाचे खीचटें रांधिलें : लोणीयाचा कवडा ताविला : मग तयासि ठावो केला : तथा दोघांहीं तो जेविला। तुटकी ऐसी बाज तियेवरि फाटकी ऐसी वाकळ आंथुरीली : ते नीजावेया दीधली : तयाचे पाए धुतले : चोपडीले : इतु-**

केनि तो संतोषला : तुमचीं जेतुलीं लोखंडें आहाति तेतुकीं बांधौनि आमचीये बाजेबुडीं ठेवा। पास : फाळ : इळा : कुऱ्हाडि : तुता बांधौनि तयाचीए बाजे बुडिं ठेवीलीं। तो पाहाटेचि[१] उठीला : आधारीएचा परीसु काढीला : तेथ लाउनि आपण नीगौनि गेला। तो ब्राम्हणु उठीला : डोइए लोखंडें ठेउनि सेता घेउनि गेला। वखरू जुंतीला तवं फाळ लवो लागला : तुतेनि करूनि माती फेडी : तंव माती न फीटे : इळेनि करूनि गवत घेउं बैसला : तंव गवत नेघवे। कुऱ्हाडीं करुनि झाडें फेडुं आदरीलीं : तवं कुऱ्हाडि बांकली। ऐसा निधावला। लोखंडें डोइए ठेउनि घरा घेउनि आला। दारीं लोखंडें घातलीं : मग भणीतलें : पापीणी पापिणी कवणासि बीढार दीधलें : महात्मेनि कुजांतर केलें : आजि माझा सोनेयाचा देहाडा वाया गेला। महात्मेनि कुजांतर केलें ऐसें भणौनि ते बाहीरि आली : तवं वीवळलें असे। वरील माती फीटली : आंतुल सोनें झळझळ करीत दीसताये। तीया म्हणितलें महात्मेनि कुजांतर केलें कीं आमचेया दळीद्राचा मुळीं इळा घातला। ऐसें म्हणौनि ते भीतरि घेउनि गेली॥

दार्ष्टान्तिक—तैसें तुमचेनि तया गोमटें आति तें ते काइ जाणत असति बाइ॥

५५. वानरीएचा दृष्टांत।

सूत्र—लोकीचा श्रेष्ठ तो येथीचा नष्ट : येथीचा श्रेष्ठ तो लोकीचा नष्ट॥१॥

---

१ पाहानपर्टीचि

दृष्टान्त—वानरी असे : ते ऐलखांदीएवरुनि पैलखांदीए जाए : पैलखांदीएवरुनि ऐलखांदीं ए। देखतयापरी हें पडैल परि धरीतीपरी ते तेंचि जाणे : न सुटतें सूत्र तें तेंचि जाणे ॥

दार्ष्टान्तिक—तैसें अनुसरती परि जीवें जाणावी : नरक चुकवीतीपरि ते परमेश्वरू जाणति ॥

५६. माकोडेयाचा दृष्टांत ।

सूत्र—धड तुटलेयांही जीवें परमेश्वरातें न सोडावें : वासना न संडावी ॥१॥

दृष्टान्त—माकोडा असे : तो जीवन पाहे : (रामे० तयाचे जीवन असूध) जीवन सांपुडे आणि धरी : तो झाडीता झडेना तोडीता तुटेना : ऐसाही झाडीजे तरि धड तुटे परि झडेना ॥

दार्ष्टान्तिक—तैसें जीवाचें जीवन परमेश्वरू : शारीरें झाडावा ना : मानसीकें तुटावा ना : जीवन न सोडावें ॥

५७. व्यतीपाताचा दृष्टांत ।

सूत्र—पुरुष जेतुलजेतुला प्रयत्नु करी तेतुलतेतुलें दैव साह्यातें करी ॥१॥ जरि प्रयत्न न होववे तरि तो तेया लाभा चुके ॥१॥

दृष्टांत—एकु वेव्हारा असे : तथा रावो : तो ब्राह्मणासि व्यतीपात दे : तयाचा दारवंठा ब्राह्मण राखत असति : तो सारी खेळतु असे कां नजैला असे। एकाधा एकु उबगला म्हणे : फळें मोडैल कां येइल : ऐसें भणौनि उबगला जाए। मग फळें मोडे का चेए : तो आंघोळि स्नान देवपूजा करी :

ब्राह्मणासि व्यतीपात दे । तो तया लाभा चुके ॥

दार्ष्टान्तिक—तैसें परमेश्वरू उदास्य स्वीकारीलें असे कां पहुडले असति । अनुसरला असे तो म्हणे उदास्य परीहरैल कां उपहुडेति : ऐसें भणौनि बाहीरि जाए : तवं उदास्य परिहरे का उपहुडेति । तो तया लाभा चुके जैसी महदाइसें मालगंठीचेया लाभा चुकली ॥

५८. कोलाचा दृष्टांत ।

सूत्र—सुखसाधनें देव न पवीजे कीं नाएका ॥१॥

दृष्टांत—कव्हणी एकु आचार्या असे : तो आपुलेया सीष्यासि सराउं दे : सराउ देतां चुके तेथ कोल हाणे कां म्हेळीएची सीवी दे । तयासि घाए खंडी ये । एकाधा एकु त्रसला जाए : दीसा सातां पांचा मागौता ए : तो खडीवाची पासौडी वैसौं घाली : या राणेहो वैसा : कां पाया पाउल होत असे ॥

दार्ष्टान्तिक—तैसें संनिधानीं असतां शारीरें मानसीकें दूखें साहाति ते ईश्वराचेया पदा योग्य होति : न सहाति ते नव्हेति ॥

५९. इसाळुवाचा दृष्टांत ।

सूत्र—बाई येथ हासतांही लटकें न बोलिजे कीं ॥१॥ हे विशाळुवाचे विशाळू ॥२॥

दृष्टांत—कव्हणी एकु इसाळु असे : तो आपुलीए स्त्रीएसि आज्ञा करी (रामे० बा०-रेघ काढी) तवं तीएचीया दारापुढुनि वऱ्हाड जाए । सेजीया साइलीया असति तिया पाहों एति । ते सेजीया साइलीयातें पुसे : हा वो नौवरी केव्हडी असे : कैसी असे : काइ लेइली असे : काइ नेसली

असे : नोवरा केव्हडा असे : कैसा असे : काइ लेइला असे : काइ नेसला असे। तिया म्हणति : एसिना का : भींती आडौनि पाहे : ते म्हणे ना वो आइ : माझेनि वरैतें मज आज्ञा केली असे। मा तो काइ तूतें भींतीआडौनि देखतु असे। ना : तयाची दृष्टी ते मजचिवरि असे ॥

दार्ष्टान्तिक—तैसे सेजीया म्हणीजति वासनिक : साइलीया म्हणीजति प्रमादीए : ते म्हणति कांजी भाजी खावो ए : पर कांजी भाजी खादलेया जें वोखटें होईल तें ते काई जाणतु असति : तें तो जाणतु असे कीं ॥

६०. झाडिलेपुसीलेया पशूचा दृष्टांत।

सूत्र—**जीव झाडिले पुसिले वहाती : त्रसले जाती ॥१॥**

दृष्टांत—**पशु असे : तें झाडीजे पुसीजे तरि साउमें ए : वरि मान घाली : ना थैक म्हणीजे तरि परतें जाए ॥**

दार्ष्टान्तिक—तैसें जीवु झाडिले पुसिले वाहाति : त्रसले जाति।

६१. सामान्यस्त्रीयेचा दृष्टांत।

सूत्र—**अनुसरलियांच्रेया दोनचि घडिया पुरति ॥१॥**

दृष्टांत—**कव्हणी एकि सामान्य स्त्री असे : ते जगाचे कवडे खातां जन्म जाए। ते जरि सेवटीं एकाची होए (पर. व्या.) तरि पतीव्रतेचे लोक होति। (रामे बा.) तयासरीसी अग्निप्रवेसु करी तरि सतियाचे लोक होति ॥**

दार्ष्टान्तिक—बोधवंताचे जन्म वीषएवेव्हारांतु जाए : सेवटीं ईश्वरासि शरण रीगे तरि प्रथम त्यागियाचिए पांती बसे ॥

६२ दासीचा दृष्टांत ।

सूत्र—गेलेती तें नव्हे : आलेती तें होए ॥१॥ आपण कव्हणा आधीन व्हावें नाहीं : आपणां आधीन कव्हणा करावें नाहीं : जीवें परमेश्वराआधीन होआवें ॥२॥

दृष्टांत—कव्हणीं एकि दासि असे : ते अष्टौ पाहार म्हणीये करी : मज खावों जेवों सूती : लेवों नेसो देती ऐसें म्हणौनि न करी : माझें करणीए म्हणौनि करी । मग तीएची गोसावीणि जेव्हेळि जेवों वैसे तेव्हेळी आधें तीएसि वाढी : आधें आपण घे ते तीएतें काइसेनही वंचीजेना ॥

दार्ष्टान्तिक—तैसें अनुसरला पुरुष दास्य करी : परि कव्हणी हेतु न करी : माझें करणीए म्हणौनि करी : मग परमेश्वर तयाते काइसेनही वंचीतिना ॥

६३ पतीव्रतेचा दृष्टांत ।

सूत्र—जन्मजीवित परमेश्वरासि देयावें ॥१॥

दृष्टान्त—कव्हणी एकि पतीव्रता असे : ते आपुलीया पतीची सेवा करी : सुश्रुषा करी : म्हणीये व्यापारु करी : तो तेयाचा म्हणौनि करी : लेंकुरवां जेउं वाढी : तीयें तेयाची म्हणौनि वाढी : आपणेया शृंघारु करी तो तयालागि म्हणौनि करी । मग तेयाची जेतुली जोडि असे तेतुली तीएचा हातीं दे : तो तीएते काइसेनही वंचीजेना ॥

दार्ष्टान्तिक—तैसें परमेश्वरु भक्तातें काइसेनही वंचीति ना : आपुली अनुभूति रति देति ॥

६४. चाटसीएचा दृष्टांत ।

सूत्र—आद्यंतीं : दैव मध्यें पुरुष ॥१॥ दैवें करावें तें केलें : पुरुषें करावें तें ठेलें ॥२॥ यथौनि म्हणितलें तें तुम्हां करणीये ॥३॥

दृष्टान्त—कव्हणी एकि सुगरणि असे : ते चाटसिएतें व्यापारवीति व्यापारवीति पाकनीष्पति करी । आंबांतु घाली : खीरीआंतु घाली : षडुरसा पाकांतु घाली ॥

दार्ष्टान्तिक—तैसें परमेश्वरु जीवातें व्यापारवीति व्यापारवीति साधननीष्पति करीति ॥

६५. अग्निएचा दृष्टांत ।

सूत्र—यथचेनि संनिधानें कर्मे नासाना तरि कें नासाल नाएका ॥१॥

दृष्टांत—अग्नीचेनि संबंधें वोलीं कोरडीं सानीं थोरें काष्टें जळति ॥

दार्ष्टान्तिक—तैसें परमेश्वसनिधानीं अनारब्धें संतासंतें कर्मे नासति ॥

६६. फुटाणेकाराचा दृष्टांत ।

सूत्र—जीवापासौनि पुरुषु उठी तयाचे नेणों कोण सिद्धी ने ॥१॥

दृष्टांत—कव्हणी एकु फुटाणेकारु असे : तो चणेयासि चोल दे : भीजति : मग एकि वाळु घाली : ते फेडी । दुसरी वाळु घाली तेही फेडी । तीसरी वाळु घाली तेही फेडी । हीरवट आणि कठीणत्व हे दोन्ही दोष जाति : सुरै मृदत्व हे

गुण एति : कंचुकवत टरल होए। मग गुळेंसीं भक्षावेया योग्य होए ॥

दार्ष्टान्तिक—तैसें परमेश्वरु जीवासि शब्द देति : अपरोक्ष देति : सामान्यज्ञान देति : विशेष देउनि प्रातियोग्य करीति ॥ **वासपक्ष** : वोलस्थानीं शाब्द : भीजलेस्थानीं रजस्तमें नासति म्हणौनि शाब्दीं जया पुरुषाचीं रजस्तमें नासति तयासि अपरोक्ष होए : आन शाब्दीं जया पुरुषाचीं रजस्तमें न नसति तयासि अपरोक्ष होआवेयाचा संदेहो। तैसें जो चणा भीजेना तो पुढां फुटेना : तैसा ठावो। शाब्दीं अपरोक्षीं कर्में नासीति : सामान्यीं मळ नासीति : वीशेषीं अयोग्यता नासीति : मळीकरुनि हिरवट जाला असे : कर्में करूनि कठीनु जाला असे : हीरवट आणि कठीनत्व हे दोष जाति : नीर्लेप आन नीर्मळ हे गुण एति : कंचुकवत अवीद्या राहे : मग प्रातीसि योग्ये होए। मग प्राप्ति करीति ॥

६७. गुळहारियाचा दृष्टांत।

सूत्र—**मळकर्में निवर्तलेयावीण जीवु कृपेसी पात्र नव्हे॥१॥**

दृष्टांत—**कव्हणी एकु गुळहारी असे : तो गुळ करी। उसाचा रसु काढी : काहालीए घाली : तळीं अग्नि जाळी : रस कढे : चाटसीएकरूनि मळी वेगळी करी : मग आणिकी भांडांचा आणीकी भांडा घाली : द्रव असे तो बद्ध होए : मग हातीं घेउनि आणिका ठायां नेयावेया योग्य होए ॥**

दार्ष्टान्तिक—तैसें परमेश्वरु जीवाचीं मळकर्में फेडौनि योग्य करीति ॥

६८. दुबळिए मातेचा दृष्टांत।

सूत्र—**उपाए न पवीजे ऐसें कांहीं असे ॥१॥**

दृष्टांत—कव्हणी एकि दुबळी माता असे : तीएचें लेकरू दुधाची आळि गे : तें काइसेनही बुझावेना। तें मरैल ऐसें जाणें : मग सूप चाटू गाहाण ठेउनि तयासि दुध सूए ॥

दार्ष्टान्तिक—तैसें पोरा जीवासि आग्रहो नाहीं : आग्रहो जरि होए तर परमेश्वरु ज्ञानियासि प्रेम देति । चाटसीस्थानीं अयोग्यता : सूपस्थानीं अदक्षता ॥

६९. वृक्षत्वचेचा दृष्टांत ।

सूत्र—साधनापसी साध्य उत्तम ॥१॥ व्यवहारींची बुद्धी धर्मी उपयोगा जाए ॥२॥

दृष्टान्त—जया वृक्षाची सालि गोड : तयाचें फळ कैसें असे : हें ऐसें जाणावें कीं ॥

दार्ष्टान्तिक—तैसें जयाचें साधन ऐसें तयाचें साध्य कैसें हें ऐसें जाणावें कीं ॥

७०. पाणिचोरियाचा दृष्टांत ।

सूत्र—ब्रह्मविद्ये सकळही विद्या अनुषंगिका ॥१॥ ऋद्धित्वें प्रकटति कां विघ्नत्वें प्रकटति ॥२॥

दृष्टान्त—पाणिचोरिया असे : तयाचें एक द्वार धरीजे तवं आणीक द्वार वाहे । तें धरीजे तवं आणीक वाहे । तें धरीजे तवं आणीक वाहे आवघीं धरीजति तवं वरिल वाहे : मुख्यद्वार धरीलेया आवघीं धरीलीं होति ॥

दार्ष्टान्तिक—तैसें एकि वीद्या जालेया आणिक विद्या उरलीचि असे : ते विद्या जालेया आणिक विद्या उरलीचि असे । आवघीया विद्या जालेया ब्रह्मवीद्या उरली असे : ब्रह्मवीद्या जालेया सकळ वीद्या जालीया

होति । तैसें एक इंद्रीयें धरीलेया आणिक इंद्रीयें मोकळें : तें धरीलेया आणिक इंद्रीयें मोकळें : तें धरीलेया जीव्हा इंद्रीयें मोकळें । जीव्हा इंद्रीयें धरीलेया सकळ इंद्रीयें धरीलीं होति ॥

७१. चातकाचा दृष्टांत ।

सूत्र—अनुसरलियातें निरोध न बद्धति ॥१॥

दृष्टान्त--चातकु असे : तो गावोगावीं देशोदेशीं नदीनदी चावी पोखरणीं असति परि तेथचें उदक न स्वीकरी । वरौती चांचु करुनि उदैलेया मेघाची वास पाहे । तो वरीषे तें तो स्वीकरी ॥

दार्ष्टान्तिक—तैसें सर्वत्र वीषो असे : वीषो सेवावयाची वासना असे : परि तो सेवीना । मग परमेश्वरु संनिधान देउनि तयाचे सकळ वीषो पुरवीति ॥

७२. सींदेराणेयाचा दृष्टांत ।

सूत्र—पुरुषु आपुले करणीये करीतसांतां तेथेंचि कीर्तीतें पावे ॥१॥ सत्यार्थ प्रकटे ॥२॥

दृष्टान्त—कव्हणी एकु रावो असे : तो राज्यभ्रष्ट होए । तयाचा पाइक परिवारु कव्हणी कव्हणातें बोळगे : कव्हणी कव्हणातें बोळगे । सींदेराणे ते सीहासनावाचौनि कव्हणातें बोळगति ना : कव्हणातें जयजयशब्दीं बोलाविति ना । ते कव्हणाचें दीधलें नेघति । ते कव्हणाचेया हातातळीं हात वोडवीति ना । एकीपरीचा उद्यम मात्र करुनि आपुलेया कुटुंबाचा नीर्वाहो करुनि असति । मग तो रावो मागौता आपुला राजीं बैसे : तयाचा पाइक परीवारु मागौता तयापासि आला । एकु दीसीं तो रावो सीहासनीं बैसला होता : तेणें ऐसें पाहीलें :

ऐसें पाहीलें : मग तेणें म्हणीतलें : हां गा : तुम्हीं आवघे आलेति : ते आमचे सौंदेराणे देखीजति ना : ते कें असति । मग ते सांगति : ते कव्हणातें वोळगति ना : कव्हणाचेया हातातळीं हात नोडवीति : एकीपरीचा उद्यम मात्र करुनि आपुलेया कुटुंबाचा निर्वाहो करुनि असति । मग तो रावो दांडी डोळिकारु पाढउनि तयातें आणु धाडी : आपण सर्व दळेंसि साउमा जाए : तयातें गाजत वाजत घेउनि ये : अर्ध राज्य देउनि आपणेया समान करी ।

दार्ष्टान्तिक—तैसें अनुसरला पुरुषु कव्हणातें वोळगेना : कव्हणातें जए जए शब्दीं बोलाविना : एकीपरीची क्षुधानीवृति करुनि देहाचा निर्वाहो करुनि असे । मग परमेश्वरु तयासि संनिधान देति : अर्ध शक्ति देउनि आपणेया समान करीति ॥

७३. रीणाइताचा दृष्टांत ।

सूत्र—अनुसरलियांचे आगांतुक खुंटे : अनारब्धें सुकेति प्रारब्धां भोगे क्षयो ॥॥१॥ अनुसरलियासि देवत्व : त्रियंचत्व होणें नाहीं ॥२॥

दृष्टांत—कव्हणी एकु देशाचा रीणाइतु असे : तयातें एकु धरी । तेयासि कांहीं देउनि सोडवी : तवं आणिकु धरी : तयापासौनि सोडवी । ऐसा उबगला त्रसला सदर्था रायासि शरण रीगे : मग तो तयाचेया रीणाची वेवस्ता करी । हा आये : खंगला म्हणौनि अर्ध सोडवी : अर्ध तयाचेया रीणाची वेवस्ता आपणचि करी । कां : नीत्यमंत म्हणौनि : हा आये खंगला म्हणौनि लक्षाचें कवडेया वुझावी । हा जें देईल तें घेयावें : जेव्हेळि देइल तेव्हेळि घेयावें : जेव्हेळि देइल तैसें घेयावें ॥

दार्ष्टान्तिक—तैसा हा जीवु अशेषा देवताचक्राचा रीणाइत त्रसला : मग परमेश्वरासि शरण रीगे : मग परमेश्वरु तेयातें नीत्यवीधि निमीत्यवीधि करुनि तयातें सकळ रीणा उतराइ करीति ॥

७४. दंदीयाचा दृष्टांत ।

सूत्र—**मार्गीं प्रवर्तलेया पुरुषा अनुकूल प्रतिकूल उदासा देवता होति ॥१॥ पोर जीवा यथौनि म्हणितलें तें न होववें : मग मरणा शरण जाए ॥२॥**

दृष्टांत—**कव्हणी एकु जगाचा दंदीया असे : ते मारीति म्हणौनि सदर्था वळियासि शरण रीगे। मग तेयाची वास कव्हणाही पाहों नए। ते तेयातें राखत असति : तो म्हणीया धाडी तेव्हेळि आपुलें आंगरखे सरीसे दे। ना तोचिहुनि जरि बाहीरि जाए निगे (पर. बास.) तरि सुरीवर घेति : (रामे० वास) अलंगवरि घेति : पोट फाडुनि दगड भरीति ॥**

दार्ष्टान्तिक—तैसा हा जीवु अशेषा देवताचक्राचा दंदीया असे : ऐसा त्रसला परमेश्वरा शरण रीगे। मग तयाची कव्हणाही वास पाहों नए। दास्य म्हणौनि बाहीरि निगे : वचन तेचि आंगरखे : वचना-बाहीरि होए तेव्हेळिसीचि देवता वीघ्न संपादीति। तैसें असंनिधानीं नीमीत्य वीधी तेंचि संनिधान : वचन तेंचि आंगरखे ॥

७५ अग्नीसंबंधाचा दृष्टांत ।

सूत्र—**परमेश्वरपरायणाचेनि संबंधें सुख : श्रय : ज्ञान यें तीन्हींहीं होति ॥१॥ अग्नीसंबंधें वात : पित्त : श्लेष्म न वद्धति कीं गा मंडळिका ॥२॥**

दृष्टांत—**अग्नीचा संबंधु तवं पर्यंत करावा : जैसा पैन्हा गेलेया वात श्लेष्मे न वधीति ॥**

दार्ष्टान्तिक—तैसें पुरुषें तवंपर्यंत संनिधान करावें : जैसें पैऱ्हा गेलेयां वीकार विकल्पु न बधीति : तैसें असंनिधानीं पुरुषें, ज्ञानीयाची जवळीक तंवपर्यंत करावी जैसें पैऱ्हां गेलेयां अज्ञान अन्यथाज्ञान न बधिति : कव्हणीचि संदेहो न पडे ॥

७६. वटरोपाचा दृष्टांत ।

सूत्र—कोमळज्ञानीं आचारें इंद्रियधर्म पातळ होति : अपरोक्षीं दशे जाति ॥१॥ म्हणौनि पुरुषें असंनिधानीं धर्म जिज्ञासावा ॥२॥ हें असे तया रक्षण ॥३॥

दृष्टांत—**वटाचें रोप असे : तें सेळीयां मेंढीयाचां खुररवीं जाए : एकाधा एकु तयाभवंतीं कूप कांटी करी : आळें करी : पाणी घाली : (मियांवा) मग तें प्ररोहातें पावे : थोरला वट्ठ होए : जरठु होए : एकु हस्ती वेंझ दीधलेयाही न वचे-तथा हस्तीचेया घंटा बांधलेयांही न वचे ॥**

दार्ष्टान्तिक--तैसे जीवासि कोमळज्ञानी वीघ्रो वीघ्र : काजी वीघ्र: नीत्यवीधि नीमीत्य वीधि राखीलेया जरठ जालेया मग रसु सेवीलेयांहीं न वचे ॥

७७. तुरंगमाचा दृष्टांत ।

सूत्र—पळे तो परता लाभे ॥१॥ प्रतिक्षणीं त्याग ॥२॥

दृष्टांत--**ब्रह्मचारी घोडा असे : तो अवचटा सुटे : घोडिएसि लागे : रावो व्याहाळीए बाहीरी नीगे मग म्हणे : हा रे हा मागिलां पाइं नीवळु कां । तो म्हणे अभए देसी तरि सांघैन : तो म्हणे सांघ । ना : हा घोडीएसि लागला । मग तो रावो म्हणे यासि वोल्हावण करी : दुणा खान लोण दे । तें तो करी : मग तो मागातौ बळासि ए । परि राजवाहाकु**

नव्हे । तोचि जरि मागौता सुटे तरि वळासि न ये । तथा तोचि आवृति सेवी तरि वल्हो आंतु पडे ।

दार्ष्टान्तिक--तैसें पुरुषासि अवचटें अनिष्ट विखो पडे तरि दुनीचर्या अंगिकरी : दुना अनुतापु अंगिकरी : मग प्रयासें करूनि धर्मी दक्ष होए : तेचि पुढती करी तरी नव्हे ॥

७८. ब्रम्हचारी घोडेयाचा दृष्टांत ।

सूत्र—विखो न सेवी तरि जीवु काइं गा मरत असे : विरोध साहिलेया अधीक योग्यता होए दक्षता होए ॥१॥

दृष्टांत—ब्रह्मचारी घोडे असति : ते काइगा मरत असति नीरोध साहीलेया अधिक वळ : तुष्टि होए : पुष्टि होए ॥

दार्ष्टान्तिक--तैसें वीषएविण जीवु काइगा मरत असति : (रामे. बा.) इंद्रियार्थें वीण ॥

७९. ऋषीशृंगाचा दृष्टांत ।

सूत्र—विषयांचा संग न करावा ॥१॥ कोमळज्ञांनीं विखो विघ्न ॥२॥

दृष्टांत—ऋषीश्रृंग स्त्रीपुरुषु ऐसा विभागुही नेणे परि संवधें पोराचें चैतन्य वेधलें : स्त्रीएचेनि दर्शनें स्पर्शनें संभाषणें पोरु धर्मापासौनि गेला । (रामे. बा.) तपापासोनि गेला ॥

दार्ष्टान्तिक—तैसें स्त्रीपुरुषु विभागुही जाणे आन वीषोही जाणे मा हा कैसा गा न वचे : म्हणौनि स्त्रीएचें दर्शन स्पर्शन पुरुषें न करावें ॥

८०. राजहंसाचा दृष्टांत ।

सूत्र—जीवासि सकळही संपत्ती परमेश्वरसंपत्ती ॥१॥ विरळा नांदे ॥२॥

दृष्टांत—राजहंस असे : तो मानससरोवरावांचौनि न रमे : गावोगावीं देशोदेशीं नदोनदीं बावीपोखरणीं असति परि तेथ न रम : कां तें आदिवंतें उदकें म्हणौनि ॥

दार्ष्टान्तिक—तैसें भक्त ईश्वरसुखावांचौनि आणिकें सुखें न सेवी ॥

८१. डीगरेयाचा दृष्टांत ।

सूत्र—परमेश्वरू एकाचें कतुलें एक अनिष्ट उपसाहाति : एकाचें केतुलेया एका अंतरायाते जनी ॥१॥

दृष्टान्त—कव्हणा एका रायाचा डींगरा असे : तो बोलिसाउलें ने : तें उपसाहे। (एकी वासना) सांखळें ने : ते नुपसाहे । तथा सांखळें ने तें उपसाहेचि । भांडार फोडौनि वाखारि ने तें नुपसाहे ॥

दार्ष्टान्तिक—तैसें पुरुषु आवडी साधन सेवी तें उपसाहाति : रस सेवी तें नुपसाहाति : तथा रसु उपसाहाति परि मुख्य वीषो नुपासाहाति ॥

८२. दुसरेया इसाळुवाचा दृष्टांत ।

सूत्र—अल्प अनिष्टें बहुत अनिष्ट परिहारे तरि परिहारीजे ॥१॥ परमेश्वरआज्ञा अतिक्रमिलेयां माया बाधा हारी ॥२॥

दृष्टान्त—कव्हणी एकु इसाळु असे : तो आपुलीए स्त्रीएचा इसाळु करी : (रामेश्वर बास) ते तयासि तोंड दे ते आपुलिया बापाभाउवाचीए मांडीएवरि लोळे : ते तयासि खंति य परि काहीं करूं न ए। तैसेंचि जरि आणीकेसी करी तरि आधां दातीं सीस घे ॥

दार्ष्टान्तिक—तैसें अनुसरला पुरुषु कांजी भाजी सेवी ते ईश्वरासि

खंति ए : परि अव्हेरु न ए। कां पा : स्वभावा अंतरवृत्यें असे। म्हणौनि तेचि जरि देवताची वास पाहे तरि अव्हेरीति ॥

८३. द्विभार्याचा दृष्टांत।

सूत्र—चैतन्यापर परमेश्वरु सकळ जीवांते रक्षिता हो उद्धरिताहो ॥१॥ अनुसरलियांचा देव ॥२॥

दृष्टान्त—कव्हणा एकासि दोनि स्त्रीया : एकि आवडती एकि नावडति। नावडतीएचा ठाइं अन्न वस्त्र अलंकार न्हाणें जेवणें हासणें खेळणें असे : परि आपणपें नेदी : आपणपें तें आवडतीएसीचि दे ॥

दार्ष्टान्तिक—तैसें परमेश्वरु अनुसरलेयासीं हासणें खेळणें करीति परि आपणपें तें भक्तासीचि देति ॥

८४. दुर्भगेचा दृष्टांत।

सूत्र—बाइ अनुचित क्रियेसी अनुताप पुरश्चरण ॥१॥

दृष्टान्त—कव्हणी एकी दुहवा असे : ते वाडीचा वाडी कलवडी असे। गावींचा गावीं तीएचे सदर्थ बापभाऊ असति : ते नेऊं एति : ते म्हणे तुमचीं पाटाउवें सुताउवें नेसतां मज असलाग्यता : एसें म्हणौनि राहे। मग कांतीएका दीखां तेणें मळीन रोडिकी दूखीस्त देखीली। मग अनुकंपा उपनली : संबंधु दीधला : गर्भसंभुति जाली : पुत्र जाला। मग ते तयाचीया आवघेयाची गोसावीणि जाली ॥

दार्ष्टान्तिक—तैसें काइसेनि एकें अनुचितें परमेश्वरु उदासीन होति : मग सनिधान न संडीत असीलेया परमेश्वरु आपुला संबंध देति। अपरोक्षापासौनि तीन्ही ज्ञानें देति : मग तो ईश्वराचेया सकळाही शक्तीसि गोसावी होए॥ वाडेस्थानीं कर्मभूमि : कलवडस्थानीं महाराष्ट्र : दुहस्थानीं

अनुचितः बस्त्र मळीन रोडिकी दुखिस्त तिये स्थानीं मानसीक दुःख गर्भसंभूति तिये स्थानीं पुनःसंबंध पुत्रस्थानीं अपरोक्षापासौनि तिन्हीं ज्ञानें तयाचिया आवघेयाची गोसाविणि होये तियेस्थानीं सकळाही शक्तीसि प्रमाणद्रव्य होए ॥

८५. शय्यापालनेचा दृष्टांत ।

सूत्र—**संनिधानीं असंनिधान : असंनिधानीं संनिधान ॥१॥**

दृष्टान्त—**कव्हणी एकि शय्यापालना असे : ते आपुलीया पतीचा धर्मी वर्ते : आपुलीया पतीचीए सेजे आणीकासि रीगों नेदी। आपण कव्हणाची वास न पाहे। तीएचेया देखोवेखीं तीएतें पुसपुसों शूद्रीही तैसीचि वर्ते : तरि जेचि गति तीएासि होए तेचि गति तीएसि होए ॥**

दार्ष्टान्तिक—तैसें संनिधानस्तीता पुरुषाचेया देखोवेखीं तयातें पुसपुसों असंनिधानस्तीत पुरुष तैसेंचि वर्ते तरि जेचि गति तयासि होय तेचि गति तयासि होए ॥

८६. पोळलेया सुनेयाचा दृष्टांत ।

सूत्र--**पोळलेया सुनेयाचेयापरी असावें ॥१॥ विरहिणीचियापरी असावें ॥२॥**

दृष्टान्त--**पोळलें सुनें असे : तयासि कव्हणी ठाइं सुखासि न ए। वळणीखाली रीगे : परि : सुखासि न ए। कलवडा आंतु रीगे : परि सुखासि न ए। ऐसें अखंड जळताचि असे।**

दार्ष्टान्तिक—तैसें ईश्वरु-विरहीया पुरुषासि कव्हणे ठाई सुखासि न ए: स्थान देखिलेया सुखासि न ए: प्रसाद नमस्कारीलेया सुखासि न ए: वासनिक भीक्षु भेटे: परि सुखासि न ए : शास्त्र आठविलेया सुखासि न ए। ऐसा अखंड जळतुचि असे ॥

८७. वीरहीणीचा दृष्टांत ।

सूत्र--देखिलें गा : हा ठावोवेर्‍हीं देवतेचिया ठायी वैंचलेपण होवावें ॥१॥

दृष्टान्त--कव्हणी एक वीरहीणी असे : तिएचा पति देशाउरा जाए मग तीएसि आणिके काइसेनही सुखासि नै ए । तयाचें आंगी : टोपरें : पुड : वाटवा : कां तयाचीए ठाउनि कव्हणी ए तणें सुखासि ए ॥

दार्ष्टान्तिक— तसें परमेश्वरु वियोगें विरहिया पुरुषासि आणिकें काइसेनही सुखासि न ए । स्थान : प्रसाद : वासनिक : भीक्षु : शास्त्र तेणें सुखासि ए : आणिकें काइसेनही न ए ॥

८८. वीरहीणीचा दृष्टांत । (द्वितीय)

सूत्र--एका वियोगीं असंनिधानीं परमेश्वरपदार्थीं पदार्थबुद्धी असे : परि परमेश्वर वियोग चिंतणें परमेश्वरपदार्था आफळसाफळ करी : ऐसा निरंतर सारभूत नाहीं : रंक होऔनि असे ॥१॥

दृष्टांन्त--एकि आफळसाफळ करी ॥

८९. वीरहीणीचा दृष्टांत । (तृतीय)

सूत्र—बाइ ऐसा कवण एकला पळपळित निगौनि जाए जो दुःखपूर्वक आपुलेया देवातें आठवीत वर्तें ॥१॥

दृष्टांत--कव्हणी एकि जरठ वीरहीणी असे : तीएसि चंदन तैसा चीखलु : अन्न तैसी माती : (राम०) साखर तैसी धुळी ॥

दार्ष्टान्तिक—तैसें परमेश्वरुवियोगें वीरहिया पुरुषासि अवघे अन्य पदार्थ । परमेश्वरसंबधीया वासनिक : भीक्षु : शास्त्र : प्रसादस्थान ॥

९०. जळमांडवीएचा दृष्टांत ।

सूत्र—विद्यारूपें अविद्या संचरे कां कृपारूपें संचरें ॥१॥

दृष्टांत--कव्हणी एकु जळमांडवीएचें रोप उदकांतु घाली। वारेयाचेनि योगें तयाचा मुळीं रज वैसे : तेथ आणिक वेंचळ उठी : तयाचा मुळीं आणिक रज वैसें । तेथ आणिक वेंचळ उठी : ऐसी आवघी वीहीरि जळमांडविया भरे। तेथ उदक आहे ऐसा भावोहि नाहीं । मग एक दीस कवळियावरि बाहीरि घाली : बाह्या भरैति : रगत ए : परि उपसवेना ॥

दार्ष्टान्तिक—तैसें धर्ममीषें संचरली अवीद्या तरि अशेषा धर्मांचा अभावो करी ॥

९१. अहीरदेशीचीए म्हातारीएचा दृष्टांत ।

सूत्र—अविद्यारूपें अविद्या संचरे कां धर्मरूपें संचरे ॥१॥

दृष्टांत--कव्हणी एकि अहीर देशींची म्हातारी असे : ते लेंकुरुवाचेनि दूखें महाराष्ट्रासि ये : ब्राह्मणा एकाचीए वोसरीए राहे। भीक्षा मागे : पुराण आइके : मागिला लेंकुरुवाचेनि दुखें तयाचेया लेकुरुवासि वोसरीए टेंको नेदी । तयाची वास न पाहे। ऐसें असत असतां तया लेंकुरुवाची माए सरली। मग तो ब्राह्मण म्हणे : आइ : मी जोडैन : तुं उकडौनि घालि । हो कां : काइ वडपींपळ लावीजेति ना : ऐसें म्हणौनि करी । ऐसें असत असतां तोही सरे। मग तीएं तीयेसीचि पोसावीं लागलीं। कांडा : दळा : तथा करांडा करौनि तयातें पोसी । ऐसें असत असतां तीएही सरली। मग तीएचेया दूखासि कांहीं पारावारु नाहीं ॥

दार्ष्टान्तिक—तैसें पुरुष ईश्वरासि अनुसरे : सांडी : लेंकुरुवें सांडी मन कृपामीषें सीक्षें करी : मग तीएं म्हणितलें न करीति : मग तयाचेया दूखासि पारावारु नाहीं ॥

९२. वर्तेचा दृष्टांत ।

सूत्र—**जीवापासौनि पुरुषु उठी तयाचे नेणों कोण सिद्धी ने ॥१॥**

दृष्टांत—**कव्हणी एकि वर्तेवरि चाले : ते डावेयाकडे न पाहे : आपणेयाकडे न पाहे : सभेकडे न पाहे : मग तयासि वर्त साधे। तयासि दाएपसाए होति : ना तेचि डावेयाकडे पाहे : उजवीयाकडे पाहे : आपणेयाकडे पाहे : सभेकडे पाहे तो पडे। तयाचे हाड गुड नुरे ॥**

दार्ष्टान्तिक—तैसें अनुसरला पुरुषु विकारविकल्पु न सेवी : कीर्ति न भोगी : वीपरीत बुधि एवो नेंदी। तेयासि दाएपासाए होति। दावो म्हणिजे वेवस्तेचें कारण : पसावो म्हणिजे प्रसन्न होऊनि अपूर्व देणें : हाड गुड नुरें म्हणिजे काइं नाहीं : आंगुळियांचीया संदी आदिकरुनि चीरटीया[१] होति : तैसे धर्मांची संदी आदिकरुनि नुरे ॥ **वासपक्ष** : हाडस्थानीं मोक्षु अंतरे : गुडस्थानीं कणवही नुरे : म्हणौनि नीत्य नरक होति ॥

९३. खर्गधारेचा दृष्टांत ।

सूत्र—**पोरजीव आपुलें ओखटें जाणे : परि जाणौनिचि करी ॥१॥ दृष्टें अदृष्ट न साधे ॥२॥**

दृष्टान्त—**कव्हणी एकु स्वर्ग-धारेवरि चाले : आंगाचें लघुत्व बुधीचें कौशल्य तयासि खर्गधार साधे : ना आंगाचें**

१ ठीकरीया.

लघुत्व नाहीं : बुधींचें कौशल्य नाहीं तो पडे : तयाचे हातपाये तुटति ॥

दार्ष्टान्तिकः—तैसे अनुसरलेया पुरुषासि नीपुणता होआवी आन विचाराची संपूर्णता होआवी : तयाचें जन्म कडे पडे। आचाराची नीपुणता नाहीं वीचाराची संपूर्णता नाहीं तयाचें जन्म कडे न पडे ॥

९४. कठियाचा दृष्टांत।

सूत्र—काइ पाप तरि नव्हे परि अविधी होए ॥१॥ विधी करितां अविधी स्फुरे : अविधीं अविधीतें प्रसवे : अविधीतवं पुरुषु धर्मापासौनि जाए ॥२॥

दृष्टान्त—कव्हणी एकु कठीया असे : तो देवतेचां ठाइं अष्टौप्रहर वेचला असे। एकु दीसीं गांवीचां जेउं बोलावीला : तो पोटभरुनि जेवीला। एउनि देवतेपुढां बैसला : तें जाड्य आलें : तीए देवतेपुढां पाए पसरुनि नीजैला। गजबजौनि उठीला : काइ माझी माउली माझें इतुलेंही नुपसाहे : म्हणौनि देवतेकडे पाए पसरुनि नीजैला। एरी दीसीं स्तर्पण करीतां पींडीए पाए लागति। मग हळु हळु पारिसेनीचि पाणियें स्तर्पण करी : पारीसींचि फुलें वाए। कालींचि झाडीलें होतें : कालींचि सडा घातला होता : आधीं स्त्रीचेनि नांवें दांडेनि साइली पीटी : ततुका समै स्त्री एकि आली। देवाची सेवा करूं लाभे : कां न लभे : देवाची सेवा काइ कव्हणा करवीली असे : म्हणौनि ते झाडी : तो सडा घाली : काहीं भीक्षासि धड गोड ए तें तीएसि सुए[१]। ऐसें असत असतां संबंधु जाला। गुरुवीणि[२] जाली : लेंकरुवें जालीं। मग तीयें

१ घाली. २ गर्भीणि.

लेंकुरुवें पींडीएजवळि हागति : मुतति : मग एकी दीसीं गांवीचां म्हणितलें : कठीये हो आतां तुम्हीं लेंकुरुवाळे जालेति : आतां गांवांतु घर बांधा : मग गांवांतु घर बांधलें। मग देवतेसि त्रीकाळ पुजा करी : हळु हळु दोनि वेळ करी। मग विळचा ते वाति लावुनि जाए : मग हळु हळु एकवेळ करी : मग तेंहीं न करी। मग तेंचि पालापाणी घाली। आपण सेतडीया मार्गों जाए : मग सेतडीया मार्गौनि ये : कोनटेया-पासि वाहाणा फेडी : दोन्हीं हातु जोडुनि मग म्हणे : जए देवा। इतुकें उरलें ॥

दार्ष्टान्तिक—तैसें अविधि अविधीतें प्रसवे ॥

९५. कीर्तिकठियाचा दृष्टांत।

सूत्र—हां गा ऐसेंही करितां लोक न भजे ऐसें न कीजे कीं ॥१॥ तुष्टला जन विखो संपादी : रुसला तरि प्राणा घतैल : भणौनि कीर्तिविधी आचरितां धर्माचें फळ आंतरे ॥२॥

दृष्टांत--कव्हणी एकु कठीया असे : तो भोगस्थानाची शुश्रूषा करी : झाडी : सडासंमार्जन करी। तें देखौनि गांवीचे म्हणति : कठीए हो नीकें करीत असा बरवे करीत असा। ते आइकौनि दीसवाडीचां दीसवडि हातु हातु चडवी : तेयासि देवता आपुलें फळ नेंदीति : तेयासि कितींचेंचि फळ जालें ॥

दार्ष्टान्तिक—तैसें अनुसरलेनि पुरुषें कीर्तिपर क्रिया कव्हणीचि न करावी ॥

९६. भींगरुटीएचा दृष्टांत।

सूत्र--जें जीव जीवांपासौनि पावति तेंचि परमेश्वरा-पासौनि पावति एकवांचौनि ॥

दृष्टांत—**भींगरुटी असे : ते कीटकीतें पाहे : धरी : कांटा रोवी : नेउनि आपुलेया घरांतु घाली : दार लींपौनि जाए । एउनि मागुती मातें खाइल म्हणौनि मेणें तीएतें चींती : चिंतीत चिंतीतां तीसीहि पाख नीगति : तेही तीए सारीखी होए ॥**

दार्ष्टान्तिक—तैसें परमेश्वरु संनिधान देति : असंनिधान धर्म नीरूपीति : मग असंनिधान देति : ईश्वराचेया वीयोगातव ईश्वरातें चींतीत चींतीतां ईश्वरासारीखा होए ॥

९७. बाळवीधवेचा दृष्टांत ।

सूत्र—**कटंकटीयेमान होऔनि असावें ॥१॥ सुखसाधनें देव न पवीजे नाएका ॥२॥**

दृष्टांत—**कव्हणी एकि बाळवीधवा असे : ते कृच्छ्र करी : मासोपवासु करी : तेणें तीएचें इंद्रीएधर्म शमति तीएचें जन्म कडे पडे ॥**

दार्ष्टान्तिक—तैसें अनुसरला सएमु करी : देहदमन करी : तथा देहसोखण करी : तेणें तयाचेंहीं जन्म कडे पडे ॥

९८. लेंकुरवाळीए मातेचा दृष्टांत ।

सूत्र—**दानी असे परि जींवासि आर्त होआवी कीं ॥१॥**

दृष्टांत—**कव्हणी एकि लेंकुरवाळी माता असे : ते कव्हणी लेंकरु काइसेनि बुझावी : कव्हणी लेंकरु काइसेनि बुझावी : एक ते काइसेनिहीं बुझावे ना । तेयासि तीची कडेचि होआवी ते म्हणीयाचेनि लाहें झडती नीगे । तें देखे : तवं पाठीं धांवे : न देखे तेथचि लोळणि घाली : मग सेजीया साइलीया असाति तीया तेयातें बुझाउं रीगति : तें तयांचें तोंड पाहे इतुलेनि तें**

तयांचेनि न वुझावे । मग ते म्हणे हें कव्हणाचेनिहीं न वुझावे । मग म्हणीये सारूनि झडती ये। पाटाउवाचेनि पालवें लाळ संवुड पुसौनि कडीए घेउनि स्तनपान दे ।

दार्ष्टान्तिक—तैसें कव्हणी अंतर्यागें झांकवले कव्हणी बहिर्यागें झांकवले कव्हणी शास्त्रें झांकवले कव्हणी प्रसादें झांकवले : आर्त तो काइसेनिहीं न झांकवे । ईश्वरीचेनि मोहें करुनि परमेश्वरू अयोग्यता अदक्षता नासौनि प्रेम देति ॥

९९. निद्रितक्षीरपानाचा दृष्टांत ।

सूत्र—वानरेया इतुले दीस काइ करीतां काइ होत असे ऐसें तुम्ही जाणाना गा : तुम्हां अनंता सृष्टी अतिक्रान्ता ॥१॥ आचारें योग्यता विचारें दृढता ॥२॥

दृष्टांत--कव्हणी एकी माता असे : तीएचें लेंकरुं भुकैलें नीजैलें अस : ते तयातें उठउनि दुधातुपाची वाटी तोंडीं लावी : मागौतें तैसेंचि नीजवी । तें उदीयांचि उठीः पालवा पीळा घे : रात्रीं मीं जेवीलां नाहीं : भुकैलांचि होतां : मज भुक लागली : जेउं वाढि : म्हणौनि तीएसरीसें आंतु रीगे : वाहीरि नीगे : पाजीलें दुधतुप नेणे। तयासि भुक लागे तवं उगीचि असे : भूक लागली ऐसे जाणे आणि सूए ॥

दार्ष्टान्तिक—तैसें परमेश्वरू जे क्रिया करवीति तेणें जें होये तें परमेश्वरूचि जाणति : तें हा जीवु नेणे ॥

१००. बाबुळीएचा दृष्टांत ।

सूत्र—अनुसरौनि संनिधान करी : या परी योग्य होए तेयासीं परमेश्वरू सत्ताज्ञानदान करीति ॥१॥

दृष्टान्त—कव्हणी तृषावंतु वाटा जातु असे : तवं पाणियांवरि थोर कणबाबुळी आली असे। बाबुळी परती सारौनि उद्क घे : मागौति बाबुळीवरि तैसीचि मीळे ॥

दार्ष्टान्तिक— तैसें कव्हणी एकि अवसरीं सकळही मळाचें परिसारण करूनि परमेश्वरु जीवीं आपुलि सत्ता संचारीति : मग मागौते मळ घालीति ॥

१०१. डोळेयाचा दृष्टांत।

सूत्र—आत्मज्ञानें मोक्ष ॥१॥ सत्ताज्ञान तेंचि अपरोक्ष ज्ञान ॥२॥

दृष्टान्त—डोळा डोळियातें देखे : परि आपणेयातें कहीचि न देखे। मग कव्हणें एकें साधनें करुनि डोळेनीचि डोळेनीचि देखता होए ॥

दार्ष्टान्तिक—तैसा आत्मा सकळातें देखे परि आपणेयातें कहीचि न देखे। मग कव्हणें एकें साधनें करुनि आत्मेनीचि आत्मेयातें देखता होए ॥

१०२. दूरदृश्याचा दृष्टांत।

सूत्र—विद्या अविद्या पुरुषु या तिहींतें विद्या प्रकाशे : मग तो विद्ये अधीन होए ॥१॥

दृष्टान्त—कव्हणी एकु वाटा जातु असे : तो दुरौनि वृक्षातें देखे : परि अमुकेयाचा वृक्षु ऐसें नेणे। नावेक साउमा जाए : मग म्हणे : हा अमुकेयाचा वृक्ष : परि तयाचे अशेष विशेष न देखे। तयाखालि उभा ठाके : मग तयाचे अशेषविशेष देखे ॥

दार्ष्टान्तिक--तैसें अपरोक्षज्ञानीं स्वरूप देखे परि झावळें देखे : सामान्यज्ञानीं झावळेंपण फीटें परि अशेषविशेष न देखे । विशेषज्ञान जालेयां अवधें अशेषविशेष देखे ॥

१०३ जागसुतेयाचा दृष्टांत ।

सूत्र—तेणें लाविलें तें तो फेडी : तेणें नाहीं लाविलें तें तेयाचेनि न फिटे ॥१॥

दृष्टांत—कव्हणी एकु नीजैला जागसुता असे : तयातें कव्हणी एकु उठुवावेया ए : अमुका उठउं आला ऐसें जाणे : परि तो काइ लेइला असे : काइ पांगुरला असे : काइ नेसला असे ऐसें नेणे ॥

दार्ष्टान्तिक--तैसें व्यवधान फीटे : समग्र अज्ञान नीवर्ते : तवं सत्ताचि देखे ॥

१०४. स्वप्नाचा दृष्टांत

सूत्र—चेइलेया स्वप्न लटिका : तैसा अपरोक्षज्ञानीं प्रपंचू मिथ्या ॥१॥

दृष्टान्त—कव्हणी एकु नीजैला असे : तो स्वप्न देखे : म्हणे मी वाघें खादलां : ऐसें दुःख भोगी : हस्ती वोळघलां : ऐसें सुख भोगी । चेवो ए तवं दोन्हीं नाहीं परि सूखदूख भोगिलें तें काइ लटीकें : ना : सूख दुख भोगिलें तें साच : तर वाघें खादला हें लटीकें : हस्ती वोळघला हें लटीकें : परि सूखदुख भोगिलें तें साचाचि :

दार्ष्टान्तिक— तैसें काइ प्रपंचू लटीका : ना : तेणें करूनि क्रिया कीजत असीजे ते साचचि : तरि प्रपंचू साच : ना : तो अपरोक्षज्ञानीं जाणीजे : प्रपंचू लटिका म्हणौनि ॥

१०५. खाराणीएचा दृष्टांत ।

सूत्र--स्वभाव प्रकटे तैं जीव मुंचे ॥१॥

दृष्टांत—कव्हणी एकु नीजैला असे : तो आंथरुणी मुती। म्हणे : मीं दारा गेलां : सागळ घेतली : शौच्य केलें : चेइला तवं तें लटीकें : परि खाराणि ते साच : ते धुतलेयां-वीण न फीटे ।

दार्ष्टान्तिक—तैसें हा जीवु विश्वाचीएठाउनि एक्षिणिपर्यंत मी म्हणे : तें तो काइ तो : तें नव्हे कीं। परि तयांचें मळ लागले ते साच : ते क्षाळिलेयांवीण न फीटेति । म्हणौनि परमेश्वरू सामान्यज्ञान देति तेणें मळ नासीति ॥

१०६. आंबवतीचा दृष्टांत ।

सूत्र--मळकर्म निवर्तलेयांविण जीव कृपेसी पात्र नव्हे ॥१॥

दृष्टान्त--सुरी असे : ते नीसीजे : इतुलेनि तेजा ये : झळका करूनि पोगर आच्छादति : आंबवती दीजे आन झळक जाए : पोगर असति ते नीवडति ॥

दार्ष्टान्तिक—तैसें योग्यतेकरूनि जीवाचें स्वरुप आच्छादलें असे : मग परमेश्वरू योग्यता फेडौनि प्राप्ति करीति ॥

१०७. चेइलेयाचा दृष्टांत ।

सूत्र—अनादी अविद्यायुक्त जीवा ज्ञान न संभवे : आणि-का संभवे म्हणा ॥१॥

दृष्टांत—कव्हणी एकु सुतला असे : तो चेये : तयासि ताहान लागली असे : तो सागळ खूंटीएसि देखे परि घेववेना कां पां : जाड्यें दाटला असे म्हणौनि ॥

दार्ष्टान्तिक--तैसें वीशेषज्ञानी यांचें अज्ञात नीवर्तलें : परि अज्ञानाचें कारण अविद्या असे म्हणौनि प्रातीयोग्य नव्हे :

१०८. जवनिकेचा दृष्टांत ।

सूत्र—लिंगपातें मोक्ष ॥१॥

दृष्टांत—स्वांग जवनीके आडौनि आवघें दीसे : व्यक्त न देखीजे । मोटकी जवनीक फेडीजे आन सावेव देखीजे ॥

दार्ष्टान्तिक—तैसें अविद्या असे तवं स्वरुपाची प्राप्ति नव्हे : अविद्या फीटे आणि स्वरुपाची प्राप्ति होए :

१०९. उखारलेया वस्त्राचा दृष्टांत ।

सूत्र—साध्याचिया प्राप्ती साधन निवर्ते ॥१॥

दृष्टांत--संवदनीयेआंतु वस्त्र चुरीजे : वोपीजे : तेल-खार दीजे : मग तांथु फुटे : मग डोळेयाचा मळ लागे ऐसें होए : मग जें वींब दीजे तें ठाके ॥

दार्ष्टान्तिक—तैसें शाब्द : अपरोक्ष : सामान्य : विशेष । विशेषीं योग्यता फेडौनि प्राप्ति करीति ॥

११०. परीसाचा दृष्टांत ।

सूत्र—जीव जैसा संगीं ठेवीजे तैसा होए : परि जीव जें होवावें तेंचि होए ॥१॥ जीव होऊं नेणे : उरों नेणें ॥२॥

दृष्टांत--परीसीं लोहो लावीजे : तेणें करूनि गंधिकाळिमा कठिणपणा जाए : तेज वर्ण ए । मग कनक ऐसें नांव होए : परि आणिकातें वेधी हें न ए ॥

दार्ष्टान्तिक--तैसें जीवाचें जीवत्व जाए : वस्तुत्व ये : परि ईश्वरु नव्हे ॥

१११. चंदनाचा दृष्टांत ।

सूत्र—**जीव सर्वाधिकार्या : परि सर्व हें नेणे ॥१॥**

दृष्टान्त—**चंदनाचीया जवळिका सुगंधता सुशीतळता ए : परि आणिकातें वेधीजे हें न ए ॥**

दार्ष्टान्तिक—तैसें परमेश्वरुसंनिधानातव भक्ताचें विकार विकल्पु स्वभावो हे दोष जाति : अनुभूति : रति हे गुण एति : परि आपुलें प्रेम आणिकासि देइजे हें न ए ॥

११२. शरणागताचा दृष्टांत ।

सूत्र—**परमेश्वरू ज्ञानियासी अनिष्टनिवृती करीति ॥१॥**

दृष्टान्त—**कव्हणी शरणागत मरणाभेण रायासि शरण रीगे । रावो तयातें पाठीसीं घाली : मरणासि राखे परि राज्य नेंदि । राज्य ते पुत्रासीचि दे ॥**

दार्ष्टान्तिक—तैसें परमेश्वरू सकळ देवता-मळ कर्मापासौनि वेगळा करीत्ति : परि राज्य तें भक्तासीचि देति ॥

११३. राज्याभिषेकाचा दृष्टांत ।

सूत्र—**परमेश्वरू भक्तासि अनिष्ट निवृती करौनि इष्टप्राप्ती करीति ॥१॥**

दृष्टांत—**कव्हणी एकु रावो असे : तो आपुलेया पुत्रासि राज्याभीषेकु करी : परि एरासि न करी । राज्याचा धनी तो पुत्रचि होए ॥**

दार्ष्टान्तिक—तैसें परमेश्वरु भक्तासि आपुली अनुभुति : रति : देति ॥

११४. साकरेचा दृष्टांत।

सूत्र—साधनापसीं साध्य उत्तम ॥१॥

दृष्टान्त—साकर होइजे तें नीकें कीं साकर अनुभवीजे तें नीकें ॥

दार्ष्टान्तिक—तैसें ब्रम्ह होइजे तें नीकें कीं ब्रम्ह अनुभवीजे तें नीकें ॥

समाप्त

टीपा

दृष्टान्त १-२-३—[परमेश्वराला जीवोद्धरणाचें व्यसन असतें व तो आपल्या परम कृपाशक्तीच्या भरांत–'उज्रंभा'मुळें अवतार धारण करीत असतो, हा महानुभावीय पंथाचा अभिमत सिद्धांत आहे. मनुष्य-देह धारण करून जे परमेश्वरी अवतार होतात त्यांत या पंथाचे अनुयायी तीन प्रकार मुख्य समजतात, आणि त्यांचें वैशिष्टय या तीन दृष्टांतांत स्पष्ट केलें आहे. 'लक्षण पाठां'तील 'अन्यव्यावृति' व 'विद्यामार्ग' या दोन प्रकरणांत 'पर' व 'अवर' शक्तींच्या प्रभावाच्या व्याप्तीचें स्पष्टीकरण टीपांत दिलें आहे तें तेथें पहावें. जडापासून चैतन्यस्वरूपापर्यंत सर्व 'अवर'; चैतन्यस्वरूपापलीकडील तें सर्व 'पर'. चक्रधरांच्या मतें केवळ ब्रह्मविद्याच 'परा–विद्या' होती; 'चैतन्यविद्या आदिकरुनि सकळही विद्या अपरा अमोचका बोलिजेति' 'एवं ईश्वरस्वरूपीं परशक्तीरूप सामर्थ्य असे'. हे तीन्ही दृष्टांत चक्रधरांनीं माहिमभट्टाच्या समागमें 'एलिये मार्गी' म्हणजे वेरूळाकडे प्रवास करीत असतां त्याला सांगितले. 'तरि का निरूपिलें : ना : येथ सकळ अवतारांची व्यावृत्ती आणि आम्हीं उभयदर्शी ऐसें उमटविलें।' 'जो जीये शक्ती क्रीडे तेया तैसें नाम होये। ना : दोन्हीं क्रीडे तरि तया उभयेदर्शी ऐसें नाम होये।'–उ० प्र०]

परांतु–'ब्रह्मांडांतर्भृत्य पर शक्ति तेचि पर।'. परदर्शे–पर शक्तीचा स्वीकार करितात. 'पर–स्वीकारें आपुलें शुद्ध स्वरूप देखे : समग्र देवता–स्वरूपें देखे : केवळे जीव–स्वरूपें देखे : जीव–स्वरूपीची

योग्यता देखे तथा अयोग्यता देखे : आपणयासम अवतारीचे स्वीकार देखे । तयांचीं दानें देखे : अनंत सामर्थ्यें देखे : अनंत वीहार देखे : प्रातीचेया जीवांते देखे : दिधलेया आनंदाते देखे ।' द्द० स्थ०; **आचारः**–घरांतुल स्थानीं अनुसरला इतुला लाभे । घरस्थानीं विचारशास्त्रार्थ : सकळै पदार्थ देखे तिये स्थानीं जे जैसे चारी ठाये ते तैसे जाणे । वाहीरील कांहींचि न देखे तिये स्थानीं आचारपर क्रियेचें इतुलेंहि ज्ञान नाहीं । जेंचि देखणें आति तेंचि देणे आति : इये स्थानीं पुसिलेया विचारूचि सांगे : परि आचाराचिया घाये खंडी निगुती न संगे । कां पा : जें जो होउनि असे तो तेंचि बोले । '–द्द० स्थ०'; आंतुल सकळही...देखे'–'चारी पदार्थांचीं (परमेश्वर–देवता–जीव–प्रपंच) कार्यें : करण : स्वरूप : लक्षण : यथातथ्य जाणती : पर वाहीरिल कांहींचि न देखे; ' म्हणजे आचाराची निपुणता, कला-कौशल्य इत्यादिक कांहीं जाणत नाहींत. त्यांना ज्ञान असतें, पण प्रेरक-शक्ति नसते : ' भक्तिपुरश्चरातें देखति : तथा भक्तीचें अंग तें हि सांगती : पर अंगें आचरणें नाहीं : ऐसें पुरुष ए द्दष्टांतीं जाणावें । ' ब्रह्मांडीचेया प्रपंचा मूर्ति तथा निष्प्रपंच फळ : अविद्यायुक्त जीव : सकळ विद्यांचे अधिकार : अनंता सृष्टींचे त्रिविध कर्मलेप : सकल देवतांचे फळीये : मूळाधिकार : प्रेमाधिकार : अभावरूप कर्में : जीवत्व : चैतन्य : इतुलें देखे ' द्द० स्थ०; ' ज्ञान घरस्थानीं : तयांत असे तो केवळ ज्ञानिया : तयाचे तीन पक्ष ' (१) अनुसरलेला पण भक्तिपुरश्चर नव्हे, वा चर्यावंत नव्हे; (२) बोध–बोधवंत असे : जैसा गजस्कंधीचा; (३) दोघें सिवतला : जैसा सामान्य-स्त्री-सदनस्थित. ' वाहीरिल...न देखे '–' अवरांतुल देखणेंचि स्वीकरिलें नाहीं ' ' जेंचि देखणें...आति' –' पराचेनि स्वीकारें लीलादानें (लीलादान–ग्रहणदान–संबंधदान–प्रेमदान म. वाक्य. प्र० पहा) दे : प्रातिकाळीं कैवल्यही दे । तर ज्ञान–प्रेम कां पा नेदी : ना : मुळाधिकाराचें तथा प्रेमाधिकाराचें ज्ञान नाहीं

म्हणौनि । कां पा : तें अवरांतुल । ' इ० स्थ०; 'बाहीरिल'–'अविद्या : आदिमळ आणि मळकर्में तीं न देखे । ' 'अवर'–'चैतन्यस्वरुपापासौनि यक्षिणीपर्यंत सकळ अवरचि असे' । 'मनुष्यत्वाखालौतें जडपर्यंत अवरचि' । 'चैतन्या आरुते अवघे अवरचि असे । ' आचार:– बाह्य स्थानी असतीपरि आचारू । सकळै देखे तिये स्थानीं असतीपरीचिया सकळ क्रिया जाणे : तेथींचें कळाकौशल्य जाणे : आंतुलस्थानौं विचार : तें कांहींचि न देखे : तियें स्थानीं जो जैसा पदार्थ तो तैसा उमटु नाहीं : जेंचि देखणें जाणणें तेंचि चालणें बोलणें । ' इ० स्थ०; 'बाहीरी'–केवळ विरक्त : 'बाहीरिल सकळै'–' उभय विधीचे अवर–पर बाह्याचरण तें सर्व जाणे. 'आंतुल'–विचारपर निर्वच. 'आचाराचे कलाकौशल्य अवघेंचि सांगे : विचारपर पुसलिया कांहींचि न सांगे' 'उंबरेयावरि'– 'संपूर्ण ज्ञात विरक्त अस्तीपरी आचरिता : वर्तेचेनि दृष्टांतें (इ० ९२) वर्तो जाणें ।' योग्यतेनुरूप निरूपण–चर्या–आचरण यांत अभिज्ञ. 'ज्ञानशक्तीचा अनुभव अवघाचि भक्त जाणति : पर भक्ताचा अनुभव ज्ञानिया कांहीचि नेणे । म्हणौनि विशेषज्ञान जालिया भक्ताचिया साधनाचें अज्ञान सांगीतलें : यातव मुख्यत्वें उभयशक्ती प्रेमचि होये : ज्ञानापसीं प्रेम उत्तम म्हणितलें म्हणौनि । '

[या पहिल्या तीन दृष्टांतांचें 'लापणिक' देतांना केशिराजांनीं 'पुरधारीं', मनुष्य–स्वरूप धारण करणाऱ्या अवतारांचें वैशिष्ट्य स्पष्ट केलें आहे. जीवोद्धार कार्य हें 'मनुष्य अवतारेंचि आति' असें त्यांनीं स्पष्ट सांगितलें आहे. 'परदर्शा' हा 'प्राप्ती'–स्वरूपप्राप्ती, स्वानुभूतींच्या द्वारें करून देतों; स्वानुभूति ही बोधाची उत्तरावस्था असून तिच्या साह्यानें 'शास्त्रीं दृढावे : जीवीं निश्चय पावे : बैसोनि ठाके : ' 'अवरदर्श्या' हा विद्यादानास समर्थ असतो व 'उभयदर्श्या' हा सकळही देणें आति.' महानुभावीय अध्यात्मांतील अवतारवाद हा नवा नसून तो वेदोपनिषत्कालीन आहे. या पंथानें फक्त त्या जुन्या सिद्धांतास नवी चालना

–पुनरुज्जीवन केलें आहे. 'लक्षण' पाठाच्या १२ व्या 'उद्धरण' प्रकरणांत हें अवतारकार्य विस्तरश: वर्णिलें आहे; (चक्र० सि० सूत्रें: पृ. ९–१३; टीपा, पृ. ७५–८९ पहा.) उंबऱ्यांवरील द्रष्ट्याची कल्पना ज्ञानेश्वरींत आली असून दोहोंत बरेंच साद्दश्य आहे. 'ऐलीचि थडी न पवतां। पळे जो माघौता। तया पैल द्वीपीची वार्ता। काय होय॥ कां दारवंठांचि जयाचें। सीस रोंविलें खांचे। तो केविं परिवरींचें। ठेविलें देखे॥' अ० १३. ८४४–५.]

द्दष्टान्त ४–५–६–७:— [या चारी द्दष्टांतांत परमेश्वरी दानाचे चार प्रकार सांगितले आहेत. अवतारधारी हें दान 'वेधेंचि देति का बोधेंचि देति' आणि हे वेध 'द्दक्-स्पर्श-आलाप व अंत:करण' या क्रमानें संचरतात. ४–५–६ हे वेधास अनुलक्षून व ७ वा हा बोधास अनुलक्षून आहे. ४ था द्दष्टांत चांगदेवाला सिंगणापूर येथें, ५वा माईबाइसा व तिची रिक्तहस्ता मुलगी एकाइसा यांना पैठण येथें भोगनारायणाच्या मंदिरांत, ६ वा नागदेवाला बोधप्रसंगीं सावरखेडा संगमीं आणि ७ वा बाइसा (नागांबिका) हिला पैठण येथें प्रथमभेटीप्रसंगीं सर्वज्ञांनीं सांगितला.]

कुकडी: कोंबडी (कुक्कुटी): पाखवा दे:–पंखांच्या उबेंत घेते; 'पक्षरहिता पिलियांते पाखवांचा उबारा देऔनि सपक्षा करी.' समभावार्थ: 'तैसा तूं कनवाळू गोसावी। असतां मी पचिजे भवीं। तरि आतां होउनि कांसवी। आठवी मातें॥ परिसें आर्ताचिया दानीं। तूं अपक्षा पिलियांची जननी। तरी संनिधानीचा पाखवा देउनि। जीववी मातें॥ स्नेहाचेनि अवलोकनें। वत्सां पोसीजती मीनें। तेवीं तुवां द्दष्टीं जगजीवनें। रक्षावें मज॥" ज्ञा० प्रबोध० १०१०–१०१२. तयातवं–त्यामुळें. गोपाळांसि–चक्रधर तपश्चर्या करीत एकाकी व अहेतुक भ्रमण करीत असतां गवळयांच्या मुलांबरोबर खेळत असत. त्या प्रसंगीं चक्रधरस्पर्शानें गोपाळांस समाधीसदृश सुख मिळे, त्याचा हा

उल्लेख आहे. (लीला च० भा० १ पृ. २५, लीळा ३३ पहा.). गरुडाघोडेयासि:–चक्रधर झाडीमंडळांतून रामदरण्यासमागमें अळजपूर (एलिचपूर) येथें असतांना रामदरण्यानें स्वारीस दिलेल्या 'गरुड घोड्या'वर बसून अंबीनाथाच्या दर्शनार्थ जात असत; तेव्हां तो घोडा परत येईपर्यंत तसाच स्तब्धपणें उभा असे. यास उल्लेखून ही आख्यायिका दिली आहे. (लीला च० भा० १ पृ. ३९, लीला ५५.) कांकोसासि–हा रावसगांवीं रामदेव 'दादोस' याच्या समागमें चक्रधराच्या दर्शनास आला तेव्हां त्याला स्थित्यानंदप्राप्ति झाली. विष्णुभटासि– गोसावी आपेगांवीं विज्ञानेश्वराचे मंदिरांत उतरले असतां हा देवदर्शनास आला व तेथें स्वामीस पाहून त्यानें गोसाव्यांची पूजा केली व स्वामींनीं त्याच्या पाठीवरून हात फिरवितां त्याला स्थित्यानंदप्राप्ति झाली. यानें बल्हेग्रामीं स्वामीची प्रसिद्धी केली. बाइसासि–पैठण येथें चक्रधर प्रथम बोणेबाईसमागमें आले तेव्हां त्यांची मार्गांत या बाईची (नागांबिका) गांठ पडली; पुढें ती आपलें जुनें 'पयोव्रत' सोडून चक्रधराच्या सेवेंत राहिली. तिला चक्रधराची पूजा करीत असतां स्थित्यानंद प्राप्त झाला. त्या प्रसंगाचा येथें उल्लेख केला आहे. अशाच प्रकारची स्थिति अनेक भक्तांस प्राप्त झाली याबद्दल लीलाचरित्रांत अनेक उल्लेख आहेत ते 'भक्तासि' 'निधिवासाचीये' (नेवासें) सभेसि' व 'भारद्वाजासि' प्राप्त झाले होते. लीलाचरित्राच्या पूर्वार्धाच्या प्रारंभींच नागांबिकेच्या स्थित्यानंदाची लीळा आली आहे. 'नित्यदिनीं लीळेचे पुरुषू'–द० ६ हा कांसवीचा आहे; यांत चिंतकाच्या (अवतारधारक) अंत:करणांत जें भक्तोद्धारक स्मरण उद्भवतें त्या शक्तीच्या प्रभावानें होणारा वेधसंचार थेट त्या भक्तापर्यंत पोंहचतो, हें निर्दिष्ट केलें आहे. या 'नित्यदिनी लीळे'चा उल्लेख बाईदेवोबासाच्या 'पूजावस्वरां'त केला आहे. 'बाईसे प्रस्नु करीति : जी जी : आम्ही गोसावियातें चींतु : गोसावी काइ चींतीति। गोसावी म्हणति

बाई : हें सकल जीवातें चींतीं।' (नित्यदिनी लीला : पृ० १६ पहा. महावाक्यप्रमेय पृ० २४ पहा.) 'मातांगासि'–चक्रधर जोगेश्वरीं असतांना स्वामीच्या दर्शनास आलेला एक अंत्यज 'आउसे'ला दारांत भजन करीत बसलेला दिसला. ती वर्दी स्वामीस पोहचतांच ते बाहेर आले व त्यानें आणलेले तीन लाडू स्वीकारून त्यांतून एक ठेवून बाकीचे दोन प्रसाद म्हणून परत दिले व शेष आपण ग्रहण करून बाकीचा शिष्यांस वाटण्यास सांगितलें. शिष्यांची साशंकवृत्ती पाहून सर्वज्ञांनीं 'विकार' विकल्पाचा पूर्ण निरास म्हणजेच संन्यास अशा अर्थाच्या सूत्राचें निरूपण केलें. शतांसहस्त्रां:–'श्रीकृष्णीं शतां सहस्त्रां वेधु' चक्रधरोक्त सूत्रें : विचारपाठ; ९१. एकाइसासि–ही सारंगपंडिताची नातेवाईक विधवा आपल्या आईसह व धाकट्या बहिणीसह स्वामीच्या सेवेंत एलापुरीं (वेरूळ) असतांना तिला स्वामींनीं धाकट्या बहिणीबरोबर पाठराखणी म्हणून पाठविलें व स्वामी जो स्थित्यानंद आईस देतील तोच एकाइसेला संनिध नसतां देखील प्राप्त होईल असें आश्वासन दिलें. त्याप्रमाणें एकाइसेला ती बहिणीच्या सासरीं असतांना प्रत्यय आला; याचा हा उल्लेख आहे. समानार्थक–'आगा मुखमेळेंविण। पिलियांचें पोषण। करी निरीक्षण। कूर्मी जेवीं॥' ज्ञाने० अ० १३, १४०. शब्दवेधिया रस–'आलापत: कनकतां नयतेऽष्टलोहं। स शब्दवेधिसु-रसः शतयोजनेऽपि'–केशिराज : दृष्टांतस्तोत्र. ही किमयेसारखी एक रसक्रिया आहे, ॥ एकु शतवेधिया रसु : एकु सहस्त्रवेधिया रसु : एकु शब्दवेधिया रसु। वि. पाठ २७९. आणि ती ज्याला साध्य झाली असेल त्या पुरुषाच्या आश्रयास असलेल्या रसांशीं स्पर्श होतांक्षणीं अष्ट धातूंचें सुवर्ण होतें अशी पुरातन समजूत आहे. आधार–आश्रय. तोवें तांबें–तापलेलें व लाल भडक झालेलें. 'आटिलिये मुसेचें तांतलें तांबें जालें असे :' मुशीमध्यें खदखदणारें व कपिलवर्ण दीसीचें; 'अल्प अग्नीतवं तापे : परि तांवडें नोहे : संपूर्ण अग्नि पावे तरि आलोहित

होए।' संतोखासि:-स्वामी एलापुरीं असतां एकदां 'विजनार्थ' गेले होते व त्यांना एका गुहेंत गुणगुणत असलेला एक विरक्त दिसला. त्याची विचारपूस करितां मी 'संतोषपूर्ण' येथेंच असतों असें त्यानें स्वामीस सांगितलें व तो त्यांच्या जवळ राहूं लागला. स्वामींनी त्याचें नांव 'संतोष' असें ठेविलें. स्वामींच्या शब्दमोहिनीनें वश होऊन तो त्यांचा अनुयायी झाला. वींझुगाचेया ब्राह्मणासि-'वींझुगा' गांवीं स्वामी असतांना एक नवगांवचा ब्राह्मण दर्शनार्थ आला व त्यांची मूर्ती व वाणी यामुळें वेधून जाऊन तो स्थित्यानंदांत निमग्न झाला. परत गांवीं गेल्यावर तेथील लोकांनीं त्याला वेड्यांत काढलें; त्यामुळें परत येऊन या स्थितीच्या निवृत्तीचा उपाय त्यांना आग्रहपूर्वक विचारूं लागला. हंसराजासि-ही नागांबिकेची धाकटी बहीण 'हांसूबाई' हिलाही नागांबिकेप्रमाणें स्थित्यानंदप्राप्ति झाली होती. अवडळभटासि-हा साडेगांवचा 'एल्हंभट', नागदेवाबरोबर सिन्नरास दर्शनार्थ गेला असतां बाकीच्या मंडळींनीं पर्वकाळीं स्वामीची पूजा केली, पण हा मात्र बाजूस राहिला म्हणून तो 'मी अवडळच' असें स्वतःस म्हणून घेऊं लागला. हें ऐकून स्वामींनीं त्याचें तेंच नांव ठेवलें व स्थित्यानंद-दान दिलें. 'धातूते घडिता तो अधिकरण : वैखरी हें आयुध :...श्वासो-श्वसित वायू जो नाभिस्वर ऐसी जे वैखरी ते अधिकार्यांते सन्मुख करुनि तयाचेनि अवधानें तथा संस्कार लक्षुनि अधिकरण तयासीं प्रणवे।' 'अरणी घणाचेनि योगें सांडसीं तोवें तांबें धरुनि जैसा योग घडतसे तैसें जीवस्वरुपीं कणनकार्य उमटतसें।' महात्मा : शांति-निवृत्ति वाचक : ज्ञानभक्तिवैराग्याचें युक्तत्व : तयाचें आधारीं शब्दवेधिया रस' 'एवं ईश्वरीचा शब्द जीव-धातुतें स्पर्शे : आणि मागौता विलया जाये' तोवें तांबें असे तें सोनें होये स्थानीं अपूर्वासि अधिकार्या होये' 'रात्री-स्थानीं जीवदेवतांचें अज्ञान : गांव-स्थानीं कर्मभूमि : रसातें स्पर्श होये तोच मोक्षाचा प्रश्नोत्तररूपी गुरुशिष्यसंवाद' 'युक्तित्रये निरसौनि बोधत्रये

संचरे : सोनेयाचे तीन प्रकार : बावनकसी : साडेपंधरे : सोळे : ऐसें अधिकारभेदें वैराग्य : ज्ञान : भक्तिप्रधान अनुग्रहो होये ।' दृ. स्थ.; विश्वनाथ पंडित बाळापूरकर यांच्या 'ज्ञानप्रबोधांत (शके १२५३) हा शक्तिव्यापार पुढील ओंव्यांत स्पष्ट केला आहे.' तयाची देखौनि अधिकारबुद्धी । जगद्गुरू धातुर्वादिया आधीं । उपदेशिली रससिद्धी । शब्दवेधाची ॥ इतर व्यावृत्तीं शोधला शुद्ध । योगाग्नि साद्य रसबोध । अनादि ज्ञानत्रयप्रबंध । सिद्धला जयां ॥ जो व्युत्पत्तींचा मुखीं । अपार सिद्धांत-धातुतें शोखी । यथार्थ ज्ञान-सुवर्ण भुक्षी । उमट-द्वारें ॥ तै तो शब्दवेधिया होये । मग नादाचेनि अनु-जाये । जीव-धातूतें वेधीत जाये । शब्दमात्रें ॥ ऐसा सिद्धरस लाधला । म्हणौनि आचार्यपदीं बैसला । तो नागार्जुन जाणे भला । कपाळपरिक्षेतें ॥ जेणें जीवपर्वतीं । लाउनी निगेपणांची भाती । वेधिलें जड वै जाती । ज्ञानौषधिबळें ॥५२१॥' [दृष्टांत ४-५-६ मध्यें परमेश्वराची तुलना मातेशीं केलेली आहे, कारण मातेच्या प्रेमामध्यें परमेश्वरी कृपेचा अंश असतो. दृक्-स्पर्श-आलाप-अंतःकरण या चारी प्रकारांनीं माता आपल्या लेकरांचें संगोपन बालपणापासून करीत असते. 'अपकार विसरौनि गोमटें करणें येविषयीं मातेचा दृष्टांत असे : जैसी माता गर्भापासौनि बालत्व पालटे तवं सर्वांग स्पर्शे वाढवी : मग दृष्टीचेनि स्नेहें अन्नोदकीं पाळण करी : तयांमध्यें मनोधर्में विद्याविवाहसंपत्ती होआवी म्हणौनि चिंतन करी : तेंहीं जालेया शब्दें विचारबुद्धि सांगे :' –दृ० स्थ०; चक्रधरसूत्रांत 'दृक्स्पर्श-आलाप-अंतःकरण' असा अनुक्रम असतां, नागदेवाचार्यांनीं केशिराजांना तो बदलण्यास कां सांगितलें, याचें कारण दृष्टांत स्थळांत पुढीलप्रमाणें दिलें आहे; 'जैसे भटोबासासि परमेश्वरपुरीहुनि (रिधपुराहून) आलेयां अवलोकीलें : मग क्षेमालिंगनें स्पर्श दीधला : उपरी श्रीप्रभुची (श्रीगुण्डम राउळ) क्षेमवार्ता पुसौनि तयाचा महीमा नीरूपीला : आंत अंतःकरणीं बोधदातृत्वाचा उल्लेख उपनला : येणें न्यायें वचनक्रम असे :' तसेंच

दृष्टांतांच्या (४-५-६-७) अनुक्रमाचें कारण पुढीलप्रमाणें दृष्टांतस्थळकार देतात; ' ऊचाचेनि क्रमें नीचेचा व्यापारु म्हणौनि ' मोक्षानुभूतीचें सुख, स्पर्शद्वारें मिळालें तरी ती मोक्षाची अथवा स्वरूपाची प्राप्ती दृष्टिद्वारें लाभते. ही प्रेममयी दृष्टि अपरोक्ष ज्ञानानें अविद्येचा छेद झाल्याशिवाय मिळत नाहीं. म्हणून स्पर्शानंतर दृष्टि ती दृष्टि, ज्ञानयुक्त आचरण अंतःकरणांत बिम्बल्याशिवाय येत नाहीं. आणि हा अन्तःकरणांतील अभिनिवेश शब्दज्ञानाच्या साहाय्यानें प्रतीत होतो.]

दृष्टान्त ८—हा भिंगार येथें 'खेईगोईस' सांगितला; खेईगोई ही घोगरगांवची एक संपन्न ब्राह्मण विधवा होती. हिनें अक्षरशः आपल्या संपत्तीवर तुळशीपत्र ठेऊन चक्रधरांचा अनुग्रह घेतला व भिक्षाचर्या स्वीकारून ती अनुयायी बनली. तिच्या 'मलवत्' त्यागाची चक्रधर प्रशंसा करीत असत. चतुर्विधदान–लीला–ग्रहण–कैवल्य आणि संबंधदान. (महा० वा० प्र० पृ० २२–३ पहा). परते–परौते–पुरतः– पलीकडेस. रूप करी–गुण-मूल्यादि परीक्षा करणें; 'निश्चयेसीं बोलेति. ' ज्ञा० अ० १८. ७३; अ. १० ओ. १४ पहा. वोबाळणीं पडे–प्रसादद्रव्य–नजराणा पुढें ठेवीत असत. सील्पविद्या–इंद्रादिकांपासून खालच्या ज्या स्वर्ग, अंतराल, देवयोनी देवता, त्यांच्या विद्या. अपरोक्षविद्या– "सत्ताज्ञान तेंचि अपरोक्षज्ञान' (चक्र० सि. सूत्रें, पृ. ११ व ८३ पहा). [मुमुक्षूंच्या अधिकारभेदास अनुसरून व 'पुरुषाचेंनि उद्यमें' परमेश्वरी दानांचे चतुर्विध प्रकार झाले आहेत. या दृष्टांताचा भावार्थ पहातां समुद्र हा 'संपूर्णज्ञात विरक्त आचार्या' असून जे 'कवडाचि घाति' ते कर्मफलेच्छू मुमुक्षु होत; ज्यांना माणिकें मोतीयें'—सिद्धप्रयोग, आचार, विचार– पाहिजेत ते 'परते जाती' म्हणजे 'आगळी जवळीक करीति' ते आचार्य संनिधानीं राहून 'अनर्घ्य रत्नांचा उदिमू करीति; ' 'तयाचा अवसर राखती: मनोवृत्ति धरीतिः तो बोले ऐसा उपावो करीतिः उचित सेवा दास्य करीति : आदरपूर्वक जिज्ञासा करीति : आक्षेप करूं जाणती :

परिहार सुधो जाणती : ऐकिलिया अर्थाचें विमर्शन मनन करीति : संवाद-चर्चा करीतिः चौ पदार्थांचे (ईश्वर-माया-जीव-प्रपंच) अशेष विशेष ज्ञान काढीति ।–' दृ०स्थ. रायासि भेटति–विशेष प्रचीतीचे पुरुष जेथें असतात अशा 'गावांसि' म्ह० गंगातीर्थादि स्थानीं 'भेटती : चर्चा मथनीं प्रवर्तती' 'रूप करी'–प्रमाणांदिकांची पारख होऊन ही रूपक्रिया होते; ज्ञा० अ० १०–१४ पहा. याचें बोलणें अप्रमाण : युक्तित्रयाचे नव्हे। पुनरुक्ति वाक्य विरोधाचें नव्हे : पूर्वापरसंबंधपूर्वक अंतरबाह्य लापिकायुक्त कालादि चातुष्टयेसीं पूर्वपक्षादि चातुष्टय लिंगत्रयविवेचनेसीं' दृ० स्थ०. कुष्ट लागे– 'याचिया बोलण्यासि जो अन्यथात्व भावील तो अन्यथाज्ञान कुष्टिया जाणावा : उत्तमार्थासि अन्यथात्व करितां : अभिमानियाचा क्षोभ होए : ज्ञान हा अंश ईश्वरीचा : तो न मानलीया ईश्वरोचि न मानिला होए।' दृ० स्थ०.

दृष्टान्त ९—वेलोपुरीं हा 'आउसेला सांगितला. (एकीवासना-खेइगोईप्रति). द्रवे–' एक वेधें : एक बोधें : एक प्रेमें : द्रवे'।

दृष्टान्त १०—सावखेडा–संगमेश्वरीं हा भट्टास (नागदेव) सांगितला; (एकीवासना : महदाइसेप्रति). परमार्थमार्गाचें आचरण करीत असतांना देखील तेथें सावधानता व दीर्घ प्रयत्न हे नसल्यास अनिष्ट होणें चुकत नाहीं, हें तत्त्व या दृष्टांतांत स्पष्ट केलें आहे. ' ब्रह्मविद्या ते अविकार्यासीचि संचरे'; ' जाली ब्रह्मविद्या जीवाचेनि करणें एका गोमटेया कारण होए (एका वोखटेया कारण होए).' करीतसांतां–करीत असतां; वोदरे–(अव–दृ) यर फुगून कोसळणें; उमळून पडणें. टेंका सूति–फुगावटलेल्या ठिकाणीं आधारास लांकडें वगैरे लावणें. नसुधा–नुसता; केवळ; फक्त. मोक्षु–' कैलासवैकुंठपर्यंत तो मोक्ष बोलिजे : इंद्रादिकांचीं फळें तो स्वर्ग बोलिजे ' –विचारमालिका. देहविद्या–देह चिरायु होण्याची विद्या; ' देहविद्या एकि आति ते ईश्वरापासौनिच होए' –वि. मालिका. देहविद्ये देह प्रकाशे : देहीं भूतें तन्मात्रापर्यंत उरेति :

सातै अंश झडेति : एकाकार वृत्ति उरे : हेमकाया होए वज्रकाया होए।'–चक्र० सि० सूत्रें–विचारपाठ. 'एकपुरुषी विद्या ते : ऋद्धी सिद्धी होति : भूतांपर्यंत गमनदर्शन।' संतें फळें–सृष्टिशून्य–नरक–लक्षणपाठ पृ० ५९ व ८१ पहा. 'एवं सकळ चर्चेचा ठायीं अतिप्रयत्न हिरेयाचे दार्ष्टांतिकीं जोडावे : दरडी पडो नेदावी हा हेतु। द. स्थ.

दृष्टांत ११—हा कानसेचेया ब्राह्मणास सांगितला. ('एकें पक्षें गोसावी निरूपिला : एकें पक्षें गौराइसा दीधला।') वेंव–साळ्याला (कोष्टयाला) मागाचें सूत गुंडाळण्यास लागणारें सरळ लांकूड. नीह्लळ–उदासीन. सरळडाळ–सरळसोट डहाळी. खांदीं–वृक्ष-स्कंधीं. वीखोवेव्हारु–विषयव्यवहार, प्रापंचिक कामास. हा दृष्टांत 'दृष्टार्थिया पुरुषासि' अनुलक्षून आहे. साळी हा आपल्या योग-क्षेमाच्या धंद्यांत वाकबगार पण उदरनिर्वाहाव्यतिरिक्त कांहींच न पहाणारा म्हणून त्यानें कल्पवृक्षापाशीं देखील अडीअडचणीस मोडतोड झाल्यास दुसरें वेंवच मागितलें; 'एसणा लाभु जाणौनि ईश्वरूही देता : परि एक अल्पचि मागेति.'

दृष्टान्त १२—'विषये' ग्रामीं रामदेवास सांगितला. पर्यायवशें-कर्मगतीच्या प्रवाहप्रकर्षामुळें. रीचवे–रिकामी होई. चैतन्यें बांधला असे–चक्र० सि० सूत्रें. लक्षणपाठ–संसरण प्र. पृ० ६–७ व ४७ पहा. 'चतुर्विध कर्मार्जकाचिया परवडी घटियंत्रवत एवं जीवायुष्यसंख्या जेंवि घटी भरे रीचवे तेंवि जीव संतासंते भोगितुचि असे।' सदृशार्थ–'भवंता राहाट घटिके। विश्राम नाहीं कर्ममालिके। मायायंत्रीं गुण-पाशिकें। बांधलिया जीवा॥ ऐसी एकीएकी जीवघडी। अध ऊर्ध्व क्रमूनि परवडी। मागुतीं होये ती बुडी। कर्मभूमीं॥' ज्ञा. प्रबोध. २४६–७. 'संसारकूपांचा पोटीं। कर्ममालिका घटी। वाया यंत्रारूढ जीव सृष्टीं। भ्रमतुसे॥' ऋ. वर्णन. १७५.

दृष्टांत १३—आउसेला डोंवेग्रामीं सांगितला. पूर्वसंचितामुळें जें दुःख जीवास भोगणें प्राप्त असतें तें पाहून जर अनुकंपा उत्पन्न होईल तर ती अनाठायीं होय; त्यांची कींव करणें हें दुबळेपणाचें लक्षण आहे, हा अभिप्राय. माळेकार–पांखरें हांकण्यासाठीं उभारलेल्या माळावर पिकाचें राखण करीत बसलेला शेतकरी. हा कां गा–हें सूत्र चक्रधरांनीं एका व्रणार्त बैलास उद्देशून उच्चारिलें होतें; तो बैल निमूटपणें इलाज करूं देणार नाहीं, धडपड करील, चिरफाड करूं देणार नाहीं, असें त्यांनीं शिष्यांस बजाविलें होतें. घृणा–दया, अनुकंपा. सोसों–(सुवो सुवों) पुनः पुनः खुपसून घेऊन. लवणीं–वांकण; वळण. वाटा घे–वाटसरांस लुटी; आपला हिस्सा जबरीनें हिसकावून घेई. वोहरे (वधूवरें)· वऱ्हाड; वरात. खैरी जुंपावेया–विहिरीच्या रहाट खांबास जुंपणें(मोलस्वर्थ पहा.) हा एक प्राचीन शिक्षेचा प्रकार होता. धारे धाकुटा–अल्पवयी, कोंवळा. मा–मग. पाखाळु–अपराधनिवृत्तीप्रीत्यर्थ राजदंड; ‘ ज्ञानांकुश आख्यायिका श्रवण –याउपरि ज्ञानांकुशांची गोष्टि सांघितली : महदाइसीं म्हणीतलें : जी : जी : ज्ञानांकुश नाम महात्मे : ते एकि गांवीं होते : तेयांतें देखौनि तीए गांविंचेया बाइलांसि तैसींचि लेंकरुवें हों लागली : गांविंचां म्हणीतलें : हे वीभचरताती : म्हणौनि : गांवींचा खैरीं जूंपा· वेया काढिले। तीहीं म्हणीतले : तरी काइसेया जूपता : शोधि घेया : पाखाळु घेया : दीव्य घेया : ते नेघेति। तेलियाचे बैल आणिले : तेयांते खैरीं जूतले : बैल बूझवि तरि दृकवीति : पर जूपविति। मग तीं ईश्वरपुरुषू म्हणौनि सोडिले...सर्वज्ञें म्हणीतलें बाइ : माहात्मा तो खैरीं काढिला त्रीकरेना : ऐसेयां होआवे।’ ली. चरि. उत्त० ४४३; बुंथि–घुंगट; बुरखा. गांवो पूजावा–ग्रामदेवतेची अर्चा करावी; वाहाव्या. चौ पदार्थांची (जीवेश्वरादि) ब्रह्मविद्या : तो माळा। तयावरि संपूर्ण ज्ञातविरक्त उभयदर्श्यां तो माळेकारु। जयाचें जें इष्ट तयापासौनि काढौनि अनिष्टीं घाली तें मारी। अस्तीपरी आंत निवाली जी कु–परी ती लवणी।

गावींचा लोकु ते लवेलागणीचे व स्नेहोपकाराचे। बापुडा तयाची कीव भाविती : रंक शौच्य दीन होउनि वर्तती। गोरा : आचारवंत आश्रमधर्म पाळिता। गोमटा : वेदागमादिवेत्ता आन आणिकांसि आचारविता। धारेधाकुटा : कोमळदशेचा बाळक वर्तता : सौजन्यपर आन प्रीतीं वर्तता। राणीयेचा पूत : चौदा विद्या चौसष्टकलावेत्ता। खैरी काढिला : नितांत पीडित। पाखाळा कां नेघे–यासि सहाय का न करी : यासि दैवत तापादु:खावेगळें कां न करी।'–आपुलेयाचीही–'नामाची तथा मार्गाची आवडी असौनि अनुताप असे तयासि आपुला म्हणावा।' (आचारमालिका ३७ पहा) नगरापुराची तथा वाघासापाची चोरींची वाट सांगता तो (दृ. ५०) नव्हे।' दृ० स्थ०; समानार्थ : 'मग साहसाचिया अवेळे। उठीति अभिलाष्र चोरकुळें। कापट्याचिये लवणीं एकवेळें। लुसती धर्मार्थातें॥ ज्ञा. प्र. २७४.

दृष्टान्त १४—प्रतिष्ठानीं पांडेयास (सारंगपंडित). स्वतसीधा–स्वत:सिद्ध, नैसर्गिक. तेजसामग्री–डोळ्यासमवेत उपजतांच जें इंद्रियजात सामर्थ्य तें. आग्रायणाच्या मतें 'अक्षि' हा शब्द 'अक्ष' या धातूपासून झाला; जी वस्तु पाहावयाची तिला डोळा आपल्या तेजानें लिंपतो अशी प्राचीन समजूत; डोळ्यांतील प्रकाश पदार्थाकडे जात असे व त्यामुळें डोळ्यास तो दिसे असें ते मानीत असत. (निरुक्त १-९पहा) मेदसामग्री–'पडळ नव्हे : कवळ-टीका नव्हेति' रत्नाचीये गर्भीचें खूतले रंग–रत्नाच्या अंतरांतील स्फुरणारे रंग; 'प्रकाशरूप ज्ञान असे : परि रत्नपरिक्षा स्वतसिद्ध नव्हे : कर्माजकें पावति।' दार्ष्टांतिकाच्या स्पष्टीकरणार्थ लक्षणपाठ पृ. ८ आणि ६४-६५ पहा. ज्ञानीभक्त–लक्षणपाठ पृ. १३ व ८७–८८ पहा.

दृष्टान्त १५–व्रल्हेग्रामीं आउसेला; ('दोठायीं निरूपिला : उपाध्यावर आन आउसावरि') खडे खुबटे–खुपणारे दगडगोटे. एकवांचौनि–परमेश्वरदास्याविना. आसळग–वर वर आलेलें; उथळ पाण्यांत

असल्यासारखें. 'एकें घूर्णितें सावधें । असलगें एकें अगाधें । '--ज्ञा. ११. १२६ अर्जुना हा फलत्यागु । आवडे कीर असलगु । परि योगामाजीं योगु । धुरेचा हा ॥ ज्ञा. १२–१३४. आंगी–बंडी. पडदनी–दुणी केलेलें आडवस्त्र–पट. अक्षोभ्य–गंभीर, गहन, न खवळणारें. भलतेंही–मन मानेल तें; आवडेल तसें. ' तैसें भलतेथ भलतेणें भावें । भलतेंही हो अथवा नोहावें । परि तें मीं ऐसें आघवें । होउनि ठेलें । '–ज्ञा. अ. ९–२५७; २९०; ३८५ अ. ११–१० पहा. हल्लीं या शब्दाला जो उपेक्षेचा व अनुचितत्वाचा अर्थ आला आहे तो प्राचीन मराठींत नव्हता. पावौनि–प्राप्ती करून घेऊं; हें आज्ञार्थी रूप चिंतनीय आहे. हा दृष्टांत , ' सहवर्तमान देहीं संतक्रिया आचरे तया प्रमादियावर आन देहांतरीं कर्मरहाटीसि पडौनि संतक्रिया आचरे तयावरि असे । ' आसळग–' अल्पेंचि काळें पावैन ऐसें देखे ' वेडस–'उपरतीचा नव्हे : म्हणौनि वेडस.' 'थडी बैसला तो बोधवंत' दृ० स्थ०.

दृष्टान्त १६—हा लखुबाइसेला डोंबेग्रामीं सांगितला (उपरिभट्टाप्रति). बांदकरी–बंद, विकलेला मनुष्य; गुलाम. वाटमाऱ्या चोरानें त्याला पकडलें ' चक्रवर्ती राय बंदी सोडी । तयां रंक घाली बांदौडीं ' ज्ञा. प्रबोध ६५०. साजात्य-वैजात्य–समान आणि विरोधी गुणांनी युक्त. नेदी–न देई. पंचनगरें नवनगरें–पंचग्रामाधिकारी नवग्रामाधिकारी. गाणें ...कालाळें–गाणें–गायक; भाटें–स्तुतिपाठक; थोंटीं–ठक; सीमूरें–उद्धटा; धांगड्या–दांडग्या बेमुरवतखोर फटकळ स्वैराचारी स्त्रिया; रांधवणें–अन्नविक्रय करणाऱ्या. सामान्यस्त्रिया–रूपजीवि वेश्या; कालाळें–मद्यविक्रेत्या स्त्रिया. कलाल स्त्रिया. अ. १७–२२ मध्यें तामस दानाचें स्वरूपस्पष्ट करीत असतां ज्ञानेश्वरांनीं जीं उदाहरणें निदर्शनार्थ दिलीं आहेत तीं याच मंडळींचीं असून तेथेंही समान शब्दांची योजना केली असल्यामुळें प्रस्तुत स्थळीं तीं समुचितपणें जुळतात. ' मग म्लेच्छांचे वसौटे । दांगाणें हन कैकटें । कां शिबिरें चोहटे । नगरींचे ते ॥ तेही ठाइं

मिळणी । समयो सांजवेळु का रजनी । तेव्हां उदारा होणें धनी । चोरि-येचां ॥ पात्रें भाट नागारी । सामान्य स्त्रिया कां जुवारी । जिथें मूर्ति-मंतें भुररीं । भुलावेया ॥ रूपा नृत्याची पुरवणी । ते पुढां डोळेभरणी । गीत भाटीव तो श्रवणीं । कर्णजपु ॥ तयाहीवरी अळुमाळु । जैं घे फुलगंधाचा गुगुळु । तंव भ्रमाचा तो वेताळु । अवतरे तैसा ॥ तेथ विभांडुनियां जग । आणिले पदार्थ अनेग । तेणें घालू लागे मातंग । गवादी (अन्नसत्र) जैसी ॥ एवं ऐसेनि जें देणें । तें तामस दान मी म्हणें ।...' २९४–३००. ह्याच प्रकारच्या तामसी अथवा आसुरी प्रकृतींच्या माणसांचें वर्णन अध्याय १६ ओव्या ३६१–६३ यामध्यें ज्ञानेश्वरांनीं केलेलें असून तेथेंही अशाच सदृश कल्पना दिल्या आहेत. उमेठां शब्दीं–उमाप, पुष्कळ, प्रचुर शब्दीं. मैळा–'आश्रम-धर्मांही तथा नीतिव्यवस्थेसि भ्रष्ट।' 'वेव्हाररत : बोधवंत : कां जें जन्म तें बोधपूर्वकचि जीवातें मागती कीं।' बांद–'जन्म.' राय–ईश्वर तथा उद्धरिता अवतारु'। मागावेया जाए–'ईश्वर जीवाचेया ठायां जाउनि बोध देउनि म्हणे' आरे मैळेया–'बोधवंतासि जन्म मागति : परि उत्तरोत्तर कणवा प्रमादियासीहि मागति । हें देहांतर पातलेयाही " तूं मागसि तें–'जीवासि सरळी तूं बरवीयापरि अनिष्ट निवृत्तीं जन्म देसि तरि आम्हीं आपणपें अवंचकत्वें सकळ आनंदाची प्राप्ती करुनि । परि तूं भलतेयापरि आम्हांसि जन्म दे । तूं जियांजियांपरि देसि तेया तेया-परि आम्ही तुज देउनि । तळमळां देसि तरि प्रेम देउनि । प्रयत्नें देसि तरि पुन:संबंध देउनि । ऐसाही प्रमादु जोडिला : पुढतीं अनुतापें अधि-काचारें देसि तरि तनुसाधन देउनि । अधिकवृत्ति नेदीसि तरि फळ देउनि । अनुतापुनि अनिष्ट त्यागें देसि तरि नरक नासौनि । दर्शनिया होउनि दास्य करुनि देसि तरि नरक नासुनि सकळै देउनि । एवमादिक प्रकारीं जें मागसि तें देउनि । परि तूं एक जन्म आम्हांसि दे ।' इ० स्थ०; हे बांद...दे–' बाळत्वापासौनि तुज बहुत कष्ट सायास आम्हीं केले

असति : तर आतां आम्हांसि अंतर नेदावें : एक जन्म आम्हांसि दे।' बांद धरी–'देहीं तादात्म्य : इंद्रिया मना स्वभावीं वासनेचां ठाइं रातलेपणें वर्तन : तथा सकळ संबंधीये आपुलेनि स्नेहें बांधलीं असति।' चोरु–'जेथ रायाचें सामर्थ्य न चले : दढाविला न वचे।' पंचनगरे–विखो : इंद्रियें : अंतःकरण : देह : विदेह।' वीडा मागावेया– 'प्रसादे भिक्षुकाचा ठाइं शांतिपुष्टिक करीति तेचि विडा मागणें।' थोटेया–'थोटेया भणिजे स्त्रिये। आणि सिमुरेया भणिजे लेंकुरवाळा : आणि गाणाभाटा काहाळा भणिजे सोइरेया। ऐसेया अनुपकार्या जन्म दे।' 'जैसी एके बरौति थोटें करूनि बोलति : एक नकटेनि नाकें सीमूर बोलति : एक हात ताणौनि उधाटा शब्दीं भाटें वानिताति : एक राजसा शब्दीं अभिलाष म्हणितलीं : ऐसीं तिये संबंधीयें बाळत्वापासौनि पाळिला : तेणें सीणें आन सलगीं आत्मत्वें निष्ठुर वचनीं म्हणितलें।' ह. स्थ.

दृष्टांत १७—सुरेगांवीं इंद्रभट्टाची बोळवण करितांना रामदेवास सांगितला. अमेध्य–अपवित्र. चाचु करूनि–चोंचीनें. ऐसा सारी–उलटापालट करी. येथें 'ऐसा'चा जोडीदार शब्द 'तैसा' नाहीं, म्हणून हा प्राचीन वाक्संप्रदाय ध्यानांत आणण्यासारखा आहे. बोडीआंतु–चिखलाच्या डबक्यांत. समानार्थक– 'कश्मला प्रपंचाचिया आवडी। जन्में उपार्जिले परत्र धाडी। मग पदार्थांची गोडी। सेवूं लागे॥ माजीं उतलिये बोडीं। अधिका सोंरा (सूकर) खोवी चुडी। तेवीं रसाचिया आवडीं। जीवा गोडिये खुते॥' ज्ञा० प्रबो० ७०८–९. चूडि–तोंडाची चुंबळ. 'काउळा तो पक्षियांमध्यें चांडाळ : कर्कश : कश्मल। अमेध्यातें चेष्टापूर्वक अतिप्रीति सेविता।' 'जैसा काउळा अमेध्यांत सार निवडुनि भक्षण करी आन चांचु पुसी : पर आंगासि लागों नेदी। आन सूकर बोडियांत चुडी खोवी : तेथिंचें सार भक्षी : मग तयांतुचि लोळे। सर्वांगीं बोडी लिपली राहे। तैसा पहिला पुरुष विषयव्यवहारातें परमार्थसाधनत्वें मानी। दुसरा तो विषयव्यवहार हेंचि साध्य मानौनि म्हणे या संसार-

सुखावांचौनि सकळही गुरु उपदेश तथा वैराग्यादि जेतुलींहीं कष्टरूप साधनें तेतुलींहीं मूर्खासि।'

दृष्टांत १८—रामदेवास (एकी वासना : देमाइसे) सांगितला. वासी–वत्सतरी; पारडी. प्रतारक–वंचना करणारा; फसविणारा. लाडु–लाड; लाट (दक्षिण गुजराथ) देशांतला. दृष्टांत १६–१७–१८ 'ईश्वराचे तथा देवतांचें म्हणितलें न करौनि साजात्य विषयात्मकाचें म्हणितलें करणें तथा प्रतारणें ये निरूपणीं हे तीन दृष्टांत।'

दृष्टांत १९—सावरखेडा–संगमेश्वरीं उमाइसेला (एकी वासना पद्मनाभीला) सांगितला. फेडी–बंध (बिरडें) सोडणें. बीरडें–दाव्याची गांठ अडकविणारा, ती दुसऱ्या टोंकाच्या डोळ्यांत घालतो; 'द्विदल' हा शब्द 'बिरडें' म्हणजे द्विदलधान्यास (पावटा) मोड फुटून तें दल फोडून वर 'विरूढ' होणारी अवस्था या अर्थीं, तो हा नव्हे. तीये जातीचें लेंकरु–याचा संबंध ज्यानें बंधन घातलें, बिरडें लावलें, यास अनुलक्षून आहे; 'कळपीची गाए एरीं कळपीं मिळे'. आदिमळु–लक्षण पाठ, संसरणप्रकरण, पृ. ३ व ४२ पहा. चैतन्यमहं जीवां जन्म बोलिजे : अन्यथाज्ञान बोलिजे : आद्यमळ बोलिजे'। उद्धरण प्रक० पृ० १२ पहा. अन्येग–अनेक, बहुविध. स्वरूप–परमेश्वर. समानार्थ–'कैवल्याचा अधिकारी। मोक्षाची सोडीबांधी करी।' ज्ञा. अ. १२–२२० बिरडें–'परि गुरुआज्ञा धरिलें। देह गांवीं असे एकलें। वांसरुवा लाविलें। दावें जैसे॥ म्हणे कै हें बिरडें फिटेल। कैं तो स्वामी भेटेल। युगाहूनि वडिल। निमिष मानी॥ ज्ञा. अ. १३, ३७८–९.

दृष्टान्त २०–खडकुळी येथें नागदेवास : 'बंधुचि न नसे : मा अविद्या काइ नासैल'। वज्रकीटकी–एक प्रकारचा रोग–जंतु; हा काल्पनिक असावा. जीवाअविद्ये विभाग–' जया ज्ञानाची रिगवणी। अविद्ये उणें आणि। जीवात्मया बुझावणी। मांडूनि दे॥' ज्ञा. १३–१६८.

अंताचीए सवडी–आंतड्याच्या पदरांत, घडींत दडलेली. लागली –‘ सुरणीं खाजवत व्यापुनी असे ’. जशी सुरणाच्या कांद्याच्या अंगीं स्वभावतः खाज, त्याप्रमाणें ही ‘ वज्रकीटकी ’ आंतड्यांच्या आंतील पदरास लागली होती. ‘ दृष्टांतस्थळ ’ कारांनीं येथें ‘ लाविली ’ असा पाठ उल्लेखून तो स्वीकारणीय कां नाहीं याचीं जीं कारणें दिलीं आहेत तीं उद्बोधक असून शुद्ध पाठाबद्दल किती विमर्शपूर्ण जपणूक होत असे, याची उत्कृष्ट कल्पना येते. ‘ लाविली नव्हे : कां श्रीमुखींचा पाठ व दार्ष्टांतीं लागली हेंचि असे । ’. ‘ प्रमाणपुरुष तैसा अर्थ न बोलती : कां जे ते आधी पहाति : मग अर्थ : वचन : तियें अर्थीं दृष्टांत अनुवर्तविती । वांचौनि पाठा अर्थ नसता एकाधा दृष्टांताचा अथवा प्रमेयाचा व्यभिचारीक शब्द घेऊनि अर्था व्यभिचारकर्ते नव्हेति । म्हणौनि अप्रमाण बोलणें तें ब्रह्मविद्येचें नव्हे ऐसें जाणावें । ’; विनियोग नाहीं : अर्थ नाहीं : दृष्टांत नाहीं : प्रमेय नाहीं : श्लोक ओंवी गीत चौपदी आदिकरूनि साधक (प्रमाणसाधक) कांहींचि नसतां अप्रमाण कैसा नोहे । ’–दृ० स्थ०; घणवरि....सांडसवरि–घणाचे घावावर घाव घातले परी; सांडसीनें (चिमट्यानें) धरधरून तोडूं म्हटलें तरी. ‘वरि’ करणार्थें तृतीयेचें अव्यय; ‘ तेथ बाणवरि धनुर्धर । वर्षताती निरंतर ’ ज्ञा. १, १६६. अपये–दूध (अपय–पय=दूध). कृपाशक्ति करूनि– कृपाशक्तीच्या द्वारें. ‘ बंध म्हणजे आदिमळ : अविद्या नोहे । ’.

दृष्टान्त २१—रामदेवास विषैग्रामीं. तापस्पर्श–मनस्तापाची बाधा. ‘ चैतन्यफळ मोक्षतुल्य : परितेथ च्युति हा दोषु ’–विचारपाठ. खाजें खादलेयां–‘ खाद्ये खादिते–सति सप्तमीचें उदाहरण.’ तरि जीवाचें कारण काइ वायांचि जाए : ना : न वचे : कांहीं कांहीं होए । ’

दृष्टान्त २२—बाइसेला सांगितला. भूक तरि जाये–‘ रजस्त- मादि सकळ दोष नासौनि अपरोक्षा योग्य होइजे । ’. अमरां नव्हीजे–

'अमर न होइजे ।'; 'भक्ताचे साधनसाध्य अनुभूति तीयें फिटतिल तैं अमर होइजैल ।'. अमरां–तृतीया; 'जनैः अमरैः न भूयेत' या भावे प्रयोगाचें प्राचीन मराठी रूप अवशिष्ट स्वरूपांत येथें आलें आहे. याचा उपयोग जसजसा नाहींसा होऊं लागला तेव्हां तृतीयेचें हें रूप प्रथमेच्या रूपासारखें भासूं लागलें.

दृष्टान्त २३—प्रतिष्ठानीं आउसेला. 'मोक्ष जालेया संसार-निवृत्ति होए.' यातायात पारुखति–जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सुटतात. चैतन्यापर–चैतन्यस्वरूपापलीकडे.

दृष्टान्त २४—वेलोपुरीं भट्टासि. 'कां नव्हे : ना : संसाराचें बीज उरलेंचि असे म्हणौनि ।'. मोक्षस्थितींत देखील संसाराचें बीज सूक्ष्मपणें असतें. साकोपसाकीं–शाखोपशाखीं. सामावला–अंतर्भूत. मोटका–'नेटकाचि' अल्पमात्र. 'उदक म्हणजे मळ रचावेयांचें सामर्थ्य संलग्नासि दे ।'. प्ररोहातें पावे–'लोपला होता तो प्रकट होए ।'; वाढूं लागे. 'कां बीज–मुद्रेआंतु । थोके तरु समस्तु ॥' ज्ञा. १३–९५. सूक्ष्म प्रपंचाचा स्थूळ विस्तार कसा होतो तें 'लक्षणपाठ' संसरण प्रकरणामध्यें स्पष्ट केलें आहे; टीपा पृ० ५१–६० पहा; महावाक्य प्र० पृ० १०–११ पहा.

दृष्टान्त २५—करंजखेडीं रामदेवा. घांसु सुए–घांस घाली; भरवी. आलेया पालेया पोट भरूनि–'आला म्हणितलेया मूळ : तयांत कंदमुळें । आन पाला म्हणितलेया कोमळा डिरिया तथा पानें खावों येति ऐसीं ।' दृ. स्थ. (Greens and Roots). 'आला–स्वरूपाचा वर्ण मूर्तीसि आला' 'पाला–प्रपंचाचा रंग तैसाचि आकारला.'. तोंड–प्रभवतें द्वार. 'ऐसें हें ज्ञान ईश्वर देतां काइसेनि एके धालेपणें नेघति ।'.

दृष्टान्त २६—रामदेवास सांगितला. 'सेंवाळलें–तें मनाचें कांटलेंपण 'ठेउंचि न ए–शिकविलें ऐकैल ऐसें म्हणोंचि न ए. ।'

झांजरीति–खरचटून जातात. ‘एक तामसक्रूर वासना काटले : ते अनधिकार्ये : तेयांसि परमेश्वरू ज्ञान नेदीति।’

दृष्टान्त २७—रामदेवास अनुलक्षून डोमेग्रामीं हा महदाइसेला सांगितला. गुन्डा–वाटोळा गोटा; ‘टांकी लावुनि घडिले घोटिले नव्हेति : वाहतांचि (जलप्रवाहाच्या वेगानें) मवाळ जाले असति।’ साद्रव–सपरिमळ; ‘नीवति : परि द्रवति ना।’. हा दृष्टांत २६ याची पूर्वावस्था समजावी; ‘कां जे तयावर (खडकावर) सेवाळ : तो निसरौनि पाडी। आन हा (गुन्डा) भीतरीं कोरडा : तयावर सेवाळ तो कठिण प्रसवाचा : तो यासि नसुनि अंतःकरणीं कोरडा : हेंचि कोरडेपण पूर्वप्रमादा आंतुलाप्रति सौजन्यें नसौनि शीकवण नायके : अनुताप तर असेचि ना। भाव श्रद्धा आयडी नाही : स्ववासना उदासपणें वर्तन।’. ‘एक कठिणा अंतःकरणाचे संनिधानीं असतां परमेश्वरधर्मा योग्य नव्हेति।’.

दृष्टांत २८—हिवरळी येथें लखोदेवास. तनधैलें–तृणानें माजलेलें (धाइलें) ‘कनधैलें’ असा पाठभेद. गोटाड; ‘तणें धालें : मूळाधिकार असौनि रजदोषें अनधिकारी जाले। विकारें मैळला पुरुष।’. दुनीजे–नांगरणी केल्यावर मातीचीं ढेंकळें दातारीनें फोडणें. ‘पदार्थाचें अनित्यत्वपूर्वक पुनः पुनः निरूपण.’ कांसीया फेडीजति–कांसकुंदा काढणें; ‘काश’ गवताच्या खोलवर पसरलेल्या मुळ्या व ‘सप्तव्यसनादी घांडोळे टाकवीजेति।’. कुंभचासी’–‘कुंभसासीं’ असा पाठभेद, कुंभसदृशाकार. ‘कुंभ एसणीं कणीसें ऐसें पीक होये। तैसें अधिकारभेदें संस्कारबळें बोधकार्य प्रगटे।’ चास–तास; प्रत्येक तासांत कुंभायेव्हडीं मोठीं कणसें आलेलें महत्तर पीक. ‘च’ चा ‘त’ झालेलें हें शब्दाचें रूप चिंत्य होय. भार आतौनि–भार आथौनि ‘आपणपें नुरौनि.’ आथौनि–संपन्न, युक्त. अतिशय भरगच्च पीक. ‘भार आथौनि जया ये फळ’–ज्ञा. अ. ८.२६२. नांगरिजे–‘विचित्रा परीचे दास्य (जैसें धांववणें, पव्हवणें, बुझवणें, पाषाण फोडवणें,

मातीकाम करविणें) इत्यादीपरी साजात्यकर्मांचे डोंगर नासौनि प्रस्तुती देहींचीयें रजवासनेचि तवणी तोडीति ।' दुनीजे–'स्थित्यानंददानें विषयानंदाची अनावडी उपजवीति ।'. कासिया–'निरूपणें रजदोषाचे पापमळ दाखवौनि विकृती उपजवीति ।' 'अग्नीकरुनि कांसिया जाळिजति.' चक्रधर आपल्या शिष्यांस आंगमेहनतीचीं कामें नियुक्त करीत असत; नागदेवाकडून वर सांगितलेलीं सर्व कामें राबवून घेतलीं. बीज पेरणें–'ब्रह्मविद्यानिरूपण'. 'तें ऋतुकाळीं : तैसेंचि पेरिलें तरि वीज नुगवे : अवधी पेढीचि पीके । बीज वायाचि जाये । तैसे दोषु असतां अधिकारकाळीं ब्रह्मविद्यानिरूपण केलें तरि ते कांहींचि धातु न वचे । प्रतीति नैये । ते दळवटुनि अवघें रजचि होये । निरूपीलें ज्ञान तें वायाचि जाये । ना : तेंचि उपायें दीधलें तरि प्रभवे । ...म्हणौनि निरूपणाचेनि नांगरलेविण जीवधर्मांची पेढी ढिसढिसी नव्हे । आणि हे आहाच जालेयाविण मनोधर्म देहधर्म इंद्रियधर्म कांसिया नव्हति : हा मुख्य हेतु ।....जैसे त्या वावराची पेढी फेडिताही न फीटे : मुळीया येरीचीया येरीकडे सकड धरौनि गेलीया असत : नांगरेकरूनि नांगरताही परि सरेति ना : नांगर मोडे । मग वखरें करुनि वखरिताही परि सरेति ना : वखर मोडे । ऐंसाही जीयां उरलिया तीयां अग्निकरुनि जाळिताही परि जळेति ना । तैसें मनोरथाची नांवें मुळिया : सकड धरौनि गेलिया असत : अवघे अंतरमनोरथ पेढियाचि मुळियांकरौनि दाटलें असे । मग आचार विचार निरूपणें करुनि पेढिया फेडताहि न फिटेति । ' दृ० स्थ०; 'एक राजस : रजोवासना दाटले : ते परमेश्वरधर्मा योग्य नव्हेति : परि केलेया होती ।'

दृष्टान्त २९—डोमेग्रामीं महदाइसेला वाराणशीगमनीं सांगितला. कानवाथरु–कृष्णप्रस्तर. सीरसाळेयातें–पाषाणभेद. शिरसाळा हा कानवाथराच्या पोटीं असतो; काळ्या पाषाणाचा पापुद्रा–थर काढल्यावर आंतील शिरसाळयाच्या मूर्ती, शिव-पिंडी वगैरे करितात; 'जैसा कानवा म्हणजे कठीणदश्यें जीव : थर म्हणजे गवसणीवत जाला असे.'

पैऱ्हां–दूर एका बाजूला. कोळें जाळी–वाळलेल्या काटक्या व पाचोळा घालून पेटविणें; कोळ–तिळाचें झाड, तें जाळणें; 'झाडिलीचि कोळें झाडी। तया न कळे जेवीं बोंडी। जाला अग्नि तरि राखोंडी। जाळील काइं।' ज्ञा. १३, ५८६. कुळथवणियें सींपे–हुलगे, कुळीथ याच्या पाण्यानें; 'खदिरांगारीं थोर दाहकत्व असतां तथा औषधवल्लींचा उदकीं अत्यंत दुष्टता असतां कोळकुळथवणीचि कां पा म्हणितली। कोळासि तरि इंगळ असतीचि ना : आन . कुळथवणी तर अन्नवत जेवीजताये। मा या दोहींचा विशेष काइ असे। ना : तें तयांचें वर्म असे : तयांचा दोहींचा योगीं कानवाथर भेदे।' दृ. स्थ.; वना नाही पाटा नाही–' तया घायासि वैद्योचि नोहे : तया घाया ओखदचि नाहीं।' 'सुखाचें पूर्णत्व : उपायों न प्रभवे' भरून न येणारी जखम ती 'व्रण'. वणा–वनौषधि नाहीं अशी. पाटा–पाती–पत्ती; पट्टी, मलमपट्टी नाहीं अशी. रणीं जुझारू घायेवटे। तरि वणियां न बधिजाति पाटे। उद्धव गीता, २४१. फेडौनि–निवारण करून. कानवाथरा होआवें ना–इष्टा आड येऊं नये. 'ये दृष्टांतीं प्रधानत्वें देहसंबंधीक कानवाथर तोचि वाखाणे'. 'सत्ताज्ञानेंकरूनि कर्मकोळें जळति : तथा सामान्यज्ञानेंकरूनि मळ कोळें जाळी.' दृष्टांतस्थळांत २४ प्रकारचे पाषाणभेद दिले आहेत; त्यातील मुख्य–म्हैसा, मुरवा, सेण्या, गारवा, कोदवा सीळवा, खरीपा, कवड्या, सेंदरा, ढवळा, पिवळा, कुरंदा, गुडकी, द्रावक, निर्गर, चुंबक, लोहक, तांबक, रूपक, हेमक, आभ्रक, सोमकांत, सूर्यकांत इ०' कानवाथर चौवीसा : तयाभीतरीं शिरसाळ असे।' दृ. स्थ.; 'एक आपण अयोग्य : आणिका योग्यातें अयोग्य करीति : ऐसेंही एक आति।'.

दृष्टान्त ३०–नाथोबास डोमेग्रामीं. जवळीका–संनिध. हृदयशून्या. 'एकासि भीतरीं शब्द उमटेचि ना : एकासि वायुवत शब्द कानावरूनि जाये : एकासि निरूपण ऐकतां अन्यरती संचरे : एकासि

आलस्य निद्रा जांभेया येति : एकाप्रति यथार्थ बोलतां असत्य मानी : ऐसे ते ज्ञानायोग्य नव्हेति. ' दृ० स्थ० अंतरसारु नव्हे–'एक अहंता आथिला : एक अभिमानें दाटला : एक मनोरथें भरला : एक आलंबनीं गुंतला : एक इंद्रियार्थीं वेचला : एक राभस्यें व्यापला : एक अविधीं ग्रासिला : एक क्षोभें भ्रमला : इत्यादिक ते अंतरसार नव्हेति।' दृ० स्थ०; बहीर्यांगीए अंतर्यांगीए– ' साधनीं दुःखरूपता : साध्यीं सुखरूपता : तो बहिर्यांग बोलिजे।' ' साध्यसाधनीं सुखरूपता तो अंतर्यांग बोलिजे ' विचारमाला; ' उभयान्वीक्ष्यमाने सत्तासंनिधमात्रें शक्ती संचरे यातें अंतर्यांग बोलिजे।' वि० माला. कखाए–' विषए '. अंतःकरणशून्य ते अधिकार्ये नव्हेति।'

दृष्टान्त ३१—रामदेवास सांगितला. जारसैलें–'कोमळ नव्हे : ना अतिपक्व तेंहि नव्हे। कोमळाची उत्तरावस्था आन पक्काची पूर्वावस्था ऐसें मध्यस्थ तें जारसैलें।' सुरकुतलेलें व नीरस. तोंडीं खतचि पाडी–तोंडाचीं सालटीं काढी. ' एक बएसा अतीत : ते धर्म निरूपीता दोषूचि घेति : ते अनधिकार्ये : तयातें परमेश्वर ज्ञान नेदीति।'

दृष्टान्त ३२—क्षौरप्रसंगीं रामदेवास सांगितला. भवंरैलें–' गाठीं भरलें असे : तयाच्या हृदयीं विकारसंग्रहें संकल्प : आचरणें अभिलाषें : ममतालोभें वैजात्य सदोष संसर्ग भरले असति।' प्रमाणशून्य अर्थाचा ज्ञाता. सर्व विष्णुमयं जगत : जोन्हळे परमेश्वरू–गुरूनें सर्व विष्णुमय आहे, असें शिष्यास सांगतां तो कर्मजड शिष्य जोंधळ्यास ईश्वरस्वरुप कल्पून त्यांची केवळ पूजा करूं लागला व क्षुधानिवृत्तीचा त्यांचा व्यावहारिक उपयोग, विसरला, तद्वत् व्यवहारशून्य.

दृष्टान्त ३३—रामदेवास सांगितला. देहलुतैलें–सडकें, कुजकें आळ्याकिडे पडलेलें, (कृमियुक्त). ' एक कर्मजड : तयासि साक्षी ठाकोंचि न ए।'

दृष्टांत ३४—नागदेवास खडकुळी येथें. द०२५ ते ३३ बोधदातृत्वास अनधिकारी असे नऊ प्रकारचे पुरुष सांगितले. कोंवळें वाळुक 'मुळाधिकारें उत्तम;' 'प्रथम देही वयसा : सकोमळ दैवी प्रवृत्ती : सद्वासना हृदय : निर्मळ : ऐसीये परीचे युक्तत्व ते कोवळें वाळुक (उर्वारुक) असे।' 'जयासि जया गुणांचें आइतेपण (साहित्याची सिद्धता) तो तियेविषयीं कोंवळें वाळुकचि ।'. तळींव–सांडगे इत्यादि. सांबारींव–कोथिंबीरयुक्त; सांबार–संभार–मसाल्याचें साहित्य. कुसंबीर–कोशिंबोर. लोणीचें–लोणचें (लवणाचें). सर्वाधिकार्या–सर्वप्रकारच्या शिक्षणास लायक. जोचि अवसर विषया तोचि ब्रह्मविद्ये ये अर्थी दृष्टांत ।'.

दृष्टांत ३५—गंगापूर येथें 'धांदुलमोक्ष' कथाप्रसंगीं पद्मनाभीस सांगितला. 'हा दृष्टांत प्रधानत्वें त्यागावरीचि वाखाणे;' 'कोंवळें अथवा जड कडूपणें त्यागीं अनधिकारी.' 'जैसें वाळुक बाळत्वादारभ्य पाकपर्यंत अवघेंचि गोड तैसा सर्वाधिकार्या पुरुष। आन इंद्रवण (वृन्दावन) मुळीं सपत्रीं अंतर्बाह्य अवघेंचि कडू तैसें उभयजरठ पुरुष।' द० स्थ० मूळांसि वेलि हातासि ये–फळ फक्त तोडूं जातां केवळ तेंच हातीं येत नाहीं; त्या फळाचा देंठ इतका निबर झालेला असतो कीं संबंध मुळासकट वेल उमळून बाहेर आली तरी तो देंठ तुटत नाहीं. 'एक उभएजरठ : अविद्यात्यागीं दक्ष नव्हेति : ते अनधिकारें : तेयासि परमेश्वरू ज्ञान नेदीति ।'

दृष्टान्त ३६—ढोरेश्वरीं इंद्रभट्टास सर्दोबासंबंधीं सांगितला. अन्यथाज्ञान व विपरीत बुद्धि यांनीं व्यापलेल्या अनधिकाऱ्याविषयीं हा दृष्टांत. सनिपातैला–संनिपात ज्वरानें व्यथित. 'द्वंद्वज संनिपात यातें बोलिजे : तोचि कैसा : ना : दोन्ही धातूप्रसाव उपजे तो । पित्तक्षोभे ताप ये आन वायो लागलेया वातें क्षोभे । भ्रांत होए : जल्पों लागे : ऐसा तो द्वंद्वज संनिपात बोलिजे ।'. 'युक्तित्रयवितर्कीं भ्रमला.' म्हेळीएची–स्त्रीची (महिला). 'जेवीं भ्रमित संनिपातें । नोळखे

स्त्रियेमातेतें । तेवीं बोधले पांखांडमतें । न मानिती तत्वार्थातें ॥ ' ज्ञा. प्र. २५७. 'एक अन्यथाज्ञानें प्रतिकूळ करीती : तयाचें गेखटें नेघौनि परमेश्वरू ज्ञान देति । '.

दृष्टान्त ३७—महदाइसेला. वाडोवाडीं–वाड्यावाड्यामध्यें. लघुग्रामांतून. आर्त–उत्कंठित. वीखया–विषयाळू; कामुक; विलासी. ' बहुतांमध्यें जो कोकशास्त्रीं प्रवीण : पात्रापात्र जाणे : काळ–वेळ–पदार्थसेवना जाणे : तिये जातीची प्रवृत्ती–निवृत्ती–धैर्य–चातुर्य जाणे । ' देशोदेशीं–' फलेठाणापासौनि सह्याद्रीपर्यंत : मग भरंवसा : तेथौनि ऋद्धपूर : मग गोंडेवाडा : नांदियेड : वोरंगळ : सेंदुर्जनी : अळजपुर मेघंकर (मेहकर) : प्रतिष्ठान : भिंगारपाठार : तल्हाटी : इत्यादि देशोदेशीं '. गावोगावीं–' अनुक्रमेंचि मार्गाचे गांव : मग वसती–अवस्थानाचे गांव । ' परि ' आर्तावांचौनि नेदीति.

दृष्टान्त ३८––सिंगणापुरीं ' खडखांबले ' प्रसंगीं चांगदेवास सांगितला. राज्य करीत असति–' अध्यात्मसाम्राज्यीं वर्तते असति '. रहात असत; मुक्काम असे; विद्यमान असत. ' म्हणौनि आर्ताविना बोधाधिकारी नव्हे । '. ' एकाची आर्ती जाणौनि दुरौनि देति.'

दृष्टान्त ३९—पैठण येथें बाइसेला. पासौनि–पेक्षां, अधिक. ' तरि आतां चंद्रा**पासौनि** निववितें । जें अमृताहूनि जीववितें । तेणें अवधानें कीजो वाढतें । मनोरथा माझिया ॥ ' ज्ञा. अ. ९.२४; मांद्यें–अग्निमांद्य. गुळळा–गुरळा; आई स्वतः विड्यांत औषध घालून तो चाऊन त्याचा रस आजारी मुलास गुरळारूपानें पाजते, तो. ' बळात्कारें बोधवृत्ती अक्षरें करवीति. '

दृष्टान्त ४०—नागदेवास खडकुळी येथें. खाती–लोहार. कामीठा–(कर्मस्थान–कामठाण–कामठाय–कामठा) लोहाराचें दुकान. 'कामतामध्यें चहवंटा' (कामछ–कामत)–पाटण शिलालेख, ओळ २५. ज्ञा. १५, ४८०; १७–२०९; १८–३५८ पहा सोनाराचा ' आगीठा ',

कोष्टयाचा ' मांगठा '; चव्हाटा, पाणोठा, इ०; खांडीं सूरीया–खड्ग, सुऱ्या. नीसत्रीति–धार लाविती. सांदीसवडी–भिंतीच्या कोंपऱ्यांत, अडगळींत. खतेनि खादली–क्षतांनीं व्यापलेली; खांचा पडलेली, धार भंगलेली. दामच्यारि–चार दाम (नाणें). इळे–विळे, कोयते. ताट–पातें, दळ, पत्र (तन्–पसरणें, तत–पसरलेलें). परजु–मूठ. वीतंडौनि सांडी–सुरीचे सर्व भाग मोकळे वेगळे करून एका बाजूस ठेवी. वीळवरि म्हणीये करी–दिवसभर आज्ञापित काम करीत होता; ' रात्रंदिवस नेणे । थोडें बहु न म्हणे । म्हणियाचेनि दाटपणें । साजा होय । ' ज्ञा. १३–४३९; ९–२८५. तावी–तापविणें, तात्र देणें. उजरी–उजळा देणें. खरसाहाणे–क्षार-सहाण आपुलीया परी–आपल्यास मनपसंत अशी. परी–प्रकार. वाये–जेथच्या तेथें लावणें; जागच्याजागीं सुरीचे भाग व्यवस्थितपणें जोडणें. दायेपसाये–(दान+प्रसाद) किंमतीपेक्षां अधिक द्रव्य प्रसन्नपूर्वक देणें. आडवांगीं घाली–संनिध ठेवी. ' लक्षणरत्नाकरां ' त हा दृष्टांत गुणधर्मक्रियासमुच्चयसंपन्न प्रमेयाचें उदाहरण म्हणून उल्लेखिलें आहे; परिशिष्ट १ पहा. जीवाचें कर्मक्षालन कसें होतें या बद्दल पथमतें जें स्पष्टीकरण तें 'लक्षणपाठ', टीपा, पृ० ८२–८९ पहा. ' कामठा तो मुख्य संकल्पदानाचा : धर्मवार्ता करवी : सुरीस्थानीं चारी ज्ञानें (शाब्द–अपरोक्ष–सामान्य–विशेष).' नीसवंति : साधनचरित करवुनि साध्यातेंही पाववीति : परिहार करवीति । खांडेस्थानीं आचार संदेह : सुरिस्थानीं वीचारसंदेह । सांदी : मार्गपरिचया वेगळेंचि राहणें । सवडी : कुपरि निषेधें कवळीत असणें । ऐसी पाहे : तयाचें पूर्वसंस्कारलक्षण पाहे : तथा देहाधिकार व्यापार करीत पाहे । तवं तेही बरवे दीसति । खतें खादली असे : कुपरीसंयोगें व्यापला असे । चारी दानें : अनिष्ट अविधी नाशे : मैळविता प्रसव मोडे : इष्टविधी जोडे : उजविता प्रसव वाढे : योग्यता दक्षता होए : मार्गासि तोख वाटे : अयोग्यता अदक्षता नाशे : ईश्वरी कणव उरे । ताट वेगळें करी : सर्व

संस्कार जाणौनि निवटी । तावी : निमित्ये विधी आचरवी । पिटी : उभये विधीचां ठाइं अकुशलता देखौनि शिक्षापी । उजरी : अकुशल-तेचा दोष उमटवुनि अनुतापपूर्वक कुशलता करवी । खरसाहाणे लावी : निर्वेदा अनुतापा आणी । तेलसहाणे : अनुशोच्यावरि आणी । तूप-सहाणे : आर्ती उत्कंठा उपजवी । इत्यादि खतें झाडी : क्रियापरत्वें कर्म नाशे। आपुलीया परीचा आणिकु परज : आपण जैसजैसीं असती-पर आचरविली होती तियेपरीचा । दाय : सामान्यज्ञान : प्रेम देति । पसाय : विशेषज्ञान : मोक्ष देति। वीसंबेना : सुखावेगळें करणेंचि नाहीं: अच्युतपद जें दीधलें तयासि च्युति असेचि ना ।' दृ० स्थ०; जैसे भट-(नागदेवास) ज्याप्रमाणें कर्मरहाटींतून म्हणजे ऐहिक व्यवहारांतून दैव-रहाटींत म्हणजे परमार्थाच्या मोक्षमार्गाच्या वाटेस लावलें, त्याप्रमाणें. कर्मभूमि : मोक्षानरकास साधक अशीं बरीं वाईट कर्में करण्याची साध्य-प्रापक स्थानें जेथें आहेत तो मृत्युलोक. 'तेलसहाणे सामान्यज्ञानें मळ नासे : तूपसहाणे विशेषज्ञान अयोग्यता नासे,' 'परजस्थानीं साध्या-नुभवसंपादक योग्यतामय चरमदेह : रायस्थानीं परमेश्वरस्वरूपाची प्राप्ती ।'. 'या परी शाब्दाचीए ठाउनि प्राप्तीपर्यंत करीति.'

दृष्टान्त ४१—पैठणीं लखुवाइसेला. रुंभणे-रुमणी-रुम्हणी-रुम्हणें. वखर व डवरा यांना लाकडाची जी वांकडी मूठ असते व जिच्यावर तोल संभाळून शेतकरी बैलांस हांकीत असतो, ती. वखर व डवरें यांच्या मुठीस वऱ्हाडांत 'रुंभणें' व नांगराच्या मुठीस 'आटारणें' म्हणतात; 'वखराचें एक रुम्हणें : दुसरें थोरलें रुंभणें तें नांगराचें ऐसें जाणावे।' दृ. स्थ.; पाठीं पुढिलावरि ठेवी—नंतर वडीलधाऱ्या माणसांवर दोष घालतो. अन्मोदीत—अनुमोदीत; प्रशंसित. बळहे—बगळा. कठीया—गुरव (देवपुजारी). पाला—देवास वहावयाची पत्री. प्रतिमा—मूर्ती. 'सप्त धातूचिया : पाषाणाचिया : काष्टाचिया : वाळूचिया : मृत्तिकेचिया : चित्रीचिया : सूर्यकांत—सोमकांत—रत्नरूपा : अंतःकरणीं अभ्यर्चनरूपा

(मानसपूजा) ऐशिया अष्टप्रकारका.' द० स्थ०; दुधाचे गुणविशेष– ' वैद्यकद्दष्टीं : कोकशास्त्रीचेनि मतें : आमकीये काळीं हिरवें तत्त सेवितां अमुका गुण होए। तैसें ते निरूपक आपुलेनि बुझपरत्वें (बुद्धीच्या सामर्थ्यानुरूप) परमेश्वर तो हाचि : तयाते पावावया क्रिया ते हेचि : म्हणौनि आपुलालेनि मतांतरें बोलती । ' द० स्थ०; तेथ– ' तयाचिये निरूपणरसवृत्तीचा ठाइं ' ' जात्यंध : गर्भांध : जयासि शास्त्रश्रवण कांहीं असेचिना ऐसे परीचा संकल्पप्रमादीया कठिया । '. पुसिले : ज्ञाननिरूपकातें पुसिले : तेही अन्यथाज्ञानीचि असती : यथार्थवक्ते नव्हेति । वेदागमादि धर्म ते बोलों जाणति पर पुसता तो (जात्यंध) कांहींचि नेणे । ' द. स्थ. ' शास्त्राचें रुंभणें तरि तेंचि कैसें पा : ना : परमेश्वरशास्त्रीं काकादि च्यान्ही (काकु–कक्षा–भावार्थ–प्रकरण) असति : पूर्वपक्षादि च्यान्ही असति : आणि समवाए असमवाए निमित्त तथा हेतु : कर्तृत्व : बीज : ऐसी सा कारणें असति : लींगत्रय विवंचना असे : युक्तित्रए त्यजुनि तियें जाणावीं : ऐसा संग सांगात केला नाहीं : अपुलीया युक्ती एकाचें नांव दुसरीयासी ठेवणें : अथवा तया पक्षपक्षांतराची वोळख एथार्थ सांगतां अन्यथाची भासे तरि तेचि कैसी पा : ना : काकूतें कक्षा म्हणे : कक्षेतें काकू म्हणे : ऐसें दोहींपरी रुंभणें होए : तैसेंचि प्रकरणातें भावार्थ म्हणे आणि भावार्थातें प्रकरण म्हणे : तेही रुंभणेंचि । तैसेंचि पक्षाते विपक्ष म्हणे आणि विपक्षातें पक्ष म्हणे तियें दोन्हीं रुंभणींचि । मग पूर्वपक्षातें सीद्धांत म्हणे : आणि सिद्धांतातें पूर्वपक्ष म्हणे। तियेंही दोन्हीं रुंभणींचि । आणि साहीं कारणांचें ज्ञान नसतां कार्यासारीखेंचि कारण नसे आणि कारण जैसें होतें तदाकार कार्यासि आलें म्हणणें तें अतिशइत रुंभणें । मग नपूंसकशब्दीं पुल्लींगाकार कल्पणें आणि पुल्लींगशब्दीं नपुंसकाकार । आणि दोन्हीं शब्दीं स्त्रीचा आकार : तैसाचि स्त्रीलिंगशब्दीं पुरुषाकार ...आणि शब्दासारिखाचि अर्थ लींग असें म्हणणें : अथवा शब्द तरी

ऐसा परि अर्थ नव्हे : ऐसें लक्षणीं असे परि कवणा शब्दाचा अर्थ तया शब्दासारिखा नव्हे : ते शब्दाचाली न कळतां स्वोक्तीतव भलते-याचि पक्षीं शब्दीं शब्दासारिखा अर्थ नव्हे म्हणणें : ऐसें ते अवघे रुंभणेंचि बोलिजे : कां जे सत्शब्द चित्शब्द आनंदशब्द ज्ञान : प्रेम शब्द जीव–देवता–प्रपंच ऐसे शब्द असति : तयांचा नीर्वच न कळतां एकैका शब्दा एकैक आकार कल्पितां रुंभणें होत असे : का जे : चीन्ता-मणी : परीस : हिरा : खाजें : अन्न : अमृत : साकर : सुरी : ... इत्यादि शब्दीं शब्दासारिखे अर्थ लींग कल्पितां रुंभणें कैसें नव्हे : म्हणौनि वचनोक्त जैसें असैल आणि प्रमाणपुरुषीं बोलिले असैल तैसेंचि धरावें : तयावेगळें पुरुषप्रतीतीचें धरीतां ईश्वरप्रतीती ठाकतें असे : आणि अन्यथात्वाचें रुंभणें धरीले होत असे। म्हणौनि तैसें न धरावें : हा **आचार** जाणावा। ' दृ० स्थ० '; एक अन्यथाज्ञानें परमे-श्वरदास्य म्हणौनि करीति : पर ते नव्हे। ' कां करीति : ना सारिखें देखति म्हणौनि करीति।'.

दृष्टान्त ४२—हा दृष्टान्त ' परसनाएकास ' अनुलक्षून नाग-देवास सांगितला. चक्रधर महालक्ष्मीच्या देवळांत जात असतां समागमें हे दोघे होते; तेव्हां देवतेच्या द्वारतोरणास लागलेलीं मातीचीं फळें ' परसनाएकास ' दाखवून हा दृष्टान्त सांगितला. ' महालक्षुमीचीया देवळां बीजें करावेयाचा हेतु : सरिसे परसनाएक आणि भटोबास असेति : परसेया : इयें तुमचीं ब्रह्मं गा '. वाटणी–विभागणी. चांदोवां–चांदव्याच्या ठायीं; ' चांदोवा चौकोना असे ' छत. चैतन्य विश्वेचें फळ–(लक्षणपाठ, विद्या. पान ३० पहा) तेथें अवरविद्यांचीं स्थानें व फळें दिलीं आहेत. खावों वैसे–'एकीलेया अर्थाचें विमर्शन करी। सेण स्थानीं पूर्वपक्ष : माती स्थानीं तर्काची चाली : ' तोंड भरें–'मुखाधार अर्थ तोचि प्रमाण होए : प्रमाणा वेगळें तेतुकें चांदोवाचि सारिखें जाणावें ' दृ० स्थ०; समानार्थक–'जैसीं सेणाचीं चित्रिवें फळें। रंगाणिलीं भावती

रसाळें । तो वर्त गेलेया सकळें । उमटे सेणु ॥ ' ज्ञा० प्र० ७४८; 'काय करूं चित्रीव फळ । आंतु सेणु । ' ज्ञा० १३–४७१.

दृष्टान्त ४३—डोमेग्रामीं माहींभटास सांगितला. 'महावाक्याचेनि अर्थें सर्वव्यापक परमेश्वरू जाणावेया हस्तीचा न्याए दीधला.' संवादति–' परस्परें आक्षेपपरिहारीं प्रवर्तति '. कोथळेया सारीखा–भरलेल्या पोत्यासारखा, कुणगीसारखा. उरोधीति–विरोध करितात. ' आणिकाचें हीनः आपुलेंचि थोर : यांचि नांवें उरोध बोलीजे '. जात्यंध–'जीव देवता दोन्ही जात्यंध ' डोळसु–' बोधवंत : ज्ञानिया '; एकु एकु अवएवु–'परमेश्वराची एकी एकी शक्ति : एकैक सिद्धांत'. मूसळासारखा–'जैसें मुसळ लवे ना : वाकेना : तैसा : माझा वेध : आवडी सबळ : आणिकाचेनि वाकुडी नव्हे : मा : भंगैल काइ'. भींतीसारीखा–' परमेश्वराचें अभय : देवाचे पाठीं रीगालों ' कोथळेया– ' जैसें कोथळेयातें कनबटें तोंड भरीजे तैसें माझें इष्ट अवयेंचि पुरलें ' ' जैसें हस्तीचें आणीक अवएव : दांत : डोळे : कुंभस्थळें इत्यादि उरलें असेति : तैसें आधिकरणाचे विशेष गुण : ज्ञान-भक्ति-वैराग्य प्रेम दायकत्व : उरलेचि असेति । ऐसा संपूर्ण गुणीं अलंकारिला तो अधिकरण बोलीजे ' दृ० स्थळ. तुल्यार्थ–' हस्तस्पर्शादिनान्धेन विषमे पथि धावता । अनुमानप्रधानेन विनिपातो न दुर्लभः ' ' एक सारीखे देखौनि : तेंचि परत्वें : नीरोपीति : म्हणौनि परमेश्वरूज्ञान ते कवणांही नाहीं : पर : देति तयांसीचि होए : '.

दृष्टांत ४४—चांगदेवास एलापुरीं सांगितला. डुळकैले–प्यालेल्या दुधाची उबळ, उलटी येत असलेलें (बालक). पेहें–पय, दूध. डुळकी घोंट उलटून पडणें; ओकणें, उबळ येणें. सेजीया साइलीया–शेजारणी मैत्रिणी; ज्ञा० १३. ५७५ पहा. लीतैल–पोटांत माखलेलें राहील. " माता : वत्सलपर : संपूर्णविज्ञात विरक्त । ' 'आपुलेया : आपण पोटीं वाहिलें : जनीलें : वृद्धत्वा पावावें ऐसा हेत जयावरि असे । ' ' पेहें : शास्त्र निरोपीति : जैसें पेहें दुधातुपाचें असे तैसेंचि साधनीं आचार

विचारपर जाणावे : 'डुळकी : विसरे ' घेइ आइ : घेयागा : वासनाधृत पुरुष असे : याच्या ठाइं कव्हणी दोष नसौनि शास्त्राची आवडी असे : ऐकावयाची आर्ता असे : यथायुक्त न धरे परि संस्कार तरि उरैल ।' 'वासनाधृत पुरुष : शास्त्र परिसावेयाची वासना असे : परि अधृत : ना धरैना ।' ह० स्थ०; 'ईश्वर देता एक अनधिकारें विसरेति : परि वासना उरलीचि असे : तेयासि पुडति पुडती निरोपीति ।'.

दृष्टांत ४५—पैठण येथें रामदेवास. कपाळपरीक्षा—कवटीची तपासणी. धातुर्वादी—धातुक्रिया जाणते; 'एक धातु भाजौनि सुवर्ण करीति : एक धूम्रवेध करीति । एक शतवेध करीति । एक सहस्त्रवेध करीति । ऐसे अनेका परीचे ॥ ' ऋद्ध० वर्णन, १६, १०७ पहा. 'एक बुद्धिदोषें वीसरे कां आणिकाप्रति 'बोले । तेयातें परमेश्वर उपेक्षीति । एक सायासें परिसे । धाडिता वेळुचि न लगे । तयातें परमेश्वर विशेषें उपेक्षीति । म्हणौनि आइकीला अर्थ मनन करुनि हृदयगाम्य करी । तयास तीन्हीं होति ।' 'निरूपिलें विसरे तेयातें उपेक्षीति । आणि आणिकाप्रति बोले तयातेही उपेक्षीति । मा तर मोदळेयाचा (ह० ४६) तोही आणिकाप्रति बोलत असे । तया दोहींचा भेद कैसा असे पा : ना: मोदळेयाचा तो कथनाचा । हेतु धातु कीर्ति साभिमानें इष्टाभिलाषें । इत्यादि परि चोंबडा शब्दीं माळौनि एकसरें अव्यंचि बोलौनि जाए । ऐसा तो कथनीया । आणि जो आणिकाप्रति बोले तयासि कथनीयाचे हेतें कांहीचि नसता । आइकिला शब्द वायाचि बोले ऐसा तो डाकुलीयेचा पुरुषु जाणावा । मा तर आपुलीया उपयोगा नें आणि रोंवतैलेया पशुचा (ह० ४७) या दोहींचा भेद कैसा असे पा : ना : आपुलीया उपयोगा नें तयासि एकाचि पासौनि वेध बोध अनुसरण शास्त्र चर्या स्मरण होए । मग मुखा टाळें घालुनि लोहोग्रसीतवत असे । आणि रोवंतलेया पशुचा । तयासी बहुत निमित्त होति : कवणापासौनि बोध अनुसरण शास्त्र चर्या स्मरण इत्यादी एकैकापासौनि एकैक गुण कष्टीं

सायासीं काहाडुनि एकी ठाइ बैसौनि आवृत्ती मनन अथवा आणिकेसीं संवाद करीतां सुखश्रयादी होती–ऐसा तो तेथ जाणावा। -दृ० स्थ०; रणासि जाए–'अज्ञान तेंचि रण। रण म्हणीजे देवता उदासा वैरिणी। तेहीं कपाळ दाटुनि अधःपातीं पडिले असति जे जीव तें रण। एथ मनुष्य देहीए ते बोलीजेति'; 'दैवतीं संपादिलें जें कर्मफळ तें अज्ञान अधःपातीं पाडिले असति।' दृ० स्थ०; कानीं काडी घाली –'आत्मकभाव नीरोपीती : गुह्यार्थ ने घे'; ते तोडुनि नीगे –'कव्हणीचि हेतु नसतां आहाचपणें आणिकाप्रतीं बोले। तो अर्थ भलतेयाचिए पासीं बोले'. ते भीतरें जाए–' अन्तःकरणीं जाउनि बैसे : तयाचें महत्त्व उमटे आणि भाव श्रद्धा आर्ति आचरे।'. तें घे–'तयांचा अंगीकार करी।' दृ० स्थ०. रण सोधु जाए–'संयोग जालेया तयाचा उमट पाहों जाए।' 'अज्ञान तेंचि रण। संग सांघात जवळीक देणें नाहीं तेंचि उपेक्षा।' एरीं कानी नीगे–' अज्ञानवशें आइकिला शब्द तो नाइकिलाचि होए।' तें सांडी–'हृदएशून्यासि उपेक्षी। युक्तत्रयाचा तयासि तें निरूपण न धरुनि (अधृत) आपुलें युक्तीत्रए तेंचि बोले। तयाचीही उपेक्षा करी।'

दृष्टान्त ४६—पैठण येथें मार्कंडेयास. मोदळा–'कण साटवितां खानदेशीं मोदळा असे : पाणी पितें घडिएचें घडिवटें तेंचि मोदळा बोलीजे।'(ज्ञा. १८.८१४) धान्य सांठविण्याची विशिष्ट आकारा तोंडाची खानदेशी कुणगी (कणीग). 'पाणी पिते घडीएचें घडिवटें' म्हणजे बुडास छिद्र असलेली घटिकायंत्राची वाटी; तिचें पाणी शिरण्याचें द्वार लहान असून, उपडी करून रिकामें करण्याचें तोंड मोठें असतें. हा अर्थ केशिराजबासांच्या दृष्टांतस्तोत्रावरून दृष्टांतस्थळकारांनीं दिला आहे.

दृष्टान्त ४७—एलापुरीं चांगदेवास सांगितला, रोवंतलेया–रवंथ केलेला; 'एथ शास्त्र आवृत्तीचा तथा मंथनाचा विचार असे'; 'एक वेळ तरि आठवीजे परि वंध्य दिवस जावों नेदीजे'; आडीदरडी– 'आडी म्हणीजे वेंघतां (चढतां) श्रम आणि पावो निसरे। दरडी

म्हणीजे निसरौनि पाडी : '' आडीस्थानीं शारीरकष्ट आणि दरडीस्थानीं मानसीक दुःख ' इ० स्थ०; सदृशार्थ–'तारुण्यभराचिया आडीं । अहंतेचिया दरडी। मरौनि वेंधतां कोरडी। होय देहाची। ज्ञा. प्र. २७९.

दृष्टांत ४८—डोमेग्रामीं महदाइसेला. 'एक जाणौनि ईश्वराचें म्हणीतलें न करीति : ते एरापसि अधम'. म्हणीयें करी–'तियेचा हिताहितीं प्रवर्ते'. सींके–शिंकें. नाडे–मोटेचा दोर. तुते–मातीचीं डिखळें फोडणें वगैरे शेतकामास व गुरें हांकण्यास उपयुक्त अशा लोखंडी शेंबेच्या काठ्या. कार्यें–'आश्रमधर्म'; काज. प्रयोजन–कार्य; 'विवाहादि, भोज : आठांगुळ : बारसें : उष्टावण : इत्यादि महोत्साह.' पांति–पंक्तीस घेऊन जेवणें; 'जेवूं वाढीति परि एकासना जेवणें तें नाहीं'. खापरीं–मातीचें भोजनपात्र. परियेळ–परळ. वीटाळे–' उत्तम चर्या टाकौनि हीन अंगिकार करी : तो कर्मचांडाळ '. निषिद्ध कर्माचरणानें भ्रष्ट बहिष्कृत झालेला तो; जन्मत: जो चांडाळ (महार, मांग वगैरे) तो ' जातचांडाळ '. नाडे–' सहिंसा क्रिया । तुते–सविकल्प क्रिया । '.

दृष्टान्त ४९—नाथोभास अनुलक्षून माणिकदंडीस सांगितला. पडाळ–पाडाळ–गुरें बांधण्याची छपरी. चरू जाए–गवतचारा खाऊं लागली असतां. डीळीसीं–खांबास; डिरी–Yच्या आकाराचें लांकूड. झडें वारेनि–पर्ज्यन्ययुक्त सोसाट्याचा वारा. जुन्या मराठींत विशेषणास विशेष्याचें लिंग–वचन–विभक्ती लागते त्याचें उदाहरण; ज्ञा० १–१८ १–२१६, १–१४६ पहा. गोसावी–गृहस्वामी. माळवध–माळवद; बांसाचा माळा केलेलें छपर. खडु–खड : खुडलेला–कापून आणलेला गवतादि चारा. कांटाळा–अंगावर कांटा रोमांच येऊन थरकांप होणारी अवस्था जिरली–हुडहुडी गेली. सवेचि कडे वोवांडी–आंगवळणीं पडलेली गोष्टच करण्याची प्रवृत्ति होई. वोवांडी–कल जाणें; झुकणें. ' पडाळीं गाए : जैसें पडाळीं खुटदावें असे तैसें स्त्री खुटदावें : संबंधिये तयाचें निबंधनें : जैसें पडाळी बाहेरीं न निगबे तैसें अविद्येबाहेरीं पड

वेना । ; रीगतेया नीगतेयातें–'शास्त्राकारणें घर रिगे ते : नीगतें : सेवादास्य : प्रवर्तन करीते अथवा शास्त्र परिसौनि विदेशा क्षेपूं जाते ।. ' द० स्थ०. ' महात्मेयासीं जें उपनलें असें तें तयातें नेलेयावांचौनि न सोडी । . ' बुजे–' एकाधेनि सुहृदें उजळौनि अधिकरणापासीं योजिला तरि तोही रीगतेया नीगतेयाते देखौनि बुजे : तयाचें उत्तमपण देखौनि आपुलां ठाइं लाज मानी अथवा गुण निर्वचितां वर्मातें पावे ।' द० स्थ०.

दृष्टांत ५०—सराळा येथें दायंबाला सांगितला. आद्यंतीं दैव : मध्यें पुरुष–' आदि भणिजे बोध : आणि अंत भणिजे प्राप्ती : या दोन्हीं ठाइ दैवाचा व्यापारु : मध्यें पुरुषाचा प्रयत्न ।' महा० वा० प्र०. वरिपडा होए–वश होईल; ताब्यांत जाईल. ' म्हणौनि स्वधर्मु हा सांडसील । तरि पापा वरिपडा होसील ' ज्ञा० २. २०१, २ ३४९ १३ व्या दृष्टांतांतील ' माळेकार ' उदासीन व मौन अवलंबून होता; या दृष्टांतांतील मार्गदर्शक आहे. एकु–' असाधारण उभयदर्शी अवतारी जाणावा ।' ' म्हणौनि परमेश्वर बळें धर्मीं न घलीति : ज्ञान देउनि उतराइ होति ।' ' नागवीजसि ', ' खाइजसि ' हीं जुनीं कर्मणी रूपें लक्ष्यांत घेण्यासारखीं आहेत.

दृष्टान्त ५१—चांगदेवास सांगितला. अयाचग्रासीया–भिक्षेची याचना न करितां मिळालेल्या अन्नावर निर्वाह करणारा. ' सदावर्ती अयाचग्रासी असे : कव्हणी ग्रांस तोंडीं घाली तरि घेयावा : वांचौनि नेघे । तयाचिया हातावरि सकल पदार्थ कालवुनि ग्रांस घाली ति : तोही अयाचग्रासी : परि येथ पहिलाचि बोलीला असे ।' द० स्थ०. आणिक–' जैसा अन्नरस सप्त धातूतें पावविता व्यानवायु असे तैसें नव्हते तें पुरवाया सकल साह्य करावया अभिमानिये (अभिमानिनी देवता) असे ।. ' द० स्थ०; ' प्रवर्तले तरि सकळही गोमटें आपणचि करीति ।.'

दृष्टांत ५२—डोमेग्रामीं आउसेला. आंगवावीं–त्याग करावा; ' जनलोकांची लज्जा न धरणें ते आंगवणचि । ' दीक्षिताची–' दीक्षित ते सकळ ब्राह्मणांमध्यें कर्मचारश्रेष्ठ : वेदशास्त्रपुराणीं संपन्न : दृष्टव्यव- हारें संपन्न । ' एकि–निलाजरीं. घरव्रात–संसार, प्रपंच. (अमृतानु० १,१३.) काळ–' जियें काळीं संपत्ति वाढे : महत्त्व मान्यता बोध होए : तो काळ । '. लोक–' कुळावेगळा अवघा लोकचि होए । '. कोळिया एकाची–' कोळियाची : हीन जातीचा : सप्त अंत्यजांतुल अंत्यज : दांगट कोळी तयाचे घर रीगे । ' कर्मचांडाळाच्या दृष्टांतांत (दृ० ४८) पुरुष ब्राह्मण असून तो महार स्त्रीच्या संसर्गानें ' कर्मचांडाळ ' झाला; या दृष्टांतांत (दृ० ५२) ब्राह्मणस्त्रीमुळे हीनज्ञातीचा पुरुष कर्मचंडाळ झाला; ' या दृष्टांतीं स्त्रियेचेनि योगें पुरुष कर्मचंडाळ होए आणि त्या दृष्टातीं पुरुषाचे '. दीक्षितकन्या पुरुषसंसर्गानें चांडाळीण झाली असली तरी ती कर्मचांडाळीण नाहीं, कारण स्त्रियेला मोक्षाधिकार नाहीं असा दृ० स्थ० कारांचा अभिप्राय दिसतो. ' म्हणौनि ईश्वराकारणें जीवें सकळही आंगवावें । '

दृष्टांत ५२—हा दृष्टांत डोमेग्रामीं देमाइसेला सांगितला. ही श्रद्धाळू बाई पैठणनजीक पिंपळगांव येथें राहत असे. गुरु केल्याशिवाय गति नाहीं असें ऐकून ती गुरु करण्याच्या उद्देशानें पैठणास 'वामदेव' नामक एका प्रख्यात साधूकडे गेली; त्याची दिगंबरवृत्ती पाहून ती दुसऱ्या साधूकडे गेली असतां त्याची विलासी वृत्ती पाहून ती बिचकून परतली. परत येतांना मार्गांत तिला ' लखुबाइसे ' भेटली व तिच्या मदतीनें चक्रधरांचें दर्शन होऊन तिला क्रमेंकरून अनुग्रह व स्थित्या- नंददान मिळालें. या दृष्टांताच्या प्रसंगीं चक्रधर देमाइसेला गांवीं परत जाण्यास सांगत होते व तिच्या मनांत जावयाचें नव्हतें; ' हें काइ जी : आपूले सकळै सांडुनि गोसावियांचेया दर्शना एइजे आणि गोसावी पाठउंचि लागती। कांहीं अपूर्व नीरूपिति ना । ' तेव्हां बाई, असें तूं

कोणत्या गोष्टी बाजूस सारून व त्याग करून आमच्याकडे आलीस असें चक्रधरानीं विचारून तिच्या गतायुष्याचें वर्णन केलें ; 'पोरिया एकु होता : तो मरौनि गेला । सहजचि लेवों न ए : नेसों न ए : खावों न ए : न्हावों न ए : तेयाचें कांहीं असिलें तरि तें नाहीं। तरि बापां भाउ-वांचिया हांडिया तावाविया : मग घांसभरि खावें। तयापरिस काइ एथौनि जा म्हणीतलें तेहवळि जाइजे : एथौनि या म्हणीतलें तेहवळि एइजे : हें सानें देमती ।' एक मुलगा होता, तो मेला, घरीं कांहीं उरलें नाहीं, मनाच्या हौसी फिटल्या नाहींत, आणि माहेरीं भावाच्या घरीं भांडीं खरडण्याचें व घांसभर खाऊन दिवस कंठण्याचें नशीबीं उरलें अशा स्थितींत असल्यामुळें निमूटपणें चक्रधरांनीं सांगितल्याप्रमाणें तिनें वागावयाचें हें कांहीं थोडें नाहीं असें चक्रधरांनीं तिला सांगितलें. त्यानंतर देमतीनें चक्रधरास मी कोणत्या तऱ्हेनें वागू, असा प्रश्न केला; तेव्हां या दृष्टांताच्या शिरोभागीं दिलेलीं सूत्रें चक्रधरांनीं निरूपिलीं. या प्रसंगावर व्याख्यान करितांना दृष्टांतस्थलकार पुढील आक्षेप घेऊन निरसन करितात. हा भाग तत्कालीन चर्चा स्वरूपाची यथार्थ कल्पना येण्यास उद्बोधक असल्यामुळें तो उतारा जरी मोठा असला तरी महत्त्वाचा म्हणून येथें अंशतः उद्धृत करीत आहों. 'मा तरि ऐसें गोसावी कां पा निरूपिलें : ना : तेयाचा त्यागाधिकार देखौनि : तरि कैसा देखीला पा : ना : मळवत् त्याग जर म्हणावा तरि मळवत्त्याग (वमनवत्) तो काइसेयाचा करावा : कां जें पोरीया होता तो अहेतन घेऊनि गेला : ना जरि अनिष्ट त्याग म्हणावा तरी पोटीं संतती तेही नव्हति : ना जर स्वतएव त्याग म्हणावा तरि जडचेतन पदार्थ बोधाअधीचि नव्हति : तेथ निमित्तापगम काइ-सेयाचा करावा । ऐसें उत्तम मध्यम कनीष्ट त्यागाधिकार नव्हे म्हणौनि चौथेनि पक्षें सर्वज्ञें म्हणीतलें : देमति असीजे ऐसें कुष्टियाचां धर्मी : कां जे बापाभाउवाचिया हांडिया खरवडावीया : तयापसि ईश्वरीचें

सेवादास्य हीन आणि काइ : ना तें सर्वोत्तम असें : म्हणौनि तैसें म्हणीतलें ।' अशाप्रकारें दृष्टांतस्थळकारानीं देमाइसेच्या त्यागाधिकाराची चिकित्सा केली आहे. वेव्हारा–व्यापारी. ब्राह्मणी–पत्नी. मरकाढी–असाध्य, मरणाबरोबरच नाहींसा होणारा. आझुइ–अद्यापि; अझूनही. पाठीं तीयें आलीं–' मनलज्जा जनलज्जा आलीं : प्रीतीतंव येती ऐसें नाहीं ।'. कऱ्हा–मातीचा कोरा घट. थापे–बोटें गळालेले नुसते पंजे. श्रीकराचेनि अनुकारें–प्रत्यक्ष क्रियेचें आंगविक्षेपपूर्वक अनुकरण; हावभाव. चक्रधरांनीं हा दृष्टांत सांगत असतां स्वत: हस्तक्षेपपूर्वक अनुकार केला. सांपटें–जीर्णवस्त्र. ' ईश्वराचेया आवडीतवं त्याग केला नसे : संबंधीयांचें विटंबलेंपणें. दुबळेनि मनोधर्मे...मरणेंसीं धरणें घेतली ।'; 'येथ आपत्तीकाळाची आंगवण बोलिजे ।' दृ० स्थ०.

दृष्टान्त ५४—हिवरळी येथें महदाइसेला सांगितला. पीढें–पाट; 'पीढें तें घरासि आलेया अतीतासि सन्मानें करणें' वानेराची पेंढी–जंगली झुडुपांचा भारा. वानीर–पाणवेत, त्यांची पेंढी. ठावो केला–पात्रं मांडिलीं. लोखंडें–शेतीचीं लोखंडीं अवजारें. पास–वखर कुळव. फाळ–नांगर. निधावला–मेटाकुटीस आला. कुजांतर (कुयंत्र)–जादू, चेटुक. देहाडा–शेत. वीवळलें–उजाडलें; 'सूर्यबिंब उगवलेया पदार्थमात्र दीसे'. महात्मा–'तोचि उभयदर्शी । तयाचिये अंतरीं जीवोद्धरणाची प्रवृत्ति तोचि परिसु ।'. 'फाटकी–' 'आवडी प्रीति होये परि अनुरागाची नव्हे म्हणौनि फाटकी ।'. लोखंडें–'षड्विधकर्मे ही लोंखंडें.' 'जीवें कर्माचा भार डोइए ठेविला असे'. कुजांतर–'परज्ञान तें अन्यथाज्ञानें कूजांतर म्हणितलें ।' 'ईश्वरीचीए अनन्यतेतव वेव्हारावरिल बुद्धि काढिली देखौनि लोक वाया गेला म्हणति : पर तो काइसेनही न वचे । :

दृष्टान्त ५५—पैठण येथें पांडेयास. देखतयापरी–पहाणाराच्या दृष्टीनें मतें; धरतीपरी–'पिलेनि धरूं जाणावें आणि न सुटत सूत्र तें मातेनें जाणावें हा वानरीचा स्वभाव उपजतचि असे ।' 'देखतयापरी

हे पडैल परि तें तेंचि जाणे। ' ही वाक्यरचना व त्यांत 'परी' या शब्दापूर्वी वर्तमानकालवाचकाची केलेली योजना लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. 'अनुसरतीपरी', 'नरक चुकविती परी' हीं रूपें देखील सदृश आहेत; हल्लींच्या वहिवाटीस अनुसरून अनुसरणाची (अनुसरणक्रियेची) परी (पद्धति) अशी रचना होईल. 'जैसे भ्रमर परागु नेती। परी कमळदळें नेणती। तैसी **परी** आहे **सेविती**। ग्रथीं इये। –ज्ञा० १–५९. 'कुष्टियाचां दृष्टांतीं (दृ० ५३) आपत्तीकाळाची आंगवण बोलिजे: कुळाची आंगवण ते परिसाचां (दृ० ५४) दृष्टांतीं: लोकाची ते वानरीचां (दृ० ५५) दृष्टांतीं: दीक्षित कन्येच्या दृष्टांतीं (दृ० ५२) तिन्ही (काळ–कुळ–लोक.) आति। ' दृ० स्थ०. 'एक दृष्टीचि वाया गेला म्हणति: परि परमेश्वरें धरिलेया वाया न वचीजे। '.

दृष्टांत ५६—पैठण येथें नागदेवास. माकोडा–मुंगळा; डोंगळा. वऱ्हाडी शद्ब; ऋ० वर्ण० १७४ पहा. जीवन–खाद्य; प्राणाधार. 'जियें काळीं जो उचित विधी उपस्थित जाला तेंचि तयाचें जीवन। '. झाडिता झडेना–' शारीरदुःख पावले तरि तो विधी सोडीना। '. तुटेना–उपटून काढूं लागलें असतांही सुटत नाहीं इतका तो मुंगळा चिलगलेला डंख खुपसून असतो; 'मानसीक दुःख पावलेयाहीं तो विधी करावेयाचा मनोधर्म तुटों नेदी आन ते विषयीं स्मरण न संडी। '. 'शारीरमानसिक दुःख साहणें। दो ठायीं जालें तें तुटणें (धड व शीर द्विधा होणें) येथ नव्हे। का जे तैसें जर तुटलें तर देहे पडे तंव करावें म्हणितलें तें न घडें। म्हणौनि शारीर मानसिक दुःख पावलेया ईश्वरीं विसर पडो नेदावा ऐसा हेत येथ असे। ' दृ० स्थ० 'धरणें तें ऐसें: धड तुटलेयाही जीवें ईश्वरातें न सोडावें तैंचि त्या लाभाते पाविजे: प्राप्ती होए। '.

दृष्टान्त ५७—बीड येथें पद्मनाभीस सांगितला. व्यतीपात दे–पर्वकाळीं दानधर्म करी. दारवंठा–महाद्वार; ज्ञा० १८-१५०७. राखत–गर्दी करून तिष्ठत. सारी–सारीपाट, सोंगट्या, चौरुर. उबगला–कंटाळला.

फळें मोडैल–सोंगट्या बाजूला करील; डाव संपल्यानंतर. चेइल–जागृति, चेव येईल, झोंप संपेल. आंघोळि–'आंघोळि ते उष्णोदकें होए;' पहुडले...उपहुडेति'–निद्रित जागृत होती; 'वैराग्य ज्ञानाचें घर रीगे। परि ज्ञान वैराग्याचें घर न रीगे। यातवं जवळीक करुनि अधिकरणाचा अवसर राखावा : तो दारवंठा टाकुनि स्वनिष्टकार्य न वचावें : जरि गेला तरि ईश्वरातें खति ए' ह० स्थ०. 'वेव्हारी असे तथा रावो'– 'निरपेक्ष कव्हणीचि हेतु नसतां : आचारा विचारांचें दातृत्व करणें हा रायाचा गुण : आणि अधिकार्यांचेनि उपचारें दाय पसाय होति तो लाभ जोडणें हा वेवहार्यांचा गुण। ऐसें दोन्ही गुण मिळौनि एक अधिकरण बोलिजे' 'पुरुषें शास्त्राकारणें अवसर राखावा : स्ववासना स्वभावें स्वकर्म परतें ठेवावें। शारीर कष्ट मानसिक दुःख साहुनि संपूर्ण जवळीक करुनि शास्त्र काढावें। हा विधि अनुसरलेयाचा असे' ह० स्थळ. एक वायांचि विण उबगले जाति : ते तेया लाभासि चुकति'. मालगांठीचेया लाभा–एका प्रसंगीं चक्रधरांची षोडशोपचारें कोणा भक्तानें पूजा करून अंगावर मालगंठीचे महावस्त्र समर्पण केलें असतां, त्यावेळीं महदाईसें हजर नव्हती; हा अपूर्व दर्शनलाभ न मिळाल्यामुळें तिला खेद झाला असतां समाधानार्थ पुन: त्यांनीं महदाइसेसमोर तें महावस्त्र परिधान केलें. मालगंठी–वेलबुटी जरतारी असलेलें वस्त्र.

दृष्टांत ५८—खडकुळी येथें रामदेवास सांगितला. सराउं दे–शिष्यास पस्य.चे हात वारंवार करावयास लावी. कोल हाणे–देहदंड करी, काठीनें मारी. म्हेळीएची–महीळेची–आईबहिणीची (शिवी). घाए खंडी ए–वार करणें व वार चुकवणें प्राप्त होई. खडीवाची पासौडी–बैसावयाची बैठक; जाजम. पाया पाउलं–चरणांचे पवित्रे कसे पडतात ते; 'कौल हाणे–' अकुशलतेचां ठाइं अविधी होए तो दाखउनि दुःख उपजवी'; 'सींत्री दे : तेणें अविधि प्रसवे : प्रमादीया होसिल : नरकासि जासिल : ऐसें सांघौनि अनुताप प्रायश्चित्त करवी'; 'खडीवाची पास-

वडी : आव्हान विसर्जन विधानपूर्वक : प्रीतियुक्त भाषण या नावें खडीवाची पासवडी बैसों घालणें '.

दृष्टांत ५९—पैठण येथें महदाइसेला. इसाळु–(विषयाळु–विषयाळु–इसाळु) स्वस्त्रियेवर कडक नजर ठेवणारा; ' स्वस्त्रियेचा अभिमानी : परि तियेवरि लक्ष ठेवणें ऐसा तो कव्हणी जाणावा । मोक्षमार्गी शिष्यापरता अभिमान नाहीं । '. आज्ञा करी–' उंबरियाबाहीरी पावो न घालावा तथा आणिकासि घालों नेदावा । '; ताकीद देणें. रेघ काढी–मर्यादा, निग्रहस्थान स्पष्ट करणें. हा वो–आवो; अहो ! या अर्थी उद्गारवाचक अव्यय. एसिना का–येत कां नाहींस, अर्थात् ये. वरैते–नवऱ्यानें. वासनिक–फलापेक्षी; " पूर्वज्ञानेसी अनुसरणाची वासना याते ' वासनिक ' बोलिजे "–उद्ध० प्र०. प्रमादीए–' ननुसरति ते प्रमादीए बोलिजेति. ' ल. पाठ, उद्ध० २३; पतित. कांजीभाजी–रसनेवर निग्रह करण्यासाठीं केलेले आहारनिर्बंध; कांजी–पेज. ' रेघस्थानीं संनिधानीं जैसें सांगितले तैसेंचि करावे । विधीचा ठाइं लंघन घडे : अनुचित घडे । '. भीतीआडौनि–' शास्त्राचे आव्हेरण चुकवौनि '. पुसे–' पुसे ते कार्य वेडेपणें : का जे स्त्रियेसी नोवरी नोवरा पहावा ऐसी आवडी असे । तरीचि सेजिया साइलियाते पुसे । तवं जया पुरुषासि जिये पदार्थी आवडी असे तो तया पदार्थाते बरवा वाईट ऐसें बोले अथवा आणिकातें पुसे । '.

दृष्टान्त ६०—डोमेगांवीं नाथोबास. साउमें–पुढारें; सन्मुख थैक–' हैक '–हांकणें. वाहाती–भारवाहकत्व (सुखें) करीति. ' झाडिजे शब्दीं संजोगणी : भागलासि श्रमलासि म्हणणें । प्रयत्नें शनै शनै अनधिकार झाडणें । '. ' पुसीजें : अन्नीं–वस्त्रीं उदकीं समाधान करणें : इष्टक्रिया आचरौनि योग्यता दक्षता होए ऐसें करणें । ' दृ० स्थ०.

दृष्टांत ६१—बेलोपुरीं महदाइसेला. कवडे खातां जन्म जाए–रूपविक्रय करून जन्म काढला. सतियाचे लोक–'ते शेषशय्याचे '. प्रथम

त्यागिया–प्रथमतः म्हणजे ‘ सर्वतोमुख्य ’ त्यागिया; श्रेष्ठ प्रतीचा त्यागी. ‘ जोचि अवसर विषया तोचि अवसर ब्रह्मविद्ये ’ ‘ एक आवघें जन्म नेदीति : तोकडेंचि देति : तेही तया लाभातें पावती । ’ पांती–पंक्तींत.

दृष्टान्त ६२—पैठण येथें नागदेवास; करणीए–‘ उचितकाळ प्राप्त जालें तेंचि करावें ’, कार्य. गोसावीणि–धनीण. कव्हणीं एकि– ‘ घरोघरीं बहुता दासी असती : तिया व्यभिचारिणी अनृतवादिनी कामचारिणी । धनीनीसि तोंडा येति : सांगितलें लौकरी न करीति : मग न संगतां उचितवादें युक्ति म्हणिये काइ करिल । म्हणौनि तिया न बोलिजेति । तरी ‘ कव्हणीं एकि ’ म्हणितलेया नियता नीतिमंता सदाचारी । तयासि दासी पूर्वजोडीतंव (पूर्वपुण्याईनें) दास्यत्वें लाधली । परि उच्च नीच व्यापार यथायुक्त करी । कव्हणीचि हेतु (उद्देश, बुद्धी) पोटीं न धरी । मा ते जैसी जातिवंत असे तैसेंचि अनुसरला पुरुष ।’. दृ० स्थ०; लेवों–‘ चर्येचे अलंकार मिरविणें ’. नेसो–‘ सुखश्रयाचे सौभाग्य मज होवावे ऐसें होते ।’. ‘ हेतुविण सकळही दास्य कीजे : तें जन्म देणें बोलिजे । ’.

दृष्टान्त ६३—पैठण येथें महदाइसेला. म्हणीये– एकाधेया प्रयोजना पाठविणें.’ जोडी–मिळकत. ‘ दासीचा दृष्टांतीं साधनापासौनि साध्यपर्यंत ज्ञानिया जाणावा । पतीव्रतेचां दृष्टांतीं प्रेमापासौनि अनुभूतीपर्यंत भक्त परिसावा । ’ ‘ दासीचा दृष्टांतीं नुसधें बाह्यदास्य सांगीतलें : परि अंतर नाहीं । तें पतिव्रतेचां दृष्टांतीं बाह्यदास्य असौनि अंतरपूर्वक करावें । बोधपूर्वक अनुसरला परि कोरडा तो दासीचेनि दृष्टांतें बोलिजे । आन जीविताचा वोला अनुसरला तो पतीव्रतेच्या दृष्टांतीं सांगता असीजे । ’ दृ० स्थ०; ‘तेंचि दास्य जीव वेचलेंपणें करी : तयासि परमेश्वर सकळै गोमटें करीति । ’

दृष्टान्त ६४—आंबा गांवीं देमाइसेला. ठेलें–स्थगित राहिलें, थांबलें. चाटसी–पळी. ‘ यथाकाळीं उपस्थित विधी मनोधर्मांचेनि

लाठेपणें करावा। मग एक वोलेंपणें प्रीतिपूर्वक करी : दुसरा कोरडे-पणाचेनि संस्कारें माझें करणीये म्हणौनि करी। दोहींचे पदार्थभेदें सुगरणीचे सुगरणपण तें जैसें तैसेंचि ईश्वराचे शाब्दचरितार्थ करितें साह्यक्रिया घडवितें कारण जाणावें। ' द० स्थ०

दृष्टान्त ६५—डोमेगांवीं महदाइसेला. ' कर्मे तीयें सनिधानींचि क्षाळिती। '. 'अग्निचेनि संबंधें : एक सामर्थ्याग्नी : दुसरा दावाग्नि : तिसरा तो भडाग्नि : आन चौथा बाळकाग्नि। बाळकाग्नि तो वरोघरींचा : तियें स्थानीं नित्य कर्मनाश थोडा। भडाग्नी तो होळियेचा : तियें स्थानीं नैमित्यक काष्टें जळति : जैसी ओली कोरडी तैसे अनारब्धे प्रारब्धे संतासंतें नाशति। दावाग्नी वणवेयाचा : ये स्थानीं पैऱ्हा जावौनि क्रमेंचि नाश करीत असे। सामर्थ्याग्नी संनिधानीचा : दोहीं ज्ञानीं सेवा दास्य व्यापार करितां थोर नाश होए। '–द० स्थ०; परमेश्वरुसंनिधानीं–'संनि-धानीं तर गोसावी सांगीतलें तेतुकेंचि करावे। तेणेंचि कर्मनाश होए। आज्ञेवीण केलें तेतुकें वाया जाए आन हिंसादोष लामे। '

दृष्टान्त ६६—खडकुळी येथें महदाइसेला. ' उत्तरोत्तर ज्ञान देउनि मळ तेही संनिधानींचि क्षाळिती '. सुरै–सुरभि; सौरभयुक्त. 'शुद्धत्वविशेषासि योग्य होए'. मृदत्व– 'विशेष संचरे ऐसा अधिकार उमटे ' टरल–टरफल. 'दासीचेनि दृष्टांते बोलिले जे ज्ञानिये तयासि उत्तरार ज्ञान देउनि मळक्षाळण करीति।' द० स्थ०; लक्षणपाठ, पृ. ८२–८७ पहा.

दृष्टांत ६७—बेलोपुरीं नागदेवास. काहालीए–मोठ्या कढईत आणिकी भांडा–'दासीचेनि दृष्टांते बाह्यचर्या आचरत होता तेथौनि काढौनि पतीव्रतेचे दृष्टांतीं लावीला। '

दृष्टांत ६८–बेलोपुरीं आउसेला. 'जीवाचेनि आग्रहें जीवा उत्तम साधन देति।' 'आउसा म्हणीतलें : जी जी प्रेमासि उपावो असे। सर्वज्ञें :

म्हणीतलें : आति : बाइ उपाये न पवीजें ऐसें कांहीं असे। आउसा म्हणीतलें : जी जी : मग तोचि कैसा । सर्वज्ञ म्ह० : संनिधानीं आग्रहीं : असंनिधानीं तळमळी : परि पोरा जीवासि आग्रह नाहीं। आग्रह जर होए तर परमेश्वर ज्ञानियासि प्रेम देति तथा पोरा जीवांसि आग्रह जर होए तर कोपरा पान्हावो ए। ' (लीळाच० उत्तरार्ध) समानार्थक मातेची उपमा ज्ञानेश्वरींत (अ० १८, ५८९) पहावी. दुबळी–'लेंकरुवावरि बहुत स्नेह : तयाची आळी भलतेयापरी पुरवावी'. बुझावेना–'झाडिलेया झडेना : तोडिलेया तुटेना।' आग्रह 'आर्ती आन एक अंतरा वाचक असे : क्रियेवाचकही असे। ' द० स्थ०.

दृष्टान्त ६९—बेलोपुरीं आडसेला.

दृष्टान्त ७०—पैठणीं नागदेवास. पाणिचोरिया–जलतस्करिणी यंत्र. ' उत्तम साधना जालेया सकळें साधनें जालीं होति । '. धरीजे–संयम करिजे : नेघे तें मारिजे : बांधोडीं घालिजे । '. ' इंद्रियांचा नाएक तो रसना । जैसिया बांदोडीयासि अन्नमात्र देउनि वांचवीति तैसे तियेसी अन्नमात्रा तथा उदकाचि देयावी । '. द० स्थ०; कांहीं टीपकारांच्या मतें येथें पूर्वार्ध संपून दृष्टांतपाठाच्या उत्तरार्धास प्रारंभ होतो.

दृष्टान्त ७१—सेंदुर्जनी येथें देमाइसेला. बावी पोखरणीं (बावी-पुष्करणी)–वापी ते विटांची बांधलेली पायऱ्यांची विहीर; पुष्करणी ती पाषाणबद्ध लहान तळी. उदक न स्वीकरी–' तयांचे रसरूप उल्लेख उपजों नेदी । '. उदैलेया मेघाची–आर्तदानी. समानार्थक–' चातकां घनोदकीं वेचु। तो पाहे वरती करूनि चांचु । येरा उदकांचा रेंचु । मना भरों नेदी ॥ तैसें जें दैवयोगें । सुखपावे विधिबागें । त्या वांचौनि न सेवी चांगें । मनोधर्मे जो ॥ ' ज्ञा० प्र० ८६–९० ज्ञानेश्वरांच्या अभंगांतील (जोगगाथा : पृ० २०८) पुढील भाग समानार्थक आहे– ' गगनीं बोळलीं घनुचरें । तेणें क्षितिवरि नाचतीं मयूरें । सोम शीतलपणें कळा मिरवी । अमृत घेवों जाणती ते चकोर रया ! ॥ बोळलीं

स्वातीचीं अंबुटें । तें तत्व झेलिती शुक्तिका संपुष्टें । येर नक्षत्रें वरुष तातीं निकटें । काय जळ तयांचें वोखटें रया !' चातकू (चकोर ?) चंद्रातें चिंतितू । तो तयाचे मनोरथ पुरवितु । बाप रखमादेवीवरु विठ्ठलू तो मी सदां असे हृदयीं ध्यातु । रया !'

दृष्टान्त ७२—पैठण येथें नागदेवास. 'आणिका देतां काइसेनही नेघे : ऐसीए अनन्यते ईश्वर आपणेया समान करीति ।'. हातातळीं हात वोडवीति ना–याचनेप्रीत्यर्थ हात पुढें करीत नाहींत. नीर्वाहो करुनि–निर्वाणुक करुनि. 'उचिताचा तो पाइक : उचित काळीं तैसेंचि पुसों जाणती । परिवार तीं आवघीं भक्तजनें ।'. सीहासनीं–'सिंहावलोकन आहे का जयाचे आसनीं । एवं स्थानांतरा जरी बीजें केलें तरि भक्तांवरि अवलोकन असे ऐसा हेत ।'. दांडी डोळिकारु–पालखी शिबिका व वाहक भोई. अर्ध राज्य...समानकरी–'सकळया शक्ती दान करीति तेंचि आपणया समान करणें । अविद्यांतरें मोक्ष देति ते पाठीसी घालणें तें अर्धराज्य बोलिजे ।'. 'पतिव्रतेपासौनि गुळहारीपर्यंत (दृ० ६३–६७) जीविताचा प्रधान : आन जन्माचा अनुषंगिक ऐसे पुरुष सांगीतले । वृक्षत्वचेपासौनि सींदेराणेयापर्यंत (दृ० ६९–७२) उत्तमा साधनांचा उपाये आन उपायाची प्रशंसा बोलिली ।' दृ० स्थ०.

दृष्टांत ७३—डोमेग्रामीं साधाप्रति. रीणाइत–ऋणग्रस्त. त्रियंचत्व–तीर्यचत्व; पशुयोनीमध्यें जन्म (लक्षणपाठ, पृ० ८२ पहा). नीत्यमंत–नीतिमान. 'तो अनन्यता करी : पर कर्मे तीए चेष्टवीति कीं : ना : ते वेवस्ता ईश्वरें आधींचि केली असे ।'.

दृष्टांत ७४–खडकुळी येथें दायंबाला. दंदिया–द्वन्द्विन्; शस्त्रोपजीवी. आंगरखे–देहरक्षक. तोचिहुनि–आपण एकटा, संरक्षक समागमें न घेतां व न पुसतां बाहेर पडला तर. सुरीवर घेति–सुरी खुपसून ठार करणें. अलंगवरि–(अग्रावरि) भाला हाणणें. 'जगाचा दंदिया :

दंद तें मात्सर्येंचि प्रवर्ते : वांचौनि रिणाइताचा ठाइं दंद करणें तैसा व्यवहारचि नाहीं : का जे रिणाइत मारिला तरि रिण काइ फिटत असे।'. 'कर्माची वेवस्ता पा तैसी : पर प्रतिकूळा विघ्न करीति कीं : ना : तया संनिधानीं रीगों न ए।'.

दृष्टान्त ७५—सिंगणापुरीं चांगदेवास. मंडळिका–नाथोबास चक्रधर या नांवानें संबोधीत असत. तवपर्यंत–'आचाराविचाराचें अज्ञान तथा अन्यथाज्ञान निवर्ते तवंपर्यंत करावा।'. पैऱ्हा गेलेया–पैल गांठल्यानंतर; 'दूर झालेया'. पलीकडे झाल्यावर म्हणजे असंनिधानीं विकारसंकल्प न बाधती. 'प्रतिकूळा पा रीगावा नाहीं : पर मनोधर्म नेति कीं। ना : ते संनिधानीं न बधीति।'.

दृष्टान्त ७६—बेलोपुरीं नागदेवास. 'यापरी राखीलें ज्ञान जारठ्य जालेया काइसेनही न वचे।'. कोमळज्ञानीं–ज्ञानानुभवाची जी प्रथम दशा, त्या वेळीं. खुर रवीं–खुरांच्या खुदळण्यानें; 'जैसी सेळी वरील डिरी खुडी : परि मूळ उपटीना आन मेंढी ते खूर खरवडुनि मूळही खाये तैसा विकार सेविलेया अनुसरण जाए पर तत्काळ बोध न वचे। आन संकल्पें अनुसरणासहित बोध उल्लेखमात्रेंचि जाए।' दृ० स्थ०; 'मग ज्ञान जालेया अन्यकथन ते सेळी आन विपरीत बुद्धि ते मेंढी'. कूप कांटी–'सेळीचें तोंड न पवे इतका उंच तथा निबिड : तया कूपाचा तोंडीं बोराटी ठेवी : ऐसेनि प्रयत्नें रोप वृद्धी ते प्ररोहातें पावे।'. वेंझ दीधलेयाही–हत्तीच्या स्कंधस्पर्शानें अथवा सोंडेच्या पकडीमुळेंदेखील. घंटा–हत्तींचा समूह, कळप.

दृष्टान्त ७७—नाथोबास सांगितला. अवचटा–अकस्मात्. व्याहाळीए–विहारार्थ; मृगयेसाठीं; 'वाहयाली प्रवहणं'. तो म्हणे–मांदुरिया–मोत्तद्दार; जिवलग आतवोल्हावण–ताज्या वनस्पती औषधी; ओलवणें, ओलवण. शरीरांत नव्या शक्तिवर्धक धातू उत्पन्न करणारे उपाय.

वल्हो–वळहो, वळु. ' जयांचा जेतुला गुण सेवेतव गेला असैल तेणें तयाचा परिच्छेद करुनि प्रयत्न साधावा : नाहीं तरि थोरा अनिष्टा वरपडा होईल। ' दृ० स्थ०.

दृष्टांत ७८—खडकुळी येथें नागदेवास. ' मा तर घोडाचि कां सांगितला : ना : रायाचे ठाइं हस्तिमुख्य सकळाचिया साळ (शाला) असति : पक्षिआदिकरुनि। परि तयांसि ब्रह्मचर्याचा नेम नसे : घोडसाळावांचौनि। तो (घोडा) परचक्रातें जिंकिता रणीं भेदुनि जात असे। घाइं जर्जर जाला तरि स्वामीतें मोकळूं न शके। ऐसी क्रिया हस्तीचे ठाइं न वर्ते। ' दृ० स्थ०.

दृष्टांत ७९—पैठण येथें छर्दोबास अनुलक्षून नागदेवास. विभागु–भेद (' जो भेद विधीनें केला ') पोरु–' जैसा अ–पुंगंड (पौगंडदशा adolescence) स्वतंत्र। जैसा वांड पोर : कव्हणासी नायके : भलेयाचे भये न मनी। '. धर्मापासौनि गेला–' पुरुषु जेतुल जेतुली विषयसेवा करी : तेतुल तेतुला धर्मी निबळ जाए ॥७॥ बाइ : पाप तरि नव्हे : परि धर्मापासौनि ऐसा निपौनि काढी ॥ ८ ॥ '–आचारपाठ (चक्रधरोक्त सूत्रपाठ, पृ० १७) तपापासौनि–' चर्येपासौनि '. [ज्ञानाची कोमळ दशा असतांना बाह्येंद्रियांच्या विषयोत्कटतेमुळें जी हानी होते व प्रतिबंधक कारणें निर्माण होतात, त्यांचें सविस्तर विवेचन; आचारपाठ, सूत्रें १–२१ पहावीं.

दृष्टांत ८०—पैठण येथें आउसेला; न रमे–' जैसें आत्मरामींचि रमति। '. ' चातकाच्या दृष्टांतीं (दृ० ७१) साधनीं दुःखचि प्रधान असे : राजहंसासारीखी रमणरूपता नाहीं। '. समानार्थः–' वावी पुष्करणी सरोवरें। नदी इत्यादि मंडित सर्वेश्वरें। तयाचिये थोरियेशीं अपुरें। अ–वर्णोदक ॥ ' ज्ञा० प्र० १०३६.

दृष्टांत ८१—एलापुरीं चांगदेवास : डींगरा–डिंगरू, गुजराथी अपभ्रंश=मुलगें, लेंकरूं; ' बीज तर रायाचे पर दासीचा पोटीं जन्मे। '.

' ऐसें एकांगवीर । विठ्ठल रायाचे डिंगर ' ज्ञानेश्वर (जोगगाथा : अभंग संख्या २२६). वोलिसाउलें–स्त्रियांचीं महार्ह वस्त्रे (सोवळीं). वाखारी– वोखारी; भांडारांतील नगद शिल्लकेस 'वोखारी' म्हणतात (ज्ञा. ७.१३५). ' डिंगरा छत्तीसा दोषांचा : जयासिं बीजाचें खरेंपण आन क्षेत्रींचा व्यभिचार ऐसीं दोन्हीं उपतिष्ठति । खरेंपणें तरि रायाचां काजीं आपणपें न रखणें (देहाची अनासक्ती) : आणि व्यभिचार तरि घरींचें पदार्थ चोरी । '; भांडार फोडौनि वाखारीं ने–' कथन करुनि बीजत्व दवडी : जया जया पुरुषाचां ठाइं छत्तिस दोषांतुल एक दोन्हि दोष वर्तती तो तो पुरुष तेणें दोषें डिंगराचि बोलिजे । पर आणिक गुण असे तर उपसाहाति । '. 'अल्पें अनिष्टें बहुत अनिष्ट परिहरे तरि परिहरीजे' 'ऐसी आज्ञा असे । ' (चक्रधरोक्त सूत्रपाठ : आचारपाठ, १०८ पहा).

दृष्टांत ८२—पैठण येथें रामदेवास : ' इसाळुवाचा ' पहिला दृष्टांत ५९ वा; या दुसऱ्यास 'चाटरीएचा' असेंही म्हणतात. ' चाटरी– चहाटळ=वोहचक; 'चाटा स्वभावाची : सलज्ज मर्यादशीळ नव्हे। '. तोंड दे–' विवादीं प्रवर्ते '; मांडिएवरि लोळे–' दृष्टीं सविशेष पाहुनि हावभावीं पदार्थाचा ठाइं तोंड दे : रमे : विवादीं प्रवर्ते । ' दृ० स्थ०; आधां दातीं सीस घे–'खालील दांताळी खाली राहे आन वरील दांताळी शीसासहित वेगळी करी । ' ' डिंगरा इसाळु याचां भेद तो कैसा असे पा : ना : डिंगरा रसरूपी होउनि रसादि मिष्टान्नें सेवी पर मुख्य विषयाची अभिमुखता न करी । तयाचें अनिष्ट ईश्वरीं विनट असे : म्हणौनि उपसहाति । आणि कुयोगीयासि तैसा विनट नाहीं : कुत्सित संयोग सकळ पदार्थ सेवी : अंतरीं निश्चयाचे उल्लेख अभिमुखतापर्यंत करी : सेवने एतां देह जाए। ' दृ० स्थ० [परमार्थाच्या प्रवासास वा यात्रेस निघणाऱ्या मुमुक्षूस मुख्य सावधगिरीची सूचना श्रीचक्रधरानीं आचारपाठ, सू० ३ मध्यें दिली आहे. ऐहिक संबंध सर्वस्वीं जे सोडतील त्यांनाच या पंथानें जातां येतें असें सूत्र २ मध्यें सांगून अधिकारी

कोणता हें व्यावृत्तीनें स्पष्ट केलें. संबंधाच्या भोंवऱ्यांत जीव एकदां अडकला म्हणजे तो कसकसा अधोगतीस जातो हें ४ थ्या सूत्रांत सांगितलें आहे; 'संबंधीं विकारु'–संपर्कामुळें विकारोदय होतो; 'विकारीं रसु '–विकारांच्या वारंवार अनुवर्तनामुळें आवड 'रसु' जडते; 'रसीं अभिमुख ', रसाच्या उपस्थितीमुळें तिकडेच अभिमुखता होते; व त्याचा शेवट 'सेवानिवृत्ती, ' सेवनेंत अतिरिक्तता येते. याच कारणामुळें प्रथमपासून 'संबंध'च पराङ्मुख होणें हें अधिकारित्वाचें अवश्य लक्षण आहे, असें सर्वज्ञांचें मत आहे.

दृष्टान्त ८३—वेलोपुरीं नागदेवास; आपणपें नेदी–आत्मार्पण न करणें. 'अनुभूति रती दे : ते प्रेमापासौनि अनुभूतिपर्यंत जाणावे। '. आवडती तो भक्त : नावडती तो ज्ञानिया। '

दृष्टान्त ८४—हा दृष्टांत आउसेला सांगितला. दुहवा–दुर्भगा; भाग्यहीन; कलवड–(कुटिर) कूडाच्या झोंपडीमध्यें; 'कलोड' आडोशाची जागा; 'झाडातळीं' कडवल–गवताचा इरला. (मोल्स्वर्थ पहा). म्हणौनि 'ऐसा विवेक करौनि.' मळीण–'देहाची मळणमाती केली.' असलाग्यता-अश्लाघ्यता. सदर्थ–संपन्न. रोडकी–'तनु जर्जर जाली असे। हाडाचा पांजर सारा जाळीं बांधला दीसे। चालतां अस्थी कडकडा वाजती। : दूखीस्त–'मृतछाया बाणली : कोढा नीगेले डोळे : दांत विक्राळ सेवाळेले : ऐसा माथां फाटुकें वस्त्र कौपीन सुडीयाचे आच्छादुन सर्वांगीं चीटीचे काले तेही बुरसले दीसेति। गंधी फाकतां विषये पात्रें टिकौनि पळती : ऐसीये परीची। अनुतापें तापला : निर्वेदें दाटला : अनुशोचें शोचला : आर्तीचि आतुला : ऐसी चर्या देखीली : ' दृ० स्थ०; या दृष्टांतावर जें 'दुर्भगाप्रमेय' रचलें आहे त्यावर चर्चात्मक सविस्तर विवेचन शारदाश्रम वार्षिक, १९३३ या नियत कालिकांत प्रसिद्ध झालें आहे, तें वाचावें.

दृष्टांत ८५—हा दृष्टांत एलापुरीं एकाइसेला. या दृष्टांतावर व त्यावर रचिलेल्या ' शय्यापालना ' प्रमेयावर सविस्तृत निबंध विविध-

ज्ञानविस्तार, वर्ष ६७, अंक. १ (जानेवारी १९३६) पहा. 'तरी शय्यापाळणा भणिजे काइ : ना : पतीचा निजता ठावो : तयाचें पाळण करुनि असे : पतीचा धर्मु : तयाचा उपदेशु स्वीकरी।' शय्या. प्रमेय. संनिधान–' दर्शन : अनुसरण : सेवा : संबंध : यातें संनिधान बोलीजे : देखोवेखीं–आचरण प्रत्यक्ष पाहून. 'तरि दुर्भगे (दृ. ८४) आणि शय्यापाळणे काइ भेद : ना : पतीचेनि अव्हेरें पतीचांचि ठाइं अवसरु राखौनि असे : आणि एकी पतीचां ठाइं वियोगीं पुढीलीया देखोवेखी शय्या पाळौनि असे। भणौनि दुर्भगास्थानीं संनिधानीचा आणि शय्यापाळणास्थानीं असंनिधानीचा!' शय्या० प्र०; 'संनिधानस्थित जैसे भटोबास आन असंनिधानस्थित तयाचे शिष्य। तेही भटोबासातें पुसपुसों आचारविचारपूर्वक वर्तन केले। तरि जेचि गति भटोबासासि तेचि गति तयां शिष्यांसि जाली।' शय्या० प्र०. कवीश्वरबास, उद्धव-गीता, १७७–८२ मध्यें असलेल्या ओंव्या रचीत असतांना कवीसमोर हा दृष्टांत होता.

दृष्टान्त ८६—डोमेग्रामीं आउसेला; सुनें–कुत्रें (श्वन्). 'पोळणें म्हणजे अंतःकरणीं तिये तिये जातीची हळहळ अखंड वाटे। परि पोळणें तें सानें : आणि जळणें तें थोर। जळणाचे ते विरहीये। तयांसि पोळलें सुनें न लभे। विरह तो पतीचा वियोगीं लभे। विरहिणीचिया परी असावे पर तो कनिष्ट विरह म्हणावा। अप्रातीचिए पुरुषासि कव्हणीचि सुखासि न ए।' दृ० स्थ०.

दृष्टान्त ८७—हा दृष्टांत छिन्नपापी येथें सांगितला. विरह– 'आर्तीची उत्तरावस्था;' 'अप्राप्तीदुःखाचें स्मरण'. देशाउरा –देशांतरास, प्रवासास. पुड–(पुट)–विड्यांचीं पानें ठेवण्याची बासाची विणलेली लहान करंडी. वाटवा–वटवा–अनेकपदरी झोळण्यासारखी; सरकदोरीची पिशवी. तयाचीये ठाउनि–मुक्कामावरून पतीची बातमी, निरोप, पदार्थ आणणारा.

दृष्टांत ८८—वृधा–वरदा–वर्धा संगमीं हा दृष्टांत आउसेला सांगितला; तो ज्या स्वरूपांत निरूपित केला त्या स्वरूपांत उपलब्ध नाहीं असा दृ० स्थ०कारांचा शेरा आहे; 'हा दृष्टांत जैसा तैसा श्रीमुखें न येचि।'. तसेंच या दृष्टांतावर केशिराजांचें दार्ष्टांतिकही उपलब्ध नाहीं ही गोष्ट चिंतनीय आहे. आफळसाफळ करी–'जैसी मेलेया माणसाचे दिसीं सखियांतें देखौनि आगळेंचि दुःख करी : ऐसा होता वो गुणाचा : म्हणौनि। परि तयांसीं गोष्टिमात करुनि तेतुका काळ दुःखा विश्रांति नाहीं तैसा ठावो।' दृ० स्थ०. आस्फालयति–अप्फलइ–आफळणें.

दृष्टांत ८९—आउसेला सांगितला. 'तळमळीमध्यें कवणींचि विवेकू संभवेना : बुद्धीचि नाहीं : म्हणीतलें :' दृ०स्थ०. लापणिकेंत केशिराजव्यासांनीं या तीन 'वीरहीणींतील' फरक पुढीलप्रमाणें दिलेला आहे. 'तयाचां (पतीचां) पदार्थीं कींचित सूख होआवें : जैसा वीरहीणीचा। एकासि पदार्थ बूधि असे : पर सेवुं नावडे : जैसा दुसरीए वीरहीणीचा। एकासि पदार्थीं पदार्थ बुधि असेचि ना : मा सेवील काइ : जैसा तीसरीए वीरहीणीचा'. पहिल्या विरहिणीला पतीकडून आलेल्या निरोपामुळें अथवा वस्तूमुळें वियोगदुःखाचा विसर पडतो; दुसरीची त्या वस्तु पाहूनही दुःखाची तळमळ तिळमात्र कमी होत नाहीं; तिसरीला पतीखेरीज दुसऱ्या कोणत्याही पदार्थाचें भान नाहीं.

दृष्टांत ९०—पैठण येथें रामदेवास. घाली–'उदकाचे निर्मळपण राहावेया जळमांडवी (एक पानवेल) रोंवी'. बेंचळ–जुंबाड; 'बेंच'–पानांत अंतर्विद्ध असलेला कोंवळ्या पानाचा कोंभ (ज्ञा. अ. १५, १०३). कवळियावरि–दोन्ही बाहूंत कवटाळून वेलीच्या जुंबाड्यांच्या अनेक खेपा उपसून साफ केल्या. बाह्या भरैति–दंड भरून आले; दंडांत पेटके येऊन ते वळूं लागले. 'जेतुलीही जीवहेतूची क्रिया तेतुलीही जळमांडवीचि बोलिजे। कां जें हेत न पुरतां मन विक्षेपे : ये

विक्षेपीं विपरीत कखायादि दोष संचरति । तिये जळमांडवीतवं धर्मांचा अभाव होए ।' इ० स्थ०.

दृष्टान्त ९१—छर्दोबास अनुलक्षून रामदेवास सांगितला. अहीरदेश–अभीर–खानदेशाच्या उत्तर सीमेवरचा प्राचीन देशविभाग. करांडा–भरड; अर्धबोबडें. सीक्षें–शिष्यपरिवार. 'म्हातारी का म्हणितली : पुरुषार्थाची नव्हे म्हणौनि ।'; 'पहिला त्याग तोचि तामस घडला'; 'ऐसें पूर्वदोषप्रसवें अथवा अवांतर जोडीतवं दुःखासि पार नाहीं ऐसें होताये ।

दृष्टान्त ९२—चांगदेवास एलोपुरीं. 'म्हणौनि सर्व प्रकारें सावधेया वर्तावें' वर्तेवरि चाले–दोरखंडावर कसरत करणाऱ्या कोल्हाटणीस अनुलक्षून हा दृष्टांत आहे. 'हार्थेविण अंतराळीं । ब्रह्मगोळकाचें आढाल चाळी । चाले विन पाउलीं । कर्माचिये वर्तेवरी ॥' उ०गी०६०५; मग कोंता (भाला) खेंव देणें । वर्तेवरील धांवणें । सांडीं पडे खेळवणें । नागिणीचें तें ॥' ज्ञा. १८. ६५. वर्त–'नाडा तथा शस्त्रधार'. दाए-पसाए–'दाये ते यथास्थितीचें देणें : पसाये म्हणजे कळेसि रूप करुनि देणें । '. हाड गुड नुरे–'यासरिसें भीतरील दुःख तेंही ठिकरिया होए।'. गुडस्थानीं कणवही नुरे–'अंगुळियाचिया संदीं ठिकरिया होति :' अपूर्व–'अपूर्व देणें तें प्रेम'.

दृष्टांत ९३—पैठण येथें नागदेवास; 'सावधेया न वर्ते तरि घडला अविधि क्षणमात्रें अशेषा धर्मापासौनि धाडी'. धार–'जैसीया शस्त्राचिया तीन धारा निसीजेति : खर साहाणेची एक धार : दुसरी तेलसाहाणेची : तिसरी तूप साहाणेची । (इ० ४० पहा); 'ये दृष्टांतीं धर्मरूप क्रिया तर होए : धर्मविरोधिनी ऐसें जाणावें : जैसें शीतकाळीं चंदन : वरि वारा । '. हातपाये तुटति–'आचाराची दक्षता निर्पौनि काढी'. जन्म कडे पडे–'लेखीं लागे'; जीवितसाफल्य होई. 'वर्तेचा तो

परमेश्वर बोधें बोधवंत परि गर्वयुक्त : खर्गधारेचा तो आत्मसंभावनेतवं अदृष्टाभिमानी नोहे।' दृ० स्थ०.

दृष्टान्त ९४—छिन्नपापी येथें आउसेला; प्रसाद वाटतांना दोन चिमटी सर्वांस देण्याप्रमाणें नागदेवास न देतां त्याला आणखी देऊं काय असें चक्रधरांस विचारितां हा दृष्टांत सांगितला. कठिया–'भीक्षाहारीया : तीर्थकठीया : शास्त्रजिज्ञासेचा दृढ नव्हे।'. वेचला–मग्न, व्याप्त. गांवीचां जेउं–ग्रामभोजनास. गजबजौनि–'मागिलें संस्कारें सावध होउनि : तवं अदक्षतावर जाडयें व्यापला'; खडबडून घाबरलेला. पाए पसरुनि–'स्वभावसरळीं वर्तन करणें तेंचि पाए पसरणें'. स्तर्पण–सेवाशुश्रूषा. पारिसेनीचि–परिश्रय; पारुसेपणें. 'अन्य काळींची (सेवा) अन्य काळीं क्रिया करी'. आधीं–अविधिप्रसवापूर्वी. दांडेनि साइली पीटीं–'स्त्रीएची साइली तेही पडों नेदी : या नांव दांडेनि साइली पीटी'. लेंकुरवाळे जालेति–'पूर्वी नीलाग होति : आतां लेंकुरवाळे जालेति'. 'सेतडीया–शेतांवर खळयामध्यें जाऊन कणसादिकांची भिक्षा मागणें; गांवांत ती 'फेरी' व शेतांत ती 'सेतडी'; 'सेतडिया अथवा वैद्यक उद्यम करी'.

दृष्टान्त ९५—डोमेग्रामीं नागदेवास. भोगस्थान–देवतेचें स्थान. बरवें–भक्तिपुरःसर. दीसवडीचां दीसवडि–दिवसानुदिवस (अर्चा) वाढवीत जाई. कीर्तीचेंचि फळ–' लोकीं वानिलेया समाधान वाटे तेंचि फळ '; 'कीर्तिदेवतेचीं लोकादि स्थानें असति : परि सालोक्यतेमाजि।', ' एकें कीर्तिदोषचि वाया जात असे इयें अर्थी हा दृष्टांत असे।' वर्तेचा (दृ० ९२) दृष्टांत व हा कीर्तिकठियाचा दृष्टांत यांतील भेद दृ० स्थ० कारांनीं केला आहे; ' तेथ विकार–विकल्पकीर्ती ऐसी चारीं बोलिलीं : परि चारी दोष मिळौनि धर्मापासौनि जात असैल ऐसेंचि होये। (दृ० ९५) येथें कीर्तिदोषें वाया जात असे : वर्तेची (दृ० ९२) कीर्ती चर्या मिरविणें : तेणें विकार : विकल्प : विपरीतें तियें अंतें घडते

असति । येथ (दृ० ९५) आपणपे मिरविणें नाहीं : वर्तेचा तो आपणे-याकडे पाहे : हा आगळे चढवी । '

दृष्टान्त ९६--एलापुरीं चांगदेवास; 'नीरंतर स्मरण केलेयां ईश्वरासारिखा होए' भिंगुरटी–गांधीलमाशी. लिंपौनि जाए–'जैसी भृंगी कीटकीते स्वातंत्र्यें भृंगी करी आन उडौनि जाए तैसें'; कीटकी भिंगुरटी जाली : तिएनें आणखीये कीटकीसि भिंगुरटी केली : ऐसा प्रभाव चालत असे । ' दृ० स्थ०.

दृष्टान्त ९७—बेलोपुरीं आउसेला. कटंकटीयेमान–' कटंकटीए भणीजे देहे शेष उरऔनि असे : जैसा का वारेनि पडैल । बल : पुष्टि : पराक्रम : काईचि नाहीं । देहे शेषमात्र असे । '–भाष्यस्थळ. कृच्छ्–चांद्रायणादि देहदमनपर व्रतें. कडे पडे–' लेखीं लागे । '.

दृष्टान्त ९८—बेलोपुरीं आउसेला. ' तेंचि स्मरण आर्ति-पूर्वक केलेया सकळै वोखटें फेडुनि गोमटें करीति । ' कव्हणी एकि– ' एकी माता असे : तियेसि आवघीया लेंकुरवांचिया खावणीं (मनोधर्म) जाणणें नाहीं । आन जाणितलयाही पुरविती समृद्धि नाहीं । ना तेही जाली तरि स्नेहाळुवा नव्हेति । उदासा निष्ठुराचि असति : जैसी तुपा-भाताची माता (दृ० २५) ते उदासीना । स्नेहाळू आन समृद्धिया ऐसी कव्हणी एकि माता येथें सांगितली । ' दृ० स्थ०; 'अवघा जीवराशी लेंकु-रवें जाणावी'. झडती–सत्वर. झांकवले–अल्प समजावणींत समाधानाभास प्राप्त झालेले; (ज्ञा० १७ ३०५ पहा). बुझावी–'एकासि स्थान नमस्कार करितां तेथिचा महिमा कळावा हा हेत : तेंचि तया उमटवी आन तो तेणेंचि बुझावे । एकासि प्रसादसेवेचें स्मरण सांगे : एकासि चर्या सांगे । एकासि पाठ : एकासि अर्थ : एकासि दृष्टांत : एकासि प्रमेय : वोवी : गीत : चौपदी : श्लोक इत्यादि अर्थी बुझावीति । ' दृ० स्थ०; समानार्थक–' जैसी ओरसें धेनू । हुंबरत ये वच्छालागौनि । ना तरि बाळाची आर्ति देखौनि । जननी जेंवी ॥ ऋ० वर्ण० १५७.

दृष्टांत ९९—वेलोपुरीं आउसेला; 'जालें गोमटें जीवु कोमळज्ञानीं नेणें : सत्तज्ञानीं जाणें'. 'मी जेवीलां नाहीं : भुकैलांचि होतां' ही आर्ष वाक्यरचना आजकालच्या प्रचाराहून वेगळी आहे; सध्यां 'मी जेवलों नाहीं, भुकैलाच (निजलों) होतों' अशी संमत रचना आहे. 'आणिकी माता असति : तयांमध्यें एकी माता लेंकरुवाची भूक नेणौनि तुपाभाताचा घांस सुये। (द०२५) दुसरी पान्हा आलेया तयासि भूक लागली असैल ऐसें जाणें। (द० ३८) तिसरी भूक लागावी भणौनि हीरडेया बेहाडेयाचा गरळा दे। (द० ३९) चौथी तर डुळुकलैया पेहें दे। (द०४४) पर भूक नेणें। पांचवी हांवर घेतलेया सांकडीं पडौनि दूध दे। (द० ६८) सहावी तर बाळक टाकौनि जाये : मग झडति येऊनि कडे घेणेयाची आर्ती पुरवी। (द० ९८) तया आवघेयासारिखी सातवी (द० ९९) नव्हे : ते निजलेया बाळकाची भूक जाणे।'—द.स्थ.

दृष्टांत १००—पैठण येथें बाइसेला. कणबाबुळी–शेंवाळ; 'परि उदकीं जाली बाबुळी। ते उदकातें जैसी झांकोळी'—ज्ञा.७.६०; 'कां हातें मारूनि बाबुळी। जळ देखिजे' ॥ ज्ञा. ११. ७४. 'बाबुळी : सकळ मळांची कवळी : थोर धर्म लंघुनि साना आचरीति असे : तैचि बाबुळी।'.

दृष्टान्त १०१—पैठण येथें आउसेला. कव्हणें एकें साधनें—'डोळेयाचें देखतें साधन जैसा आदर्श : तेथ पाहिल्रेया डोळेनीचि डोळेयातें देखे। आन तयाचे क्षाळोलें कष्मल तेंही देखे। मा तर कव्हणें एकें साधनेंचि कां म्हणितलें : ना : जैसीं डोळेयाचीं देखतीं साधनें बहुतें असति : एकें उपनेत्रें : एकें विचित्रें अंजनें : तेहीं आणिक पदार्थ दीसति। पर डोळाचि डोळेयाते देखे ऐसे नव्हेति। तेथ विशेष जैसा आदर्शांचा : अथवा जळांत रूप पाहिलेयाचा।'. द० स्थ०.

दृष्टान्त १०२—'डखले' यास अनुलक्षून हा सांगितला : 'तर काइ (अपरोक्षीं) सविशेष देखे : ना : वेवधान असे तवं सत्ताचि

देखे । '. झावळें–' दुरी देखे तें झांवळें : भ्रंशित । '. समानार्थक– ' विचाराचेनि बळें । उघडती व्युत्पत्तीचे डोळे । तैं स्वरूप बुझाचे झावळे । बुद्धीचें फीटे ॥ " ज्ञा० प्र० ६८२. ज्ञा० ९. ७२ पहा. अशेष विशेष न देखे–' एकैके शक्तीचे अनंतत्व आन अचिंत्यत्व न जाणे । '.

दृष्टान्त १०३—वेलोपुरीं आउसेला. जागसुता (जागृत+सुप्त =जाग+सुत) ' अत्यंत निजैला ऐसा नव्हे : सावध । '; ' अपरोक्षज्ञानिया तोचि जागसुता जाणावा. ' लेइला–' लेइला तो गुणांचा थोवा : आन पांगुरला तो धर्मांचा थोवा । '. सत्ताचि देखे–' शाब्दीं अस्तित्व होतें तयाचें प्रत्यक्ष दर्शन । आतां सामान्य विशेष होउनि प्राप्ती होईलचि ऐसा निश्चय । ' इ० स्थ०.

दृष्टान्त १०४—पैठण येथें आउसेला : हस्तीं ओळघलां– ' कां स्वप्नींचा आभासे । भद्रजाती ॥ ' ज्ञा० २. १२१; ओघळलां– आरोहण केलें. ' अपरोक्षीं बहुरूपता : बहुकामता : तेणें सुखदु:खाचें क्षालण तें साच : परि प्रपंच तो लटका । '. लटीका–' मिथ्यामृगजळवत भासत असे '. समानार्थक–' जैसें स्वप्नामाजीं देखिजे । तें स्वप्नींचि साच आपजे । मग चेऊनियां पाहिजे । तवं कांहीं नाहीं ॥ ' ज्ञा० २. १३९. ' तीए ज्ञानीं प्रपंचाचा अहंभाव नीवर्तला.'

दृष्टांत १०५—पद्मनाभीस सांगितला. सागळ–उदकपात्र; ज्ञा० १३. ४१९ पहा. शौच्य केलें–शुद्ध झालों. खाराणी–क्षारयुक्त (शय्या) खारेपणा. ' विपरीत दोष ते साच । '.

दृष्टांत १०६—बीड येथें पद्मनाभीस. नीसीजे–पाजळणें; धार देणें; ज्ञा० १५. २५९ पहा. झळका–झिलई. पोगर–सुरीवर आलेलीं घर्षणजन्य अग्रें, ओरखडे; पातें घांसल्यामुळें धातूवर आलेले पापुद्रे; धार. ' पोगर नीवडे : मोक्षाधिकाराचीं चिन्हें उमटों लागती । '. आंब्रवती–आम्लरस : क्षारांत बुचकळणें–घालणें.

दृष्टांत १०७–पैठण येथें लखुबाइसेला. सुतला–सुत; निजैला; 'रजस्तमाचा निरास करूनि काम क्रोध लोभ तथा रागक्षोभादि अइता-ममतादि सकळ दोष विसरौनि गेला। तेंचि सुतणें।' चेये–जागिन्नला प्रयत्नीं वर्तला. ताहान–'जीवाचें जीवनप्रेम होवावे ऐसी आर्ती संचरली।'.

दृष्टान्त १०८—वेलोपुरीं नागदेवास. 'विशेषज्ञान जालेया प्राप्ती कां होआवी पा : ना : साधनापासौनि (पेक्षां) साध्य उत्तम भणौनि।' लिंगपातें–आद्य मळाचें परिसारण; अनादि अविद्येचें पटल नाहींसें होणें. स्वांग–सोंग; 'जैसें चिळसी आवगलें स्वांग। बीभत्साचें' ज्ञा० प्र० ७४५. (ज्ञा० १८, १३०२–३ पहा). जवनीके–जवनिका–पडदा; 'जयासीं जें आड राहे ते जवनिकाचि बोलिजे।'.

दृष्टांत १०९––खडकुळी येथें नागदेवास; 'म्हणौनि योग्य करुनि प्राप्ती करूनि : प्राप्ती परतें करण नाहीं।'. उखारलेया–क्षार-युक्त जळांत टाकलेल्या; (उत्+क्षारित); सवदनीये–(सौंदण) कापड धुण्याचें पसरट तोंडाचें पातेलें (सतेलें); 'ना लुगडीं चोखें होआवी। ऐसें आथी जीवीं। तरी सौंदणी न मनावी। मळिण जैसी॥' ज्ञा० १०८. १४१; अ० १३, ४६६. फुटे–मोका, उत्फुल्ल होई. योग्यता–'अधिकार पाप्ति.' समानार्थक–'ना तरि सांदनियेभीतरीं। वस्त्र चुरिजे पायवरी। उखारेना तयाबाहेरीं। या हेतू॥ पाटीं नेउ-नियां शिळें। जवं उपटीजेना बळें। तवं न संडिजे मळें। नुसद्धेनि उदकें॥ तें जवं जवं उष्णें तापे। तवं उजळे वोपें। चोखाळलेया जो रंग देपे। तो राहे तेथ॥ तैसें वैराग्यदु:ख–कष्टू। येणें दोष होति नष्टू। तैं अनन्य भक्ति वरिष्टू। संचरे जीवीं॥' ज्ञा० प्र० ८४८–५१. 'लक्षणपाठ : उद्धरण प्र० ५८–६६ पहा (श्रीचक्रधरोक्त सूत्र-पाठ).' जिये अधिकारीं साधनाचे न प्रभवे : तेथ तयाचें साध्य प्रभवैल म्हणतां बहुतर वीरुद्ध होत असे। म्हणौनि ज्ञानियासि मोक्ष : आणि भक्तासि अनुभूति देति। ऐसेंचि साध्य दंडक असति। ते

बुझावेया श्री दृष्टांत जाणावा । कापड उखारिजे : त्यावरि बींब राहे : नुखारिजे तरि न राहे। याचें साहित्य कैसें पा : ना : कापड म्हणितलेया सामान्य वाक्य : एक सपुर पुज्यें घतें असे : एक बाश्वतीवार (नित्योपयोगाचें ?) तैसें असे। मग तियें संवादनीयांतु चुरीजति : धुइजेति : वोपवीजेति : तेल खार देंउनि तपउनि धुइजेति : आणि तातु फुटे। मग हीरडें देइजेति : तेयावरि बींबटें रटाचें (रिठ्याचें) दाट दीजे : तरि चौळ चुरीजेति म्हणीतले। सातार्ही अधिकारांचें युक्तत्व : तेचि चुरणें। धुइजे म्हणीजे अयोग्य तें योग्य कीजे : तपवीजे म्हणीजे ज्ञान : प्रेमलक्षण : सूर्याचें रश्मी संचरीति। तयावर जैसे पाणी सीपीजे तैसे संनिधानीचे अथवा साधिकरणी असतीपरीचें दास्य घडविती : मग बहुता पाणियांत धुतलेया तैसीं चोखटें होती। तैसे तयाचे शब्दचरीत होउनि पुनःसंबंधा जन्मती : मग तेलखार दीजे : तिये स्थानीं अपरोक्ष : सामान्य बोलिजे। का जे : सत्तासामान्यज्ञानीं मिळौनि अशेष कर्मक्षाळण करी : अशेष मळक्षाळण करी। जैसी तेलखाराची मीळणी तैसीचि दोही ज्ञानियांची बोलिली। मग तेलखाराउपरि जैसें वोपत्रणें तैसें विशेषज्ञान सूर्याचें तेज संचरे। तयाउपरी धुईजेति : जैसी तैसी कृपास्पदीं अयोग्यता नासौनि अविद्या छेद करीति। ऐसें चोखटें होए। एणेंचि क्रमें : ज्ञानियाचें : साधन आचरतां : जीवस्वरुप चोखट होए : आणि भक्ताचें तर वैसलयाचि सकळही चरीतार्थ होए। मग तातु फुटे : म्हणीजे सलग्नाचा वासनाबंध तुटे : जीवाचां मोक्षीं चैतन्या मोक्ष भणौनि। डोळ्याचा मळ लागे ऐसे होए भणीजे जीवस्वरुपशुद्ध तरि जालें : पर तयाचा लेपाधिकार मोडला नाहीं। का : जे : लेपाधिकार्या प्रातीचेंही म्हणीतले म्हणौनि। मग तीयें हीरडीजेति : तैसीं पारांगत होउनि साध्याचियां प्राप्तीं साधननिवृत्ति होए : आणि तुरटीचें बींब ठेकी : तैसा यथाधिकार दाटचि सोवयें (?)। ना : पातळ दीजे तर पातळचि लागे। तया बींबडेयाचे भेद : अत्यंत कुशलतेचे :

तयासि सपुरा रेखा तिया पत्रवेली : कमळें : श्वापदादिकें असति । ऐसें तें सपुरा वस्त्रावांचौनि धोंगडीयावरि उमटेचि ना । म्हणौनि सपुरावर तेचि बींब दीजे : आन धोंगडियावर उमटें ऐसें धोंगडिया रेखाचें दीजे । तैं देतेया कर्तेयासि रूप होए : नाहींतर अकुशळता दीसे। का जे वस्त्राचा पडीपाड आणि बींब तेयांचाही पडिपाड न कळेचि : का जे जयाची रेखा केंसापसि सपुर : तें धोंगडीयावर कैसी उमटैल : ऐसें न कळेचि : यातव । मग रंगाचे भेद : साधारण असाधारण : मग जैस-जैसी वस्त्राची कोंवळीक : आन बींबडेयाचें सपुरत्व : ऐसें दोहींचें युक्तत्व जाणौनि तैसतैसा रंग चढवीति : तेचि कुशळ बोलिजेति। हें तयाचें साहित्य । तयाचेनि अभिप्रायें ज्ञानिया : भक्ताचे : अधिकारभेद जाणावे : तर तेचि कैसे पा : ना : जैसे एक सपुर एक धोंगडें कापड तैसें मूळाधिकारीं दोनी भेद : कापुसाची जाती तर एकचि : परि कांतणें : वीणकरी : तवं सपुर : धोंगडी : दोनी जाली। तैसे जीवराशी आवघां सारिखाचि असे : परि अहेतुक भजनाचां ठाइ दोनी भेद जाले । पुरभजने जयासि घडलें ते सपुर–वस्त्रस्थानीं बोलिजे : आणि भूतभजन घडले ते धोंगड–स्थानीं लाभे । तीयें दोन्हीं संवदणी-आंतु चुरीजेति : तर संवदणी भणीजे मनुष्यदेहे । तेथ पाहुनि प्राप्ती करावेया मनोधर्म धरीति : मग जे बींब दीजे तें टाके म्हणीतले । बींबडे देतां तो जैसा वेगळाचि असे : पर जें बींबडें तेचि तो पुरुष ऐसें नव्हे : तैसा बींब देता पुरुषु तो साधनापासौनि साध्यपर्यंत कर्ता : सर्वज्ञ । आणि जैसें बींबडें वेगळे तैसें अव्यक्त साध्यस्वरुप : जैसे बींबड्याचे सपुर : धोंगडे : दोनिभेद असति तैसेचि मोक्षानुभूतीचे दोनि भेद जाणावे । मा तो जैसा जया वस्त्रासिं साधारण : असाधारण रंग चढवी : तैसा साधनसाध्यदाता परमेश्वर : जयासि अनुभूतीचा अधिकार : तयासि अनुभूती : रतीचा रंग दे । आणि जयासि मोक्षाचा अधिकार : तयासि तोचि रंग दे :

तयाते साधारण म्हणितलें । आन भक्ताचा तो असाधारण बोलिजे। तया दोहीं दातृत्वाचा विस्तार पुढिला दृष्टांतीं (११०–११४) साकरपर्यंत स्पष्ट बोलिला असे।" दृ० स्थ०. या उताऱ्याच्या महत्त्वाबद्दल अन्यत्र लिहिलें आहे; परंतु यांतील वस्त्रधावनाचें साहित्य लक्षांत आणून जर ज्ञानेश्वराच्या प्रथमाध्यायांतील प्रख्यात मंगलाचरणाची 'पद-बंध नागर । तेंचि रंगाथिलें अंबर । जेथ साहित्य वाणें सपूर । उजाळाचें' (ज्ञा. १. ६)–ही ओंवी वाचली तर निघणारा अर्थ व आजकालचा रूढ असलेला अनुमानानें अंदाजलेला अर्थ, यांत केवढा मोठा फरक आहे, तें सूज्ञांच्या दृष्टीस येईल.

दृष्टान्त ११०—हिवरळी येथें नागदेवास. गंधिकाळिमा–जंग; 'तया लागतखेंवो परिसीं । धातूची गंधिकाळिक जैसी । जाती रजतमें तैसीं । तुटलीं दोन्हीं ॥ज्ञा० १८ २०९; अ० ४.६४ वस्तुत्व–केवळस्वरूप कैवल्यावस्था.

दृष्टान्त १११—बेलोपुरीं नागदेवास : 'चंदनाचां ठाइं सुशीतलता : सुगंधता : हे गुण इते आणिका झाडेळिसि आले । तैसें परिसाचा ठाइं कव्हणीचि गुण नसति : जे आणिकातें वेधुनि तेथ राहाती मा तर लोहाचें सोनें केलें तो वेधु कैसा नव्हे । ना : संयोग जाला हें होए : परि जैसी चंदनाची सुशीतळता सुगंधता झाडळीसी आली तैसा परिसाचा गुण लोहासी ऐसें नाहीं।'–दृ० स्थ०. मागे जो 'वेळुवाचा' (दृ० ३०) दृष्टांत सांगितला त्यांत निर्दिष्ट केलेला 'चंदन' साधनरूप होता; या प्रस्तुत दृष्टांतांतील चंदन साध्यरूप आहे, हा विशेष होय. 'ना : तेथ झाडळी बेधति : तयाचे विचित्र भेद : पर जयाचा जैसा अधिकार तैसतैसीं परमेश्वर शक्तिरूपें साधनदेति । तयांत ज्ञानिये : भक्त : वेधवंत : आणि इतर विद्यावंत : ऐसे अवघेचि लाभती । परि शक्तीसामर्थ्याचा व्यापार होए । आणि साध्यरूपें चंदनीं शक्तिविरहित केवळ

गाभयाचें अनुवर्तन। कां जे: परमेश्वर भक्तासि आपुली अनुभूति: रति देति: भक्तासि आपणपें समोर देति।' दृ० स्थ०; हें न ए– 'तयासारिखा तो न होए।' 'साध्यकाळीं जीव ब्रह्म न होए: ब्रह्मतुल्य होए।'

दृष्टान्त ११२—नाथोबास अनुलक्षून पैठण येथें सांगितला; 'दंदियाचा (दृ० ७४) दृष्टांत तो साधनरूप: हा साध्यरूप जाणावा।' पाठीसीं घाली–'आत्यंत मरणापासौनि राखे।'

दृष्टांत ११३—ढोरेश्वरीं नाथोबास. एरासि–'अनउद्यमी: आळसी: अन्यरत: अभिलाषी: अभिमानी: अन्यकथनी: अहंकर्ता: अधिक वृत्तीचा: भलतिये क्रीये अदक्ष: इत्यादि परीचा।' 'रायें अनेका स्त्रिया परिणियलया: परि राज्याची सत्ता ते पट्टाचिया कुमारासि।' 'ए दृष्टांतीं एकीची परमेश्वरस्वरूपीं भक्ता आणि ज्ञानियाचें स्वरूप मिसळलें: परि प्राप्ति अनारिसी। काजे: दोहीं वाट फांकली: तेथौनि वाक्येंचि आन। यांतु अर्थ असे तो कैसा: ना: साध्याचीए ठाऊनि साध्यव्हेरीं वाट फांकली: जेया पुत्रभक्तासि तेयासि कैवल्य-राज्याचा पटाभिषेक करीति: आणि बोधाचीए ठाउनि प्राप्तिव्हेरी वाट फाकली: जेया अनुसरलेया ज्ञानियासि तो शरणांगत दुःखापासौनि राखौनि ईश्वरस्वरूप पाठीसी घालीती: हें ए दृष्टांतीं तात्पर्य।' –दृष्टांतिकान्वय.

दृष्टांत ११४—गणपतीमढीं आउसेला सांगितला. एकदा चक्रधर महदाइसेला 'ब्रह्मानुभूति' विषयींची थोरवी सांगत होते. 'सर्वज्ञें म्हणीतलें: ब्रम्हानुभूति कव्हणाही जीवां नाहीं: बाइ:।: आउसीं म्हणीतलें: जी जी: गोसावी ब्रह्म: आम्हीं अनुभवित असो: नव्हे: यावरि सर्वज्ञें म्हणीतलें: मग तुम्हां नांव अनुभवदेवो म्हणा:' आउसेचें म्हणणें ऐकू सर्वज्ञांनीं या प्रसंगाला अनुलक्षून 'साकरेचा' दृष्टान्त सांगितला.

'साकर ते गोडीवाचक: सर्वोत्तम तयातें साकर म्हणीतलें।' होणेयापसि अनुभवीजे तें चांग। साध्यभेद तथा अनुभवभेद निरूपिला असे : भक्तासारिखा परमानंद नाहीं : जैसा तळेयांत तेलाचा थेंब घातला : तो हारपौनि जाए : तैसा हाही तीयें स्वरूपीं नास्तिभावें हारपौनि जाए : जीवाचें जीवत्व जाए : वस्तुत्व ए : मग वस्तुचि केवळ उरे: (लक्षण-पाठ, उ० प्रकरण. सूत्र ६५-; चक्रधरोक्त सूत्रपाठ). 'सायुज्यताप्राप्ति तेंचि ब्रह्म होणें:' 'उरलेंपण आणि भ्रांति नसुनि फळानंदाची प्राप्ति तो ब्रह्मानुभव। हें दान परमेश्वरावांचौनि देवताचां ठाइं न वर्तें म्हणौनि देवताफळाची व्यावृत्ति केली.' 'एवं चतुर्विधमुक्ति विलक्षण परमेश्वराचें दान निर्वचिजे : स्वातंत्र हा मोक्षु : परतंत्र हा बंधु : म्हणौनि। एका दीधलें आपणपें परि आणिका लागुनि अवेच यथा एका दीपापासौनि अनंत नेइजेति।— विदेहीबल्हो. 'ईश्वरीचें साधन द्विविध : एक भक्त : एक ज्ञानिये। प्रेम उत्तम : तैसें ज्ञान नव्हे : पर सकळ उद्धरणा ज्ञानचि कारण। ज्ञान व्यापक : का पा : प्रेम न व्हवौनि ज्ञान चरितार्थ करूं शके : तैसें ज्ञान न व्हौनि प्रेम करूं न शके। भणौनि सकळ उद्धरणा ज्ञानचि झारण : ज्ञातासहित प्रेम तें उत्तम।'–उद्धरणप्रमेय.

परिशिष्ट पहिलें

दृष्टांत–स्वरूपासंबंधीं

लक्षणरत्नाकर व बत्तीस लक्षणाची टीप

यांतील उतारे

परेणोक्तं प्रमाणं च सर्वबुद्धेरगोचरम्
येन दृष्टः प्रमेयान्तः तं दृष्टान्तं प्रचक्षते ॥
अंशग्राह्यः समग्रांशोऽन्वयोऽप्रत्यन्वयस्तथा
वास्तवो योगजार्थेषु दृष्टान्तः षड्विधः स्मृतः ॥

अथ अंशग्राह्याः सप्त। समग्रांशाश्छुरिकादयः। खाद्यादयोऽन्वयग्राह्याः। अप्रत्यन्वया दुर्बलाख्यादयः। योगजाः समुद्रवज्राकरादयः। वास्तवाः शर्करादयः॥ अंशाद्ग्राह्योंऽशग्राह्यः॥ समग्रैरंशैर्ग्राह्यः समग्रांशग्राह्यः॥ अपरपूर्वप्रकृतिसंबंधोऽन्वयः॥ एषां परस्परसंबंधो न विद्यते। व्यतिक्रमेण ग्राह्यः प्रत्यन्वयः॥ स्वरूपनिष्ठो वास्तवः॥ योगजो व्यक्ताव्यक्तसंबंधग्राह्यः। प्रत्यक्ष्यानुभवाद्ग्राह्या गुणजातिक्रियादिभिः॥३॥––(लक्षणरत्नाकर)

मागां प्रतिज्ञेसहित प्रमाण निरूपिलें : त्यें जीवासि बुझावया दृष्टांत होवावा लागे : म्हणौनि प्रमाणा अनंतरें दृष्टांतलक्षण :।: दृष्टादृष्ट नीरूपूनि तत्सादृश्यें दृष्टादृष्ट बुझविजे त्यें दृष्टांतसूत्र : त्येंचि समर्थ उदाहरण–अतिदेश–निपात भेदें त्रिविध :। : वचन : वचनार्थु : लापिका : उदाहरण : या चौचें अर्थान्वयें समर्थन त्यें **समर्थ उदाहरण** बोलिजे : **दृष्टांतस्थळ**

बोलिजे :। : पूर्वापर प्रकृतीचा समुच्चय तें केवळ उदाहरण बोलिजे :। : पुर्वप्रकृति तो **दृष्टांतु** बोलिजे :।: अपर प्रकृति तें **दृष्टांतिक** बोलिजे :।: दृष्टांतस्थळीं त्रिविधें दृष्टांतसूत्रें असेति :।: एकें महावाक्यसूत्रें : एकें प्रकरणसूत्रें : एकें वाक्यसूत्रें असेति :।: **महावाक्याचें** उदाहरण यथा **सुरीचां दृष्टांतीं** अठरां वाक्यांचें सूत्र : तें महावाक्यसूत्र :।: आणि **स्पर्शाचां दृष्टांतीं** एकविसा वाक्यांचें सूत्र तें महावाक्यसूत्र :।: आणि **वांदकरियाचां दृष्टांतीं** तेरा वाक्यांचें सूत्र त्यें महावाक्यसूत्र :।: एव-मादि :।: **प्रकरणाचें** उदाहरण : यथा : **समुद्राचां दृष्टांतीं** आठां वाक्यांचें प्रकरणसूत्र :।: तथा **ववाचां दृष्टांतीं** सां वाक्यांचें प्रकरणसूत्र :।: एवमादि :।: **वाक्याचें** उदाहरण :।: **राहाटघटियेचां दृष्टांतीं :** तथा **खाजयाचां** तथा **अन्नाचां** तथा **अमृताचां** एक एक वाक्य असे :।: एवमादि :। आतां समदळ विषमदळभेदें केवळ उदाहरण तेंचि द्विविध :।: दृष्टांत तें **पूर्वदळ :** दृष्टांतिक तें **उत्तरदळ :** दोन्हीं सादृश्यें जेथ असेति : त्यें **समदळ** उदाहरण जाणावें :।: तथा हि :।: उत्तरदळ जंगम : आणि पूर्वदळ तेंही जंगम : त्यें **समउदाहरण** बोलिजे :।: साजात्य वैजात्यभेदें समउदाहरण त्यें द्विध :।: जिया जंगमजाती उत्तरदळ वर्ते : तियाचि जंगमजाति पूर्वदळ वर्ते : त्यें **साजात्य** उदाहरण बोलिजे :।: उत्तरदळ मनुष्यजाती वर्ते : आणि पूर्वदळ पशुतीर्यंचादि चेतनजाती वर्ते : त्यें **वैजात्य** उदाहरण बोलिजे :।: उत्तरदळ मनुष्यजाती वर्ते : आणि : पूर्वदळ स्थावरादिजाती वर्ते : त्यें **विषमदळ** उदाहरण बोलिजे :।: एवं साजात्य वैजात्य विषम भेदें त्रिविध केवळ उदाहरण जाणावे : जंगम भणिजे चेतन पदार्थ : तयाचे भेद :।: चंद्र : मनुष्य : पशु : तीर्यंचादि :।: स्थावराचे भेद : समुद्र : हीरेखनि : कल्पवृक्ष : डोहो : खडक : गुंडा : फळ : एवमादि :।: ऐसें त्रिविध उदाहरण प्रत्येक षड्विध :।: एक उदाहरण **अंशग्राह्य :।:** एक **सम-ग्रांश :।:** एक **अन्वय :।:** एक **अप्रत्यन्वय :** एक **वास्तव :** एक **योगज :।:** वेधसंक्रमु तो साधनाचा अंशु बोलिजे : साधनांशसंचार बुझावया अर्थे घेईजे तो **अंशग्राह्य :।:** एवं दृष्टांतस्थळीं जेतुके दृष्टांत वेधसंक्रमपर : तेतुके अंशग्राह्य जाणावे : कां पा वेधसंक्रमु तो साधनाचा अंशु भणौनि :।: संनिधानीं समग्रांश साधनचरित बुझावया अर्थे घेइजे तो **समग्रांश :।:**

एवं दृष्टांतस्थळीं जेतुके दृष्टांत समग्रांशसाधनचरितार्थपर तेतुके समग्रांश जाणावे : कां पा साधन त्यें समग्रा अंशीं मिळौनि असे भणोनि :।। : देवताफळानंदव्यावृत्ति बुझावया अन्वयें घेइजे : तो **अन्वयग्राह्य** :।: एवं दृष्टांतस्थळीं जेतुके दृष्टांत : देवताफळानंदव्यावृत्तिपर : तेतुके अन्वयग्राह्य जाणावे :।: कां पां जेतुलीचि जीवाची क्रिया : तेतुलेंचि देवता फळ दे : एणेंसीं नित्यसंबंधु तो अन्वय : तेणें तो ग्राह्य भणौनि :।: जैसें जैसें जीवाचें करण : तैसे तैसें परमेश्वराचें असमर्थपण : हें जीवाचेनि व्यतिक्रमें घेइजे एऱ्हवीं परमेश्वरू तो सदा समर्थु : या परी परमेश्वराचें अव्हेरण बुझावया व्यतिक्रमें घेइजे तो **अप्रत्यन्वय** :।: एवं दृष्टांतस्थळीं जेतुके दृष्टांत अव्हेरणपर तेतुके अप्रत्यन्वय जाणावे : कां पां : दृष्टांत दृष्टांतिकाचें समान स्थान नाहीं भणौनि :।: स्वरूपनिष्टसाध्यानंद बुझावया जो दीजे तो **वास्तव** : एवं दृष्टांतस्थळीं जेतुके दृष्टांत साध्यपर : तेतुके वास्तव जाणावे : कां पा वस्तुसंबंधें निर्वचिले भणौनि वास्तव : आणि स्वरूपीं निष्टा पावले तेणें स्वरूपनिष्ट : ऐसें नांव पावलें भणौनि :।: असंनिधानधर्म बुझावया जो दीजे तो **योगज** : एवं दृष्टांतस्थळीं जेतुके दृष्टांत असंनिधानपर : तेतुके योगज जाणावे : कां पां : योग भणिजे संनिधान : त्या पासाव असंनिधानधर्मु जाला भणौनि : आणि योगज दृष्टांत व्यक्ताव्यक्तसंबंधें घेइजे : केवीं संनिधानीं असंनिधान : असंनिधानीं संनिधान : भणौनि :।। : सर्वज्ञें भणितलें-आद्यंतीं दैव : मध्यें पुरुषु :।: याचा त्रिविध अर्थु :।: प्रथम दैवाद्य :।: मग पुरुषाद्य :।: मग दैवांत :।: ऐसा त्रिविध उद्धरणव्यापारु बुझावया **दृष्टांतस्थळ** समस्त निरूपिलें : दैवाद्य चतुर्विध : प्रथम वेधसाधनसंचार बुझावया आद्य अंशग्राह्य सात दृष्टांत जाणावे :।: मग अपरफळानंदव्यावृत्ति बुझावया खाद्यादिक दृष्टांत अन्वयग्राह्य जाणावे :।: मग संनिधानीं साधनचरितार्थकरण बुझावया समग्रांशच्छुरिकादिक दृष्टांत जाणावे :।: मग साधनचरितार्थ नव्हता अव्हेरण बुझावया दुर्बळाख्यादिक दृष्टांत अप्रत्यन्वय जाणावे : हें **दैवाद्य** :।: असंनिधानधर्म बुझावया योगज दृष्टांत : समुद्र वज्राकरादिक जाणावे :।: हे **पुरुषाद्य** :।: साध्यानंदानुभव बुझावया वास्तव दृष्टांत : शर्करादिक जाणावे :।: साध्यानुभव देणें हें **दैवांत** : अव्यक्ताचें करण तें वास्तव

भणौनि :। : आतां उदाहरणाचें पूर्वदळ दृष्टांत शब्दें बोलिलें : तोचि दृष्टांत **अतीतविद्यमान** भेदें द्विध : **साक्षात्कारु** तो तिसरा :। : श्रुत कथारूप अतीतकाळीं वर्तला तो **अतीत** दृष्टांत :। : यथा वेवाचा :। : माळेकाराचा :। : खडेयाखुबट्याचा :। : बांदकरियाचा :। : लाडाचिये वासियेचा :। : वज्रकीटकियेचा :। : तुपाभाताचया घांसाचा :। : सुरीयेचा :। : रुंभणयाचा :। : एवमादि **अतीत** दृष्टांत जाणावे :। : आपणयां दृष्ट का लोकां दृष्ट तो **विद्यमान** दृष्टांत :। : यथा कुकडीयेचा :। : काकसूकराचा : सेवाळलया खडकाचा :। : पाणियांतुल गुंडयाचा :। : तनधैलया वावराचा :। : जारसलया वाळुकाचा :। : तथा भंवरलयाचा :। : तथा देहलुतेलेयाचा :। : तथा कोवळया वाळुकाचा :। : इंद्रावणाचा :। : एवमादि दृष्टांत ते आपणया दृष्ट बाहुल्यें असत :। : आतां लोकदृष्ट दृष्टांत : तयांचीं उदाहरणें :। : लोकदृष्ट :। : यथा समुद्राचा :। : सोमकांताचा :। : हीरेखनिचा :। : शब्दवेधिया रसाचा :। : विषयाचा :। : एवमादि दृष्टांत : ते लोकदृष्ट जाणावे :। : आत्मदृष्ट दृष्टांत तो **साक्षात्कार** : तयांचीं उदाहरणें : जैसा डोळयाचा :। : दुसरया डोळयाचा :। : जागसुतयाचा :। : स्वप्नाचा : खाराणियेचा :। : अग्निसंबंधाचा :। : एवमादी आत्मनिष्ट दृष्टांत जाणावे :॥॥ : आतां दृष्टांतिकाचें उदाहरण :। : दृष्टांताचेनि व्यवहारें जो अर्थू निर्धारिजे त्यें **दृष्टांतिक** :। : तेंचि **प्रमेय** : **विधायिक** : **सपक्ष** : **उपलवण** भेदे चतुर्विध :। : त्यामाजीं प्रमेय आणि विधायिक तें केवळ दृष्टांतव्यवहारें निर्धारिजे :। : अन्वय व्यतिरेके भेदें विधायिक द्विध :। : सपक्ष तें अतिदेशव्यवहारें निर्धारिजे :। : उपलवण त्यें निपातव्यवहारें निर्धारिजे :। : आतां अतिदेशाचे भेद :। : जैसा : तद्वत : त्याचिये परी : सारिखे : तुल्य : ऐसया : एहीं शब्दीं साम्यता : तो **अतिदेश** जाणिजे :। : **निपाताचे** भेद : रूपक : व्यधिकरण : निदर्शन :॥॥ : तेथ प्रमेयाचे लक्षण त्यें ऐसें :। : दृष्टांत आणि दृष्टांतिका क्वचित् साजात्य : क्वचित् वैजात्य : क्वचित् विषम : ऐसें असतां तेथिचेनि **गुणें** कां **धर्में** : कां **क्रिया** : एहीं तीहीं अर्थीं साम्यता प्रतिपादिजे तें प्रमेय :। : यथा ईश्वराचया स्पर्शातव एकां वेध संचरेति : एथ स्पर्शगुण असे :

म्हणौनि : कुकडीचा दृष्टांतु स्पर्शगुणसादृश्यें घेतला :।: एर अवघें वैजात्य :।: हें गुणाचें उदाहरण :।: आतां धर्माचें उदाहरण :।: यथा :।: ईश्वरसंनिधानीं पुरुषाचेनि उद्यमभेदें दातृत्व देणें आति :।: एथ दातृत्वधर्मु असे : भणौनि : समुद्राचा दृष्टांत दातृत्वधर्मसादृश्यें घेतला : एर अवघें वैजात्य :।: हें धर्माचें उदाहरण :।: आतां क्रियेचें उदाहरण :।: यथा :।: परमेश्वरसंनिधानीं जाली ब्रह्मविद्या जीवांचेनि करणभेदें एकां गोमटेया कारण होये : एका वोखटेया कारण होये : एथ पुरुषाचा क्रियाभेदु असे : भणौनि : हिरेखणीचा दृष्टांतु क्रियाफळसादृश्यें घेतला :।: येर अवघें वैजात्य :।: आतां गुणधर्मक्रियेचें उदाहरण :।: यथा :।: परमेश्वरू जीवासि बोधदातृत्व देउनि च्यान्हीं ज्ञानें निर्वाळूनि प्राप्तीसी ईश्वरस्वरूपा मेळवीति ::: एथ बोधदातृत्व हा धर्मु असे : च्यान्हीं ज्ञानें निर्वाळणें हा गुण असे : ईश्वररुपा मेळवणें हें क्रिया असे : भणौनि सुरीचा दृष्टांतु गुणधर्मक्रियासादृश्यें घेतला : एर अवघें वैजात्य :।: एवमादि प्रमेयभेद जाणावे :।।।: आतां **विधायिकाचें** लक्षण त्यें ऐसें ::: साजात्य दृष्टांतीं कां वैजात्य दृष्टांतीं कां विषम दृष्टांतीं तें अमुकां स्थानीं अमुकें : अमुकां स्थानीं अमुकें : ऐसी मुदला अर्थाचेनि अनुसंधानें सादृश्य कल्पना कीजे : तें **विधायिक** : तेंचि अन्वयप्रत्यन्वयव्यतिरेकभेदें त्रिविध : प्रमेयाचा अन्वयो घेउनि दृष्टांताचे सकळ भाग **गुणीं** लाविजेति : तें **अन्वय-विधायिक** ::: यथा सुचांरी दृष्टांतीं खातिस्थानीं परमेश्वरू : गांवस्थानीं कर्मभूमी : जेणें आणिलो तीयें स्थानीं देहाभिमानिनी देवता : सुरीस्थानीं अधिकार्या जीवु : दामस्थानीं देवतेसि आनंदु देति : वितंडणेंस्थानीं कर्म-राहाटीआंतुनि काढूनि दैवराहाटीआंतु घालीति ::: जेसे भट :।: आगीआंतु घालीति : तिये स्थानीं बोधदातृत्व : तावी पिटी उजरी : तिएस्थानीं धाववीति पव्हवीति : जुंझवीति : या परी एकें कर्में नाशीति : खरसा-हाणेस्थानीं अपरोक्ष : एथ कर्में नाशीति : तैलसाहाणेस्थानीं सामान्य : तेथ मळ नाशीति : तूपसाहाणेस्थानीं विशेष : तेथ अयोग्यता नासूनि योग्य करीति : परजस्थानीं चर्मदेह : रायस्थानीं स्वरूपाची प्राप्ति करीति :।: प्रमेयाचा किंचित अन्वयो घेउनि दृष्टांताचे भागु अर्थांतरीं घेइजेति तो प्रत्यन्वय : तो अनेकविध : यथा सुरीचां दृष्टांतीं **बासीं**

बोलिलें : खाती स्थानीं उभयदृश्या अवतारू : रायस्थानीं परदृश्या अवतारू : अधिकरण अवताराचया तोखातव दावोपसावो तो साधिकरणीं लाभे : मोक्षु देति : कां प्रेम देति : योग्य करूनि हातीं लावीति : अथवा बीजें करावयाची प्रवृति तरि अवतार अवतारा निरोवीति : न विसंबे तीये स्थानीं सुखावेगळा केव्हेळाही न करीति : । : सुरोचां दृष्टांतीं दुसरा प्रत्यन्वयो तो ऐसा : जैसा निमित्तविधीचा कष्टीं ताविला : आक्षेपाचां घाईं पीटिला : चतुर्विधासुखाचीए साहाणे लाउनि प्रेमासि पात्र केला :।: अयोग्यार्थप्रतिपादक दृष्टांत योग्यअर्थीं प्रतिपादिजेति तो **व्यतिरेकु** : । : यथा मैळाचोरु : तीयेंस्थानीं जो पुरुष तो परमेश्वरसाधना अयोग्य : तो गुणीं लाविजे : तो ऐसा : मैळेस्थानीं उत्तम अनुसरला : बांद धरी तियें स्थानीं इंद्रियार्थाचा निग्रह करी : मागुता नेदी तीयेस्थानीं सकळ देवताचया विघ्ना अर्ह नव्हे : ऐसा **व्यतिरेकु** जाणावा : ॥ : आणि सेवाळलें खडक तीयेस्थानीं व्यतिरेकें उत्तम अनुसरला : पावो देवोचि नये तीयेस्थानीं कव्हणाहीं विघ्ना आपलवुंचि नये : एवमादी व्यतिरेकु जाणावा: आणि उत्तमदृष्टांत तो हीने अर्थीं वाखाणिजे तोही व्यतिरेकु : जैसा रोंवतलया पशुचा दृष्टांतीं पशुस्थानीं विषयी : आडी दरडो चरे तीयेस्थानीं जेथ जेथ पात्र देखें तेथे तेथे रमे : । : एवमादि जाणिजे ॥ एवं **समर्थ उदाहरण** लक्षण : ॥।। : आतां अतिदेश लक्षण : । : दृष्टांत प्रधान असौनि जैसा तद्वत् : परी : सारीखें : तुल्य : ऐसें : एवमादि एहीं शब्दीं एकेचि वाक्यीं गुणादिकीं साम्यता द्योतविजे तो **अतिदेश** : । : तोचि त्रिविध : । : एकदल : द्वीदल : समदल : । : जैसा तो तैसा बाहुल्यें आणिकु नाहीं ऐसेनि निर्धारें व्यावर्त्यांचा अभावीं व्यावर्तकाची प्रशंसा ते एकदळ : । : यथा वैराग्य जैसें भर्तृहरीचें : । : गुरु विश्वासु जैसा म्हैळेयाचा : । : त्यागु जैसा खेईगोईचां : । : भक्ती जैसी रामाची लक्ष्मणें केली : । : जैसे द्वापरीं श्रीकृष्ण चक्रवर्ती : । : जैसें सैंहाद्रीं श्रीदत्तात्रेयप्रभु : । : जैसे द्वारावतीये श्रीचांगदेवराउळ : । : जैसे रुद्धिपुरीं श्रीगुंडमराउळ : । : एवमादि : । : व्यावर्त्य व्यावर्तकाचे एकेंचि वाक्यें समर्थन त्यें **द्विदल** : । : यथा : जैसा तुम्हां श्वानसूकराचा विखो : तैसा इंद्रादिकांसि तुमचा : । : चेइलया स्वप्नु लटिका : तैसा अपरोक्षज्ञानियासि

प्रपंचु मिथ्या :॥:॥ दृष्टांत दृष्टांतिक एकेंचि वाक्यें समर्थिजेति त्यें **सम-दळ** :।:यथा : वत् याचें उदाहरण :। : कर्पूरकज्जलिकावत् श्रीकृष्णचक्रवर्ती पुरत्यागु केला :।: मळवत्त्यागु तो निर्गुण :। : परि : पोळलया सुनयाचिचे परी असावें :। : "ऐसें" : लोहें पाणी गिळिलें ऐसयां होउनि असावें :। : "समान": तुम्हां बोडि गंगासमानचि कीं गा :।: "सारिखें" एथिचें सारिखें अन्यत्र आति :। : "तुल्य" : ब्रह्मतुल्य आनंद विघ्नत्वें प्रकटेति :। : आता सपक्षाचें लक्षग त्यें ऐसें :। : दृष्टांत आणि दृष्टांतिकाचा एकेंचि वाक्यें उद्बोध : तो **सपक्ष** :। : यथा : चेइलया स्वप्नु लटिका : हा **दृष्टांत** : तैसा अपरोक्षज्ञानियासि प्रपंचु मिथ्या हें **दृष्टांतिक** : या दोंचा एकेंचि वाक्यें उद्बोधु होये : एवमादि अनिर्देशसूत्रीं हें सपक्षवर्तन सर्वत्र जाणिजे :। : आतां **निपात** लक्षण :। : दृष्टांतु असौनि दृष्टांतिकाचा अभावो : कां दृष्टांतिक असौनि दृष्टांताचा अभावो : तें **निपात** सूत्र : । : यथा विरळा नांदे :।: एथ दृष्टांतिक नाहीं :। : आणि ऐंसीचि वस्तु ते । येथ दृष्टांतु नाहीं :: ऐसें निपातसूत्र :। : तेंचि **रूपक : व्यधिकरण : निर्देशन** भेदें त्रिविध :। : जैसें तद्वत् : परी : सारिखें :। : तुल्य : ऐसें : एवमादि सादृश्य वाचकां शब्दांचा अभाव असौनि दृष्टांतीं दृष्टांतिकें वर्ते त्यें **रूपक** बोलिजे : दृष्टांतभासु बोलिजे यथा : संसारु भणिजे हा दीर्घ स्वप्नुचि गा :।: दांत असत तेथ चणे नाहीं : चणे असत तेथ दांत नाहीं : ज्ञान असें तेथ वैराग्य नाहीं : वैराग्य असें तेथ ज्ञान नाहीं : हें वाक्य अन्वयसूत्रपाठीं असे : पोरिया एका कारणें सातापांचाचां सासुरवास साहिजे : मा विश्वाचा पति परमेश्वरु तेणेंसि धरणें मांडिलें तरि जगाचा सासुरेवासु साहावा कीं : दृष्टांतीं दृष्टांतिक न वर्ते त्यें **व्यधिकरण** :। : यथा : सेवंतयाचे अरळ खुपे तोचि खांडया भालयाचे घाय आडेदेव्हडे साहे :।: दांत असति तेथ चणे नाही : चणे असति तेथ दांत नाहीं :। : एका कोठाचे बैल भांडेति : झुंजेति : परि कुसिकुसीं दाटोनि वैसेति : । : तळिचिल हाणितिलेया वरिचिल पडे उतरंडि गडवडी :। : ज्ञानिया ब्रह्मीं मिसळे : बुडी दे :। : वोथंबा डावो देखे :। : पळे तो परतां लाहे :। : तिसरीये धारेवरि चाले ऐसा कवणु असे :। : तळहातें भालि

ह्मणावी :।। बिढारावरि काइं बिढार असे :॥॥: दृष्टांतसमवेत दृष्टांतिकाचा निपात एकींचि पदीं वर्ते त्यें **निदर्शन** :।: यथा : मुक्तीची चाड : आणि तेवीचि खुंटदावें सांभाळणें :।: येथ खुंटी म्हणौनि खुंट : ते स्त्रीवाचक होये : आणि खुंटाही वाचक होये : एवं दृष्टांत दृष्टांतिक एकेंचि पदें आळविलीं जाणावी :।: तैसेंचि बांधे : भणौनि दावें भणीजे : तरि : बंधनातें करि तें दावें होये : आणि संबंधीयेंहीं होति : तैसेंचि महारवाडाहुनि धर्म काढावा :।: महारवाडा संबंधियांचेनि योगें जाला : या परता अपवित्र ठावोचि नाहीं : म्हणौनि निदर्शन दीधलें : एथ एकींचि पदीं दृष्टांत दृष्टांतिक :।: तैसेंचि एथ प्रवृत्ति जाली तरि स्तंभा एकातें निमित्त करूनि बोलिजैल : स्तंभु स्तंभवाचकु : आणि : आचार्या वाचक दोघे आधारभूत : एकेंचि पदें आळविले भणौनि हें निदर्शन :।: तैसेंचि : तरि : खुंट गिळिजे : येथ खुंट शब्द खुंटी भणौनि खुंटावाचकु : वासनेतें खुंटी भणौनि निग्रह तोही खुंट :।: तैसेचि : स्त्री म्हणिजे मेंढियेचें खाजें : कांहीं करूं न शके ते मेंढो : ते उभयपक्षीं लाभे : भणौनि हें **निदर्शन** : आतां निपातव्यवहारें उपलवण जाणिजे : तया **उपलवणाचें** लक्षण :।: दृष्टांत असौनि दृष्टांतिक नाहीं तेथ दृष्टांतिक कल्पिजे : आणि दृष्टांतिक असौनि दृष्टांत नाहीं तेथ दृष्टांत कल्पिजे : ते **उपलवण** :।: यथा : विरळा नांदे : एथ दृष्टांत नाहीं : आणि : ऐसीचि वस्तु ते : एथ दृष्टांतिक नाहीं : तेंचि ऐसें कल्पिजे : जैसा : संग्रामीं विरळा वीरु नांदे तैसें : जैसे पुरुष आपुले करणीयें करितसांता तेथचि कीर्तीतें पावे : ऐसी दृष्टांतिक कल्पना : तेथचि माया संबंधातें पातली असे : आणि तेथचि न पवे : हा दृष्टांतु याचे दृष्टांतिक : जैसी माया न पवे ऐसिचि ते वस्तू न पवे : वस्तु म्हणजे चक्राख्य देवता : तेचि सर्वशक्ति : तेचि शुद्धज्ञानशक्ति : तेचि अस्तीपरि :।: एवमादि निपातसूत्रीं हें उपलवण जाणिजे :॥॥: आतां **दृष्टांता** आणि **उपमेसि** आणि **न्यायासि** भेदु दाखविजैल :।: गुणीं उत्कृष्ट प्रसिद्ध जे वस्तु त्यें उपमान बोलिजे :।: यथा चंद्रु :।: गुणीं साधारण अप्रसिद्ध जे वस्तु ते उपमेय बोलिजे : यथा : मुख :।: **उपमान उपमेयेसीं** क्वचित् **गुणें** तुल्यता : क्वचित् **धर्में** तुल्यता : क्वचित् **जाती** तुल्यता :

क्वचित् **क्रिया** : तुल्यता : ते **उपमा** बोलिजे :। : यथा चंद्रवत् मुख :। : एवं उपमेसी आणि हीनेसीं जे गुणादिकी साम्यता ते **उपमा** ऐसा अर्थ : । : **उपमेय उपमानेसीं** जे तुल्यता ते क्वचित् गुणें क्वचित् धर्म क्वचित् जाती क्वचित् क्रिया ऐसी जे तुल्यता तो **दृष्टांत** बोलिजे :। : यथा खातीस्थानीं परमेश्वरू :। : एवं हीनेसीं आणि उत्तमेसीं जें गुणादिकीं साम्यता तो दृष्टांतु ऐसा अर्थु : या परि जेतुके दृष्टांतीं वर्तमान अर्थ ते अवघे हीनचि : आणि दृष्टांतिकी वर्तमान जे अर्थ ते अवघे उत्तमचि : कां पा : परमेश्वरू आणि कुकडी : मासोळी : कासवी : शब्दवेधी : समुद्र : हिरेखणि : सोमकांतु : वेव : राहाटघटिका : एवमादि :। : तैसेंचि उपमेचा ठाइं उपमान जे अर्थ : ते अवघे उत्तमचि : आणि उपमेय जे अर्थ ते अवघे हीनचि : कां पा : कें चंद्र आणि कें मुख : जैसाचि तो तैसाचि हा : ऐसी उभयतांसि साम्यता दीजे : ते समर्थ उपमा बोलिजें : यथा : जेचि गति यशोदे तेचि पुतने : जेंचि देवाचया मातयापितया : तेंचि भक्ताचया : एवमादि क्वचित् समर्थ उपमेतें **न्याय** भणिजे :। : यथा : मायाचक्रभ्रमणन्यायें पर्यायवशें जीव सकळही पावे : एक वांचौनि : मायाचक्र म्हणिजे भवचक्र : म्हणिजे संवत्सरचक्र : त्याचा न्याय म्हणिजे सारिखेपण : चतुर्विध कर्मफळोद्यम नासी :। : आतां न्याय : असाधारण धर्मबळें व्यतिरेकें साधारण धर्मीचि कल्पना कीजे तो **न्याय** :। : यथा आत्मज्ञानें मोक्ष : येणें न्यायें भणिजे असाधारणधर्में करूनि आत्मज्ञान व्यतिरिक्त मोक्षु नव्हे : ऐसी साधारण धर्माची कल्पना उदैजे :। : तैसेंचि एकीचि ब्रह्मविद्या मोचक : ऐणें न्यायें एरीं अनेका विद्या मोचका नव्हेति :। तैसेंचि एथिचयासि प्राणापदीची पीडा नाहीं येणें न्यायें : अन्यत्र सकळ फळीं अंतीचें दुःख आति। यापरी दृष्टांता आणि उपमे आणि न्यायासी लक्षणभेद जाणिजे ॥ एवमादि दृष्टांतसूत्रें जाणावी ॥ एवं दृष्टांत लक्षण ॥

—बत्तीस लक्षणाची टीप.

परिशिष्ट दुसरें

दृष्टांतपाठाचें केशिराजबासकृत लापणिक

॥ श्री परेशाय नमः ॥

१ उद्धरण तें मनुष्यअवतारेंचि आति : परि तेथीचि विशेषु : परदर्श्यत्वें प्राप्ति करणें आति। जैसा **आंतुलाचा** ॥१॥ अवरदर्श्यत्वें सकळहि विद्या देणें आति : जैसा **वाहीरिलाचा** ॥२॥ उभएदर्श्यत्वें सकळही देणें आति : जैसा **उंबरेयावरिलाचा** ॥३॥

२ तेंचि देणें चतुर्विधापरी : स्पर्शद्वारें देणें आति : जैसा **कुकडीयेचा** ॥४॥ दृष्टीद्वारें देणें आति : जैसा **मासळीयेचा** ॥५॥ अंतःकरणद्वारें देणें आति : जैसा **कासवींयेचा** ॥६॥ शब्दद्वारें देणें आति : जैसा **शब्दवेधिया रसाचा** ॥७॥

३ पुरुषाचेनि उद्यमें देणें आति : जैसा **समुद्राचा** ॥८॥ परि ब्रह्मविद्या ते अधिकार्यासीचि संचरे : जैसा **सोमकांताचा** ॥९॥ जाली ब्रह्मविद्या जीवाचेनि करणें एका गोमटेया कारण होए : एका ऊखटेया कारण होए : जैसा **हीरेखाणियेचा** ॥१०॥

४ एसणा लाभु जाणौनि ईश्वरूही देता परि एकु अल्पेचि मागेति : जैसा **वेंवाचा** ॥११॥ तें काइ मागावें असे : तें सकळही कर्मवसेंचि पावैल : जैसा **राहाटघटियेचा** ॥१२॥ कर्मवसें पातलें दुःख भोगितां देखौनि जीवीं अनुकुंपा उपजो नेदावी : जैसा **माळेकाराचा** ॥१३॥ सुखदुःखें पावे ऐसी सामग्री जीवीं असतूंचि असे : जैसा **डोळे-**

याचा ॥१४॥ संतसामग्रीया परमेश्वरू आसलागु ऐसी वृधि उपजे : परि तो काइसेनही न पविजे । जैसा : **खडेयाखुबटेयाचा** ॥१५॥ ईश्वरें भणितळें तें केलेया पाविजे : परि जीवु वैजातीऐं न करीति : जैसा **वांदकरीयाचा** ॥६१॥ हो कां : साजात्या विषयात्मकांचें भणीतलें केलेया कांहीं गोमटें आति : ना नाहीं : जैसा **काकसुराचा** ॥१७॥ कां नाहीं : ना : तें परतारकु भणौनि वरि वोखटेंचि आति : जैसा **लाडाचीये वासीचा** ॥१८॥ एवं बंधनीवृतिलागीं जें जीवु करी तेणें अधिका बंधुचि लागे : जैसा **बांधलीये गाईचा** ॥१९॥ बंधुच न नासे : मा अवीद्या कांइ नासैल : जैसा **वज्रकीटकीयेचा** ॥२०॥

५ तर जीवाचें करण कांइ वायाचि जाए : ना : न वचे : कांहीं कांहीं होए : जैसा **खाजेयाचा** ॥२१॥ परि संसारनिवृत्ति नोहे : जैसा **अन्नाचा** ॥२२॥

६ मोक्ष जालेया संसार निवृत्ति होए : जैसा **अमृताचा** ॥२३॥

७ कां नोहे : ना : संसाराचें बीज उरलेंचि असे भणौनि : जैसा **वट-बीजाचा** ॥२४॥

८ ऐसें हें ज्ञान ईश्वरूही देता कांइसेनि एकें धालेपणें नेघेति : जैसा **तुपाभाताचिया घांसाचा** ॥२५॥ एकें तामसें : क्रूरवासना काटले : ते अनिधिकार्ये : तेयासि परमेश्वरू ज्ञान नेदीति : जैसा **सेवा-ळलिया खडकाचा** ॥२६॥ एकें कठीणा अंतःकरणाचें संनिधानीं असतांही परमेश्वरधर्मा योग्य न होति : जैसा **पाणीयां आंतुल गुंडेयाचा** ॥२७॥ एकें राजसें : रजोवासना दाटले : ते परमेश्वरधर्मा योग्य न होति परि केलेया होति : जैसा **तनधैलिया वावराचा** ॥२८॥ एके आपण अयोग्ये : अणिकां योग्यातें अयोग्यु करीति : ऐसेहीं एकु आति : जैसा **कानवाथराचा** ॥२९॥ अंतःकरणशून्य ते अधिकार्ये न होति : जैसा **वेळुवाचा** ॥३०॥ एके वएसा अतित : ते धर्म नीरुपीता दोषुचि घेति : तें अनधिकार्यें : तेयातें परमेश्वर ज्ञान नेदीति : जैसा **जारसैलेया वाळुकाचा** ॥३१॥ एके भक्तिजडे : तेयाचें अन्यथाज्ञान न फीटे :

भणौनि धर्मा योग्य न होति : जैसा **अव्ररैलेया वाळुकाचा** ॥३२॥ एके कर्मजडे : तेयांसि साक्षि ठाकोंचि न ए : जैसा **देहलुतैलेया वाळुकाचा** ॥३३॥ एके कोमळ निर्दोषे : ते सर्वाधिकार्ये : तेयांसि ईश्वरु ज्ञान देति : जैसा **कोवळेया वाळुकाचा** ॥३४॥ एके उभए जरठ : अविद्या त्यागीं दक्ष न होति : तें अनधिकार्ये : तेयांसि परमेश्वरू ज्ञान नेदीति : जैसा **इंद्रवणाचा** ॥३५॥ एके अन्यथाज्ञानें प्रतीकूळ करीति : तेयाचें वोखटें नेघौनि परमेश्वरु ज्ञान देति : जैसा **सन्निपातलेयाचा** ॥३६॥ परि आर्तावांचौनि नेदीति : जैसा **विषयाचा** ॥३७॥ एकाचि आर्ति जाणौनि दुरौनि देति : जैसा **दूरस्थ मातेचा** ॥३८॥ एकासि आपणचि आर्ति उपजौनि ज्ञान देति : जैसा **हीरडेया बेहाडेयाचा** ॥३९॥ या परी शाब्दाचीए ठाउनि प्राप्तिपर्यंत आपणचि करीति : जैसा **सुरीयेचा** ॥४०॥ एके अन्यथाज्ञानें परमेश्वरदास्ये भणौनि करीति : परि तें नव्हेति : जैसा **रुंभणेयाचा** ॥४१॥ कां करीति : ना : सारिखे देखेति भणौनि करीति : जैसा **चांदोवेयाचा** ॥२॥ एक सारीखें देखौनि तेंचि परत्वें नीरोपीति : भणौनि परमेश्वरुज्ञान तें कव्हणाही नाहीं : पर देति तयासीचि होए : जैसा **हस्तोचा** ॥४३॥ ईश्वरा देता एके अनधिकारें विसरेति : परि वासना उरलीचि असे : तेयासि पुडती पुडती नीरोपीति : जैसा **डुळकैलेया बाळकाचा** ॥४४॥ एकु बुद्धिदोषें विसरे कां आणिकाप्रति बोले : तेयातें परमेश्वर उपेक्षीति : जैसा **कपालपरीक्षेचा** ॥४५॥ एकु सायासें परिसे : परि धाडीता वेळुचि न लगे : तेयातें परमेश्वरु विशेषे उपेक्षीति : जैसा **मोदळेयाचा** ॥४६॥ भणौनि आइकीला अर्थु मनन करुनि हृदएगाम्य करी : तयासीं तीन्हीं होति : जैसा **रोवंतलेया पशूचा** ॥४७॥ एकु जाणौनि ईश्वराचें भणितलें न करीति : तें एरांपसि अधमु : जैसा **कर्मचांडाळाचा** ॥४८॥ एके सवेतवं दुःखरूपा अविद्या वोवांडलें जाति : जैसा **पडाळीये गाईचा** ॥४९॥ भणौनि परमेश्वरू बळें धर्मीं न घालीति : ज्ञान देऊनि उत्तराइ होति : जैसा **माळेकाराचा** ॥५०॥ प्रवर्तले तरि सकळही गोमटें आपणचि करीति : जैसा **आयाचग्रासीयाचा** ॥५१॥ भणौनि ईश्वराकारणें जीवें सकळही आंगवावे : जैसा **दीक्षीतकन्येचा** ॥५२॥ आंगवीजे ऐसें कांहीं नाहीं पा : परि

केवळ अनन्यताचि पुरे : जैसा **कुर्ष्टीयाची** ॥५३॥ ईश्वराचीए अनन्यते-तंव व्यवहारावरील बुद्धि काढीली देखौनि लोक वायां गेला भणति : परि तो काइसेनही न वचे : जैसा **परीसाचा** ॥५४॥ एक दृष्टींची वाया गेला भणति : परि परमेश्वरें धरीलेया वाया न वचीजे : जैसा **वानरीएचा** ॥५५॥ धरणें तें ऐसें : धड तुटलेयाही परि जीवें ईश्वरातें न सोडावें तेंचि या लाभातें पावे : कां :- प्राप्ति होए : जैसा **मार्कोडेयाचा** ॥५६॥ एक वायाचिविण उबगलें जाति : तें तेयां लाभा चुकेंति : जैसा **व्यतीपाताचा** ॥५७॥ एके शारीरें मानसिकें दुःखें ईश्वरापासौनि पावति : पर त्रसेति ना : तें ब्रम्हविद्येचें पावति : जैसा **कोलाचा** ॥५८॥ एके त्रसेंति ना : परि आज्ञा भंगीति : तेयातें परमेश्वरू अव्हेरीति : जैसा **इसाळुवाचा** ॥५९॥ एके सोच्य त्रसले जाति : तयातें परमेश्वर त्रसवीति ना : जैसा **झाडीलेया पुसीलेया पशूचा** ॥६०॥ एके आवघे जन्मे नेदीति : तोकडेंचि देति : तेहीं तेया लाभातें पावति : जैसा : **सामान्य स्त्रीयेचा** ॥६१॥ हेतुविण सकळही दास्य कीजे : तें जन्म देणें बोलिजे : जैसा **दासीचा** ॥६२॥ तेंचि दास्ये जीव वेचलेपणे करी : तेयांसि परमेश्वरू सकळै गोमटें करोति : जैसा **पतीव्रतेचा** ॥६३॥ तेंचि गोमटें जीवातें व्यापारवीति व्यापारवीति करवीति : जैसा **चाटसीएचा** ॥६४॥ कर्में तीयें संनिधानीचि क्षाळीति : जैसा **अग्निएचा** ॥६५॥ उत्तरोत्तर ज्ञान देउनि मळ तेही संनिधानींचि क्षाळीति : जैसा **फुटाणेकाराचा** ॥६६॥ या परी मळनिवृति करुनि प्राप्तीयोग्य करीति : जैसा **गुळहारीयाचा** ॥६७॥ जीवाचेनि आग्रहें जीवा उतमसाधन देति : जैसा **दुबाळिए मातेचा** ॥६८॥ साधनाचेनि ज्ञानें साध्याचें उत्तमत्व जाणावें : जैसा **वृक्षत्वचेचा** ॥६ ॥ उत्तम साधना जालेया सकळै साधनें जालीं होति : जैसा **पाणिचोरियाचा** ॥७०॥ ऐसें हें ज्ञान जाणौनि आणिकें सुखें न सेवी तयासीचि होए : जैसा **चातकाचा** ॥७१॥ आणिका देता काइसेनही नेघे : ऐसीए अनन्यते ईश्वर आपणेया समान करीति : जैसा **सोंदेराणेयाचा** ॥७२॥ तो अनन्यता करी : पर कर्मे तीए चेष्टवीति कीं : ना : ते वेवस्ता ईश्वरें आधीचि केली असे : जैसा **रीणाइताचा** ॥७३॥ कर्माची वेवस्ता पा तैसी : पर प्रतिकुळा विघ्न करिति कीं : ना : तया

सनिधानीं रीगों न ए : जैसा **दंदींयाचा** ॥७४॥ प्रतिकुळा पा रीगावा नाहीं : पर मनोधर्म नेति कीं : ना ते सनिधानीं न बधीति : जैसा **अग्नीसंबधाचा** ॥७५॥ या परी राखीलें ज्ञान जारठच जालेया काइसेनही न वचे : जैसा **वटरोपाचा** ॥७६॥ अवचटें घडलें अनीष्ट प्रएत्नें मागुता बळासि ए : पर राजवाहक नव्हे : जैसा **तुरंगमाचा** ॥७७॥ मानसीक नीरोध साहीलेया दोन्ही होति : जैसा **ब्रह्मचारी घोडेयाचा** ॥७८॥ म्हणौनि विषयातें दृष्टीही न पाहावें : जैसा **ऋषीश्रृंगाचा** ॥७९॥ दर्शन जालेयाही परमेश्वरुअर्थीया तो विषयीं न रमे : जैसा **राजहंसाचा** ॥८०॥ अल्प सेवी तयाचें केतुलें एक अनीष्ट न सेवी : उपसाहाति : जैसा **डींगरेयाचा** ॥८१॥ अनीष्ट न सेवी तयाचा केतुला एकु स्वभाव उपसाहुनि सकळै गोमटें करीति : जैसा **दुसरीया इसाळुवाचा** ॥८२॥ तैसेयाची उपसाहाति : ना : जेणें आपणपें दीधलें तयासीचि आपणपें देति : जैसा **द्विभार्येचा** ॥८३॥ आपणपें दीधलेयाही परमेश्वरु काइसेन एकें उदासीन जालेया पर सनिधाना न संडीत असिलेया तयासि सकळै गोमटें करीति : जैसा **दुर्भगेचा** ॥८४॥ सनिधान नाहीं पा : तेणेंचि धर्में वर्तावें : जैसा **शय्यापालनेचा** ॥८५॥ कैसे वर्तावें पा : ना : काइसेनही सुख व्हावें : जैसा **पोळलेया सुनेयाचा** ॥ ८६ ॥ तयाचा पदार्थीं कींचीत सूख होआवे : जैसा **वीरहीणीचा** ॥८७॥ एकासि पदार्थ बूधि असे : पर सेवीना : जैसा **दुसरीए विरहीणीचा** ॥८८॥ एकासि पदार्थीं पदार्थबुधि असेचि ना : मा सेवील काइ : जैसा : **तीसरीए विरहीणीचा** ॥८९॥ ऐसेयासि धर्ममीषें संचरली अवीद्या तर अशेषा धर्माचा अभावो करी जैसा **जळमांडवीएचा** ॥९०॥ अभावो करी इतुलेचि : ना : दृष्टीचि महंता दुःखातें दे : जैसा **अहीरदेसींचीए म्हातारीएचा** ॥९१॥ म्हणौनि सर्व प्रकारें सावधेया वर्तावें : जैसा **वर्तेचा** ॥९२॥ सावधेया न वर्ते तर घडला अवीधि क्षेणमात्रे अशेषा धर्मापासौनि धाडी : जैसा **खर्ग–धारेचा** ॥९३॥ एक प्रसवत प्रसवत धाडी : जैसा **कठियाचा** ॥९४॥ एक अवीधि तरि न करी : पर विधीचि केलेया जाए : जैसा **कीर्तिकठियाचा** ॥९५॥ नीरंतर स्मरण केलेया ईश्वरासारीखा होए : जैसा **भींगुरूटीएचा** ॥९६॥ तेंचि

स्मरण काइसेन होववे पा : ना : देहदमन : जैसा **बाळवीधवेचा** ॥९७॥ तेंचि स्मरण आर्तिपूर्वक केलेया सकळै वोखटें फेडुनि गोमटे करीति : जैसा **लेंकुरवाळीए मातेचा** ॥९८॥ जालें गोमटें जीवू कोमळज्ञानी नेणें : सत्ताज्ञानी जाणे : जसा **निद्रिस्तक्षीरपानाचा** ॥९९॥ तेचि सत्ताज्ञान मळातें सारौनि संचरीति : जैसा **बाबुळीएचा** ॥१००॥ मग आत्मेनीचि आत्मेयातें देखतां होए : जैसा : **डोळेयाचा** ॥१०१॥ तर काइ (अपरोक्षीं) सविशेष देखे : ना : वेवधान असे तवं सत्ताचि देखे : जैसा **दूरदृश्याचा** ॥ १०२॥ वेवधान फीटे : समग्र अज्ञान नीवर्ते तवं सत्ताचि देखे : जसा **जागसूतेयाचा** ॥१०३॥ तीए ज्ञानीं प्रपंचाचा अहंभाव नीवर्तला : जैसा **स्वप्नाचा** ॥१०४॥ अहंभाव नीवर्तला पा : पर मळ क्षाळिलेयाविण न फीटति : जैसा **खाराणीएचा** ॥१०५॥ मळक्षाळण जालेया विशेष ज्ञान देति : जैसा **आंबवतीचा** ॥१०६॥ विशेष ज्ञान जालेया जवं अज्ञानाचें कारण असे तवं प्राप्तीयोग्य नव्हे : जैसा **चेइलेयाचा** ॥१०७॥ विशेष ज्ञान जालेया प्राप्ती कां होआवी पा : ना : साधनापासौनि साध्य उत्तम म्हणौनि : जैसा **जवनीकेचा** ॥१०८॥ म्हणौनि योग्य करूनि प्राप्ति करीति : प्राप्तीपरतें करण नाहीं जैसा **उखारलेया वस्त्राचा** ॥१०९॥ संबंधें जीवाचें जीवत्व जाए : वस्तुत्व ए : जैसा : **परिसाचा** ॥११०॥ ईश्वराचें सकळै गुण एति : परि तो ईश्वरू नव्हे : जैसा **चंदनाचा** ॥१११॥ एका अनीष्ट नीवृति करीति : जैसा **शरणांगताचा** ॥११२॥ एका इष्टप्राप्ति करीति : जैसा **राज्याभिषेकाचा** ॥११३॥ अनिष्टनीवृतिपसि इष्टप्राप्ति ते दुर्लभ जैसा **साकरेचा** ॥११४॥ एवं दृष्टांत लापणीक ॥:॥

परिशिष्ट तिसरें.

केशिराजबासकृत दृष्टान्तस्तोत्रम्

देवो दधन्मनुजतां परदृक् क्वचित्स्यादन्तस्थवत्वपरदृक् च बहिस्थवत्स्यात् । धत्ते परापरदृशं करुणानिकेतो वास्तुस्थितोऽन्तरबहिर्दृशिवत्परेशः ॥१॥ स्पर्शेन कुक्कुटशिशुः स्वदृशाथमीनः कूर्मो हृदा जगति जीवति वै जनन्याः। आलापतः कनकतां नयतेऽष्टलोहं सच्छब्दवेधिसुरसः शतयोजनेऽपि ॥२॥ स्पर्शावलोकनमनोवचनैस्तथेशो जीवाय वेधसुधनानि ददाति देवः। तं जीवजीवनकरं सदयावलोकं वांछे विहाय विषयान् परचक्रपाणिम् ॥३॥ कर्पादिकैः कश्चिदुपैति तोषं कश्चित्सुरत्नैरपरस्त्वनर्घ्यैः । यथा समुद्रेऽमित-रत्नराशौ विचित्रलाभं प्रलभन्ति पान्थाः ॥४॥ तथा परेशेऽमितलाभरूपे लब्ध्वा वरं किंचन सर्वलाभं । मन्यन्ति चैकेऽमितबोधतोऽन्ये विन्दन्ति मुक्ति [१]तमहं समिच्छे ॥५॥ करैः सुधाशोरिव सोमकान्तः सुधाद्रवी नैव शिलान्तराणि । तथा [२] परेशेऽमितवेधलाभं यथाधिकारं प्रलभन्ति [३] नैके ॥६॥ वज्राकरे हीरककामुकानां व्रजन्ति केचित्कणिकासु तुष्टिं । अन्ये पतत्कूल-निपीडताङ्गाः केचिल्लभन्ते कृतिनः सुरत्नम् ॥७॥ तथा परेशं प्रसमीक्ष्य केचित् तुच्छान्यलाभादभवन्कृतार्थाः । अन्ये च विज्ञाय परं परस्मात् प्रमादिनोऽगुर्भवशून्यतां ते ॥८॥ केचिन्निजार्थे निपुणप्रयत्नाः स्वनाथसाहाय्यदृढीकृतार्थाः । कैवल्यरत्नं कुशला लभन्ते येनेश्वरेणेति तमाश्रयेऽहम् ॥९॥ * ॥ प्राप्यापि कल्पकतरुं प्रवृणोति मूढस्तं वायको वयनसाधनमेवमीशं । लब्ध्वाऽभिवाञ्छति जनः कुणपोपभोग्यान् भोगान-नाथचरणाब्जरजः पवित्रम् ॥१०॥ [आपूरणागमनरेचनयानमित्थं यन्त्रे

---

१ तमहं दिदृक्षे । २ तथैव नाथे । ३ न लभन्त एके ।

निबद्धघटिकासु चतुर्विधत्वं । एवं क्रियाफलचतुर्विधतामुपैति चिच्चक्रसंभ्रमवशात् क्रमशो हि जीवः ॥११॥ * ॥ क्वचिच्च चोरेषु धृतेषु हन्तुं सन्नीयमानेषु विलोक्य लोकः । हा हा वृथैषां वध इत्युवाच न मंचकारस्तदकर्मवेत्ता ॥१२॥ एवं प्रभुर्जीवकृतं विजानन् कर्मानुरूपं फलमश्नुवत्सु । जीवेषु रुष्टे समुपस्थितेऽपि जनोऽनुकम्पी न परः श्रयेत ॥१३॥ * ॥ सामग्रीद्वयसंयुतं हि नयनं वृद्धा यदा तैजसी । रत्नान्तस्थितमीक्ष्यतेऽथ पिशिते वृद्धे तदान्धो भवेत् ॥ जीवोऽज्ञानविवृद्धिरेति जडतां विद्याभिवृद्ध्या सुरानोक्षेदापरमेश्वरं च समियात्सर्वाधिकारी ततः ॥१४॥ *॥ आसन्ना इव भान्ति निर्मलतया तोये यथा शर्कराः शांबूकाः किल मज्जनेऽपि च कृतेनादानदक्षा नराः । विश्वेशः सुलभो विभाति करणैरन्यैरसाध्यस्तथा तं मायातनुधारिणं गुणनिधिं द्रक्ष्ये परेशं कदा ॥१५॥ * ॥ कुर्वन्ति वै बंदिकरा हि चोरा वैश्यानटानां वचनं न राज्ञः । साजात्यतो जीवजनो हि जीवान् संसेवते नैव तथा परेशम् ॥१६॥ * ॥ अन्तस्त्वमेध्यमवकीर्य विलोकयन्ति तुण्डेन सारमिव वायससूकराद्याः । तत्तुल्यचेष्टितजनो न विना परेशं संसारसारमतिरुद्धरतीह किं तत् ॥१७॥*॥ वत्सं तृषार्तमुपकूपमवेक्ष्य लाटो धर्मं चरन् कुमतितो निदधाति कूपे । दुष्कारिता भवति तेन तथाऽज्ञजीवैः पाशापहारि चरितं दृढपाशकारि ॥१८॥*॥ आत्मानं परिमोचितुं[1] भ्रमति चेद्दाम्ना निबद्धः पशुस्तेन स्याद्गलबंधनं दृढतरं प्राणैर्वियुज्येद्यथा । बद्धो येन स मोचयेद् यदि तदा मुच्येत बंधात्तथा जीवो जीवति विश्वनाथकृपयेत्यूचे तमीशं श्रये ॥१९॥*॥ रोगे यथा वज्रककीटरूपे भिषग्भिरन्यैर्विविधैरुपायैः । उपेक्ष्यतेऽसाध्यतयाऽथतज्ज्ञैर्वैद्यैरपेयं विहितोऽप्युपायः[2] ॥२०॥ भवामयो नैव निवर्ततेऽन्यैर्विचित्रमार्गैरपिमोक्षतुल्यैः । विना परेशं सदयावलोकं प्राहेति तं चक्रधरं नमामि ॥२१॥ क्षुधानिवृत्तिः किल खाद्यतः स्यादन्नेन तृप्तिः सुधयाऽमरत्वम् । कैश्चित्फलैर्दुःखनिवृत्तिमात्रं स्यादन्यवांछापि निर्वर्ततेऽन्यैः ॥२२॥ च्युतिर्न केनापि निवर्तते यद्वटः स्वबीजे स्फुटितो यथास्ते । चिदोऽनुभूतावपि बीजभूताऽविद्या तथाऽऽस्तीति भवान्तरं तत् ॥२३॥ अनिष्टहानिः परलाभलाभः

---

१ परिमोक्तुमाभ्रमति २ ह्युपायः ।

स्यादीश्वरेणेति जगाद देवः।। तं विश्वनाथं सदयावलोकं संसेवितुं वाञ्छन्ति मानसं मे ।।२४।।*।। घातं घृताक्तमबलाऽर्पयति स्वसूनोर्वक्त्रं पलायति च सोऽशनया विहीनः । एवं परापरविचारसुधीमजीर्णी दोषान्तरैर्न पिबतीशकृपां सुलक्षाम्[१] ।।२५।।*।। तद्वत् पदं जलपुरीषशिलासु दत्तं तन्निःसरेदिति गतावुचिता नताः स्युः । तद्वद्विकर्ममलसंवलितान्तरांस्तान् धर्माधिकाररहितानवदत्तमिच्छे ।।२६।। अन्तर्जले निवसती प्रतिभासमानाऽप्याक्लिन्नवन्नतु शिळा सलिलाद्रितासौ । शुष्कान्तरा किल तथाखिलजीवनाथ सत्संगमेऽप्यवरधर्मनिबद्धचित्तान् ।।२७।। काठिन्यविस्फुटगुणाऽश्मसमानधर्मान् धर्मेण सार्द्रहृदयानिव भासमानान् । विश्वेशधर्मकरणानधिकारिणस्तानूचे परापरगुरुस्तमहं वृणोमि ।।२८।।*।। क्षेत्रं त्ववान्तरतृणैः पिहितं न योग्यमुप्तं बलाद्धलधरैः प्रसवेन्न बीजम् । एवं जनो जनितदोषमनोविकारैरापूरितो न परधर्मधियोऽधिकारी ।।२९।।*।। युक्तः स्वयं किल न कर्णसनामकोऽश्मा युक्तान्तरोपरिवसन् कुरुतेऽप्ययोग्यम् । केचित्तथा स्वयमयोग्यतरा विकुर्युर्धर्माधिकाररहिताः स्वयुजापि पात्रम् ।।३०।। विद्धेऽपि चंदनयुजा तरुगुल्मयूथे वंशो न वेद्धमुचितोऽन्तरसारशून्यः ।। नैवं जनः पटुतराशयशून्य ईशधर्माधिकार्यपि परेशपदाब्जयोगे[२] ।।३१।। यद्वालुकं न जरठं किल भक्ष्ययोग्यं सोपायसेवितमजीजनयन् क्षतानि ।। एकं बहिर्वरमिव भ्रमरायितं तन्नो सेवनीयमपरं न करग्रहार्हम् ।।३२।। देलुत्तमन्तरखिलं कृमिपूर्णमेतैर्दोषैर्विहीनमपरं सुखसेवनीयम् । एवं जनेषु जरठा न तु धर्मयोग्याः पात्रीकृता यदि बलात् प्रसवन्ति दोषान् ।।३३।। अन्तरभ्रमद्भ्रमरगुंठविगुंठिनोऽन्ये धर्माधिकारकरणास्पदतां न यान्ति । केचिच्च कर्मनिरतामितगर्वमाना धर्मे समीपकरणानरुहाः स्वदोषात् ।।३४।। सन्तीह केचन जना वरदैववन्तो मुक्ता अशेषकलुषैः परधर्मपात्रम् । इत्थं जगाद कृपया परचक्रपाणिस्तं सर्वबन्धुमधुना शरणं व्रजामि ।।३५।।*।। मूलं बालकमुज्जहाति झटिति स्वं यद्वदिन्द्रावणं । तत्पक्वं दृढमूलमुज्झति न चाकृष्टं तृटद्वल्लिकम् ।। नो धर्मे पटुता भवेन्न जरठेऽविद्यासमुन्मूलने । जीवानां प्रथमे वयस्युपरतौ शक्ति जगौ तं श्रये ।।३६।।*।। भृत्ये रोगाभिभूते

---

१ सुलभ्याम् । २ योग्यः ।

प्रजपति विमतं सन्निपातेन दृष्ट्वा स्वामी सद्यो रिरिक्षुः प्रवदति वितरेरातु वैद्येश्वराय। तद्वन्मूढो जनोऽयं वितरति शमनं तं परेशः कृपालुस्त्रातुं संसाररोगादभिमुखकरणः सोऽनुकम्पेत् कदा मे ॥३७॥*॥ पात्रं विजानन् विषयी यथाऽऽसौ रमेत तेनेति तदीक्षतीशः। उद्धर्तुमार्तानवतीर्य लोके समीक्षते नित्यमहं तमिच्छे ॥३८॥*॥ जानाति जननी यद्वद्रस्थापि क्षुधा शिशोः। जीवस्यार्तिं तथा नाथस्तमीशं शरणं व्रजे ॥३९॥*॥ बिभीतकाभयादानात् क्षुधामुत्पाद्य भोजनम्। राति माता तथैवार्तिं दत्त्वा तां पूरयेत् परः ॥४०॥*॥ शस्त्रकारो यथा शस्त्रं शोधयेच्छुरिकां क्वचित्। निशितं समुपानीतं राजयोग्यमबुध्यते ॥४१॥ मौल्यस्य कल्पनां कुर्वंस्ताटं मुष्टिं व्ययोजयत्। व्यापारान्तरसक्तोऽसौ संस्मृत्याथ कदाचन ॥४२॥ अग्निना धमितं ताटं घनाघातैरपोथयत् सच्छाणासु च सर्वासु निशितं विमलीकृतम् योजितं मुष्टिनाऽन्येन राजवाह्यमकारयत्। तथा योग्यं प्रभुर्जीवं वियुनक्ति परात्परम् ॥४४॥ यदाऽसौ तत्पदाम्भोजसंनिधौ दासवद्वसेत्। विमलीकृत्य गृह्णाति यः स्वोत्संगे तमाश्रये ॥४५॥*॥ पयं सितं श्वैत्यमथो बलाकासमं च सा रूम्भणरूपरूपा। तद्रूभणं वक्रभुजाग्रतुल्यं श्रुत्वेति रूपं पयसः स मेने ॥४६॥ जात्यंध एवं व्यलिहद्विमोहात् पयोधिया रूभणमेव शंकी। तथा जनोऽज्ञः कुमतिः परेशादन्येशधीर्याति परं नतेन ॥७४॥ *॥ चित्रे शकृन्मृण्मये चित्रितेऽपि जंबीरजंबू–कदलीफलानां। करोति कामं कुमतिर्विताने साकारिताकारितधीस्तथाऽयम् ॥४८॥ शिलाजलब्रम्हमतिर्न वेद देवं परेशं भ्रमितान्तरात्मा। एवं वदन् वारयति स्वधर्मादन्यां धियं तं शरणं व्रजामि ॥४९॥ एकःस्तम्भस्वरूपमाह करिणं कूलाकृतिं चापरः सूर्पाकारमितीह बुध्य करिणोऽप्येकैकमंशं तदा। जात्यन्धेषु विवादभाजिषु यथा तेषां च चक्षुःस्थितिं कृत्वैकैकगजांशतः समवदत्तस्य स्वरूपं परम् ॥५०॥ ईशस्यामितशक्तिसंयुततनोरेकैकशक्तिं तदा जानन्तः प्रवदन्ति तां परतया सिद्धान्तभेदास्पदाम्। विश्वात्मा विजयप्रदानचतुरः कृत्वाऽखिलस्य स्थितिं विश्वातीतमनन्यगोचरतया संप्राह तं संश्रये ॥५१॥ दोषाद्वमति बालेऽपि भूयः प्राशयते पयः। अन्तर्लेपाशया माता तथा बोधसुधां प्रभुः ॥५२॥*॥शिलिकैकेन कर्णेन प्रविश्यान्येन याति वा। मुखतो वा न तत्साधु साध्वन्तः स्थितिकृच्छिरः ॥५३॥ श्रुत्यैकया श्रुतो धर्मः परया याति वा

मुखात् तन्नोचितमिति प्राह तमहं कामये सदा ।।५४।।*।। ग्राहकं सुषिरं सूक्ष्मं वृद्धं धर्मविसर्जकम् ।। तन्मोदलपयःपानमिव नान्तःक्रियाकरम् ।।५५।। रोमन्थते चर्वितमेव पूर्वं पशुर्गरीयान् गदितं परेण ।। आकर्ण्य धर्मं परिचिन्तयेयु : कथां न कुर्यु : पुरुषाधमेभ्य : ।।५६।। * ।। विप्रोऽपि संप्रकुरुतेऽन्त्यजकर्म योऽसौ, कर्मान्त्यजोऽधमतरोऽन्त्यजजातिजातात् ।। एवं विहाय निखिल भजतां परेशं विज्ञाय लाभमधमो जगति प्रमादी ।। ५७ ।। * ।। गोष्ठे गलद्वारिणि वेपमानां पङ्कक्रमिभ्यो व्यथमानपादाम् ।। वीक्ष्याऽथ नीत्वा गृहनायको गां वद्ध्वा गृहान्तर्यवसं च तेने ।। ५८ ।। तत्रोष्मणाऽसौ विनिवृत्तशीतामभ्यासतस्तच्चकिता चकर्ष ।। स्तम्भ : पतेदित्यसमंजसाऽसौ मुक्त्वाऽगमद् गोष्ठमतीव दुष्टम् ।।५९।। एवं नरो पूर्वतया जहाति स्वलाभमूढोऽखिलशर्मरूपम् ।। धर्मं परं विश्वकृदंघ्रिसेवामित्याह किं तस्य लभेय दास्यम् ।। ६० ।। * ।। मार्गे भयं साधुतमं जनानां ब्रवीति मार्गं किल मंचकार: ।। प्रवेशयेन्नैव निपोड्य कर्गौ तथा परेश : कृपया धरित्र्याम्।।६१।। ददाति बोधं न तु जीवकार्यं प्रवृतित: कारयतीह शभु : ।। तदत्र नित्यं पुरुषेण कार्यमित्याह तं चक्रधरं लभे किम् ।। ६२ ।। * ।। घासाग्रहस्तद्गिलनं च कार्यं समश्नतोऽन्यत् किल दैवकार्यम् ।। पुंसोऽन्यहानिर्जगदेकबंधोरधीनतां कार्यतया जगाद ।। ६३ ।।*।। अन्तेवसायिसदनं त्विह दीक्षितानां कन्याऽऽविशेन्न गणयेत्कुलकाललोकान् ।। तद्वद्विहाय निखिलं भजतां परेशं लाभं जगाद वरदस्तमहं दिदृक्षे ।। ६४ ।। श्वैत्रात्संदूषिताङ्ग: स्वजनपरिहृतस्तप्तचित्तो दुराशो ।। निर्वेदादुद्विजन् सन् क्षितिसुरसदनं सेवतेऽनन्यभाजी ।। रक्षां दृष्टेऽन्नपानै: सृजति निजगतिं राति चान्तेऽल्पदैवं धार्यं विश्वाधिदैवं विगलितविषयैः कुष्टिधर्मैस्तमिच्छे ।। ६५ ।। * ।। यथा कृषाणः कृषिसाधनानि स्पर्शेन हेमात्मतया कृतानि ।। कुबेरयोग्यानि निरीक्ष्य खेदं जगाम जानन्महतीं न तेषाम् ।। ६६ ।। नष्टं जनः प्राह नरं प्रवृत्तेरयोग्यमीशांघ्रिनिषेवणेन ।। लाभं न जानाति च तेन लब्धं प्राहेति तं चक्रधरं नमामि ।। ६७ ।। * ।। वानरीमुत्पतन्तीं यदपत्यं विधृतोदरं ।। पश्यन्नाह जनो जानन् हा हा बालः पतिष्यति ।। ६८ ।। तथा जानाति सा सूत्रमपत्यं न पतेद्यथा ।। एवं जीवेन सर्वेशो धृतः सर्वात्मना यदि ।। ६९ ।। अशेषाशुभनिर्मोक्षं सर्ववित्परमां गतिं । कुरुते कृपया देवस्तं नाथं शरणं व्रजे ।।७०।।

*॥ छिन्नेऽपि चार्धेन जहाति यद्वन्मंकोटको जीवनमेवमीशम् ॥ यो जीवनं स्वं न जहाति नाथं परं स यातीत्यवदत् तमिच्छे ॥ ७१ ॥ * ॥ वीक्षन्नवसरं विप्रस्तिष्ठति द्वारमत्यजन् । तदादानं व्यतीपातसमये लभते यथा ॥७२॥ जीवोऽथ जीवनाथस्य चरणांबुजसंनिधिं । अत्यजल्लँभते लाभमित्यूचे तमहं श्रये ॥७३॥*॥ प्रविष्ट आचार्यतले यदीह प्रगृह्य शस्त्रं गुरुदर्शितानि ॥ संसाधनीयानि विहाय तन्द्री विचित्रशस्त्राभिहतस्थलानि ॥७४॥ तदभ्यसन्नुद्विजतेतिशस्त्रं विहाय गच्छेत्तदुपैति मानं । तथैव लाभार्थितया परेशं भजन्ति ये तैर्गदितं परेण ॥७५॥ तत् तत्प्रयत्नादवधार्य कार्यं नोचेत्प्रयातव्यमपास्य नाथं ॥ एवं परात्मा कृपया जगाद श्रीचक्रपाणिं तमहं दिदृक्षे ॥७६॥ सकुतुकवरवध्वोर्यानमालोकयन्त्यास्तुमुलरवसुतुर्यं पृच्छतं मेहि पश्य । इदमविदितदोषाः प्रोचुरन्तर्गृहस्था व्रजति न पतिजाज्ञालंघने वेत्ति दोषम् ॥७७॥ तदिव वरदसेवी विश्वनाथोक्तकारी तदकरणनिमित्तं वेत्ति दोषं न चान्य ॥ पशुरिव परिमृष्ठो लुब्धतामेति हित्वा त्रसिततनुरियाच्च श्रीशमिच्छेऽवदत् तम् ॥७८॥ सामान्यवनिताऽप्यन्ते जन्मैकस्य ददाति या॥ साऽपि गच्छेद् गतिं रम्यां यथा नाथे तथा जनाः ॥७९॥ जन्मैकं निखिलं हित्वा येऽर्पयन्ति दयाकरे ॥ ते यान्ति परमं लाभमित्यूचे तं परं नुमः ॥ ८० ॥ दासीत्वमात्रादखिलं यथा स्यादवश्यकार्यं गृहदासिकायाः ॥ आदेहपातं करणीयमेव स्त्रियो यथा स्यादथवा स्वभर्तुः ॥८१॥ आलिंगपातं जगदेकबन्धोःप्राप्तं तथा जीवतयैव दास्यम्॥अवश्यकार्यं प्रविहाय हेतुं सर्वं जगादेति तमाश्रयेऽहम्॥८२॥*॥नारी यथा स्वनिकटस्थितदार्विकां सा व्यापारयेद्रुचिरपाककृतौ तथैव ॥ जीवो जहाति न पतिं यदि तं कृपालुर्व्यापारयेच्छुभकृताविति तं श्रयामि ॥८३॥ काष्टानि किं दहनसंगतितो न यान्ति नाशं महान्ति निखिलान्यपि तु ज्वलन्ति ॥ जीवस्य तद्वदखिलेश्वरसंनिधानात्सर्वाणि संक्षयमियन्ति कृतान्ति तानि ॥८४॥*॥ आन्दोलयंश्चणकभर्जनकृत् कपाले स्फोटितान् सुचणकान् रुचिरान् करोति॥ संप्रक्षिपन् क्वचिदसौ क्वचिदुक्षिपन्वा भांडेषु संस्थितरसं गुडकृत् करोति ॥८५॥ बन्धाय योग्यमिव तद्वदशेषबन्धुर्जीवं प्रपन्नमजनो निजसंनिधाने ॥ व्यापारयन् निजकृपास्पदतां प्रयाति श्रीचक्रपाणिरिह तं शरणं व्रजामि ॥८६॥ यस्याग्रहः स्याददतिदुर्बलाऽपि संपादयेत्तस्य पयो यथाऽम्बा ॥ तथेशवांछा

मनुजेन कार्या कृपाकर : पूरयिता तमिच्छे ॥८७॥*॥ एवंविधा यस्य तरोः सुरस्या त्वक् तस्य कीदृक् सुरसं फलं स्यात् ॥ ज्ञातुं न शक्यं किमिदं तथैव सुरम्यधर्मात् पररम्यता च ॥८८॥*॥ सर्वेषु चाध : सुषिरेषु नैके धृते समस्तं निखिलेन चोर्ध्वम् ॥ ऊर्ध्वं धृतं स्यान्निखिलं धृतं तद्धर्मज्ञवालैरिव वारिचोरे ॥८९॥ धृतेऽन्यधर्मे न भवेदशेषं सर्वं धृतेऽन्येन परश्च धर्म : ॥ परेऽथ धर्मे विधृते समस्तं धृतं भवेदित्यवदत्तमिच्छे ॥९०॥*॥ नान्यज्जलं सेवति चातकोऽयं घनागमे याचति तं यथाऽऽर्त : ॥ तथाऽऽदिनाथं प्रभजन्त्यनन्यास्ते यान्ति लाभं तमहं समिच्छे ॥ ९१ ॥ * ॥ श्रान्तो यथा राजसुतो न राज्ञः संसेवतेऽन्यस्य करं न चाधः । करोति नान्यजयजीयशब्दान् प्रसादभाजी न तु कस्यचिच्च ॥ ९२ ॥ तथा परेशं स्वपतिं विना तं नोपासतेऽन्यान् सुरसिद्धजोवान् ॥ ये ते परं प्रापुरिति श्रुतं मे तस्यांघ्रिदास्यं प्रति सोत्सुकोऽहम् ॥ ९३ ॥ * ॥ आदीयते ऋणमृणी धनिभिर्निरुध्य धत्ते स चेन्नृपबलं न धनाय तस्य ॥ कुर्यान्नृप : स्थितिमिवेश्वरसेवकानामीशेच्छया कृतफलं प्रभवो न चान्ये ॥ ९४ ॥ * ॥ शत्रुं यथेह बलिनः सदनं प्रविष्टं रक्षन्ति हन्तुमथ निर्गममीक्षमाणाः ॥ निर्याति चेद् बलवतो भुवनात् तदा तं निघ्नन्ति तेऽतिकुपिता भुवि वैरिवर्गाः ॥९५॥ तद्वत्परेशशरणं विषयारिवर्गाः सर्वेशरम्यचरणालयतोऽपयातम् ॥ वीक्षन्ति हन्तुमिति य : कृपया जगाद श्रीचक्रपाणिरिह तं शरणं व्रजामि ॥९६॥*॥ नो वातशीतभयमग्नियुजाऽपि नित्यं शक्यं समूलमनिल : प्रतियाति यावत् अन्तर्मुखीकृतविषा विषयाश्च सन्ति दूरे वसन्ति पतिसंनिधितोऽतिभीताः॥ ९७ ॥ तावत्परेशपदपंकजपंजरान्तः स्थेयं क्षयं विषयवैरिवरा व्रजन्ति ॥ इत्थं कृपालुरवदत् कृपया स किं मां सीदन्तमानतमतिं स्वदृशा समीक्षेत् ॥९८॥*॥ शुष्येत् स कोमलवटः समुपेक्षितोऽजाविच्छिन्नचारुतनुपल्लव इत्यतोऽसौ । संपालितोऽथ परिवीतसुकंटकीभि : प्रौढो गजघरुषणैरपि नैव भञ्जेत् ॥९९॥ एवं सुकोमलतरं परबोधरोपं क्षुद्रेन्द्रियार्थनिहतं प्रतियाति नाशं ॥ तस्माद्विहाय विषयाननुरक्षणीयो धर्मोऽयमेवमदत् तमहं दिदृक्षे ॥ १०० ॥ वाहास्तुरङ्गीयुतनष्टसत्त्वो विज्ञाय यत्नात्कृतवीर्यवृद्धिः ॥ मनोज्ञतामेति यदा तुरंगी संगं पुनर्नैति तदोचितत्वम् ॥ १०१ ॥ यथा यथा सेवत इन्द्रियार्थं धर्मेऽबलःस्यात्पुरुषस्तथैव ॥ विनेन्द्रियार्थं म्रियते न जन्तुस्तुरंगवत् तं

प्रभजेन्न तस्मात् ।। १०२ ।। * ।। ऋष्यशृंगो न जानाति स्त्रीपुंभेदं तथाप्यसौ ।। स्त्रीभिः संदर्शनालापक्रीडाकृष्टो यथा गतः ।। १०३ ।। योगिनोऽपि तथा स्त्रीणां दर्शनादिविघातकं । अन्यानि मादयन्तीह सेवया दर्शनेन सा ।। १०४ ।। मत्तद्रव्यनृपः स्त्री स्यादतः साक्षी भवेन्न तु ।। इत्थं जगाद जीवानां कृपया तं पर श्रये ।। १०५।।*।। रमन्ति राजीवविराजमानमनोरमारामसरित्सरःसु ॥ सुराजहंसा न तडागतीरे शिवेतरैराकुलितो विहगैः ।। १०६ ।। एवं विचारविदितात्मगतिः परेशादन्यान् न सेवति सुरान् विषयान् विमूढैः ।। आसेवितानवरधर्मधरैर्धरित्र्यां तन्त्रादितारणपरः कृपया भवाब्धौ ।। १०७ ।। स्वामी स्वकिंकरकृतान्सहतेऽपराधानन्यान् न चान्यविनटं क्षमते कृतं सः ।। पत्न्याःसहेत पतिरन्यसमस्तदोषानन्यान् समीक्षति तथाऽन्यनरं भजेच्च ।। १०८ ।। तन्नो सहेदविगणय्य गुणान्यथाऽसौ नाथस्तथा स्वशरणागतसेवितांघ्रिः ।। येऽन्यं भजन्ति न समीक्षति तान्परेशः पापादनन्यशरणानिति तं श्रयामि ।।१०९।। तांबूलवस्त्राभरणान्नपानैः प्रपंचतः पालयतीह चैका ।। आत्मानमन्यां च ददाति यद्वत् तथा परेशो वरधर्मिणोऽन्यान् ।।११०।। प्रीणाति चित्रामलशर्मपूरैर्ददाति नात्मानमनन्यलभ्यं ।। आत्मानमीशः शरणागतानां ददाति तं नाथमहं श्रयामि ।।१११।।*।। पत्नीं पतिस्त्यजति सा यदि तस्य साध्वी द्वार्येव तिष्ठति कृशाऽमितकष्टदीना ।। इत्थं स्थिता करुणयाऽऽकलिता स्वभर्तुः पुत्रं च सम्पदमवाप यशोऽथ लोके ।। ११२ ।। तद्वज्जनो निजपतिं करुणानिकेतं विश्वाश्रयं न विजहाति यदा तदेशः ।। दत्त्वा स्वयोगमतिरम्यतरं कृपालुर्लाभं परं वितनुते तमहं लभे किम् ।। ११३ ।। शय्यां यथा पालयति स्वभर्तुः शूद्री शुभां याति गतिं तथैव ।। अनन्यताधर्मरतो वियोगे परस्य भर्तुः प्रतियाति लाभम् ।।११४।। सारमेयोऽग्निना दग्धो न क्वचिल्लभते सुखं ।। एवं विश्वेशविरहे भाव्यं जीवेन सर्वदा ।।११५।। नारी पतेर्विरहदावहता न लेभे केनापि शर्म पतिवस्त्रयुजाऽपि किंचित् ।। तद्वत्परेशशरणस्य सुखं न चान्यैर्भाव्यं तदीयजनसंगमशर्म किंचित् ।।११६।।*।। नेहास्ति किंचन सुखाय पतिं विना तं मत्वेति काचन निराकुरुते समस्तं ।। अन्या विमोहितमतिर्विरहेन दग्धा नो पंकचंदनमृदन्नविभेदबुद्धिः ।।११७।। यः संनिधानरहितो जरठात्मबोधो नाम्ना न तस्य विषयोऽस्ति जितेंद्रियस्य ।। यस्यातिकोमलमतिः स निरा-

करोतीत्येवं जगाद वरदस्तमहं दिदृक्षे॥११८॥ अंभो मंडपिकाग्रमम्भसि किल क्षिप्तं समादाय तद् ।। वातानीतरजो विवृद्धिमगमच्चानन्त्यमित्थं जने ।। सर्वालंबनवर्जिते तनुमिषा दृढा ततो नोज्झितु ।। शक्या संमिषतीव तत्क्षण-मतो विद्यां न योगी भजेत् ॥११९॥ * ॥ आभीरदेशात्प्रविनष्टसर्वा काचि-न्महाराष्ट्रमुपेत्य नारी ॥ द्विजाश्रमे सा वसती विमूढा तत्संगमात्तन्ममता-मवाप ॥ १२० ॥ तद्बालकान् पालयती न तृप्ता तेषां विनाशे विललाप दुःखात् ।। तप्ता वृथा स्नेहवशाद्यथा सा त्वाभीरदेशस्य महत्तरीया ॥१२१॥ अविद्यमानां महतीमविद्यामादाय नानापरितापभाजी ॥ आत्मा निधेयो न महत्यनिष्टे प्राहेति तं चक्रधरं नमामि ॥ १२२ ॥ वरत्रामारुहन् सव्यं वामतो वा विलोकयेत् ॥ तदा पतति देहोऽस्य चूर्णीभूतो तथा भुवि ॥१२३॥ असिधारोपरि गतौ लाघवं बुद्धिकौशलं ॥ महद्विना भवेन्मृत्युरेवं धर्मेऽपि कौशलम् ॥ १२४ ॥ विना जीवस्य विषमं धर्मस्याचरणं क्षणं ॥ ईशोक्ता-दन्यथाकुर्वन् नश्यतीत्याह तं श्रये ॥ १२५ ॥ * ॥ कष्टी यथा स्थावरदे-वताया दास्यं चरेत्सोऽभिमुखांघ्रिरीशं।।बाधिष्यते मामिदमेव किंचित्सुप्तोऽपि जानन्नविधिं चकार ॥ १२६ ॥ सोऽथाविधिः प्रसवते विधिमन्यमेवं तत्संततिः प्रवितता युवतीं सुतांश्च ॥ आपाद्य तं नयति तस्य यथा न देवो भूयो भवे-दिह तथैव परेऽपि धर्मे ॥ १२७ ॥ जीवो विधिं चरति चेत्प्रसवेत्स चान्यं सोऽप्यन्यमित्यविधिसंततिरीशधर्मात् ॥ तं भ्रंशयेदिति चरेदविधिं न कश्चित् प्राहेति तं सकरुणं वरदं वृणोमि ॥ १२८ ॥ संमार्जनादि रचयंस्त्रिदशालयेऽसौ कष्टी जनस्तवरांच नितरां करोति ॥ इत्थं चरन् व्रजति कीतिफलं न चान्यै-र्नैवं नरः स्वपरविन्निजधर्महा स्यात् ॥१२९॥ कुटयां पेशस्कृता[१] रुद्धो विद्धः कण्टकजां व्यथां ।। कीटः सोऽनुभवं याति तद्रूपतामनुस्मरन् ।। १३० ॥ एवं वियोगे नाथेन तमात्यां समनुस्मरन् ।। नयेज्जीवितमेतीशं जगादेति तमाश्रये ॥ १३१॥*॥ कष्टोपवासव्रतशुष्ककाया प्रनष्टसर्वेंद्रियचंडभावा ॥ तद्बालरंडेव कटंकटीयमानो नयेन्नाथवियोगि जन्म ॥ १३२ ॥ तं विश्वनाथो मुहुरेत्यरातिप्रयत्नसंरक्षितरक्षणीयं ।। एवं दयावानवदत् स्वदासान् दत्ता-भयो दास्यति संनिधिं मे ।। १३३ ॥ * ॥ खाद्यैः प्रलोभितसुता विरहन्ति

---

१ भ्रमर् २ कृच्छ्रोपवास

सर्वे नैकोऽम्बया परिहृतः पथि संरुदन्सः ॥ अम्बाऽम्बिकेति मलमुत्र-विलेपिताङ्गः संवीक्षते यदि तदा सुतचिन्तयैत्य ॥ १३४ ॥ अंके निवेशयति सा परिमृज्य बालं क्षोमांचलेन किल तद्वदनाथबन्धुः ॥ अन्यैरशोभितमसंगदितेऽपि शंभोः पान्थानुवर्तनमुपैति तमाश्रयेऽहम् ॥ १३५ ॥ * ॥ सुप्तोंऽकमादाय निपाययित्वा क्षीरं घृतं शायित एव मात्रा ॥ प्रातः शिशुर्याचति पल्लवं तामापीडयन् भोज्यमविन्निशाशम् ॥ १३६ ॥ तुष्टिं च पुष्टिं च पयोभवां सा माता विजानाति यथा तथैव ॥ जीवो न न जानाति कुमारबोधी कार्यं प्रभुर्वेति तमाश्रयामि ॥ १३७ ॥ * ॥ अम्भो यथा बब्बुलिका[१]ऽवगूढं ग्रहीतुमुत्सारयते जनस्तां ॥ उत्सार्य जीवस्य मलांस्तथेशस्तनोति सत्तां तमहं दिदृक्षे ॥ १३८ ॥ * ॥ चक्षुर्जगत्पश्यति न स्वरूपं कदाचिदात्मानमवेक्षते तत् ॥ तथात्मनः संविदितीश्वरेशो जगाद तं चक्रधरं नमामि ॥ १३९ ॥ * ॥ दूरस्थितं भाति यथा न तत्स्यान्नराश्वगोत्वादिविशेषवेद्यं ॥ तथावद्वस्तुतयाऽवभासं सत्ताऽभवत् तं शरणं व्रजामि ॥ १३० ॥ * ॥ जाग्रत्सुप्तो यथा कश्चिन्मामाह्वयति कश्चन ॥ गंतुमित्येव जानाति न विशेषं यथा तथा ॥१४१॥ जीवो जानाति सत्तायां सत्तयैव ततः परे ॥ ज्ञानेऽसौ सोज्वलं सर्वमित्यूचे तं परं नुमः ॥ १४२ ॥ * ॥ मृषा प्रपंचः परवेदने सति स्वप्नो मृषा स्यादिव जागरे सति ॥ भक्ताञ्जगादेति दयासमुद्रस्तं चक्रपाणिं प्रणमे कदाऽहम् ॥ १४३ ॥ * ॥ उत्थाय गत्वा बहिरेव मूत्रं करोमि पश्यन्निति मन्त्रयेत ॥ स्वप्नो मृषा स्यादखिलस्तथापि गंधिर्विना क्षालनतो न याति ॥ १४४ ॥ एवं परात्मानुभवेऽपि जाते मृषाऽपि यज्जीवमलीमसं तत् ॥ निवर्तते क्षालनतः स्वतो न प्राहेति तं चक्रधरं नमामि ॥ १४५ ॥ * ॥ लोहे यथा सुनिशिते विमलेऽभियाति दातुं किलाम्बवतिकां न मलोपरिष्टात् ॥ जीवस्तथा निखिलकर्मकषायशून्यः कर्तुं कृपां समुचितो न मलैरुपेतः ॥ १४६ ॥ * ॥ उत्थापितः साधुतरं प्रबुद्धः पश्यत्यशेषं सविशेषजातम् ॥ निद्रा शरीरे परमास्तिपूर्णा तद्गात्रभंगेन न कार्ययोग्यः ॥ १४७ ॥ विशेषतो वेत्ति विशेषबोधी सर्वं तथा ज्ञानमनादियावत् ॥ न याति नाशं न तु लाभ-

---

१ बाबुळी, हिरवागार थर (पाण्यांवरील).

योग्यो भवेदितीशोऽकथय-त्तमिच्छे ।। १४८ ॥ सर्वं यथा जवनिकान्तरिते विभाति रूपेपिहीनमनपावृतदर्शनं तत् । निःशेषसंविदपि नैव समापराप्त्या प्राहेति तं सकरुणं वरदं वृणोमि ।। १४९ ।। वस्त्रं बिधूतमलल्लेपमयो यथा स्यादुत्क्षारितं भवति तत्किल बिंबयोग्यम् ॥ एवं विधूय मलकर्मचया-नविद्याभेदाद् भवेत्समुचिता परलाभयोगे ।। १५० ॥ * ॥ स्यादष्टलोहं कनकं यथा नो स्पर्शो भवेत् स्पर्शयुजा तथैव ॥ जीवः परं याति परेशयोगा-न्नेशो भवेदीश्वरसेवकोऽसौ ॥ १५१ ॥ वृक्षो यथा चन्दनसंनिधानात्सुगंधतां याति न चन्दनत्वं ॥ जीवस्तथैवेश्वरसंनिधानादुपैति मोक्षं न परेश्वरत्वम् ॥ १५२ ।। * ॥ निधाय पृष्ठौ शरणागतानां रक्षानिधानं क्रियते सुतानां ।। प्रदीयते राज्यमितीह तद्वद् राज्ये स्वभक्तान् सिषिचेऽनुभूतौ ॥ १५३ ॥ * ॥ सितादनं चारुतरं सितात्वाद् ब्रह्मैक्यतायाश्च तथाऽनुभूतिः । प्रज्ञा-वतः स्वान् निदधाति पृष्ठौ सद्रूपतायां कृपया परेशः ॥ १५४ ॥ * ॥ इति श्रीपरमधर्मे महामोक्षसाधने श्रीनागार्जुनोपदेशे केशिराजमुनिविरचित् दृष्टान्तस्तोत्रं समाप्तिमगमत् ॥ ७ ॥ ७ ॥ ७ ॥

१ साखरखाणें.

परिशिष्ट ४ थें

दृष्टांतांत निरूपिलेल्या व्यक्तींची यादी

[पाठांतील दृष्टांत कोणास व कोणत्या स्थळीं सांगितले याबद्दल सर्वत्र एकवाक्यता नसल्यानें एका सांकेतिक जुन्या पोथींत उपलब्ध झालेल्या माहितीवरून परिशिष्ट तयार केलें आहे; स्थलसूचि महत्त्वाची न वाटल्यानें ती तयार केली नाहीं.]

	नांव	एकंदर संख्या	दृष्टांत कोणते ?
१	आउसा	२	१५, ६६.
२	इंद्रभट	१	१७.
३	उमाइसा	१	१९.
४	एकाइसा	१	८४.
५	कानमेचा ब्राह्मण	१	११.
६	खेइगोई	१	८.
७	चांगदेव	८	४,३८.४७,५१,७५,८१,९२,९६.
८	डखले	२	४४,१०२.
९	दार्यंबा	३	५०,७४,११२.
१०	देमाइसे	३	५३,६४,६९.
११	नाथोबा	४	४९,७७,९५,११३.
१२	पद्मनाभी	४	३५,५७,१०५,१०६.
१३	बाइसा	७	७,१३,२३,३९,६३,८९,१००.
१४	भटोबास	२३	६,१०,२०,२४,२८,३४,४०,४२,५६,५८, ६२.६७,६८,७० ७२,७३ ७६,७८,८३,९३, ९८,९९,१०९,१११.
१५	भक्तांप्रति	६	२७,३६,६०,७९,८७,९१.
१६	मार्तंड	१	४६
१७	मायेधवा	१	५
१८	माहादाइसे	१७	३७,४८,५२,५४,६१,६५,८०,८५,८६,९४, ९७,१०१,१०३,१०४,१०८,११०,११४.
१९	माहिंभट	४	१.२,३,४३.
२०	रामदेव	१५	१२,१८,२१,२२,२५.२६,२९,३०,३१,३२, ३३.४५,५९,८२,९०.
२१	लखुबाइसा	३१	१६,४१,१०७.
२२	शांतिबाइसा	१	९
२३	साधे	१	७३.
२४	सारंगपंडीत		१४,५५,८८.
२५	सेंदुर्जनी ब्राह्मण	१	७१.

परिशिष्ट ५ वें

दृष्टान्तपाठ व व्याकरण

दृष्टान्तपाठांतील गोष्टींची भाषा यादवकालीन मराठी जनतेची सर्वसामान्य बोली असल्यानें, ती व्याकरणाशिवाय कळणारी अशी नित्य व्यवहारांत वापरली जाणारी सुबोध भाषा असल्यास आश्चर्य नाहीं. सुमारें ६००–६५० वर्षांचा दीर्घ अवधि गेल्यानें आज तीच विद्वानांना अपरिचित व अवघड वाटूं लागली आहे. असें असूनही यादवकालीन पद्यापेक्षां दृष्टान्तपाठासारखा गद्यमय ग्रंथ मुळांतून वाचला तरी तितका अवघड वाटत नाहीं. सावेवो (सावयव), साकारू (साकार), वीखो (विषय), तेयाचेनि (त्याच्यानें), इत्यादि आज विकृत व अशुद्ध वाटणारे शब्द, त्या वेळचे शुद्धस्वरूपांतीलच शब्द होत व ते तसेच बोललेलिहिले जात असले पाहिजेत, हें १३–१४–१५ शतकांतील मराठी शिलालेखांवरून स्पष्ट दिसून येतें. ग्रंथासाठीं मुद्दाम बनविलेली ती भाषापद्धति नव्हती. **चक्रधरसिद्धान्तसूत्रें**, (पान ९६ ते ९८ पहा) यांतील भाषाविषयक टीपा देतांना शुद्धाशुद्धतेबद्दल सामान्य वाचकांना वाटणारे विचार व शिलालेखांच्या आधारावरून ठरणारे विचार यांत कसा फरक आहे हें वाचकांना दाखविण्याचा अल्पसा प्रयत्न केला होता. त्यानंतर 'श्रीज्ञानेश्वरदर्शन' या प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांत, 'ज्ञानेश्वरीकालीन मराठी व ज्ञानेश्वरीचें व्याकरण' या निबंधांत, ज्ञानेश्वरीच्या व्याकरणाविषयीं स्थूलमानानें चर्चा केली होती. महानुभावीय आद्य ग्रंथांना. ते समकालीन असल्यामुळें तीच चर्चा सामान्यतः लागू पडत असल्यानें, येथें पुनरुक्ति न व्हावी म्हणून वाचकांना तो निबंध एकवार वाचण्याची विनंती करितों. (ज्ञान० दर्शन, पान ४९–५२, साहित्यखंड).

२. भाषेंतील जुने अवशेष पद्यांत दिसून येतात तितके तत्कालीन गद्यांत दिसून येणार नाहींत; तथापि वाक्यरचनेच्या दृष्टीनें प्राचीन

भाषेची मोड जितक्या विविध प्रकारें गद्यांत आढळून येते, तितकी ती पद्यांत आढळत नाहीं. याचें नैसर्गिक कारण म्हणजे गद्यांतील भाषेच्या स्वैरविलासाला यमकवृत्तादिकांचा बंध नसतो हेंच होय; यामुळें ज्या लकबी गद्यांत सहजासहजीं व पुष्कळ आढळून येतात, त्या पद्यांत मोठ्या कष्टानें शोधून काढाव्या लागतात. बीजें करणें (गमन करणें), वास पाहणें (अवलोकन करणें), म्हणीयें करणें (आज्ञापालन करणें) इत्यादि वाक्प्रचार हुडकून काढण्यास ज्ञानेश्वरीची पानामागें पानें उलटवावीं लागतील, तर गद्यग्रंथांत ते पानोपानीं सांपडतील. म्हणून वाक्यरचनेच्या दृष्टीनें ज्ञानेश्वरीपेक्षांही दृष्टान्तपाठासारखा गद्यग्रंथ अधिक उत्तम साधन होय यांत संशय नाहीं.

३. प्राचीन गद्यवाक्यरचनेची स्थूल कल्पना येण्यास, १३–१६–४० ५४–७२–९४ इत्यादि सुमारें १५० ते २५० शब्दांत गुंफलेले मोठे दृष्टान्त वाचकांनीं वाचावे. त्यांतील वाक्यें प्रायः लहान लहान दिसलीं, तरी मधून मधून त्यांत मोठमोठीं वाक्येंही दृग्गोचर होतात. तसेंच कर्तरि-कर्मणि-भावे रचना, स्वार्थ-आज्ञार्थ-विध्यर्थ-संकेतार्थादि अर्थदर्शक वाक्यें; वर्तमान, भूत, भविष्य इत्यादि काळद्योतक वाक्यसमूह; संबंधीं वाक्यें, प्रश्नार्थक वाक्यें, निरनिराळे वाक्प्रचार इत्यादिकांचीं विपुल उदाहरणें या दृष्टान्तांत वाचकांना उपलब्ध होतील. उदाहरणार्थ सोळावा दृष्टान्त (पान८) आपण पाहूं या. प्रस्तुत गोष्ट सुमारें १५० शब्दांची आहे; 'मग रावो तयासि वीडा दे : मग तीये जाति : तीये म्हणति' इत्यादि वाक्यें लहान लहान आहेत; पण नवव्या पानावरील 'तीयें म्हणति : हे काइ रे मैळेया :........ मग तो तयांसि दे' हें २–३–४–५ या ओळींत वाक्य चांगलें पल्लेदार आहे. तसेंच पुढील वाक्यांची रचना व अर्थबोधकता लक्षांत ठेवण्याजोगी आहे; 'आरे मैळेया : हे बांध आम्हांसि दे : मग म्हणसी तें आम्ही देउनि'; 'रावो म्हणे : आम्हांसि नेंदीचि : पंचनगरासि नेंदीचि : मा तुम्हांसि काइ देइल :'; 'काइरे मैळेया : तुवां जोड़ावें आम्ही खावें : मागां जोडिलें तें आम्हांसि खादलें : पुढां जोडिसी तें आम्हांसीचि खासी म्हणौनि उमेठां शब्दीं वानिती'; 'तैसा हा जीवु कव्हणासि दे :.......ना : विषयवेव्हाराचेया चाडा जीवासि दे'; इत्यादि. बांद धरणें, वीडा मागावेया एणें, जोडणें (मिळविणें) इत्यादि

तीन वाक्प्रचार या लहानशा गोष्टींत आढळतात; त्यांपैकीं बांद धरणें हा वाक्प्रचार ज्ञानेश्वरींत मोठ्या कष्टानें सांपडेल; किंवा एरव्हीं वाचनांतून निसटला जाणारा वाक्प्रचार या गद्यप्रयोगावरून ज्ञानेश्वरी वाचतांना नजरेंतून सुटणार नाही असा वाचकांना अनुभव येईल. या ग्रंथांतील इतर दृष्टान्त वाचतांना, वाचकांना असाच अनुभव येईल. 'म्हणसी तें आम्ही तुज **देउनि** (देऊं)' अशी रचना अनेक वेळां प्राचीन गद्यांत सांपडल्यामुळें, ज्ञानेश्वरी वाचतांना तसे पूर्वीं न आढळलेले प्रयोग वाचकांना काढून दाखविणें आम्हाला शक्य झालें. (ज्ञाने० दर्शन, साहित्यखंड, पान ५०–५१ पहा).

४. ज्ञानेश्वरींत व महानुभावीय प्राचीन काव्यांत, **म्हणौनियां, करौनियां, म्हणौनु करौनु,** अशीं रूपें दिसतात, पण गद्यांत हीं रूपें जवळ जवळ आढळत नाहींत असें म्हटलें तरी चालेल; दृष्टान्तपाठांत अशा तऱ्हेचें एकही रूप आढळलें नाही. **वर्णौं, बोलौं,** या हेत्वर्थकाच्या ठिकाणीं **वर्णौं, बोलों, वर्णुं, बोलुं** अशींच रूपें येतात; **'लागौनि'** या रूपाबद्दल **'लागीं'** हें रूप अधिक दिसतें; **आणि** हें अव्यय गद्यांत मुळींच दिसत नाही. **म्हणौनि, करौनि** अशा रूपांपेक्षां **म्हणुनि, करुनि** अशीं रूपें, तीहीस दोन, या प्रमाणांत आढळतात. तरतमभाव दाखविणारें 'पासौनि' अव्यय गद्यांत जवळ जवळ नाहीं. वास पाहाणें, काटी करणें, वेंझ घेणें, म्हणीयें करणें, वरिपडा होणें इत्यादि वाक्प्रचार ज्ञानेश्वरींत उपलब्ध होतात; पण राज्य करणें (वास करणें), वोहरे मारणें (वधुवरें लुटणें), माए सरणें (मरणें), पालापाणी घालणें (पूजाअर्चा करणें), खैरीं जुंपणें (एक प्रकारची शिक्षा देणें), वाहाणा फेडणें (पायांतून काढणें), इत्यादि ज्ञानेश्वरींत न आढळणारे कित्येक वाक्प्रचार या ५०–५५ पानांच्या ग्रंथांत सांपडतात. महानुभावीय पद्यांत इतके प्रकार आढळत नाहींत.

५. शब्दसंपत्तीच्या दृष्टीने पाहातां, दृष्टान्तपाठाची संपत्ति किती भरपूर व विविध प्रकारची आहे हें टीपांवरून स्पष्ट होईल; पवे (प्राप्त होई), वोदरे (ढासळणें), टेका सूति (आधार देतात), जडे–उजडे, उजळे–मैळे, फेडी–फिटे, सोडी–सुटे, पळवी–पळे, मोकलणें (मुक्त करणें), झांजरणें (खरचटणें), तनें दाटलें (तृणानें गजबजून गेलेलें), न वचे (जात नाहीं), रिगे–नीगे, भरे–रिचवे, गळा आवळे, होए–होववे, नांगरीजे, दुणीजे,

पेरीजे, सुरी नीसवणें, खतें पडणें, लावून खाणें, ओडवी, तांबे घडत असे, खोवणें, बुझावणें, अव्हेरणें, आंगवणें, उबगणें, गिवसणें, कीटकी लागणें, वीरडें लावणें, पारुखणें, दारवंठा राखणें, रूपकरणें, वीवळलें (उजाडलें) इत्यादि कितीतरी धातू या ५०–५५ पानांत सांपडतात.

[अ] अकरणरूप करण्याच्या तऱ्हा विपुल दिसतात; ओडवी–नोडवी, घे–नेघे, दे–नेंदे, उपजवी–नुपजवी, असे–नसे, जाणिजे–नेणिजे. मुंचीजे–मुंचीजेना, उपसाहाति–नुपसाहाति, जळेना, देवों नैए इत्यादि.

[आ] जोडशब्द वापरण्याची लकब विपुल आढळते:–पालापाणी, हाडगुड, काजभोज, सींदेराणे, घाएखंडी, पुडुवाटवा, पाटाउवें–सुटाउवें, दाएपसाए, सांदीसवडी, सेजीयासाइलीया, इळाखिळा, धारेधाकुटा, गोरागोमटा, मोडकेतोडके, साने–थोर, सोएरीधाएरीं, वोखटेगोमटें आडीदरडी, दांडीडोळीकार इत्यादि. वरील जोडींतील विशेष रहस्य हें आहे कीं, दोन्ही शब्दांचे अर्थ दिसण्यांत सदृश असले तरी त्यांत किंचित फरक आहे. टीपांतून त्यांचें स्पष्टीकरण वाचकांना आढळेल. जसें, सेजोया म्हणजे शेजारीण व साइलीया म्हणजे सखीया.

तत्सम, तद्भव व देशी यांपैकीं तत्सम शब्दांचें प्रमाण इतर शब्दांच्या मानानें फारच कमी आहे; देशी शब्दांचें भांडार विपुल व विविध आहे; सर्वांत जास्त भरणा म्हणजे तद्भव शब्दांचा आहे. वर्णागम, वर्णविपर्यय, वर्णविकृति, वर्णनाश इत्यादि प्रकारें तयार झालेली शब्दांची संख्या विशेष जास्त आढळते. उदाहरणार्थ, चाळीसाव्या दृष्टान्तांत, अयोग्य, योग्य, ज्ञान, दृष्टि, असे पांचसातच शब्द शुद्ध संस्कृत स्वरूपांत दिसतात. या गोष्टींतील एकंदर शब्द १५० च्या वर असूनही त्यांत तत्सम शब्द बोटावर मोजण्याइतकेच दिसतात; ताट, परज, दाम, मांडी, आडवांगी, वीतंडणें इत्यादि शब्द अगदीं देशी आहेत; पण बाकीचे सर्व शब्द तद्भव आहेत. जसें, खतें (क्षत), आगी (अग्नि), दाएपसाए (दानप्रसाद), गांव (ग्राम), खांडीं (खड्ग) इ०. एका गोष्टींत जर इतकें शब्द, तर ५०–५५ पानांत पुकळ आढळले तर त्यांत नवल नाहीं.

कामिठा, आगिठा, सामथा; नाडें, तुतें, रुंभणें, फाळ, लोखंडे, इळा, कुऱ्हाडि, वखर; वना, पाटा; तांथु, संवदणी, आंबवती, खार; खातीये,

ताट, परज, खते, साहाण; टांकी, कुळथवणी, चकतळीया; खांड, घाएखंडी; फळें (सोंगटी, प्यादी), रिणाइत, दंदीया, वाखारी; सागळ, गुळळा, पडदणी, पाटाउवें, वाकळ, साउलें; तळीव, सांबारीव, कोशिबीर, सांभार; खाण, लोण, वोल्हावण; पडाळी, कलवड; इ० अनेक प्रकारच्या धंद्याचे शब्द या लहानशा पुस्तकांत कितीतरी आढळून येतात. तसेंच, बेव्हारा (व्यवहारी), पांति (पंक्ति), कुजांतर (कुयंत्र), पाखाळा (प्रक्षालन), तन (तृण), खादलें (खादित), पूंस (पुच्छ), शेज (शय्या), दुहवा (दुर्भगा), सांपें (सांप्रत), सीस (शीर्ष), सांखळें (शृंखला), गोसावी (गोस्वामी) इत्यादि तद्‌भव शब्द जिकडे तिकडे पसरलेले आहेत. चक्रधर हे निरनिराळया ठिकाणीं पर्यटन करीत असल्यामुळें व अनेक तऱ्हेच्या व्यक्तींशीं त्यांचा संबंध आल्यामुळें, त्यांच्या वोलण्यांत अशा प्रकारची शब्दांची विविधता व विपुलता दिसली तर त्यांत कसलें नवल!! सांभार (कोथींबोर), देहाडा (शेत), माकोडा (मुंगळा), वखर, फास, सांपटें (फाटकें वस्त्र), थापें (थापट झालेले हात), सराउ (सराव), लवणी, कलवडी (झोंपडी), राळेयाचें खीचटें, लोणीचा कवडा, थैक (हैक), वरैता (नवरा), पीढें (पाट), टरल (वरचें साल), गुळहारी (गुऱ्हाळाचा मालक), डींगरा (दासीपुत्र) इ० शुद्ध देशी शब्द चक्रधर जितके वापरतात, तितके ज्ञानेश्वरींत देखील दिसत नाहींत; अर्थात चक्रधरांच्या इतका निरनिराळ्या गटांतील लोकांशीं ज्ञानेश्वरांचा परिचय झाला असता व तशाच प्रकारचें परिभ्रमण झालें असतें, तर ज्ञानेश्वरांच्या अवलोकनांत हे शब्द आले असते.

६. आतां वाक्प्रचारांकडे आपण वळूं. ज्ञानेश्वरींत जे वाक्प्रचार आढळून येतात तेवढेच नव्हे, तर आणखी कितीतरी नवीन प्रकार, या लहानशा पुस्तकांत सांपडतात. जसें—रूप करणें, बीजें करणें, रण शोधणें, रण पडणें, ठावो घालणें, म्हणीयें करणें, पाठीं पुढीलावरि ठेवणें, योग होणें, स्थूळेसीं उठी, तनें दाटणें, मळ लागणें, कुष्ट लागणें, जिव्हा झडणें, खैरीं जुंपणें, बुडी देणें, लावून खाणें, तोंड पळवणें, बीरडें लावणें, खांब राखणें, तांथू फुटणें, टांकी लागणें, हातातळीं हात वोडवणें, नीर्वाह करणें, कूपकाटी करणें, वेंझ देणें, बळासि येणें, आधां दातीं सीस घेणें, खंति येणें, तोंड देणें, वडपिंपळ लावणें, बेचळ उठणें, घरवात करणें, इयादि.

७. अशा प्रकारें शब्दसमूह व वाक्प्रचार यांचें थोडक्यांत अवलोकन केल्यावर आपण वाक्यरचनेकडे वळूं.

[अ] पुढील वाक्यांतील तरतमभाव दर्शविण्याची पद्धति लक्षांत ठेवण्यासारखी आहे. हें **आगाधाचें** आगाध कीं : हे **विशाळुवाचे** विशाळु (दृ० ५९); लाभा**पासौनि** (पेक्षां) लाभ (दृ० ३९); गळा **आधिकचि** आवळे (दृ० ३९); जाणतेया **पासि** (पेक्षां) **वर** नेणता चांग (दृ० ५८); साधना **पासि** साध्य उत्तम (दृ० ११४); इत्यादि. गद्यांत 'पासौनि' शब्दाचा या अर्थी उपयोग, काव्यापेक्षां फारच थोडा होतो.

[आ] पुढील वाक्यांतील उपमा देण्याची तऱ्हा पाहावी; जसें–तीयें सुदुर्बळें ऐसीं ब्राह्मणें; तुटकी ऐसी बाज, तयावरि फाटकी ऐसी वाकळ; राणीएचा पूत ऐसा दीसत असें; तीएसि चंदन तैसा चीखल इ०.

[इ] पुढील वाक्यांतील प्रथम पुरुषीं क्रियापदें ध्यानांत ठेवण्याजोगीं आहेत. जसें––आगा : मी प्रसन्न **जालां** (दृ० ११); मी **जेविलां** नाहीं : मी भुकैला **होतां** (दृ० १९); मी दारां **गेलां** (दृ० १०५); मी वाघें **खादलां** (अहं व्याघ्रेण खादितः) : हस्ती **वोळघलां** ऐसें दुःख भोगी (हस्तिना अवलंघितोऽहम्) (दृ० १०४); सध्यां आपण असा प्रयोग करीत नाहीं. अहं गतवान् (गेलां); राजवाडे–ज्ञानेश्वरी व्याकरण (पान १०२–१०३ पाहा).

[ई] पुढील वाक्यांतील क्रियापदें पाहावींत. जसें––आरे काइ **करितासि** : ना दूध **पीताए** (करीत आहेस–करतोयस्; पीत आहे–पीतोय) दृ० ४१; हावो : हे **डुळकीताए** : तरि कां **पाजीतीएसि**; हे **वीसरताए** : हे या प्रति कां **नीरूपीजताए** (दृ० ४४); हें आझुइं कां जीताए (जीत आहे, जीवन् आस्ते) दृ० ५३. सध्यां मराठींत अपूर्ण वर्तमानकाळीं क्रिया दाखविण्याची असल्यास वरील प्रकार आढळतो. मी खातोय, तो बोलतोय, इत्यादि वाक्यांत ही तऱ्हा दिसते.

[उ] पूर्वकालवाचकें दोन आल्यास दोन निरनिराळीं रूपें वापरलीं जात; जसें––शेंबुड **पुसौनि** कडीए **घेउनि** स्तनपान दे (दृ० ९८).

[ऊ] पुढील वाक्यांतील संकेतार्थी रचना पाहावीं. जसें–या वाटा **जासि** तरि चोरीं **नागवीजासि** : वाघें **खादीजसि** : तेया वाटा

जाए तरि चोरीं नागवींजे कां वाघें **खाइजे** (दृ० ५०); यातें जो **राखैल** तयासि मी एव्हडी सोनेयाची रासि **करीन** (दृ० ३६); आगी आंतु **घालिजैल** तरि जळौनि **जाइल** (दृ० ४०); अभए **देसी** तरि **सांघैन** (दृ० ४०); अमृत **पीजे** तरि अमरां **होइजे.**

[ऋ] पुढील वाक्यांतील वर्तमानकालवाचकांचा उपयोग पाहावा. जसें—हें **नेसतां** मज अश्लाघ्यता (इदं **वसानस्य** मम अश्लाघ्यता); ते आगीं **जाळितां** जळेना (तत् अग्निना **दह्यमान**मपि न ज्वलति); विधि **करितां** विधि स्फुरे (विधिं **कुर्वतः**—कुर्वाणस्य—नरस्य विधिः स्फुरति); वोखटें **करीत सातां** (अवक्षतं **कुर्वन्**) कव्हणीं गोमटेयातें न पवे; **खणतखणतां** खांब वोदरे (**खन्यमाने** स्तम्भः अवदीर्यते) एवं **वाढवित वाढवितां** अनिष्टातवं नरकासि भाजन होए (**विवर्धमानः**) हा जीवु **ईश्वरां मागतां** जन्म नेदी (ईश्वरेण **मृग्यमाणः** अपि).

[ॠ] पुढील वाक्यांत वर्तमानकालवाचकांचा अर्थ काय होतो तो पाहावा. जसें—**घेतें** द्वार साने (आंत प्रवेश होऊं **देणारें**); परमेश्वर **नव्हतें** पुरवीति (नसणारी गोष्ट); न **सुटतें** सूत्र (न सुटणारें).

[ए] पुढील वाक्यांतील क्रियापदांचीं रूपें लक्षांत ठेवावीं. जसें—हे बांद आम्हांसि दे : मग म्हणसी तें आम्ही तुज **देऊनि** (आम्ही देऊं) दृ०१६; मग तूं **मागसीं** तें **देऊनि : म्हणसी** तें **करूनि** (देऊं—करूं) दृ० १६; तीयें म्हणती : आम्ही बांद **मागौनि** (मागूं) दृ० १६.

[ऐ] पुढील वाक्यांतील जाडी अक्षरांत असलेल्या शब्दांचे अर्थ पाहावे; जसें—काउळा असे : तो चांचु करूनि अमेध्य **ऐसा** सारी : **ऐसा** सारी (एकीकडे—दुसरीकडे) दृ०१७; माता लेकुरुवांसि घांसु सूए : तें तोंड **ऐसें** पळवी : **ऐसें** पळवी (दृ०२५); तो हातीं (सुरी) घे : **ऐसी** पाहे : **ऐसी** पाहे (दृ०४०); माता आपुलिया लेकुरुवांसि पेहें दे : ते डुळकी : **मागौतें** दे : मागौतें डुळकी : **मागुतें** दे : **मागुतें** डुळकी (एकदां, दुसऱ्यांदा, पुनः एकवार) दृ०४४; तयाचें एक द्वार धरीजे **तवं आणिक वाहे :** तें धरीजे **तवं आणिक वाहे :** तें धरीजे तवं **आणिक वाहे** (एकदां, दुसऱ्यांदा, तिसऱ्यांदा) दृ० ७०.

[ओ] सतिसप्तमीचीं उदाहरणें:—**खाजें खाइलेयां** (खाद्ये खादिते) क्षुधानिवृत्ति होए; **परमेश्वर** प्रसन्न **जालेयां** (परमेश्वरे प्रसन्ने) जीवें काइ करावें; **मोक्षु जालेयां** (मोक्षे जाते) यातायात पारुखति; या रचनेच्या बाबतींत भा. इ. सं. मंडळ यांचें इतिवृत्त पाहावें (वर्ष १६ पृष्ठ १ लें); ही लकब मराठींत कशी आली याचें ऐतिहासिक दृष्टीनें स्पष्टीकरण त्या टाचणांत आम्ही दिलेलें होतें.

गाथा सप्तशतींतील पुढील उदाहरणें पहा:––पत्ते वि णअरदाहे (प्राप्तेऽपि नगरदाहे) २. ६३; दैवम्मि पराहुत्ते (दैवे पराभूते) ३. ४५; विरहे होत्तम्मि को जीअइ (विरहे भवति) २. २४ इत्यादि.

उमरावतीचे **प्रो. जैन** यांनीं संपादिलेल्या महाराष्ट्री अपभ्रंशांतील पुढील उदाहरणें पहा; जसें–**वयहं गयहं** धम्मु गउ (**व्रते गते** धर्मो गत:) साव० दोहा २०६; **वाहिहिं विणिवारयहिं** वेयण होइ न एक्क (व्याधिषु विनिवारितेषु वेदना एकाऽपि न भवति) साव० दोहा ४३; **अग्गिहिं उल्हावियहं** अवस ण उट्ठइ धूउ (अग्नौ आर्द्रीभूते–प्रशान्ते– अवश्य धूमो न उत्तिष्ठति) साव० दोहा ३९.

[औ] पुढील वाक्यांतील 'ऐसाही' या शब्दाचा अर्थ लक्षांत घेण्यासारखा आहे; जसें–तेंचि (इंद्रावण) देठीं निबर जालेयां तोडीजे तरि न तुटे। **ऐसांहीं** तोडीजे तरि मूळांसि वेलि हातासि ये ।। (निबर इंद्रावण तुटणार नाहीं; **इतकें असूनहीं असेंच निष्काळजीपणानें** तोडण्याचा प्रयत्न केला तर मुळासकट वेल हातांत येईल) दृ० ३५; जारसैलें वाळुक असे : तें खावोंचि न ए: **ऐसाही** मीठ मीरपुडी **लाउनि खाइजें** तरि तोंडीं खतचि पडे। दृ०३१; तो झाडोतां झडेना : तोडोता तुटेना : **ऐसाही** झाडोजे तरि धड तुटे परि झडेना। दृ०५६.

[अं] पुढील वाक्यांतील रूपें दिसावयास सारखीं असलीं तरी त्यांचें व्याकरण निरनिराळें आहे. १ एकी ठाइं **वैसौनि** (बसून, पूर्वकालवाचक) रोवंती दृ० ४७; २ तेलसाहाणे लावी: **तेणें करूनि** (त्या करण्यानें, त्यामुळे) शब्दयोगी अव्यय दृ० ४०; ३ आगी आंतु घालीजैल तरि **जळौनि जाईल** (नि:शेष खाक होईल) दृ० ४०; ४ तो म्हणे हे सुरी **लाउनि देया** (दृ. ४०); ५ लाभा**पासौनि** (पेक्षां) लाभ (लाभा-

पेक्षां अधिक लाभ; दृ० ३९; ६. हाटुवेळु नव्हे **भणौनि** वृक्षा एकातळीं नीजे (इति–उभयान्वयी अव्यय) दृ० ११; ७. म्हणसी तें आम्ही **देउनि** (देऊं; क्रियापद) दृ० १६; ८. इष्टा**पासौनि** काढुनि (पंचम्यर्थक शब्द० अव्यय) दृ० १८; ९. भार **आतौनि** पीके (बहरयुक्त असे होऊन, बहरपूर्ण) दृ० २८; १०. कानवाथरु असे : तो सीरसाळेयातें **व्यापौनि राहिला** असे (निःशेषं व्याप्तवान्) दृ० २९; ११. हें शास्त्र **आपण होउनि** कवणाचें घर न रिगे (आपण स्वतः) दृ० ४७; १२. एकीपरीचा उद्यम मात्र **करुनि** आपुलेया कुटुंबाचा नीर्वाहो **करुनि असति** (निर्वाहं **कुर्वन्तः** आसते; वर्तमानकालवाचक) दृ० ७२; १३ काउळा असे : तो **चांचु करूनि** (करवीं, द्वारें, प्रयोजक अर्थ) अमेध्य ऐसा सारी; दृ० १७; १४. सुटावेया**लागौनि** (लागीं; शब्द० अव्यय) दृ० १९; १६. तो पोट **भरूनि** जेविला (पोटभर; अव्यय) दृ० ९४.

[अः] साहाय्यक म्हटलीं जाणारीं क्रियापदें:–(ज्ञाने० दर्शन, साहित्यखंड, पान ४२ उ पाहा)–सेवाळलें खडक असे : तयावरि पावो **देउंचि न ए** (देतां येत नाहीं) दृ० २६; हातीं **घेउंचि न ए** (ग्रहीतुं न शक्यते) दृ० ३३; दूध तें हें म्हणौनि **पेवों** लागला (पातुं प्रवृत्तः) दृ. ४१; **खावों** बैसे (**खादितुं** उपविष्टः) दृ० ४२; जात्यंध हस्ती **पाहों** (द्रष्टुम्) गेले : दृ० ४३; सेजें आणिकासि **रीगों नेंदी** (गन्तुं न ददाति) दृ० ८५; तुतेनि करुनि गवत **घेउं** बैसला (ग्रहीतुं प्रवृत्तः) दृ० ५४.

या क्रियापदांविषयीं कै. राजवाडे यांनीं केलेल्या परिस्फोटांत (राजवाडे लेखसंग्रह, भाग २रा, पान १४–१५) 'करूं येते' यांतील मूळ क्रियापद 'ज्ञा'चा अवशेष आहे असें त्यांचें म्हणणें सयुक्तिक दिसतें. महाराष्ट्रीय प्राकृत व महाराष्ट्री अपभ्रंश यावरून तीच गोष्ट सिद्ध होते. (गाथासप्तशतींतील उदाहरणें पाहा).

१ अमिअं पाउअकव्वं **पढिऊं सोऊं** अ जे ण **आणन्ति**
अमृतं प्राकृतकाव्यं **पठितुं श्रोतुं** च ये न **जानन्ति** १–२

२ एको वि कालसारो ण **देइ गन्तुं** पआहिणवलन्तो
एकोऽपि कृष्णसारो न **ददाति गन्तुं** प्रदक्षिणं वलन् १–२५

वरील वाक्यांवरून 'पढूं, ऐकूं' हीं क्रियापदें नाहींत हें स्पष्ट दिसतें.

(क) कांहीं स्फुट वाक्यें:–आतांपर्यंत दाखविल्याप्रमाणें विविध प्रकारचीं वाक्यें या लहानशा ५०–५५ पानांच्या ग्रंथांत सांपडतात. त्यांपैकीं आणखी कांहीं वाक्यें देऊन हें प्रकरण आटोपूं.

१ दारीं **तीटत तीटत** ऐसें पाणी पडत होतें. दृ० ५४;

२ आंतुल सोनें **झळझळ** करीत **दीसताये**. दृ० ५४;

३ तें विषयाचीया **चाडा** (इच्छेनें, तृतीया) **गांवीचा गावीं** (गांवांतल्या गांवांत) घरवात करी. दृ० ५२;

४ देमती : **असीजे** ऐसें कुष्टियाचां धर्मीं (तुवां असावें; विध्यर्थ);

५ देवो माझा : मी देवाचा : ऐसियापरी **असीजो** कां (आज्ञार्थ, भावे, आस्यताम्–भूयताम्) दृ० ५३;

६ ऐसें देखौनि **घरीचा** गोसावी म्हणे (गृहस्थ–घरचा, घरांत असणारा, मालक) दृ०४९; ही षष्ठी नव्हे, प्रथमा होय.

७ **येथींचा** श्रेष्ठ तो **लोकींचा** नष्ट (अत्रस्थः) दृ०५५;

८ तुवां **जोडावें** : आम्हीं **खावें** : मागां **जोडीलें** तें आम्हांसीं (अस्माभिः सार्धं) **खादलें** : पुढां **जोडिसी** तें आम्हांसींचि **खासी**, या वाक्यांत वर्तमान-भूत-भविष्य तीन्ही काळीं क्रिया दर्शविली आहे. दृ० १६;

९ ऐणें जीयें पापें **केलीं आहाति** तीयें मी **जाणतु आहे कीं** (अनेन यानि पापानि **कृतानि सन्ति** तानि **जानन् असे**) दृ० ३३;

१० कव्हणी एकु कठोया असे : **देवतेचां-ठाइं** देवतेच्या ठिकाणीं-अष्टौप्रहर वेचला असे । एकु दीसीं **गांवींचां जेउं** बोलाविला (**ग्रामस्थैः**)

११ मग एकीदीसीं **गांवींचां** म्हणीतलें (ग्रामस्थैः भणितम्) तृती० दृ.९४;

१२ ऐसें **असत असतां** तया लेकुरुवांची माए सरली 'अथ गच्छता कालेन' या संस्कृत रचनेप्रमाणें, दृ० ९१; इत्यादि.

८. निरनिराळ्या विभक्तींच्या बाबतींत 'ज्ञानेश्वरदर्शन' या ग्रंथांतील निबंधांत विशेष विस्तारानें जें विवेचन केलें आहे तेंच येथें प्रायः लागूं पडत आहे. (साहित्यखंड, पान ३७–३८); म्हणून येथें कांहीं नमुन्यासाठीं उदाहरणें दृष्टान्तपाठांतून दिलीं आहेत.

प्रथमा--कव्हणी **एकु** देशाचा रीणाइ**तु** असे : दृ० ७३; कव्हणी एकु **रावो** असे : दृ० ७२; कव्हणी एक फुटाणे**कारु** असे दृ० ६६.

द्वितीया--तया **देशां** न वचावें; **गावां** हस्ती आला; नीगतेया**तें** देखौनि म्हणे; द्वितीयेचा 'ला' प्रत्यय या ग्रंथांत कोठेंही आढळत नाहीं.

तृतीया--तृतीयेचा **आ** प्रत्यय लागून झालेलीं रूपें विशेष ध्यानांत ठेवण्यासारखीं आहेत. (भा. इ. सं. मंडळ, वर्ष १६ ज्ञानेश्वरीचें पुराणत्व-चर्चा, मोडक-नेने, पाहा) चंदनाचिया **जवळिका** (सान्निध्यानें) सुशीतळता ए; या **वाटा** (वाटेनें) जासी तरी **चोरीं** (चोराकडून) नागवीजसी; **वाघें** खादला; **ईश्वरां** मागतां जन्म नेदी (ईश्वराकडून मागितलें असतांही); **वरिसां दीसां** कालें शास्त्र; **तुतेनिकरूनि** माती फेडी; तया**तवं** (त्यामुळें) तीयें वाढति; **परिसीं** (परिसाशीं) लोहो लावीजे; सर्वदळेसीं साउमा (सामोरा) जाए; कव्हणी लेकरु **काइसेनि** (कशानें) तरी बुझावी; तो **दोघांहीं** (द्वाभ्यां सह) जेवीला; **घणवरि** पीटितां (घणावर घण मारण्यानें); **माझेनि बापें** इत्यादि.

चतुर्थी—हितां वर्ते दृ. ३६; सुटावेया **लागौनि** उपावो करी; **भीक्षेसि** धडगोड ए; घरां **वसतीसि** जाए; **लेकुरुवां** जेउं वाढी; आपुलेया **शिष्यांसि** सराउ दे; लोक **पाहावेया** एति; इत्यादि.

पंचमी—तेथौनि तेयातें अन्तःकरणीं आठवी; ज्ञाना**पसि** प्रेम उत्तम; मळकर्मा**पासौनि** वेगळा; भीती **आडौनि** देखतु असे; **एथौनि** (आमच्याकडून-पासून) जीवाचीं कृतकर्में जाणिजेति; कर्मा**पासौनि** सोडवी.

षष्ठी—विद्ये**चां** ठाइं; कुष्टिया**चां** धर्मी; इत्यादि.

सप्तमी--चांदोवां (चांदव्यावर) आंबेयासारिखे आंबे देखे; **थडीए** वीए; रुंभणें **कोठां** देखीलें; **पाडाळीं** गाए बांधली असे.

९. विभक्तिप्रत्ययाऐवजीं शब्दयोगी अव्यय अथवा तो अर्थ दाखविणारें नाम त्या त्या विभक्तींत योजून कांहीं कांहीं वेळां अर्थ दर्शविला जातो. जसें-बाजे**बुडीं**, वृक्षा**तळीं** (खालीं); खांदीए**वरूनि** (हून); माहात्माचीए आधारीए (आधारीं, जवळ); तुतेनि **करूनि** माती फेडी; हा ठावो**वेऱ्हीं** (पर्यंत); भक्षावेया योग्य

(खाण्या**जोगें**) ; आपणेया **समान** (आपणा**सारखे**) ; ऐसीयापरी (अशा प्रकारें) जोगें, सारखें, प्रकारें हीं सध्यां शब्दयोगी अव्ययें बनलीं आहेत.

प्रस्तुत प्राचीन गद्यग्रंथांत **ला** प्रत्यय न दिसतां, 'लागीं–लागौनि' हे शब्द दिसतात. 'उद्देशें–दोषें' हे पद्यांत आढळणारे चतुर्थीदर्शक शब्द येथें मुळींच दिसत नाहींत. तरतमभाव दाखविणारा 'पासौनि' शब्द क्वचितच गद्यांत आढळतो.

१०. **सर्वनामें**––**जो** जेतुला **तो** तेतुलियातें करूं शके; **आपण** ऐलाडि असे : **तीयें** पैलाडि असेति; **एक** कवडे देखति **ते** कवडे भरीति; आगा : **मी** कल्पवृक्ष : प्रसन्न **जालां**; तूं **भलतेंही** करी पा (यथामति कोणतेंही कर); **तुं** म्हणसी **तें आम्हीं** तुज **देउनि** (देऊं); **तेणें** नाहीं लावीलें तें **तेयाचेनि** (त्याच्यानें) न फीटे; **यासि आपणपें** (आपण होऊन) दीजे तरि **हें** (आम्हीं) **आपणपें** दे; इत्यादि.

'एथौनि' व 'हे' यांच्या उपयोगाविषयीं ज्ञानेश्वरदर्शन साहित्यखंड, पान ५१ पाहावें; उदाहरणें––**हें** (चक्रधर स्वत:) जीवा अविद्ये विभाग करूं जाणे; **एथौनि** तुमचे दोष बाहीरि घालिजेति; आधीं **येथें** (चक्रधरांच्या ठिकाणीं) मग **येथचिया** परिवारावरि व्हावी.

११. **विशेषणें**––ज्ञानेश्वरदर्शन, साहित्यखंड, पान ३५–३६ पाहा.

[अ] नामाप्रमाणें जोडविशेषणें वापरण्याची तऱ्हा दिसून येते; जसें–गोरागोमटा, वोखटेंगोमटें; मळीनरोडकी, सानेथोर इत्यादि.

[आ] सार–लटिकें; साद्रव–कठीण; संतें–असंतें; वोला–कोरडा; सार–पोकळ; अक्षोभ्य–असलग; वगैरे **विरोधी** विशेषणें आढळतात.

[इ] तुटकी ऐसी बाज : तयावरि फाटकी एसी वाकळ; मोहरी एव्हडे खांड–इत्यादिकांतील 'उपमा' पाहावी.

[ई] **मोटका** पान्हा, **बरवें** वेव, **आदिवंत** उदक, **मैळा** चोरु, **सदर्थ** रावो, **उमेठां** शब्दीं; यांतील विशेषणें लक्षांत ठेवावीं.

[उ] नामापासून बनलेलीं विशेषणें—**सेवाळलें** खडक, **देहलुतैलें** वाळुक, **तान्हैलें** (तृषित–तृषा संजाता यस्य) बालक इत्यादि.

[ऊ] विशेषणांचा नामाप्रमाणें उपयोग––**जाणतेया** पसि : वर **नेणता** चांग (ज्ञात्यापेक्षां अडाणी बरा); तयाचें **म्हणीतलें** करीति

(तेन यद् **उक्तं** तत् कुर्वन्ति); **तळींव** (तळलेले पदार्थ); **सांबारींव** (कोथिंबीर घालून केलेले पदार्थ); **गांवींचा** (ग्रामस्था जनाः).

१२. **क्रियाविशेषणें**—नसुधा (केवळ), अवचट (एकदम, अकस्मात), पैऱ्हां (पलीकडे), निकें (खरें), खालीं, मागां, पुढां (हीं वास्तविक पाहातां सप्तम्यन्त नामें आहेत; पण उपयोग अव्ययासारखा आहे); **आवृत्ति** सेवी (पुनः पुनः); भीतरि; **आझुइं** (अद्यापि); **सापें** (सांप्रत); एऱ्हवीं, केधवा, तेव्हळीं, मागौता, परते, परौते, पाठीं (मा, मग); 'झणि' हें अव्यय गद्यांत येत नाहीं.

१३. **उद्गारवाचकें**–थैक (हैक); पापिणी, आगा, आये, आरे इत्यादि.

१४. आतां व्याकरणाच्या तौलनिक दृष्टीनें थोडासा विभक्तींचा विचार करून हें प्रकरण संपवूं. उमरावती येथील **प्रो. जैन** यांनीं अलीकडे प्रसिद्ध केलेल्या 'कारंजा जैन ग्रंथमालेकडे' प्राचीन मराठीच्या जिज्ञासूंचें जितकें लक्ष जावें तितकें अजून गेलें नाहीं. त्या मालेंतून **महाराष्ट्री अपभ्रंशाचीं** दोन तीन पुस्तकें बाहेर पडलेलीं असून, त्याचा प्राचीन मराठीशीं कितपत सांधा जुळतो याचा विचार करण्यासारखा आहे. म्हणून 'सावयधम्मदोहा' यांतील उदाहरणांवरून कांहीं गोष्टींचा येथें थोडक्यांत विचार करावयाचा आहे. कै. राजवाडे यांच्या वेळीं हे ग्रंथ उपलब्ध असते तर त्यांनीं यांचा चांगला उपयोग केला असता.

विभक्तींच्या रूपांचा प्रपंच पाणिनीय संस्कृतांत फारच होता; महाराष्ट्री प्राकृतांत (गाथासप्तशतीसारख्या ग्रंथांत) तो बराचसा कमी झाला; व त्यानंतर महाराष्ट्री अपभ्रंशांत विभक्तीचीं रूपें करणें त्याहूनही सोपें झालें असें दिसतें. कै. राजवाडे यांनीं आपल्या ज्ञानेश्वरीच्या मराठी व्याकरणांत अपभ्रंशभाषेचा उपयोग केलेला दिसतो, पण तो कोणता अपभ्रंश आहे, याचा त्यांत उल्लेख नाहीं.

[१] 'अपभ्रंशांत' प्रथमा व द्वितीया यांचीं रूपें सारखींच आहेत. एकवचनीं 'उ' व बहुवचनीं 'अ'कारान्त अशीं रूपें दिसतात. जसें—दुज्ज**णु** सुहि**यउ** होउ (दुर्जन सुखी होवो); जेण जगि सुय**णु** पयासियु (जेणें

जगीं सुजन प्रकाशिले) सा० दोहा २; या उदाहरणांत 'सुजणु, दुजणु' हीं रूपें ध्यानांत ठेवण्यासारखीं आहेत. गुरुउवएसियइं मग्गइ **णर** सिवपट्टणि **जन्ति** (गुरुउपदिष्टमार्गे **नर** शिवपट्टणा–शिवपुरीला–**जाति**) सा० दोहा ८. यांत 'नर' शब्द बहुवचनी आहे. नपुंसकलिंगी रूपें निराळीं आहेत. जसें–पाणिय विणु सुक्का**हं** सरवर**हं** (सप्तमी) पउमइं ण हुन्ति (पाण्याविणें सुक्या सरोवरांत **पद्में** होत नाहींत) सा०दोहा १८; येथें 'पउमइं' (पद्मानि) हें रूप मननीय आहे. जइ अणुराउ मुक्कउ (यदाअनुरागो मुक्तो भवति तदा) मंडण**इं** विमुक्क**इं** हुंति (मण्डनानि विमुक्तानि भवन्ति) दोहा २५; अनुराग सुटला कीं अलंकारावरील प्रेम सुटलें.

[२] **तृतीया**––संखे**वें** पयडक्खर**हिं** सावयधम्मु अक्खमि (संक्षेपेण प्रकटाक्षरैः धर्मम् आख्यामि) सा० दोहा१; संखेंवें (संक्षेपें), अक्खरहिं (अक्षरीं) हीं रूपें प्राचीन मराठीला जवळ आहेत. जिम वि**सें** अमिउ, तमि**ण** वासरु, कच्चे**ण** मरगउ (जेंवि **विषें** अमृत, **तमें** वासर–दिन–**काचें** मरकतमणी तेंवि) मा० दोहा० २; या उदाहरणांतील 'विसें, तमिण, कच्चें' हीं तृतीयेचीं रूपें असून एँ–एण–इण हे त्यांत प्रत्यय दिसतात. या प्रत्ययांत **इ** मिळविली कीं प्राचीन मराठीची तृतीया होते. मग्गइं (मार्गें) यांतील 'इं' प्रत्यय, मागील 'अ'च्या जवळ आल्यानें 'एँ' होतो. प्राचीन मराठींतील 'इतुलेनि, खतेनि, माझेनि बापें, हेंच सिद्ध करितात.

[३] **चतुर्थी–पंचमी–षष्ठी**–यांचीं रूपें अगदीं सारखींच आहेत असें म्हणण्यात हरकत नाहीं. एकवचनी 'हु' किंवा 'हि–हिं' असे प्रत्यय असून बहुवचनी 'हं' प्रत्यय आहे. **एकवचन**––सायरगय**हिं** समिल**हिं** (सागरगताय शैलाय, सागरगत शैलासाठीं) सा० दोहा २; दोष**हिं** रहिउ (दोषा**पासून** रहित) सा० दोहा ५; जूएं (जुव्यानें) धन**हुण** हाणि (धनस्य न हानिः) पर वय**हं** मि विणासु होइ (परंतु व्रतांचाही विनाश होतो) सा० दोहा ३८; एहु मज्ज**हु** दोसु (इदं मद्यस्य दोषः) सा० दोहा ४२; गोत्त**हु** (गोत्रस्य) जसधन हाणि (यशधनहानि) सा० दोहा ४८; दंसणभूमि**हिं** बाहिरउ (दर्शनभूमीच्या पासून बाहेर) सा० दोहा ५७; सुक्खफल आयस**हु** (आकाशात्) पडंति सा० दोहा ५७.

बहुवचन—भवजलगयहं जीवहं मणुयत्तणि संबंधु दुल्लहु (भव-जलगतानां जीवानां मनुष्यत्वे सम्बधः दुर्लभः—जीवांचा मनुष्यत्वाच्या ठायीं संबंध) सा० दोहा ३; संकाइयदोसहं रहिउ (शंकादिदोषेभ्यः रहितम्–दोषांपासून रहित) सा० दोहा १९; आयहं अट्ठहं अंतरि (एषां अष्टानाम् अभ्यन्तरे–या आठांच्या मध्यें) सा० दो० २२; ताहं धरि भोयणु अच्छउ (तेषां गृहे भोजनम् अस्तु) त्यांच्या घरीं भोजन तर राहोंच; सा० दोहा ३०; वेसाधरि पइसंतु (वेश्यागृहं प्रविशन्) सव्वहं गुणहं (सर्वेभ्यः) णरु मुच्चइ (नरः मुच्यते) वेश्येच्या घरीं प्रवेश करणाऱ्याची सर्व गुणांपासून मोकळीक होते, सा० दोहा ४४; चोरी बहुयकिलेसहं खाणि (चोरी बहुक्लेशांची खाण) सा० दोहा ४८; जेण अपत्तहं धणु दिण्णु (येन अपात्रेभ्यः धनं दत्तं) सा० दो० ८४; जेण चोरहं अप्पियउ (येन चोराय अर्पितं) सा० दो० ८४.

वरील वाक्यांतील चतुर्थी, पंचमी, षष्ठीची, बहुवचनाचीं रूपें व प्राचीन मराठींतील रूपें यांत साम्य आहे. 'ह'कार काढल्यास हीं रूपें मराठीप्रमाणें होतील; जसें–सर्वहं गुणहं (सर्वां गुणां); अपत्तहं (अपात्रां धन); चोरहं (चोरां अर्पित) जीवहं (जीवां संबंध) इत्यादि.

(४) **सप्तमी**–जगि (जगांत), घरि(घरांत); अंधारइं; (अंधारीं) यावरून एकवचनी रूपांत असणाऱ्या प्रत्ययांची कल्पना येईल; येथील 'इं प्रत्यय तृतीयेच्या प्रत्ययासारखाच दिसतो; व त्यामध्यें हकार मिसळल्यास 'हिं' प्रत्यय होऊन तो चतुर्थी–पंचमी–षष्ठी–यांच्या प्रत्ययाप्रमाणें होतो. बहुवचनी प्रत्यय 'हं' असून, तो चतुर्थी–पंचमी–षष्ठीप्रमाणेंच आहे. जसें–अग्गिहिं उल्हावियइं (अग्नौ आर्द्रीकृते) अग्नि ओला केला असतां; सा० दोहा ३९; कन्दइं उप्पाडियइं वेल्लिहिं पत्त समत्त (कन्दे उत्पाटिते वेल्लीनां पत्राणि समाप्तानि भवन्ति) सा० दोहा. ४५; बीयइं पाणियइं रुद्धइं अंकुरलद्धि रुद्धी (बीजेषु जले रुद्धे अंकुरलब्धिः रुद्धा भवति) सा० दोहा ४७; मणवयकायहिं दय करहि जेण ण ढुक्कइ पाउ (मनोवचन-कायैः दयां कुरु येन न आगच्छति पापं–पाप ढुकून पाहात नाहीं) सा० दोहा ६०; गेहिं (घरीं) कवेडउ देसियउ (कपटं यदि प्रविष्टं तदा) काइं ण काइं करेइ (किं किं न कुर्यात्–घरांत कपट शिरल्यास तें काय

काय करणार नाहीं) सा० दोहा ६२; सिप्पिहिं (शिपलींत) गयउ साइय जलु (गतं स्वातिजलं) रवण्णु मुत्तिउ होइ (रमणीयं मौक्तिकं भवति) सा० दोहा ९१.

वरील उदाहरणें लक्षांत घेतल्यास तृतीयेपासून सप्तमीअखेर बरीचशीं रूपें एकप्रकारचे सारखेच प्रत्यय लागून होत असल्यानें रूपें करण्याचें काम बरेंचसें सोपें झालें आहे. हेंच साम्य जुन्या मराठी विभक्तींत दिसून येतें. जसें--**दृष्टी** (दृष्टीनें) पाहे; अंतः**करणीं** (मनानें) आठवी; इत्यादि तृतीयेच्या रूपांप्रमाणें **गावीं**, घरीं, इत्यादि सप्तमीचीं रूपें दिसतात. **वाटा** (वाटेनें) जाए, **चाडा** (इच्छेनें) या रूपांतील तृतीयेचा 'आ' व **कोठां** रुंभणें देखीलें, **चांदिवां** आंबें देखिलें या सप्तमींचा 'आ' सारखा वाटतो. अन्न **जेविलेयां** (सप्तमी) भूक तरि जाये : अमरां (तृतीया) नव्हीजे (अमरैः न भूयेत) दृ०२२; दोन्ही हातु **कींवीयां** (कृमिभिः तृ०) भरीति दृ० ३३; **जीवेश्वरां** (षष्ठी) स्वामीभृत्य संबंध अनादीचा (दृ० ३६); **हितां** (चतुर्थी) प्रवर्ते; **लेकुरुवां** (चतुर्थी) जेउं वाढी; लोक **पाहावेया** (चतुर्थी) एति. प्राचीन मराठींत **पंचमीचीं रूपें** यासारखीं दिसत नाहींत.

१५. क्रियापदांच्या रूपांच्या बावतींत महाराष्ट्री व अपभ्रंश यांत विशेष फरक नाहीं; पण साहाय्यक क्रियापदाची ही प्रथा कोठून आली व प्राचीन मराठींत विशेष प्रमाणांत केव्हां दिसूं लागली याची फोड अजून झालेली नाहीं. (ज्ञानेश्वरीदर्शन, पान ३२, साहित्यखंड, पहा).

१६. सारांश, 'ज्ञानेश्वरीदर्शन' (भाग १) साहित्यखंड, यांतील निबंध एकवार वाचण्याबद्दल विनंति करून हें परिशिष्ट संपवितों.

[ग्रंथसमाप्तिकाल ता. २१ डिसेंबर १९३६]

समाप्त

C

309